
सिंधु
ते
कृष्णा
टी. बी. लुल्ला | किशोर लुल्ला

सांगली येथील करसल्लागार

**तोताराम भोजराज लुल्ला**

आणि

**किशोर लुल्ला**

यांचे आत्मकथन

# सिंधू ते कृष्णा

•

# सिंधू ते कृष्णा

संकलन व शब्दांकन

**वसंत आपटे**

किर्लोस्करवाडी-सांगली.

प्रकाशक

**किशोर लुल्ला**

अभ्यंकर कॉम्प्लेक्स, आमराई रोड, सांगली ४१६४१६

ई-मेल : lullakishor@gmail.com

**श्री.झमटमल वाधवानी**

यांच्या हस्ते यातील पहिला भाग

शनिवार दिनांक ३ मे २००३ रोजी प्रकाशित झाला.

'माझी इनिंग'सह पूर्ण पुस्तक

गुरुवार दि.११ ऑगस्ट २०१६ रोजी, 'मातृवंदना' या कार्यक्रमात

**श्री.विवेक घळसासी**

यांच्या हस्ते प्रकाशित झाले.

त्यानंतरच्या कालावधीत ज्या घडामोडी झाल्या, त्या अनुषंगाने काही बदल करून

तिसरी आवृत्ती

शुक्रवार, दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध केली

मुद्रक

**सार्थक ऑफसेट, सांगली**



**कै.भोजराज राधाकिशीनदास लुल्ला**

श्रद्धा आणि श्रम यांचे सूत्र
आमच्या हाती देणाऱ्या भाऊंच्या स्मृती सोबत होत्या,
म्हणून 'सिंधू ते कृष्णा' हा प्रवास
तृप्ती आणि समाधान देणारा ठरला.
त्यांच्या स्मृतीस.....

# प्रकाशकीय

वीस वर्षांपूर्वी 'सिंधू ते कृष्णा' या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली, त्यावेळी पुस्तकाचे असे इतके स्वागत होईल अशी कल्पना केली नव्हती. ते पुस्तक माझ्या वडिलांच्या व्यक्तिगत आठवणींच्या स्वरूपात असले तरी, देशाच्या फाळणीनंतर झालेली लाखो सिंधी कुटुंबांची वाताहात आणि त्यानंतर इथे प्रयत्नपूर्वक सुस्थिर केलेले जीवन, असा विषय लोकांना खूप भावला.

त्यांच्या निधनानंतर माझी इनिंग मी त्यास जोडली आणि दुसरी आवृत्ती प्रकाशित केली. केवळ माझी हौस म्हणून हे पुस्तक छापले आणि येईल जाईल त्याला वाटून संपवले, - इतके त्याचे स्वस्त गळेपडू स्वरूप नव्हते. मला त्यातून काही मिळकत व्हावी असा उद्देश तर निश्चितच नव्हता. पण घेणाऱ्याला आणि वाचणाऱ्याला त्यात खूप स्वारस्य वाटून गेले ही गोष्ट निर्विवाद खरी आहे. आता माझ्या वानप्रस्थी टप्प्यावर त्यात काही बदल करून, माझ्या आयुष्यभराच्या अनुभवातून आलेले थोडेसे विचार मांडत ही तिसरी आवृत्ती प्रसिद्ध करीत आहे. पूर्वी ज्यांनी हे पुस्तक वाचले असेल त्यांच्यासाठी फारच थोडे नवीन आहे. तरीही आधीच्या दोन आवृत्त्यांच्या अनुभवावरून अशी अपेक्षा करण्यास जागा आहे की, हे पुस्तक नव्याने ज्यांच्या हाती पडेल ते मोठ्या औत्सुक्याने हा विषय आणि त्यामागचा हेतू समजून घेतील. मला तेवढे समाधान पुरेसे आहे.

ही आवृत्ती प्रसिद्ध करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचेच आभार व्यक्त करतो, पण या संपूर्ण पुस्तकाची जबाबदारी पेलणारे आणि उत्कृष्ट शब्दांकन करणारे माझे कुटुंबस्नेही वसंत आपटे, त्यांचे सहकारी शिशिर गुर्जर, तसेच सार्थक ऑफसेटचे सुनील चव्हाण आणि मला सहकार्य करणाऱ्या मुग्धा अभ्यंकर यांचा नामोल्लेख केला पाहिजे.

हे पुस्तक आमच्या कुटुंबापुरते न राहता प्रत्येक कुटुंबाचे होऊन जाईल असे वाटते.

**– किशोर लुल्ला**

# भूमिका

साधारण १९६० पासूनची चार दशके तोताराम भोजराज(टी. बी.) लुल्ला हे करदात्यांच्या जगात एक प्रतिष्ठित असे नाव होते. त्यांनी वयाची एक्काहत्तरी ओलांडल्यानंतर त्यांना निवृत्तीचे वेध लागले, त्या निमित्ताने त्यांच्या कामाबद्दल आणि आजवरच्या योगदानाबद्दल सामुदायिक कृतज्ञता व्यक्त व्हावी अशी कल्पना पुढे आली. अशा प्रसंगी त्यांच्या गौरवपर एखादा अंक निघावा ही पद्धती आहे. पण ती प्रत्यक्ष या गौरवमूर्तीला रुचणारी नव्हती. आम्हालाही त्यात स्वारस्य वाटेना.

श्री.लुल्लांच्या आयुष्यक्रमाला दुसऱ्या एका दृष्टिकोणातून अतिशय महत्त्व आहे. ते म्हणजे, भूतपूर्व सिंध प्रांतातून आपल्या देशाच्या फाळणीनंतर विदीर्ण अवस्थेत इकडे आलेली ही व्यक्ती अग्निरक्षेतून पुन्हा जीवन फुलविणाऱ्या सिंधी जिद्दीचे प्रतिनिधित्त्व करते. पूर्वपरंपरेतील कौटुंबिक समृद्धी पायतळी टाकून श्री.लुल्ला मुंबईत आले. रेल्वेगाडीत गोळ्या विकून दिवस काढल्यानंतर ते लखपती बनले, अनेक परिचितांचे, कार्यकर्त्यांचे 'डॅडी' बनले. परिस्थितीची ही वळणे एखाद्या कथा-कादंबरीत शोभतील इतकी मनोवेधक आहेत. म्हणून ती पुस्तकरूपाने शब्दबद्ध व्हावीत असे योजिले.

याही कल्पनेस मर्यादा पडल्या. कारण एकतर स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांच्या आयुष्यक्रमासंबंधी एक चिठोरेदेखील हाती लागण्याचा संभव नव्हता. श्री.लुल्ला यांचे वास्तव्य पन्नास वर्षे मराठीत झाले तरीही या भाषेतील वाटा नि वळणे त्यांच्या 'जीभवळणी' पडली नाहीत. त्यांनी स्मृतीला ताण द्यावा आणि त्यातून झिरपेल त्याची साठवण करून त्यास लिखित मराठी भाषेचे रूप द्यावे असा हा प्रयोग केला आहे. यातील घटनाक्रमात घोटाळा असू शकतो, पण यातून श्री.लुल्ला या व्यक्तीचे आश्चर्यजनक जीवन वाचकांस समजून येईल आणि स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर त्यांनी भोगलेले भोग कळून येतील. श्री. टी. बी. लुल्ला यांच्या  एकाहत्तरीच्या निमित्ताने, वीस वर्षांपूर्वी ही जीवनकथा प्रथमच प्रकाशात आली.

त्यांनी रुळवलेल्या पायवाटेवर चालून त्या वाटेचा राजस मार्ग बनविणारे किशोर हे चांगल्या अर्थाने बापसे बेटा सवाई ठरले. धनवंताचे सुखासीन आयुष्य उपभोगत राहण्याऐवजी चळवळ्या किशोर यांनी समाजाचे भोग कमी करण्याचा प्रयत्न चालविला. त्या सगळ्या अनुभवांतून एक सुंदर जीवनप्रवाह वाहात असलेला दिसतो. सिंधूपासून कृष्णेपर्यंत वाहात आलेल्या या जीवनप्रवाहातून, त्याचे अवगाहन करणाऱ्यांस नवचैतन्य लाभेल अशी अपेक्षा

होती, ती सफल झाली हे वास्तव आहे. म्हणून त्या कथेचा उत्तरार्ध दुसऱ्या आवृत्तीत समाविष्ट करून तो २०१६ साली प्रकाशित केला. गेल्या सात आठ वर्षांत हे पुस्तक ज्यांच्या वाचनात आले त्यांना त्याचे वेगळेपण जाणवल्याचे निश्चितपणे सांगता येईल. आता त्याची पुढची तिसरी आवृत्ती करण्याचे ठरल्यावर स्वाभाविकच या कालावधीतले बदल त्यात नोंदविणे ओघानेच आले. म्हणजे साधारण पाऊणशे वर्षांची लुल्ला कुटुंबाची ही प्रवाही कथा तयार झाली.

माझा या वाहत्या-वाढत्या कुटुंबाशी घरोब्याचा संबंध जुळावा हा एक अजब योग आहे. तोतारामजी लुल्ला यांना आम्ही मित्रमंडळी 'डॅडी' कधी म्हणू लागलो, ते कळले नाही. वास्तविक हे डॅडी अथवा किशोर माझ्या वयाचे नव्हेत. डॅडी - दीपक - किशोर - किंवा हे सगळेच कुटुंब - माझ्या दृष्टीने एका प्रांतीचे नाही; भाषा भिन्न; चालीरीती साज-सरंजाम वेगळे; व्यवसाय एक नाही; आर्थिक स्थितीत तर कुठल्या कुठे फरक. श्रद्धा समजुती निराळ्या; वाचन पठण संस्कार आहार सवयी सगळे निराळे! तरी हे ऋणानुबंध जुळून आले आणि ते दृढ होत गेले. बहुधा त्यांनाही या गोष्टीचे आश्चर्य असेल, कदाचित ओझेही वाटत असेल... ! असो.

या कुटुंबकथेचे दोन नायक आहेत. त्या दोघांच्या राहण्या-वागण्यात फरक आहे पण वैशिष्ट्ये सारखीच आहेत. डॅडी - किशोर - अमृता अशी जोडणी मला जास्त जुळणारी वाटते. बाकीचे सदस्य लुल्ला कुटुंबातलेच आहेत; तरीही या तिघांच्या अंतरंगात एक सामाजिक बंध आहे तो मला जास्त आकर्षून घेतो. परिचयातल्या प्रत्येकाचा स्वभाव, त्याचे हेतू, त्याच्यातले मानवी गुणदोष आणि व्यवहार यांच्याशी प्रसन्न मिश्किलीने पाहात ते तिघेजण वागतात. त्यामुळेच आयुष्यातल्या बऱ्यावाईट प्रसंगांत, सुखदुःखांत ते सहजपणे रमतातही आणि त्यांचा त्रयस्थपणे आस्वादही घेऊ शकतात. या पद्धतीचे मला वाटणारे आकर्षण, हेच त्या कुटुंबाशी माझे 'जमून जाण्या'चे कारण असावे.

या कथेचा पहिला भाग टी.बी. लुल्ला यांचा आहे. त्यांच्या उतारवयात ते अंथरुणावर आरामात पहुडलेले आणि मी त्यांच्याजवळ बसून बोलणे ऐकत, विचारत राहिलेला. ते त्यांचे कथाकथन कागदावर उतरल्यानंतर डॅडीनाही ते आवडले. दुसरा भाग म्हणजे किशोर यांचा डाव. त्यातल्या बऱ्याच घडामोडी माझ्या मैत्रकाळातल्या असल्यामुळे त्या मांडत जाण्याचेच काम माझ्याकडे होते. पुढची तिसरी आवृत्ती करायची, तर मधल्या काळातील बदलांच्या अनुषंगाने थोडे फेरफार करून घेतले. मुख्यतः समारोपासाठी वानप्रस्थाच्या दुसऱ्या टप्प्यावर येताना, आजवरच्या वाटचालीतून मनाच्या तळकप्प्याशी साठलेले विचारसंचित हे पुढच्यांसाठी प्रगट करावे हे सयुक्तिक होते. काही कौटुंबिक किंवा वैयक्तिक बाबतीतली मते खुली करणे वाचकांसाठी नीरस होण्याची शक्यता वाटली, पण हे कथन म्हणजे 'भविष्या'तल्या कुणासाठी 'ऐतिहासिक' ठरू शकेल असा दृष्टिकोण ठेवला. तरीही ही पाऊण शतकाची कथा म्हणजे कंथा(गोधडी) होऊ नये इतपत काळजी घेतली आहे.

या पुस्तकाच्या नायकांची एक सुसंबद्ध जीवनकथा उलगडावी असा हा प्रयत्न आहे. रोचक वाटेल इतपत लालित्य त्यात वाचकांना जाणवले तर तो प्रयत्न यशस्वी म्हणायचा!

**– वसंत आपटे**

# *प्राक्कथन*

*'वाटणी' हा शब्दही भारतीय मनाला विलक्षण वेदना देणारा आहे; तेथे 'फाळणी' हा शब्द केवढा पीडादायी असू शकतो याची कल्पनाच केलेली बरी! या शब्दाला अनेक छटा आहेत. विविध पैलू आहेत. राष्ट्रीय मनावर झालेल्या एका अमिट व्रणाचा ठसठसता संदर्भही आहे. त्याचमुळे 'भारत-पाकिस्तान' फाळणीचा स्पर्श असणारे काही वाचताना, वाचकाचे मन आधीच काहीसे व्याकूळ झालेले असते. साहित्य आस्वादनात असा पूर्वग्रह योग्य नसतो, हे कितीही पटले तरी राष्ट्रीय स्पंदनांशी नाते असणारा कोणीही याच भावस्थितीत जातो हेही खरेच!*

*'सिंधू ते कृष्णा' हे पुस्तक काही वर्षांपूर्वी वाचण्यासाठी मी हाती घेतले होते, तेव्हा माझी अवस्था तरी अशीच होती. पण पुस्तक वाचत गेलो तेव्हा थोडा वेगळा अनुभव आला. कारण 'फाळणी'ची मीमांसा करणारे हे पुस्तक नव्हते. फाळणीमुळे आपला देश-मुलुख सोडून एका 'निर्वासिताचे' जगणे वाट्याला आलेल्या आणि पाकिस्तानातील गाव सोडून हिंदुस्तानात येऊन, स्थैर्य मिळवण्याच्या प्रयत्नात यशस्वी झालेल्या एका कुटुंबाची ही कहाणी वाचताना वेगळाच पट डोळ्यासमोर उलगडत गेला.*

*सिंध प्रांतातून मुंबईत येऊन, रेल्वेत गोळ्या पेपरमिंट विकून उपजीविका भागवणारा एक सिंधी तरुण, कृष्णाकाठी सांगलीत येऊन सुखवस्तूच नव्हे तर हेवा वाटावा अशा संपन्नतेचे जीवन जगतो, ही एक गोष्टही कादंबरीचा विषय व्हावा अशी आहे. फाळणी, त्यानंतरची क्लेशदायक फरफट, जमिनीवर पाय टेकण्याची धडपड, जगण्याचा संघर्ष, सरकारी नोकरी, करसल्लागार म्हणून लौकिक.... या अनुभवांतून घडत, कृतार्थतेचा टप्पा गाठलेल्या टी.बी.लुल्ला यांना 'लिहिते' करण्याची इच्छा आप्त-मित्रांना होणे स्वाभाविकच होते. त्यातूनच ते पुस्तक सिद्ध झाले.*

*कै.लुल्ला यांच्यानंतर, व्यावसायिक यशाची कमान उंचावत नेण्याचे काम त्यांच्या मुलाने केले. श्री.किशोर लुल्ला यांनी उत्तम व्यवसाय केला, मोठे नाव मिळवले. भरभरून पैसा मिळवला आणि तसाच तो दोन्ही हातांनी योग्य कामासाठी निःसंकोचपणे दिला, आजही देत आहेत. यशातून अधिक यशाकडे चाललेला हा प्रवास श्री.किशोर लुल्ला यांनीही शब्दबद्ध करावा, असा आग्रह त्यांच्या मित्रांनी धरणेही स्वाभाविक आहे. तो आग्रह श्री.किशोर यांनी मान्य केला आणि एक छान पुस्तिका तयार झाली.*

*कै.टी.बी.लुल्ला यांच्या मूळ 'सिंधू ते कृष्णा' या पुस्तकाचा विस्तार म्हणजे श्री.किशोर यांचे लिखाण! पिता-पुत्राचे आत्मनिवेदन आज एकत्र, एकाच पुस्तकाच्या रूपात आपल्यासमोर येत आहे, मी त्याचे स्वागत करतो. मराठी आत्मनिवेदनात्मक पुस्तकांत,*

*अशा प्रकारचे पुस्तक कदाचित पहिलेच असेल. दोघांच्या निवेदनाचा मनावर ठसणारा गुण म्हणजे प्रतिपादनातील सरळपणा! सरळपणाची दोन कारणे मला वाटतात. दोघेही साहित्यिक नसल्याने ते 'आकृतीबंधा'च्या, अलंकारिकतेच्या जंजाळात सापडले नाहीत, आणि समीक्षकांच्या पसंती-नापसंतीची ते पर्वाही करत नाहीत. दुसरे कारण, ते आहेत यशस्वी व्यवसायिक! घोळ घालण्यापेक्षा सरळ मुद्द्याला हात घालणे हा दोघांचाही स्वभाव! सरळ मांडणीमुळे वाचक, प्रतिपादनाच्या प्रवाहाशी सहज मैत्र साधू शकतो आणि वाचन सलगपणे पार पडते.*


*प्रांजळपणा हा दुसरा गुण या लिखाणात आहे. आपण सरकारी नोकरीत 'खुशी' घेत होतो हे टी.बीं.चे सांगणे काय; किंवा निर्वासनानंतर स्थैर्याची काहीशी ऊब लाभताच पैसा आणि इस्टेटीवरून झालेले तंटे, त्यांच्या आईच्या मृत्युपत्रावरून झालेला बेबनाव काय, अथवा नंतर स्वकीयांत निर्माण झालेला दुरावा काय.... हे कसल्याही भाष्याशिवाय मांडणे सोपे नव्हे. हाच प्रांजळपणा श्री.किशोर यांच्या लिखाणात आहे. आई-पत्नीतली मतभिन्नता, वेगळे राहण्याचा निर्णय, वडिलांच्या मृत्यूवेळी दूर असल्याने आपली वाट न पाहाता अंत्यसंस्कार पार पाडा असे सांगणे, आणि व्यवसायातील प्रसंगाने जाणवणारी घालमेल श्री.किशोर प्रांजळपणे मांडतात!*

*श्री.किशोर यांच्या मांडणीतील विचारपूर्वक अनुकरण करावा असा भाग, लिखाणातील शेवटचे उतारे व्यापून राहिला आहे. विवाहाला तीस वर्षे झाल्यावर वानप्रस्थाश्रमी होण्याचा विचार मनात येणेही खूप मोठे आहे. हा वानप्रस्थ म्हणजे समाजकार्यात जीवन व्यतीत करणे; असे त्यांना वाटते हे महत्त्वाचे! 'पैशाची फारशी चिंता नाही आणि मुला-नातवंडांची बेगमी झाल्यानंतर अधिकचा पैसा समाजाला अर्घ्यदान म्हणून अर्पण करण्याची बुद्धी परमेश्वराने दिली आहे. हे समाजाचे देणे देऊन जोपर्यंत माझी मालमत्ता संपत नाही, तोपर्यंत साक्षात यमराजही मला वर नेऊ शकणार नाही, असा विश्वास बाळगून, मावळत्या प्रत्येक दिवसाला माझा हिशोब देत मी तूर्तास आनंदाने राहात आहे' ही त्यांची भावना प्रत्येक प्रापंचिकासाठी आदर्श आचारसंहिताच आहे.*

*या संयुक्त आत्मकथनाचे मन:पूर्वक स्वागत करून, श्री.किशोर लुल्ला यांच्या सर्व संकल्पांना, माँ भारती शतप्रतिशत यश देवो; अशी सदिच्छा प्रकट करतो.*

***– विवेक घळसासी***

*महालक्ष्मी मंदिराजवळ*
*जयप्रकाशनगर, नागपूर*



‘मी जे अनुभवले
त्याचे स्मरणसुद्धा मला आता मनोरंजक वाटते आहे.
माझे मन, माझा स्वभाव, माझ्या सवयी,
माझे एकूण वागणे..... एकूण मी हा असा...
आता मी स्वत:च थोड्याशा अलिप्तपणाने पाहू शकतो.’

# ।। अनुक्रम ।।


**टी.बी.लुल्ला**

| | |
|---|---|
| स्थळकाळाच्या अतीत | १५ |
| आमच्या मुलखात | १७ |
| आठवते ते असे | २१ |
| आमच्या गोकुळात | २४ |
| शाळा व शालान्त | २६ |
| होत्याचं नव्हतं | ३० |
| सीमा ओलांडल्या | ३३ |
| मिळालं ते आपलं | ३५ |
| जीवनचक्र फिरू लागलं | ३८ |
| फटिंग ते गृहस्थी | ४२ |
| जीवनचक्र फिरत आहे | ४९ |
| ढळला रे ढळला दिन.... | ५८ |
| बहुतांची अंतरे | ६२ |

**किशोर लुल्ला**

| | |
|---|---|
| माझी इनिंग | ७६ |
| डॅडींचे निर्वाण | ७७ |
| माझे डॅडी | ८२ |
| वारा प्यालेले वासरू | ८८ |
| व्यवसायाला लागलो | ९४ |
| लग्नाची सुखद बेडी | ९७ |
| घरगृहस्थी | १०० |
| विक्रीकर संघटनांमधून भरारी | १०६ |
| आमचे ऑफीस | ११० |
| केल्याने देशाटन | ११६ |
| ग्राहक पंचायत | १२० |
| इस्टेट डेव्हलपर्स | १३० |
| चळवळींचा विचार | १३५ |
| व्यक्तीकडून समष्टी | १३९ |
| सासऱ्याच्या भूमिकेत | १४४ |
| प्रतिष्ठानचे शिक्षण | १५४ |
| दानं संविभाग: | १६४ |
| लांबत चाललेल्या सावल्या | १७२ |

□

## स्थळकाळाच्या अतीत

आमच्या प्रशस्त बंगल्यात कोणीही नव्हतं.
माझी पत्नी कुठेतरी प्रवचनाला म्हणून गेली होती.
किशोर त्याच्या धंद्याच्या व्यापासाठी बाहेर,
आणि सुनेला माझ्या नातवंडांनी मघाशीच ओढून बागेत फिरायला नेलं होतं.
आज मी दिवसभर घरीच होतो.
किरकोळ वाचन, थोडावेळ टीव्ही, आणि जेवणखाण उरकून
बाकीचा वेळ तसा लोळूनच काढला. हल्ली बऱ्याचदा असं होतं.
कामात बुडून गेलो की मला दिवसच नव्हे तर रात्रही पुरत नसे.
पण हल्ली मी मोकळा असलो की काही सुचत नाही.
घरातल्या प्रत्येकानं बाहेर जाताना मला, 'तुम्ही येताय का?' म्हणून
विचारलं होतं.
– आणि सगळ्यांना मी 'नाही' म्हणालो होतो.

'अतीत' बंगल्याच्या दाराशी छानपैकी झोपाळा करून घेतलेला आहे.

स्वैपाकघरातल्या टेबलाशी बसून मी मघाशी घोटभर दूध घेतले.
मोकळा कप ठेवून मी झोपाळ्याशी आलो.
सळ्यांना तक्क्या टेकला होता. मी त्यावर रेललो.

बाजूला पडलेले सकाळचे वृत्तपत्र उचलले. पण चष्मा आतच राहिला होता. उठून तो घेऊन येणे जिवावर आले. डोळे बारीक करून नजर दिली तर अजूनी अक्षर दिसते; तेवढे यावेळी मला पुरेसे होते.
पहिल्या पानापासून त्याच त्या बातम्या.
पंतप्रधान असे म्हणाले, विरोधक तसे म्हणाले,
एक अपघात आणि भाषणबाजीचा एक फोटो.
पानाच्या साधारण मध्यावर पाकिस्तानमधील एक बातमी,
तिथल्या सरकारविरुद्ध असंतोष प्रकट करण्यासाठी
सिंध प्रांतात काही घडामोडी, शिकारपूरमध्ये सभा....
मी ते वृत्तपत्र बाजूला टाकले.

सूर्य पार खाली गेला होता.
झाडांच्या नि घरांच्या सावल्या सभोवती लांबत चालल्या होत्या.
धूळ आणि धूर उंच चढल्यामुळे त्याला उन्हाचा तांबूसपणा आला होता.
मी डोळे अर्धवट मिटून पडलो होतो.
डोळ्यासमोर तीच धूसरता दाटली होती. पण त्यातूनही मला मघाशीच नजरेखाली येऊन गेलेले ते शिकारपूर स्पष्ट दिसत होते.
आमचे शिकारपूरचे प्रशस्त घर, त्याचे उंच छप्पर,
त्यावर पडलेले तसेच तांबूस कोवळे संध्याकाळचे ऊन.....
त्या प्रकाशात मला सगळे शिकारपूर दिसू लागले.
रस्त्यावरून घरात शिरणारा बारा-चौदा वर्षाचा मी,
आजही समोर पाहात होतो.

सिंध प्रांतातले आमचे शिकारपूर.....

□

# आमच्या मुलखात

त्या वेळच्या हिंदुस्थानच्या वायव्य दिशेला सिंध-पंजाब-बलुचिस्तान ही राज्ये मुस्लीम बहुसंख्येची होती. पण हिंदु-मुसलमान लोकांत आजच्यासारखी तेढ नव्हती. पंजाबची राजधानी लाहोर शहर हे सुसंस्कृत, अभिजात कला आणि शिक्षणाचे केंद्र होते. तसेच ते राजकीय जागृतीचे शहर होते. सध्याच्या महाराष्ट्रातले पुणे, किंवा मध्य भारतातले इंदूर ही शहरे ज्यांना माहीत आहेत, त्यांना त्या काळच्या लाहोरची कल्पना येऊ शकेल. उत्तर टोकाची सिंधू नदी ही या सर्व भूप्रदेशाची जीवनसरिताच मानावी लागेल. पाच-सहा हजार वर्षांपूर्वीची प्राचीन सिंधू संस्कृती म्हणजेच भारतीय-हिंदू जीवनपद्धतीचा उगम मानला जातो. मोहेंजोदरो आणि हडाप्पा ही सिंध प्रांतातली स्थाने इतिहासाच्या ढिगाऱ्यात गाडली गेली, त्याचप्रमाणे माझ्या आठवणीतला सिंधू नदीचा रमणीय - चैतन्यदायी प्रदेश, आज धार्मिक विद्वेषाच्या कराल विळख्यात सापडून अस्तंगजीव झाला आहे.

आमचे शिकारपूर हे गाव सिंधूकाठी वसलेले आहे. प्रसिद्ध सक्करचे धरण आमच्या वरती सुमारे चाळीस किलोमीटरवर होते. एरवीही सिंधू नदी सतत वाहातच असे, पण धरणाच्या खाली आमचे गाव असल्यावर पाण्याची टंचाई कशी असणार? शिकारपूर -सक्कर - मुलतान ही मोठी गावे झाडीजंगलांची नव्हती, पण तिथे शेतीवाडी बरी असे. शिकारपूर हे बहुतांशी हिंदू वस्तीचे गाव होते. तिथे पन्नास-साठ टक्के हिंदूच असत. मुस्लीम बाकी वीस-पंचवीस टक्के. लाहोरमध्ये पंजाबी हिंदू-शिखांची संख्या मोठी होती, पण शिकारपूर - सक्कर ही शहरे स्पष्ट रीतीने हिंदूच होती. अर्थात भौगोलिक सलगतेचा मुद्दा मान्य करून ही गावे नंतर पाकिस्तानात जाणे अपरिहार्य म्हणावे लागेल.

आमचे लुल्ला कुटुंब शिकारपूरचे पिढीजात परंपरागत रहिवासी होते. माझे आजोबा राधाकिशनदास हे गावातले संपन्न गृहस्थ होते. त्या काळच्या तालेवार गृहस्थी रिवाजानुसार शेतीवाडी - व्यापारउदीम - वाडाहुडा - भाऊबंद - पोरंबाळं हा सगळा पसारा लुल्ला कुटुंबाने विस्तारलेला होता. मला आजोबा आठवत नाहीत, पण माझ्या वडिलांचे व्यवहार व त्यांची राहणी मी जन्मापासून पाहिली, त्यावरून आजोबांनी माझ्या वडिलांकडे जे वारशाने दिले त्याची सहज कल्पना येई. वडिलांनी त्या सर्वांचे जतन तर केलेच पण आपल्या कर्तृत्त्वाने - शक्तीने त्यात भर घालण्यासही तडफेने सुरुवात केली होती.

शिकारपूर हे गाव व्यापारी शहर म्हणूनच प्रसिद्ध होते. धान्य व जीवनोपयोगी वस्तूंची मोठी पेठ होती. इथला सगळा व्यापार हिंदू लोकांकडेच होता. मोलमजुरी, शेतकाम करणारे मुस्लिम असत. मुस्लिम स्त्रिया क्वचित कामाला येत. पण नागरी स्वरूपातील नोकऱ्या, शिक्षण, व्यापार, सरकारी कामकाज यांमध्ये आमच्या शहरात हिंदूंचे प्राबल्य होते. अर्थात इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, तसा धार्मिक भेद फारसा कुणाच्या लक्षातही यायचा नाही.जीवनपद्धती अशी होती की, व्यापारी व्यापार करीत आणि मजूर मजुरी करत. त्यात धार्मिक उच्चनीचतेची अस्मिता किंवा चीड-चडफडाट नव्हता. असलाच तर तो समजण्याचे माझे वयही नव्हते. या पेठेतील दुकाने १९४४च्या सुमारास एकदा आगीत सापडली होती.

या शहरात आम्हा लुल्ला कुटुंबाची चार दुकाने होती. ‘३७३-३७४, मेन बझार’ हे धंद्याचे मुख्य ठिकाण. ‘३८८, स्टुअर्ट गंज’ येथेही मोठे दुकान होते. माझे वडील भोजराज. त्यांचे शालेय शिक्षण नव्हते, पण व्यापारधंद्याला ते तरबेज होते. व्यवहारज्ञान आणि एकंदर कुटुंबाचे पुढारीपण त्यांच्याकडे असे. ते मुळीच शिकलेले नव्हते तरी सगळ्या उलाढाली, येणी-देणी अचूक करीत असत. भाषा म्हणून सिंधी समृद्ध आहे, पण त्या भाषेतली पुस्तके-ग्रंथ माझ्या वडिलांना वाचायला येत नसत. सिंधी भाषेची एक दुय्यम लिपी असे. तिला ‘हाटकी’ म्हणतात. हाटकीला वेगळे व्याकरण वगैरे नाही, पण व्यापारी हिशेबठिशेब व किरकोळ चिठ्या-चपाट्या यासाठी ती लिपी वापरली जात असे. मराठीला मोडी लिपी पूर्वी होती, तशीच ही सिंधी हाटकी. या हाटकीत माझे वडील नोंदी ठेवीत. ते आणि त्यांचे एक चुलतभाऊ गिरिधारीलाल हे सगळा व्यवहार पाहात. धंद्याचे नाव ‘भोजराज गिरिधारीलाल’ असे होते. या पेढीचा व्यवसाय क्वीट्टा (क्वेट्टा), सक्कर, लारकाना, जेकोबाबाद आणि चिमन येथेही होता. क्वीट्टा हे आता पाकिस्तानात गेले, तर चिमन अफगाणिस्तानात! या सर्व शाखांतून

व्यापार-धंदा चाले व त्याचे नियंत्रण हे दोन्ही भाऊ करीत. सक्करची शाखा माझा मोठा भाऊ सांभाळू लागला होता. सगळा मुख्य व्यापार धान्य-किराणा-भुसार अशा मालाचा होता. इतर पुष्कळ प्रकारचा माल आमच्याकडे अडतीवर(कमिशन) खरेदीविक्री चालत असे. सगळ्या ठिकाणच्या दुकानांच्या व्यवहारांचे तपशील माझ्या वडिलांकडे येत असत आणि ते योग्य त्या सूचना देत असत. शिकारपूरच्या एका दुकानासंबंधी पहिल्याच वर्षीच्या कामाबद्दल चर्चा चालू असताना मी तिथे उपस्थित होतो, आणि त्या वर्षी त्या दुकानास पंचवीस हजाराचा नफा झाल्याबद्दल सर्वजण खुशीत होते, हे मला आजही आठवते. एकंदरीत सर्वच शाखांचा व्यापार-धंदा भरभराटीत चालू होता, असे म्हणता येईल.

शिकारपूरमध्ये व्यापारी समाजाची मोठमोठी घरे होती. दुमजली तीनमजली घरे सरसकट होती. आमच्या गल्लीत तर त्याहून उंच मोठी घरे असत. आमचे घर एक अधिक पाच असे एकूण सहा मजली होते. त्यांपैकी तीन मजल्यांचे पक्के बांधकाम होते. इकडे महाराष्ट्रात मोठाले वाडे म्हणत, आमच्याकडे त्यांस हवेली म्हणत. एक हवेली म्हणजे त्या विशाल कुटुंबाचा सगळा पसारा, आणि आप्तस्वकीय वगैरे लोकांच्या त्यात सोयी असत. आमच्या हवेलीत तशी आतल्या आत पाच सहा प्रशस्त घरे होती. माझे काका त्या हवेलीतच स्वतंत्र जागेत वेगळे राहात. क्वेट्टा येथे आम्हा लुल्ला कुटुंबियांचे एकत्र घर बांधलेले होते. १९३५ मध्ये क्वेट्टा शहराला भूकंपाचा जबरदस्त तडाखा बसला, आणि गावातली सगळी घरे ढासळून गेली. त्यानंतर आमचे हे घर बांधले, त्यामुळे क्वेट्टातील इतर घरांप्रमाणेच ते साधे-कच्चे असे होते. क्वेट्टा हे त्या प्रांतातील थंड हवेचे ठिकाण होते. त्यामुळे उन्हाळ्यात तर आमच्या घरात सर्व पाहुण्यांची चांगली गर्दी असे. माझा भाऊ आणि मी सर्व कुटुंबियांसमवेत १९४५च्या उन्हाळ्यात क्वेट्टा येथे महिनाभर राहिलो होतो. हा सर्व मुलुख फळफळावळ आणि बदाम-पिस्त्यांसाठी आजही प्रसिद्ध आहे. त्या वर्षीच्या उन्हाळ्यातील क्वेट्टाचा मुक्काम संपवून परत शिकारपूरला जाताना आम्ही खूप फळे (ड्राय फ्रूटस्) आमच्याबरोबर नेली. शिकारपूरच्या मोती बझार या भागात घर नंबर २३४ म्हणजे 'निचानी हवेली' हे आमच्या वडिलांचे राहते घर होते. राहत्या हवेलीभोवती मोठी तटाची भिंत असायची. प्रखर उन्हाळा आणि कडाक्याची थंडी असे तेथील वातावरण असे. त्यामुळे हिवाळ्यात प्रहर रात्रीनंतर रस्त्यावर शुकशुकाट होई आणि उन्हाळ्यात मात्र अंगणात अंथरूणे पडायची.

□

माझे वडील भोजराज आणि काकांचे नाव किशनदास. काकांना दोन मुली. एक भागी आणि दुसरी शुली. माझी आई पार्वतीबाई हीसुद्धा त्याच शिकारपूर गावातली. माझे काका हिरालाल. त्यांचा कुटुंबकबिला सुखवस्तू होता. आईची दहा बाळंतपणे झाली. त्यातली दोन मुले गेली. आम्ही तीन भाऊ. मोठा करमचंद, मधला तेजूमल आणि मी तोताराम. बहिणी पाच. कौसल्या, कर्मा, मथरी, मूली आणि शीला. यातली कौसल्या गेली. कर्माबाई व मूलीबाई मुंबईला असतात. मथरीबाई कोईमतूर येथे, तर शीला पुण्याला असते. आम्हा सर्व भावांची शिक्षणाची उत्तम व्यवस्था असे. त्या काळात मुलींना शिक्षण देण्यासाठी शाळेत घालण्याची प्रथा कमी होती. घरच्या घरी अक्षरओळख किंवा लेखन-वाचन असे काही घरांतून चालत असे. आमच्या घरी मुलांच्या शिक्षणाचे चांगले वातावरण होते. माझी चुलतबहीण भागीबाई हिचे पती साधूराम आहुजा हे मुंबईत डॉक्टर होते; त्यांची बहीण कलाही डॉक्टर असून ती अविवाहित राहिली. मीही मॅट्रिक परीक्षेनंतर मेडिकलला जाण्याचे ठरवलेलेच होते; पण माझी मॅट्रिक परीक्षाच अर्ध्यावरती टाकून द्यावी लागली; असा दैवाचा खेळ!

□□□

# आठवते ते असे....

मला आठवते ते माझे बालपण अत्यंत सुखवस्तू परिस्थितीतले होते. सिंधू नदीचे सान्निध्य, मोठे थोरले घर, माणसांचा गोतावळा आणि खाण्यापिण्याची रेलचेल. बालवयात याहून वेगळे काय लागते? माझे वडील आणि मोठी पुरुष माणसे आंघोळीला, फिरायला व देवदर्शनाला वगैरे सिंधू नदीवर जात. रोजची त्यांची आंघोळ नदीवर किंवा घराबाहेरच असे. घरातल्या मोरीत मोठ्या घरची पुरुषमाणसे क्वचित आंघोळ करीत. नदीवर आंघोळीला जाताना पुष्कळ मुलं बरोबर असायची. आमच्या वडिलांसाठी घरी टांगा होता. तो घेऊन ते नदीवर जात. मीही टांग्यात बसून जाई. उन्हाळ्याच्या दिवसांत पोरांच्या झुंडी नदीवर आंघोळीला जात. मी पाठीवर भोपळा बांधून पोहायला पडलो त्यावेळी शाळकरी होतो. पण माझे पोहणे त्या भोपळ्यावरच थांबले. उन्हाळ्यातही नदीला चांगले पाणी असे. गावात चार-पाच मोठ्या बागा होत्या, त्यात हौद असत. तेथे आंघोळी चालत. मोठी माणसे सकाळी लवकर आंघोळी उरकून उद्योगाला गेली की, मग पोराटोरांची झुंबड नदीवर उडायची. माझे वडील नदीवरून येताना बाजारातून लोणी आणत, घरी आल्यावर पोरांना ते खायला देत. नदीच्या बाजूलाच लखीदार नावाचे फिरण्याचे ठिकाण होते. तिथे कुल्फी छान मिळायची. पोरांना आणि घरच्या महिलांना फिरायला घेऊन जायचे आणि ही कुल्फी खायला द्यायची असा एक कार्यक्रम घरोघरी चालायचाच. पायी जाताना वाटभर खूप कलकलाट चालायचा. नदीवर इतकी वर्दळ असल्यामुळे तिथे खाद्यपदार्थांची दुकाने लागायची. गव्हाच्या दाण्यांपासून कोकी नावाचा एक पदार्थ चटणीला लावून खायला फार छान असायचा. आमचा तो लाडका पदार्थ. तिथे त्या वेळी सगळ्या प्रकारचे आंबे खूप स्वस्त मिळायचे. पोहायला जातानाही आम्ही आंबे खात जायचो.

या सर्व सुखवस्तू राहणीमानाचा परिणाम म्हणून असेल, पण त्यावेळी त्या गावातले बहुतांशी लोक दीर्घायुषी होते हे खरे! ऐंशी-पंचाऐंशी वयाची वृद्ध माणसे,

आजी-आजोबा घरोघरी दिसत. साठ-सत्तर वयापर्यंत तर ती उद्योगातच असत. घरच्या, नात्यातल्या बायका पाचदहा बाळंतपणे होऊनही खेळकर - उत्साही असायच्या. प्रौढ किंवा वृद्ध महिला घरकामाऐवजी देवपूजा, मुले-नातवंडे, भाजी निवडणे अशा कामांत असत. सरसकट सर्वजण चार वेळा भरपूर खायचे. सकाळी नाष्टा, दुपारी जेवण, संध्याकाळी खाणे आणि रात्रीचे जेवण यात कुणीही मागे नव्हते. म्हणजे एवढ्या मंडळींचे स्वैपाकपाणी करण्यात स्त्रियांचा खूपच वेळ जायचा. एवढे मोठे घर सांभाळणे, त्याची झाडलोट, पाणी, पाहुणेपै, शेतीमाल-धान्य यांची व्यवस्था, दरसाल येणारे एखाददुसरे लग्नकार्य या खटाटोपात घरच्या सगळ्या बायका गुंतून जात. माझ्या काकांना दोन मुली. त्यांना मुलगा नव्हता. अनेक प्रसंगी ते मलाच मुलगा मानून कुठेही घेऊन जायचे. त्यांची सासुरवाडी कराचीला होती. १९४५मध्ये मी या काकांबरोबर कराचीला गेलो होतो. त्यावेळी ती सिंधची राजधानी होती. तिथले बंदर आणि एकूण शहर फार छान वाटायचे. त्याही काळात ते गजबजलेले असायचे. काकांच्याबरोबर आल्यामुळे असेल, पण कराचीतल्या पाहुण्यांकडेही माझे लाड व्हायचे.

स्वैपाकात रोटी-दाल असे. चार सहा दिवसांनी मटण शिजायचे. त्या भागात सर्वसाधारण प्रत्येक घरात मटण खात असत. अंडी नसत पण मटण खाल्ले जाई. घरीच तो स्वैपाक असे आणि स्त्रियाही ते खात. चार-पाच आणे शेर असा त्याचा दर असेल. बहुतांशी घरांमध्ये दारूही असायची. स्त्रिया दारू मात्र प्यायच्या नाहीत. वडिलांचे मित्र किंवा खास जवळचा पाहुणा आला तर दारूची बैठक असे. वडिलांच्या कपाटात चारदोन बाटल्या शिलकीत असायच्या. लग्न किंवा मोठ्या धार्मिक समारंभात सोमरसपान असे. मला वाटते प्राचीन सिंधू-संस्कृतीची एवढी परंपरा मंडळींनी मनापासून जपली असावी!! आजही पुष्कळ प्रमाणात सिंधी लोक घरी मटण खातात. मी मात्र पाच-सात वर्षांपूर्वीच ते सोडून दिले.

मुलांना खर्ची म्हणून एक पैसा दिला जाई. तीन पै म्हणजे एक पैसा, आणि चार पैशांचा एक आणा. एक पैसा दिला की बाजारात एक वाटी उत्कृष्ट खिमा मिळायचा. तीन पकोडे घेण्यास एक पै लागायची. कुणाच्या लग्नात मोठ्या माणसाकडून एक पैसा मिळाला की मी एक पै चे पकोडे आणि दोन पै ला मिळणारा पतंग विकत घ्यायचा. हल्ली मुलांना क्रिकेटची बॅट हे जरा मानाचे खेळणे वाटते, तसे आमच्या लहानपणी पतंग घ्यायचा. त्या पतंगावरून मग मुलांची भांडणे, आई-आजीकडे तक्रारी हे चालायचे. आजीने समजूत घालावी, आणि आईने नंतर दोन धपाटे द्यावेत हा नेहमीचा खाक्या. सासूपुढे सून मोकळेपणी वावरत असे पण सासू-सुनांचे भांडण, अबोला असे काही नसायचे. सुना लहान वयातच घरी आलेल्या असायच्या, आणि

मोठ्या माणसांचे ऐकायचे हे ठरून गेलेले असायचे. त्यातूनही कामाच्या रगाड्यात भांडणाचे फारसे विषय मिळत नसतील. एखादी हुशार महिला एकदोन इयत्ता शिकली असेल तर काही वाचून वगैरे दाखवी. गुरुमुखी लिपी काही महिलांना येत असे.

□

माझ्या मोठ्या भावाचे करमचंदचे लग्न त्याच्या विसाव्या वर्षी झाले. मी तेव्हा बारा वर्षांचा होतो. मला ते लग्न चांगले आठवते. ते एकोणीसशे चाळीस-बेचाळीस साल असावे. पाचसहा दिवस तो समारंभ चालला. अशा वेळी जास्तीचे शे-सव्वाशे नातलग जमायचे, राहायचे. चार-पाच मेजवान्यांपैकी एक दारू-मटण पार्टी असे. दोन पक्वान्नांची जेवणे आणि एक साधे. नवऱ्या मुलाला डोकीवर मुंटग (फेटा) बांधत. तीन तास होमहवन व धार्मिक विधी चालत. शास्त्रीबुवा मंत्र वगैरे म्हणत. लग्नाचा विशेष विधी असायचा. अग्नीला तीन किंवा सात फेऱ्या असायच्या. स्त्रियांचा पदर डोकीवरून पार पुढे हातभर असायचा. बुरखा नव्हता, पण स्त्रियांचा चेहरा दिसणे शक्य नाही. वरात निघायची. गावातल्या देवदर्शनाला वाजत गाजत जाऊन यायचे. अशा वेळी घरचे व शेतावरचे नोकरचाकर सहभागी होत.

एक विशेष बाब म्हणजे लग्नसमारंभ संपल्यावर नवऱ्या मुलास त्या घरचे वडीलधारे एक छापील पुस्तक भेट देत; ते म्हणजे 'विवाहितांचा वाटाड्या' अशा स्वरूपाचे असे. वधू बारातेरा वर्षांची आणि वर अठराच्या आतबाहेरचा. त्यांना मार्गदर्शक ठरेल अशी माहिती स्पष्टपणे देण्यासाठी हे पुस्तक वाचायला देत असत. काळजी घेण्याच्या दृष्टीने ही एक चांगली पद्धत होती असे मला वाटते. त्या काळात या बाबतीत खुलेपणी बोलले जात नसे, आणि वयात येणारी तरुण मुले कुठे चुकू नयेत, घसरू नयेत असा हेतू त्यामागे असे. शास्त्रशुद्ध रीतीने ही माहिती योग्य वेळी देणे उचित मानले जाई. त्याचप्रमाणे या पवित्र गोष्टीची फारशी उघड चर्चा वा टवाळी होत नसे.

नवरात्रीच्या काळात स्त्री-पुरुषांनी पूर्णत: वेगळे राहण्याची पद्धत होती. हिंदुस्थानात पुष्कळ भागात ज्या त्या प्रथा आहेत. कुठे आषाढ महिन्यात पत्नीचे तोंड पाहायचे नाही, तर कुठे श्रावणात पत्नीला माहेरी पाठवतात. आमच्या तिकडे नवरात्र पाळत. गावातल्या देवळांमध्ये पुरुष मंडळी झोपायला येत. एकेका देवळात शे-पन्नास लोकांच्या पथाऱ्या पडत. आम्ही मुलेही वडील किंवा काकांबरोबर देवीच्या देवळात झोपायला जात असू. 'नवरात्रात देवीच्या पायाशी झोपायचे' असे आम्हाला ठाऊक होते, त्या मागचे कारण कशाला माहीत असणार?

□□□

□
# आमच्या गोकुळात

शाळेला जाण्यापूर्वीचे माझे दिवस असे हुंदडण्यात गेले. पण कधी ना कधी शाळेत जाणे अटळ होते, याची मलाही जाणीव व्हायची. आमच्या शिकारपूरमध्ये मोठी हिंदू पाठशाळा होती. आमच्या सगळ्या घराण्याची तीच शाळा. 'हिंदू जाती पाठशाला' हे त्या शाळेचे नाव होते. एके दिवशी मी त्या शाळेत दाखल झालो. गल्लीतल्या मुलांसोबत मी जायचो पण मला शाळा अजिबात आवडत नसे. मग कधीतरी शाळा चुकवायची. घरच्यांना किंवा मास्तरांना जर कारण पटले नाही तर त्याबद्दल मास्तर शिक्षा द्यायचे. कडाक्याची थंडी वगळता वर्षातला पुष्कळसा काळ उकाडा असे. उन्हाळी सुटी दोन-तीन महिने; पण त्याव्यतिरिक्त उकाडा पाचवीलाच पूजलेला असे. शाळेची उंच छपरे असत. आणि त्याला आडवी काठी टांगून मोठ्ठे पडद्यासारखे झालरीचे कापड आडवे बांधून पंखा बनवीत. एकाने भिंतीजवळ उभारून त्याची दोरी मागे-पुढे ओढत राहिले की वर्गातल्या सगळ्या मुलांना वारा मिळे. शाळा चुकविल्याबद्दल ही पंख्याची दोरी ओढत राहण्याची शिक्षा ठरलेली असे; आणि माझी शाळेतली उपस्थिती अभ्यासापेक्षा ही दोरी ओढण्यातच संपायची. एरवी मी तसा दंगेखोर, हूड वगैरे नव्हतो.

त्या काळी सिंध प्रांतातल्या मोठ्या शाळा म्हणजे हायस्कूले-मुंबई विद्यापीठाशी जोडलेल्या असत. पंजाब मॅट्रिक्युलेट युनिव्हर्सिटीचे केंद्र लाहोरला होते. मी प्राथमिक पहिली दुसरी केली आणि एकदम इंग्रजी पहिलीत - म्हणजे आताच्या पाचवीत प्रवेश घेतला. त्यामुळे मधली दोन वर्षे वगळून मी पुढे गेलो. तेव्हा वयाची अट वगैरे नव्हती. अभ्यासातली गती-प्रगती पाहून मास्तर तशी परवानगी देत असत. लाहोर व मुलतान या शहरांत परीक्षांचे केंद्र असे. त्या काळी मॅट्रिकच्या परीक्षेत संस्कृतला पर्यायी भाषा म्हणून पर्शियन होती. पण आमच्या शाळेत पर्शियनची सोयच नव्हती आणि आठव्या

इयत्तेपासून संस्कृत विषय घ्यावाच लागे. माझ्या लहानपणी घरी वीज नव्हती. परंतु रॉकेलचे मोठे दिवे आणि कंदील असत. सगळे व्यवहार दिवेलागणीपर्यंत आवरते घेतले जायचे. कंदिलावर मुलांचा अभ्यास चाललाय असले दृश्य कुठेच दिसायचे नाही.

हिंदू-मुस्लिमांचे प्रश्न या दरम्यान शिजू लागले होते. शाळेतल्या वयात असताना आमच्या शेतावर जायचो, आंबे घरी यायचे. शेतातले गडी-मजूर मुस्लिम होते. पण त्यांच्यात हे नवे वारे खेळू लागल्याचे कुठेही जाणवत नसे. मोठ्या मंडळींच्या गप्पांतून, सभांमधून ते उल्लेख होत असत. आमच्या शिकारपूर शहरात त्याची तीव्रता फारशी नव्हती, कारण गाव सगळे हिंदूच होते आणि ते सर्व संपन्न होते. खरे सांगायचे तर हिंदू जरा आगाऊही होते. मी आठ-दहा वर्षांचा असताना हिंदू-मुस्लिम दंगा झाला होता. त्यावेळी हिंदूंनी मुस्लिमांना खरपूस हाणले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रसार खूप होता. लाहोर - कराची या शहरांत त्यांच्या कवायती होत. छोट्या-मोठ्या गावांत शाखा लागत. मात्र त्यांचा दंगलींशी कुठे दूरान्वयाने संबंध नसे. त्याचवेळी राजकीय परिस्थिती वेगाने बदलत होती आणि त्याचा अपरिहार्य परिणाम धर्मद्वेष वाढण्यात होत होता. हिंदुत्त्वाचे जागरण त्याच काळात संघाच्या स्वरूपात संघटित होत होते हा योगायोग असेल. मुस्लिमांनी मुद्दाम काही खोड्या काढल्या तर त्यांना अंगभर मार खावा लागे इतके हिंदूंचे प्राबल्य आमच्या भागात होते. चाळीस सालच्या सुमारास जो दंगा झाला त्यात भोसका-भोसकीपर्यंतचे प्रकार झाले, त्यात हिंदू 'विजयी' झाल्याची चर्चा मोठी माणसे करीत.

हे वातावरण आणखी तापत गेले आणि त्याने भीषण वळण घेतले. त्यात आमची मॅट्रिक परीक्षा आणि आमचे शिक्षण यांचीच होळी झाली. पुढच्या कलाटणीमुळे माझे बालपणच नव्हे तर जीवनच पार बदलून गेले.

□□□

□

# शाळा व शालान्त

आमच्या घरात भावंडांपैकी कुणी सातवीच्या पुढे शिकले नाही. मुलींना फार शिकवण्याची पद्धत नव्हती, आणि मुलांनी व्यापारधंदा करायचा हे गृहीतच होते, त्यासाठी शाळेतले शिक्षण कशाला? ही परिस्थिती ठाऊक असल्यामुळे मी वडिलांकडे 'मला शिकायचे आहे' असे सारखे सांगून ठेवत असे. मी मेडिकलला जाणार हेही घोषित केले होते, आणि त्याला कुणाची फारशी हरकत नव्हती. वडिलांचे प्रोत्साहन होते. शिकारपूरला मेडिकल कॉलेज होते. माझ्या चुलत बहिणीचे यजमान डॉक्टर होते, आणि त्यांची बहीणही शिकून डॉक्टर झाली होती. मी त्याच्या घरी जाऊन या कोर्सबद्दल विचारून घेत असे. थोडक्यात म्हणजे घरात व्यापारधंद्याचे वातावरण असले तरी मला पुढे शिकून डॉक्टर व्हायचे होते, याचेही सर्वांना अप्रूप असे. तशी माझ्यासह सर्वांची मानसिक तयारी होती. माझे शालेय शिक्षण एकेक वर्षाने पुढे चालले होते आणि मी आता मॅट्रिकच्या वर्गात होतो, ही महत्त्वाची परीक्षा मी उत्तीर्ण होणार याबद्दल मलाही फारशी शंका नव्हती. माझा अभ्यास चांगला होता. ऑगस्ट महिन्यात परीक्षा होती, तीवर मी लक्ष्य केंद्रित केले होते.

तरीसुद्धा मी दररोजचे वृत्तपत्र वाचत असे. माझ्या शाळेतल्या दिवसांतही मला ती सवय होती. शिवाय रोजचे व्यवहार घरात-गावात सुरू असले तरी सर्वत्र फैलावलेली अस्वस्थता, आणि परिस्थिती ढवळून काढणारे वातावरण यांची चर्चा होतच असे. १९४७च्या जानेवारीपर्यंत गांधीजी आणि काँग्रेसची नेते मंडळी भारताची फाळणी करू देण्यास तयार नव्हती; इतकेच नव्हे तर 'माझ्या प्रेतावरून पाकिस्तानची रेघ ओढली जाईल' अशी आश्वासक विधाने वाचून ऐकून सर्वांना निर्धास्तपण यायचे. तरीसुद्धा शंकेची पाल मनात नेहमी चुकचुकत असे. पुढच्या तीन-चार महिन्यांत काय उलथा-पालथ झाली हा राजकीय इतिहास येथे सांगण्याचे कारण नाही; पण देशाची फाळणी होणार ही गोष्ट आम्हा सामान्यजनांस एप्रिल-मे पर्यंत पक्की कळून

चुकली. अर्थात अखंड हिंदुस्थानचे दोन तुकडे होणे ही एक राजकीय घटना आहे, आणि नाइलाजाने ती स्वीकारावी लागणार इतकाच मर्यादित अर्थ आमच्या आयुष्यक्रमाशी संबंधित होता. (पश्चिम)पंजाब, सिंध, बलुचिस्तान हे भूप्रदेश नव्या पाकिस्तानात समाविष्ट होणार असल्यामुळे आमचे शहर आणि यापुढील सर्व जीवन पाकिस्तानमध्ये व्यतीत होईल हेही उघड होऊ लागले. या राजकीय घडामोडी आपापल्या सामान्य आयुष्यांवर थेट येऊन आदळतील याची कोणा नागरिकाने कल्पना केली नव्हती. कदाचित आम्हाला नजिक येऊन ठेपलेल्या भविष्याचे आकलन झालेले नव्हते, असे म्हणू.

१९४७ च्या काही काळ अगोदर हिंदू-मुस्लिम या दोन्हीत फार सख्य होते अशातला भाग नाही, पण एवढ्या पराकोटीचे शत्रुत्वही नव्हते. त्यांचे परस्पर विश्व वेगळे होते. आपापली स्वतंत्र जीवनपद्धती होती. आर्थिक हितसंबंध वेगळे होते. म्हणजे व्यवहारांत वेगळेपण होते हे जरी खरे, तरी शत्रुत्त्व नव्हते आणि वेगळे प्रेमही नव्हते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा गावोगावी भरायच्या. त्या काळात प्रत्येक शाखेवर पन्नास-साठ-सत्तर अशी तरुणांची उपस्थिती असे. आम्ही शाळेत असताना शाखेत कधीतरी जायचो. एक गोष्ट खरी आहे की, यामुळे हिंदू लोक वेगळे ताठ मानेने वावरू लागले होते. त्यांना सामाजिक भान येत होते. ब्रिटीश राजवटीमुळे नोकरी व्यवसायात गुंतून पडल्यामुळे 'आपण बरे - आपले घर बरे' अशी एक सामाजिक कंजुषी आलेली होती. त्या लोकांना जागे करून संघटित करण्यामुळे त्यांचे सामर्थ्य त्यांच्या लक्षात येत होते. अलीकडच्या राजकारणामुळे मुस्लिमांकडून हेतुत: कुरापती काढण्याचे प्रमाण खूप वाढले होते. पण अशा वेळी हिंदू लोक आक्रमक होऊन सामाजिक धुलाई करत. काही सीमावर्ती भागात कधी एखाद्या शहरात दंगल उसळली तर भोसकाभोसकीचे प्रकार घडत, त्यांमध्ये हिंदू लोक मागे नसत. मात्र ही राजकीय दंगल आहे हे उघड दिसून येई, त्याचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष लोण गल्लीत पोचले होते. हिंदू लोकांनी विनाकारण मस्तवालपणा केला नाही, पण मुकाट्याने मार खाणार नाही एवढी शक्ती आल्याची जाणीव अशा दंगलींतून सर्वांना होऊ लागली होती.

□

एव्हाना पंजाबच्या पुष्कळ शहरांतून दंगली सुरू झाल्याच्या बातम्या आमच्यापर्यंत पोचल्या होत्या. लाहोर, सियालकोट, मुलतान या शहरात हे रोजचेच सुरू होते. आमची परीक्षा जवळ येऊन ठेपली होती, अभ्यासात डोके खुपसावे लागत होते आणि दुसरीकडे परीक्षेचे काय होणार - आपल्या पुढच्या शिक्षणाचे कसे होणार? अशा

प्रश्नांचे काहूर उठायचे. या वातावरणातील सर्व चर्चा, काळजी वा भीती आणि पुढचे आडाखे यांचा संबंध आमचे शैक्षणिक वर्ष फुकट जाण्याशी होता हे येथे सांगितले पाहिजे. दंगली पसरत गेल्या तर परीक्षेला जाता येईल का, वाहतूक बंद पडेल का असे हे प्रश्न होते. घरच्या व गावातल्या वडीलधाऱ्यांना त्यांच्या त्यांच्या व्यवसायधंद्याची काळजी होती. आम्हाला हिंदू-मुस्लिम प्रश्न, देशाची फाळणी, इंग्रजांची कूटनीती.... वगैरे उच्चस्तरीय प्रश्नांचे गांभीर्य कळलेले नसावे. १९४७ चा ऑगस्ट उजाडला आणि १५ तारखेपासून पाकिस्तानची निर्मिती होणार हे जाहीर झाले होते. आमच्या परीक्षा भावलपूर येथे व्हायच्या. त्या परीक्षा केंद्रावर जाण्याची आम्हा विद्यार्थ्यांची एकीकडे तयारी चालू होती, आणि दुसरीकडे त्या पंधरा दिवसांत दंगलींचा वणवा वेगाने पसरत चालला होता. २१ ऑगस्टला आमच्या मॅट्रिक परीक्षेचा पहिला पेपर होता.

१५ ऑगस्ट १९४७ हा दिवस आमच्या गावात नेहमीसारखा उगवला आणि मावळला. तो आमच्या दृष्टीने स्वातंत्र्यदिन नव्हताच. तो तर दु:खाचा, विदारक वास्तवाचा, काळोखी दिवस होता. परीक्षेच्या तयारीमुळे आमची शाळा थांबलीच होती, पण गावातही काही सभा-समारंभ नव्हता. 'काहीतरी वेगळे घडू शकेल' असे एक तणावाचे वातावरण होते. त्याच प्रकारच्या तणावात व्यवहार चालू होते. आजपासून आपण हिंदुस्थानपासून वेगळे राहणार आहोत एवढी सल होती.

१५ ऑगस्ट नंतरच्या आठवड्यात आमच्या शिक्षकांचे मनोधैर्य खचले, आणि 'मुलांना परीक्षेसाठी भावलपूरला न्यायला नको' असे ते म्हणू लागले. कुठे काय होईल याचा भरोसा नाही, मुलांना त्रास नको, उगीच धोका पत्करू नये हे त्यांचे मत पडले. याउलट मुलांचे वर्ष फुकट वाया जाऊ नये ही पालकांना काळजी. थोडी दक्षता घ्यावी लागेल ती घेऊया, अशी ही चर्चा चालायची. पालक एकदा शाळेत हेलपाटा घेत, तर पुन्हा एकमेकांच्या घरी..... अशी त्यांची घालमेल चालू होती. व्यापार-व्यवसायामुळे माझ्या वडिलांचे भावलपूरमध्ये अनेकांशी संबंध होते. त्यापैकी काहीजणांशी ते टेलिफोनवर बोलले. तिथली परिस्थिती त्यांनी विचारून घेतली. नीट चौकशी केली. परीक्षेसाठी मुले तिकडे येण्यात काही अडचण तर येणार नाही ना, हे विचारून घेतले. भावलपूरच्या या परिचित मित्रमंडळींनी त्यांना माहिती दिली, आणि यायला हरकत नाही असा हिरवा कंदील दाखविला. त्यावरून वडिलांनी आमच्या शिक्षकांना पटवून दिले व मुलांना घेऊन परीक्षेला निर्धास्तपणे जायला सांगितले. काही अडचण आली तर भावलपुरातील हे मित्र सर्वतोपरी मदत करतील असा दिलासाही दिला, त्याशिवाय आमच्यासोबत खुद्द माझे वडील भावलपूरला येण्यास तयार होते. एवढे झाल्यावर सर्व मुलांच्या पालकांची, शिक्षकांची पुन्हापुन्हा खलबते होऊन 'निघायचे' असे एकदाचे

ठरले. आम्ही सर्व परीक्षार्थी मुले, आमचे शिक्षक, पिताजी आणि त्यांचे मित्र असा समुदाय मिळून आम्ही भावलपूरला चाललो.

परीक्षा २१ ऑगस्टला होती म्हणून २० तारखेच्या सकाळी आम्ही तिथे पोचलो. भावलपूरच्या एका व्यापारी मित्राने वडिलांच्या सांगण्यानुसार आम्हा सर्वांची राहण्याची सोय एका मोठ्याशा दालनात केली होती.

मॅट्रिक परीक्षेचा उद्या पहिला पेपर होता, आणि आम्ही एकमेकात एकीकडे अभ्यासाबद्दल बोलत होतो, तर दुसरीकडे आमच्या सोबतची मोठी माणसे कुठे काम गडबड चालू आहे याचा अंदाज घेत होती. दुसऱ्या दिवशी आम्ही अशाच वातावरणात परीक्षेला गेलो. आमच्यासारखीच पुष्कळ मुले तशा संशयित वातावरणात एक प्रकारच्या दबावाखाली असल्याचे जाणवत होते. आमच्यासमवेत जी मुस्लिम मुले परीक्षेला आली होती तीसुद्धा धास्तावलेलीच होती. पेपर देण्यासाठी आम्ही दाखल झालो. २१, २२ आणि २३ ऑगस्ट असे तीन दिवस सलगपणे तीन पेपर होते. ते पार पडले. त्यानंतर मधे तीन दिवसांची सुटी होती.

या वेळेपावेतो तीनचार दिवसांतच दंगलींच्या ज्वाळा भावलपूर शहरापर्यंत येऊन पोचल्या होत्या. जवळपासच्या गावांतून हा गदारोळ आमच्या कानी येत होता. पेपर नव्हते, त्या तीन दिवसांच्या सुटीमुळे आम्हाला ही आग जवळ येऊन ठेपल्याचे जाणवत होते. माझे वडील, शिक्षक आणि भावलपुरातले त्यांचे स्नेही सतत एकमेकांशी भेटून चर्चा करीत होते. काय करावे..... काय करावे...... आणि काय करावे!

या दंगलींचे जे तपशील कानी येत होते ते विचित्र होते. रेल्वेगाड्यांतून प्रवास करणाऱ्या हिंदू लोकांना ठार करून त्यांची प्रेते बाहेर फेकून देण्यात येत आहेत हे ऐकल्यावर आमचे काळीज गोठून जाई. त्या दोन तीन रात्री आम्हाला कुणाला झोप लागणे शक्य नव्हते. सुटीच्या तीन दिवसांनंतर भावलपूरमधल्या त्या परिचित स्नेह्यांनी सल्ला दिला की, 'आता मात्र तुम्ही इथे थांबू नका. केव्हा काय होणार हे सांगता येत नाही.' परीक्षेच्या उरलेल्या पेपरांची आता ऐसीतैसी! सर्व मुलांना आपले 'गाव गाठावे हे बरे' हा सल्ला ज्या गंभीरपणे त्यानी दिला आणि सर्वांनी काळजीमुक्त अंत:करणांनी तो ऐकला, त्यामध्ये परीक्षा हा विषय आपोआपच मागे पडला आणि आपल्या घरी सुखरूप कसे पोचावे याला प्राधान्य आले. २७ ऑगस्टला आम्ही भावलपूर सोडले. शिकारपूरला फोन लावून माझ्या वडिलांनी घरी निरोप दिला, तिथली चौकशी केली आणि परीक्षा सोडून देऊन आम्ही परत निघालो आहोत हेही कळवून टाकले. सगळ्याच मुलांचे पालक वाट पाहात असणार.....!

□□□

□

# होत्याचं नव्हतं

पंजाबात दंगलींचा वणवा पेटला होता. लाहोर हे राजधानीचे शहर दळणवळणाचे मोठे केंद्र होते. लाहोरहून शिकारपूरकडे जाणारी रेल्वेगाडी होती. वाटेत भावलपूरला आम्ही चढणार होतो. आम्ही सतरा विद्यार्थी आणि मोठी माणसे तीन-चार जण असे एकत्र बसायचे, प्रवासात जी काही परिस्थिती येईल तिला तोंड द्यायचे असा निश्चय करून आम्ही भावलपूर स्टेशनची वाट धरली. स्टेशनवर पोचलो आणि गाडीची वाट पाहात थांबलो. फारसे कुणी बोलत नव्हतो. वास्तविक ही परीक्षा संपवून नेहमीच्या उत्साहात आम्ही परतलो असतो तर केवढे बागडत आलो असतो. पण आज सगळे वातावरण गंभीर होते. कधी एकदाची गाडी येते असे झाले होते, त्यातही आम्हाला कशी कुठे एकत्र चढायला जागा मिळणार हाही एक तणाव होता.

गाडी स्टेशनात आली, आणि एका छोट्या डब्यात आम्ही सर्वजण दाटीवाटीने घुसलो. या आणि आसपासच्या डब्यात मुस्लीम प्रवासी होते. आमच्या गाडीने भावलपूर स्टेशन एकदाचे सोडले, आणि उगीचच सर्वांनी खोल निश्वास सोडले असावेत. पुढच्याच स्टेशनवर गाडी थांबली, डब्यातून एक मुस्लिम खाली स्टेशनवर उतरला आणि फलाटावरच्या लष्करी जवानांना त्याने ओरडून सांगितले की, ‘या आणि पुढच्या डब्यात पुष्कळ हिंदू एकत्रित आहेत.’ यानंतर दोन बंदूकधारी लष्करी सैनिक डब्यात आले. आता हे लष्कर पाकिस्तानचे झालेले, जवानही अर्थातच मुस्लिम. लष्कराकडून सुरक्षेचा विश्वास बाळगण्याऐवजी आमच्या पोटात भीतीचा गोळा उठला.

गाडीत आलेल्या त्या दोन जवानांनी बंदुका पेलत आम्हाला शिव्याशाप द्यायला सुरुवात केली. ‘आत्तापर्यंत तुम्हा हरामखोर हिंदूनी आमच्या कत्तली केल्यात काय? आता बघतो तुम्हाला!’ या आवेशात ते ओरडत होते. आमच्याच डब्यात एक पोक्त

अशी मुस्लिम महिला होती, तीच आमच्या बाजूने पुढे सरसावली. आम्ही तर दादा बाबा करून गयावया करण्याशिवाय काम करू शकणार होतो? या म्हातारीने त्या सैनिकांशी वाद घालायला सुरुवात केली. ''ज्यांनी मारामारी केली त्यांना धरा जा की. ही लहान कच्ची बच्ची पोरं. यांनी तुमचं काय घोडं मारलंय. ती भावलपूरला चढलीत. तुमच्या लाहोरचा यांचा संबंध नाही. यांना मारून तुम्ही काय मिळवणार आहात?....'' वगैरे बोलून या बाईने त्या सैनिकांना रोखले. कधी गरीब कनवाळू आवाज तर कधी आक्रमक करडा आवाज असे समजावत ती महिला, सैनिकांशी बोलत होती. शेवटी एकदाचे हे दोघे सैनिक विरघळले आणि आम्ही पंचवीसजण वाचलो. हा प्रकार पुष्कळ वेळ चालू होता. देव संकटाच्या वेळी धावून येतो असे म्हणतात. आमच्या बाबतीत तरी तो आज त्या मुस्लिम मातेच्या रूपाने अवतरला होता. बाजूच्या डब्यातून अधूनमधून फैरी ऐकू यायच्या. मारलेल्या किंवा अर्धमेल्यांना रेल्वे डब्यातून भिरकावून दिले जात होते. आम्हापैकी चारपाच मुले जीव वाचविण्यासाठी रेल्वेडब्यातल्या संडासात जाऊन बसली होती. पण आमच्या डब्यातल्या सर्वांचेच जीव परमेश्वराने आणि त्या मुस्लिम महिलेने वाचविले. यापुढच्या प्रत्येक स्टेशनवर आमच्या डब्याच्या सर्व खिडक्या आम्ही लावून घेतल्या होत्या. आम्हाला असे सुचविण्यात आले की, वागण्यात जरा बेफिकिरी आणून, आपण घाबरलेले हिंदू आहोत असं वाटू देऊ नका. तुम्ही हिंदू आहात की मुसलमान, हे ओळखू देऊ नका.

..... नाहीतरी जन्माच्या आणि मरणाच्या दारात कोण हिंदू नि कोण मुसलमान काय ओळखू येणार?

□

जीव मुठीत धरून आम्ही एकदाचे शिकारपूरला उतरलो, घरी आलो. घरच्यांनी आनंद व्यक्त केला. माझ्या आईच्या तर डोळ्याचे पाणी खळेना. गेल्या आठ दिवसांत त्यांना आमची भयंकर काळजी लागून राहिलेली होती, आणि आम्हालाही 'तिकडे शिकारपूरला काही घडलेले नसेल ना' हीच चिंता जाळत होती. पण सर्वजण जिवानिशी सुखरूप एकमेकाजवळ आलो आणि सर्वांना अगदी उचंबळून आले.

सभोवतीच्या बातम्या आणि ताज्या प्रवासात अनुभवलेले क्रौर्य यामुळे 'आता येथे राहण्यात काही अर्थ नाही' हा विचार पिताजींनी बोलून दाखविला. आम्ही हिंदू असलो तरी, मुसलमान समाजाशी आमचे वैर असण्याचे कारण नव्हते. हिंदू-मुसलमानांची भांडणे आणि दंगली ही तात्पुरती कारणे असू शकतात. ब्रिटिश जाऊन

राजकीय परिस्थिती थोडी निवळल्यावर दोन्हींकडचे लोक शांत होतील, सध्याची तात्कालिक गडबड कमी होईल, असे आतापर्यंत सर्वांना वाटत होते. पण एका बाजूच्या नि:शस्त्र सामान्य लोकांवर सशस्त्र लष्करच चालून येते, तर मग आता कुणाचा भरंवसा मानावा? या स्थितीत आपले रक्षण इथे कोणीही करूच शकणार नाही ही त्यांची पक्की खात्री झाली. सर्वांच्याच मनात ते होते. पण जाऊन जायचे कुठे? सर्व पुरुष मंडळींनी आवराआवर करण्याचा निर्णय घेतला. व्यापार संबंधामुळे माझ्या वडिलांचे जयपूरला पुष्कळ परिचय होते. म्हणून शिकारपूरहून हैदराबाद (सिंध) व तेथून पुढे जयपूर हे जवळचे अंतर म्हणून तिथे जाण्याचे ठरले.

पुढच्या तीन-चार दिवसांत आमच्या चाळीस-पन्नास जणांचे कुटुंब अक्षरश: रात्रंदिवस धडपडत होते. खायचे सुचत नव्हते, देहधर्म सुचत नव्हते. सगळ्या गावात तीच तारांबळ उडालेली. कुणी अमृतसर म्हणतोय, कुणी जयपूर म्हणतो, कुणी एकदाचे पलीकडे जाऊ, मग पुढचे पुढे पाहू म्हणून गाठोडी बांधतोय....! २० ऑगस्टला आम्ही परीक्षेसाठी उमेदीने बाहेर पडलो होतो आणि दहाच दिवसांनंतर आम्ही आमची मातृभूमी सोडून पळ काढत होतो. शिकारपूरमधला आमच्या कुटुंबाचा पसारा किती मोठा! गावातच तीन दुकाने, शिवाय आमच्या जाकोबाबाद, सक्कर, लारकाना येथे शाखा. इथली हवेली, क्वेट्टाचे घर..... हे सगळे कसे आवरायचे? काय काय म्हणून बरोबर घ्यायचे? कसे निस्तरायचे? त्या दोन तीन दिवसांत बालकेही तरूण झाली, तरूण प्रौढ झाले, प्रौढ होते ते म्हातारे झाले आणि म्हातारे तर अर्धमेले झाले. पण कुणाचा काही इलाज नव्हता, विचार करायला वेळ नव्हता. ३ सप्टेंबरला आमचा तांडा शिकारपूर सोडून बाहेर पडला. पाचसहा व्यापारकेंद्रे, शेतीवाडी, हवेली, गावात मानमरातब, चांगली पत, पोरंबाळं,..... एक संपन्न सुखवस्तू जीवन पायाशी फेकून देऊन आम्ही निर्वासित झालो!


□□□




शिकारपूरचा घंटाघर चौक




लखीदार चौक शिकारपूर



नदीकाठच्या शेतीवरील बैल रहाट



लाहोर गेट



सक्कर येथील लॉईड बॅरेज




पंजाब सिंध प्रांतातील दुर्मिळ छायाचित्र



पूर्वीच्या शिकारपूरची एक वास्तू



होपफुल ॲकॅडमी, शिकारपूर



सक्कर येथील हिंदू हवेली

भोजराज राधाकिशीनदास लुल्ला यांच्या
सिंधमधील अमूल्य मिळकतीची
विस्थापनानंतर झालेली किंमत

GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF REHABILITATION

Order No.149 Index No. S/SR-13/2225

Before: - Shri Rupchand Assanmal, Claims officer, Bombay.
Name of the claimant: - Bhojraj Radhakishindas
Details of properties claimed- This claim relates to 6 properties as shown below:-

1. Property No.I was a building with C.S.No.234 in Mochi Bazzar, Near Chabutra, Shikarpur.
2. ½ share in a shop with C.S.No.373-374 in Main Bazzar, Shikarpur.
3. ½ share in a shop building bearing C.S.No.388 in Stuat Ganj, Shikarpur.
4. ½ share in C.S.No.290-257-258-259-293-294 and 295 in Stuat Gang, Shikarpur.
5. ½ share in shop bearing C.S.No. 217 ABCD, 629/1 and 629/2 and 630 in Machhi Market, Shikarpur.
6. ¼ share in a plot is Khanchandabad, bearing No.S.S.17/1.

| Province | Kind of property | Area | Value claimed | Value assessed |
|---|---|---|---|---|
| Sind | Building | 550 Sq.ft. | 12,000/ | 12000/- |
| | Shop | 571 sq.ft. | 5000/- | 3,177/- |
| | Shop | 342 Sq.ft. | 2125/- | 2125/- |
| | Shop | 2634 Sq.ft. | 7500/- | 7500/- |
| | Shop | 5984 Sq.ft. | 6250/- | 5984/- |
| | Plot | 3126 Sq.ft | 250/- | 250/- |

Rehabilitation benefit enjoyed- Nil

Order:- Title in all cases is proved by certified copies

Property No, 1- The claimant has claimed Rs.12,00/- for this property. The area of the site 61-1 Sq. Yds. i. e. 550 sq.ft. The construction was a pacca one with three storeys fully built up. The claimant has claim roughly Rs.13/- per sq. ft. both for site and construction together which is a most undervalued rate and hence is allowed in toto.

सिंधमधील शिकारपूर येथे घरंदाज घराण्यात
जन्मलेल्या टी. बी. लुल्ला यांना
'रिफ्युजी' म्हणून मिळालेले हे प्रमाणपत्र

FORM OF DOMICILE CERTIFICATE
(to be issued to the displaced persons).

I hereby certify that Shri Totaram Bhojraj Lulla born on or about the $12^{th}$ day of October of 1931 at Shikarpur, (Sind) Is a Non-Muslim displaced person from WESTERN PAKISTAN and has his domicile in the Province of Bombay by virtue of the Resolution No.1866/46 dated the 25th July 1949, of the Government of Bombay, Political and Services Department (copy annexed).

Ex.A: Refugee Registration Certificate
No. 365 dated 5. 2. 49.

Ex.B: Questionnaire

Ex.C: Declaration before the Chief Presidency
Magistrate, Bombay, dated 29. 8. 51.

Ex.D: School Leaving Certificate.

Place- Bombay,
Dated the 31st August 1951.

Presidency Magistrate, Bombay.
Magistrate authorised by
Chief Presidency Magistrate,
Bombay.

VVK.



सांगलीच्या नळभागातील घरात पहिला मुक्काम
१९६० ते १९७०



रामकृष्ण मेडिकलच्या माडीवरील भाड्याचे घर
१९७० ते १९८५




गुलमोहर कॉलनीतील अतीत बंगला १९८५




**ऑफिस**



**टीम लुल्ला ऑफिस** : लखन, अशोक, शुभम, मुग्धा, गीता, गझाला, चैत्राली, रोहन, नितीन, किशोर, अमित, गुंजन, राजश्री.




कै. तोताराम भोजराज लुल्ला
स्वर्गवास दि. २८/०९/२०१०



कै. गुलीबाई तोताराम लुल्ला
स्वर्गवास दि. १२/०८/२०१८



कै. वीणा मुरलीधर पंजाबी
स्वर्गवास दि. २५/०९/२०१४



कै. मुरलीधर मोतीराम पंजाबी
स्वर्गवास दि. १६/११/२०२३



सिंधी पुरुषार्थी पंचायत
ट्रस्टच्या वतीने शिवालोमल कुंदनानी
यांच्या हस्ते सत्कार



मा. आर. आर. पाटील
गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य
यांचा सत्कार करताना.




टॅक्सेशन कन्सल्टंट्स्
असोसिएशन मध्ये
मार्गदर्शन करताना...



गुलीबाई आणि तोताराम लुल्ला



किशोर आणि दीपक लुल्ला सोबत



आमचे कुटुंब - सुधीर, संजीवनी, सुनिता, गुंजन, सारंग, गौरी, आयुष, अमेय, अमृता, किशोर, अमित, अनिता, दिपक.




डॅडी-मम्मीचा लाडका किशोर




सुनिल आणि शिरीष सह



विदेशी जाण्याच्या स्वप्नात



मुरलीधर, बली, डॅडी, रेश्मा, किशोर, सुनिता, मोतीराम, सुजाता, मम्मी, अनिता.



# सिंधी पुरुषार्थी पंचायत ट्रस्ट, सांगली

## सन्मानपत्र

### मा. श्री. तोताराम भोजराज ऊर्फ टी. बी. लुल्ला

सविनय सप्रेम प्रणाम,

सांगली नगरीतील विविध संस्था-संघटना, मित्र परिवार, कार्यकर्ते बंधू-भगिनी आणि कुटुंबीय या सर्वांच्या वतीने सिंधी पुरुषार्थी पंचायत आपल्यास हे सन्मानपत्र आज प्रदान करीत आहे.

परम पवित्र सिंधुभूमीत गेल्या पंधराशे वर्षांत मानवी कृतघ्नपणाचे तांडव अनेकवेळा अनुभवास आले. १९४७ साली त्याचा असह्य अनुभव घेत आपण सर्व सिंधी बांधवांनी आपली धर्मभूमी असलेल्या खंडित भारतात प्रवेश केला. आपण स्वत: जयपूरमार्गे मुंबईत आलात. प्राप्त परिस्थितीत रेल्वेस्टेशनवर पेपरमिंटच्या गोळ्या विकण्यासारखे कामही चरितार्थासाठी तुम्हास करावे लागले. मुंबई - कोल्हापूर मार्गे सांगली शहरात येऊन आपण पाऊल ठेवले, ते आपल्या कर्तृत्वाचे पहिले पाऊल ठरले.

सांगली शहर आणि जिल्ह्यातच नव्हे तर पुणे-मुंबईच्या व्यापार-व्यवसाय जगात आपल्या नावाला जे वजन आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, त्यामागे आपली तपश्चर्या कारणीभूत आहे. करनिर्धारण या विषयात आपण आज जे प्रभुत्व संपादन केले आहे त्याला आपले सखोल ज्ञान व सततचे परिश्रम कारणीभूत आहेत. व्यवसायिक निष्ठा आणि मूल्ये सांभाळूनही आपले ग्राहक, सहकारी आणि शासकीय अधिकारी यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध आपण ठेवू शकलात हे आपले कौशल्य आहे.

सिंधी समाजाच्या वतीने जे उपक्रम चालतात त्यात आपला सक्रिय सहभाग असतोच, पण इतरही सामाजिक कार्यात आपण कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे असता. ही भूमिका नेहमी पडद्यामागे राहून वटविणे हे आपले खास वैशिष्ट्य आहे.

दोन्ही कर्तबगार सुपुत्र, सुविद्य सुना आणि उदयोन्मुख नातवंडांनी तुम्हा उभयंतांचे गृहस्थी जीवन संपन्न केले आहे. आज आपण वयाची ७१ वर्षे, व्यवसायातील ४६ वर्षे, तर वैवाहिक जीवनाची ४५ वर्षे पार केली आहेत. या प्रदीर्घ वाटचालीचा गौरव करून सर्वांच्या वतीने अत्यंत आदरपूर्वक हे सन्मानपत्र अर्पण करीत आहोत.

आपणा उभयंतास असेच सेवाभावी व आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य लाभो ही जगन्नियंत्याकडे नम्र प्रार्थना !

सिंधी पुरुषार्थी पंचायत ट्रस्ट, सांगली

Vishindas B. Gidwani

सांगली
वैशाख शु॥ २ शके १९२५
शनिवार दि. ३ मे २००३

बिशनदास गिडवाणी
अध्यक्ष
सिंधी पुरुषार्थी पंचायत ट्रस्ट, सांगली




दीपकचे कुटुंब




पंजाबी कुटुंब



अमृतासह जोशी कुटुंब



सूनबाईंचे माता-पिता



मीरा लुल्ला आणि आयुष जोशी

अव्यना





'भारत मेरा घर'
योजनेतून केलेल्या
मेघालय प्रवासात
तेथील कुटुंबात किशोर

ग्राहक पंचायतीच्या कामासाठी किशोरचे प्रवासदौरे



लातूर



परभणी, सोबत बिंदुमाधवजी जोशी



सांगली




औरंगाबाद येथे बैठकीनंतर मा. बजरंगलाल गुप्त व बिंदुमाधवजी समवेत ग्राहक पंचायतीचे आघाडीचे कार्यकर्ते



ग्राहक कार्यकर्त्यांबरोबर
मा. लक्ष्मणराव भिडे यांच्यासह
दिल्लीच्या राष्ट्रीय महासंमेलनात




दिल्लीच्या व्यासपीठावर राजाभाऊ पोफळी
व संतोष गांधी यांच्यासोबत




टॅक्स सेमीनार मध्ये मार्गदर्शन करताना



२०१९ च्या महापुरानंतर
लुल्ला फाऊंडेशनतर्फे शालेय मदत

संपर्कसेतू बापूराव लेले यांच्या सत्कारप्रसंगी 'स्मरणगाठ' पुस्तकाचे प्रकाशन पंतप्रधान अटलजी यांच्या निवासस्थानी झाले त्यावेळी मा. आडवाणींची स्वाक्षरी घेताना,







मा. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते सत्कार



समग्र वंदे मातरम् ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात राज्यपाल मा. विद्यासागर राव यांच्या अध्यक्षतेखाली सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या हस्ते प्रत स्वीकारताना...



रोटरी फाउंडेशनचे डायरेक्टर बॅरी रॅसिन यांच्या हस्ते सत्कार



रोटरी इंटरनॅशनल माजी अध्यक्ष जेनिफर जोन्स यांच्या हस्ते सत्कार




मा. बाबासाहेब पुरंदरे व लुल्ला फाउंडेशनचे सहकारी



जि.प.सांगलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.अभिजित राऊत,
बाल साहित्यकार मा.राजीव तांबे व इतर मान्यवर.



'सेवा' प्रकल्पाच्या व्यासपीठावर
मा. लीना मेहेंदळे, अनामी रॉय, रवींद्र शिसवे इ. मंडळींसह आम्ही सहकारी

टी. बी. लुल्ला चॅरिटेबल फाऊंडेशनच्या कार्यक्रमाला मिळणारा प्रतिसाद







बुलडाणा अर्बनच्या सहकार्याने शववाहिका आणि स्पर्धा परीक्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचनालय व अभ्यासिका



'शिकू आनंदे २०१४' चे प्रमुख पाहुणे मा. शंकरजी अभ्यंकर



सेवा २०१३ अंतर्गत सामाजिक संस्थांना मार्गदर्शन
मा. अनिकेत प्रकाश आमटे

□

# सीमा ओलांडल्या

सिंध प्रांतातील हैदराबाद हे मोठे शहर, ते आम्हाला जवळचे होते. बाहेरच्या जगाशी हैदराबादमार्फत दळणवळण होत असे. आम्ही सर्वच्या सर्व सिंधी लोक या नव्या सुलतानी संकटातून सुटण्यासाठी निघालो; ते जाणार कुठे? - अर्थातच पूर्व दिशेला! पंजाब-काश्मीर-राजस्थान-मुंबई...... कुठेही. ज्याला जिथे पाऊल ठेवायला जागा मिळेल अशी शाश्वती होती, ते गाव शोधत जायचे होते. आमचे कोणी सगेसोयरे मुंबईत होते. तिथे काही काळ थांबणे भाग होते. आमच्या वडिलांच्या व्यवसायामुळे त्यांचे लागेबांधे पुष्कळ ठिकाणी होते आणि आमचे तसे उच्चभ्रू कुटुंब असल्यामुळे, देशभरात सुस्थिर झालेले नातलगही आम्हाला होते. पण इतर सगळ्या हिंदू लोकांपुढे हा प्रश्न महाबिकट होता. 'जायचे कुठे?' -उत्तर स्पष्ट होते, -'कुठेही' कसेही करून ही नवी 'सीमा' ओलांडून जाणे आवश्यक होते. अर्थात इथे हेही सांगायला हवे की, आम्ही सगळे सिंधी लोक याही परिस्थितीत 'कायमचे बाहेर चाललो आहोत' अशा मानसिकतेत नव्हतो. ही वावटळ थोडा-फार काळ चालेल. त्यानंतर स्थिरस्थावर झाले की मग पुन्हा हळूहळू आपापल्या गावी आपण परत येऊ हेच सर्वांनी त्यावेळी तरी गृहीत धरले होते.

भारताची फाळणी होऊन दोन देश झाले. या धामधुमीत हिंदू-मुस्लिमांचे शत्रुत्व निर्माण झाल्याची भावना आपोआप खूप वाढली. सीमापार होण्यासाठी पारपत्र (पासपोर्ट) वगैरे गोष्टी फार दूर राहिल्या, त्यावेळी तो प्रश्नच नव्हता. हुसकाहुसकी आणि पळापळी असेच त्या स्थितीचे वर्णन करावे लागेल. जे मुस्लिम लोक पाकिस्तानात चालले होते त्यांची संख्याही पुष्कळ होती. पण त्यांच्या मानाने पाकिस्तानातून येणारा आमचा लोंढा फारच मोठा होता. दुसरे म्हणजे, भारतातून पाकिस्तानात जाणारे मुस्लिम तसे फार संकटात होते असे नव्हे. काहीसा खुशीचा भाग असावा; मात्र अशा खुश-हाल

मुस्लिमांची संख्या बेताची होती. जवळपासची भारतीय शहरे, अथवा बडोदे-मुंबई याही भागातून हुसकले गेलेले काही मुस्लिम पाकिस्तानात जाण्यासाठी सीमेवर गर्दी करून होते. त्यावेळी सीमेवर तपासणी नाके वगैरे सोपस्कारही असण्याचा प्रश्न नव्हता. अमृतसर ते लाहोर, हैदराबाद ते बारामुल्ला, कराची ते राजकोट अशी जी वाहतूक विशेषत: रेल्वेगाड्यांची व मोटारींची चालत असे, ती खचाखच वाहात होती. 'लोकसंख्येची धार्मिक तत्त्वांवर अदलाबदल' हे फाळणीपूर्वी म्हणायला सोपे होते, पण यावेळी त्याचा जो प्रत्यक्ष आविष्कार चालला होता, तो भीषण स्वरूपाचाच होता. 'निर्वासितांच्या छावण्या' हाच मोठा आधार वाटावा अशी सामान्यजनांची स्थिती होती.

पाकिस्तान निर्मितीच्या कालखंडात ज्या दंगली चालू होत्या त्या दंगली म्हणजे हिंदूंच्या एकतर्फी कत्तली होत्या. या कठीण काळाला छेदून जाण्यासाठी आम्ही जिवानिशी पळालो आणि आकाशाच्या प्रचंड पोकळीखाली पूर्ण निर्वासित म्हणून रेल्वे फलाटावर येऊन उतरलो. आमचे सर्वस्व गेले, पण जीव वाचला. आम्ही आमच्या धर्मभूमीत येऊन पोचलो; एवढा एकच आधार आमच्या जगण्याला त्या काळात होता.

□□□

□

# मिळालं ते आपलं

हैदराबादहून आम्ही बारमेरला सीमेवर आलो, व तेथून पुढे जयपूरला आलो. या प्रवासात गर्दी आणि चेंगराचेंगरी होती. सीमा ओलांडून हिंदुस्थानात येण्याला तसे बारा चौदा तास लागले असावेत. पुढच्या स्टेशनांवर जागोजागी अन्नपदार्थ वाटले जात होते. विशेष करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक जमेल तितकी व्यवस्था करत होते. धीर देत होते. त्या त्या शहरात उतरून जर कुणाकडे जायचे असेल तर त्याची सोय करून देत होते. आम्ही जयपूरपर्यंत आलो. तिथे आमची सोय एका मोठ्या दालनात (हॉल) केली होती. आम्ही आप्तस्वकीय असे मिळून सुमारे चाळीस लोकांचे कुटुंब एकत्रित होतो. त्याच इमारतीत आम्ही बरेच दिवस राहिलो. पुन्हा परत आपल्या गावी जायचे होते. ही दंगल आज संपेल, उद्या संपेल म्हणत पंधरवडा उलटला. माझे वडील आणि दोघेतीघे जण प्रमुख पुरुष मंडळी अजूनी मागे गावाकडे राहिलेली होती.

या एकाच जागी आठरा दिवस आम्हाला राहावे लागले. सोबत आणलेले तोकडे सामान, पैशाची तर वानवा होतीच. अशा स्थितीत किती काळ राहणार? दरम्यानच्या काळात हळूहळू ज्या बातम्या कळत होत्या, त्यावरून असे स्पष्ट होत चालले होते की, आता परत आपल्या गावी जाण्याचा नाद सोडून दिलेला बरा. वडिलांनी आमच्या व्यवसायाची आशाही सोडूनच दिली होती. पण जमेल तशी वसूली, आवराआवर करून घेण्याचा एक प्रकारचा चिवटपणा सुरू होता. तो सिंधी स्वभावातला एक भाग असावा असे आता इतक्या वर्षांतले जग पाहिल्यावर मला वाटते. आम्ही आमचा तळ तिथून हलवला, आणि मुंबईची वाट धरली.

माझे मुंबईतले मेव्हणे म्हणजे चुलत बहिणीचे यजमान श्री.ताराचंद आणि काही नातेवाईक यांनी मुंबईच्याच सांताक्रूझ भागात दोन खोल्या आमच्यासाठी घेऊन ठेवल्या होत्या. आमचे दहा माणसांचे कुटुंब मुंबईला येऊन त्या दोन खोल्यांत

स्थिरावले. खार येथे बहिणीचे सासर होते. त्या काळात प्रत्येकी एक हजार रुपये पागडी भरून आम्हाला या दोन खोल्या मिळाल्या होत्या. या जागेत आमच्या कुटुंबाने चूल मांडल्यावर निदान पोट सुरू झाले. हातपाय हालवायचे सुचायला लागले. हा सगळा मिळून कालावधी जेमतेम तीन-चार महिन्यांचा होता. जानेवारी १९४८च्या अखेरीस महात्मा गांधींचा खून झाला. त्यामुळे दुसरे वादळ उठण्याच्या आतच म्हणजे ३१ जानेवारीला माझे वडील तिथे मुंबईत येऊन दाखल झाले. हाताशी आले तेवढे पाचपंचवीस हजार रुपये त्यांनी बरोबर आणले होते. आमच्या शिकारपूरहून ते कराचीला गेले होते व तेथून थेट विमानाने ते मुंबईत उतरले होते. त्यांनी दिलेल्या तपशीलांवरून असे लक्षात येत होते की, आपण सर्वांनी पळून जाण्यासाठी जी घाई केली ती अगदी योग्यच होती! त्यांच्या सर्व हकीगतीवरून हेही स्पष्ट ठरले की आपले वतन आता विसरून जायचे आहे. मुंबई हेच आता आपले गाव. इथे पाऊल ठेवलेच आहे. पुढचा मार्ग इथूनच शोधला पाहिजे. वडिलांचा आणि आम्हा सर्व भावंडांचा आता त्या दिशेने विचार सुरू झाला. हातात तुटपुंजा पैसा, आठ-दहा माणसांचे कुटुंब आणि अनिश्चित भविष्यकाळ अशा स्थितीत फार दिवस फुकट घालविण्यात अर्थ नव्हता.

□

वडिलांची व्यवसायिक नजर शोध घेऊ लागली. त्या काळी मस्जिद बंदर भागात जी मुस्लीम व्यापारी मंडळी होती, त्यांच्यावरही काही प्रमाणात गंडांतर आले होते. मुंबईत जातीय दंगे मोठ्या प्रमाणावर उसळले होते. पाकिस्तानात हिंदू लोकांवर भीषण अत्याचार झाले, त्याची प्रतिक्रिया येथे उमटणे यात अस्वाभाविक काही म्हणता येणार नाही. तसे होणे चूक की बरोबर असा प्रश्न पुढे येतो आणि त्याचे उत्तर ठरलेलेच आहे! तशी हिंसक प्रतिक्रिया होणे हे सर्वस्वी चूकच आहे. एकाने याची गाय मारली म्हणून दुसऱ्याने त्याचे वासरू मारावे हा न्याय नव्हे. एकाने याचा डोळा फोडला म्हणून दुसऱ्याने त्याचा डोळा फोडला तर काय घडेल? 'आय् फॉर दि आय्, वर्ल्ड गोज् ब्लाईंड!' हा सगळा स्वस्थपणी, शांतचित्ताने होणारा विचार अत्यंत योग्य आहे. परंतु तितके मानसिक संतुलन विशिष्ट परिस्थितीत समाजात राहू शकत नाही. सूड म्हणून काही मुस्लीमांवर मुंबईच्या दंगलीत हल्ले झाले, त्यांना पळवून लावले गेले हे खरे आहे. अर्थात पाकिस्तानातील भीषण हत्याकांडाच्या तुलनेत मुंबईतल्या मुस्लिमांना मिळालेला मार फार सौम्य ठरेल. मस्जिद भागातील ज्या मुस्लिम व्यावसायिकांच्या

दुकान जागा ओस पडल्या होत्या, त्या जागा ताब्यात घेऊन प्राधान्याने त्या आम्हा सिंधी निर्वासितांना देण्यात येत होत्या. माझी आठवण चूक नसेल तर सरदार वल्लभभाई पटेल यांची त्यासाठी अनुकूलता होती. सरदारांचा दंगलींना पाठिंबा होता असा याचा विचित्र अर्थ कुणी काढू नये; परंतु पाकिस्तानातून अत्त्याचार भोगत इकडे आलेल्या हिंदू निर्वासितांचा प्रश्न त्यांनी सर्वांपेक्षा अधिक सहानुभूतीने हाताळला अशीच आम्हा लोकांची भावना झाली.

'मे.ठाकूरदास ॲन्ड गिरीधारीलाल' या व्यापारी पेढीचा व्यवहार भगवानदास नावाचे गृहस्थ पाहात असत. त्यांच्याशी भागीदारी करून माझ्या वडिलांनी 'भोजराज ॲन्ड गिरीधारीलाल' या नावाने व्यवसाय सुरू केला. तिकडे शिकारपूर, सक्कर, क्वीट्टा वगैरे ठिकाणी आमची जी स्थावर मालमत्ता होती, त्या सहा ठिकाणच्या घरजागांची किंमत म्हणून सरकारकडून आम्हास नंतरच्या काळात खूप उशिरा तीसपस्तीस हजार रुपये मिळाले. इकडे निघून येताना आमच्या सोबत जे सामान आले त्यात काही कागदपत्र होते, ते दाखवून आमची तिकडील मालमत्ता सिद्ध होण्यासारखी होती. पुढे १९६२ सालच्या अखेरीस भारतीय सर्वेक्षण विभागाच्या (मिनीस्ट्री ऑफ सर्व्हे) आम्हा विस्थापितांना तिकडील मालमत्तेची भरपाई देण्यात आली. पण त्याचे मूल्यमापन कसे केले होते कुणास ठाऊक! उदाहरणार्थ आमचे जे राहते घर 'निचाणी हाऊस' म्हणून होते ती पाच मजली हवेली केवळ बारा हजार रुपयांची धरली गेली. याच प्रकारे सक्करच्या दुकानातील अर्धी वाटणी म्हणून ३१७७, एका मिळकतीचा हिस्सा केवळ २५० असे सहा ठिकाणचे सगळे मिळून ३१ हजार रुपये आले. ही भरपाई देण्यास तब्बल चौदा वर्षे उलटून गेली होती. तोपर्यंतच्या काळात आम्ही आमच्या परिश्रमांवर इथे मार्गी लागलोच होतो. त्यामुळे हे जेवढे पैसे मिळाले तेवढे आपले, असे म्हणून आम्ही त्यावर पडदा टाकला.

मुंबईच्या मस्जिद बंदरजवळ माझ्या वडिलांनी पुन्हा व्यवसाय सुरू केला. या दरम्यान दुसरा भाऊ बडोद्याला जाऊन राहिला होता. त्याने सुरू केलेला धंदा आवरून इकडे मुंबईलाच यावे असे वडिलांनी सुचविले, आणि तो मुंबईला आला. या आधीच मी मात्र माझे अर्धेमुर्धे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याच्या खटपटीला लागलो होतो.

□□□

□

# जीवनचक्र फिरू लागले

तिकडच्या आणि इकडच्या भाषेत आणि अभ्यासात खूप फरक असणार हे गृहीत होते. तिकडे माझ्या लहानपणी शाळेतल्या दोन इयत्ता ओलांडून मी लवकर मॅट्रिक गाठली होती. इथे आल्यावर मार्च १९४८ मध्ये मी पुन्हा पूर्व परीक्षेला (प्री-मॅट्रीक्युलेट) बसलो. ग्रँट रोडच्या सिंध मॉडेल हायस्कूलमधून १९४९ मध्ये मी ७०० पैकी ३६१ गुण (५२%) मिळवून मॅट्रिक पास झालो. राहिलेले पेपर्स मुंबई विद्यापीठानेच घेतले. इंग्रजी पहिली ते सातवीपर्यंतच्या तिकडून आलेल्या सर्वांना परीक्षा न घेता पुढच्या वर्गात घातले. मॅट्रिक परीक्षेला मात्र प्री मॅट्रिक्युलेट परीक्षा द्यावी लागली. या शिक्षणकाळात वडील आणि मोठे भाऊ पूर्वीप्रमाणेच इथे मुंबईतही व्यवसाय सुरू करण्याच्या खटपटीत होते. धंद्यासाठी जागा, भागीदारीपत्रे, कुटुंबाची व्यवस्था, राहण्याची सोय, भांडवल उभारणी असे अनेक विषय त्यांच्यामागे असणार. त्या सर्वांचा दिवस त्यातच संपायचा. घरची सांपत्तिक स्थिती पाहायलाच नको! मी त्यांच्या त्या व्यापात फारसा अडकलो नाही, पण पैसा कोठूनही मिळाला तरी तो हवाच होता. म्हणून मग मी पेपरमिंट - लिमलेटच्या गोळ्या विकायला सुरुवात केली. जवळच्या विलेपार्ले रेल्वे स्टेशनवर विक्री बरी व्हायची. पत्र्याच्या चपट्या गोल डब्यातून गोळ्या विकणारी मुले किंवा बाप्ये जुन्या पिढीला आजही आठवत असतील. खांद्यावर एक लांब बंदाची पिशवी लटकवून, आणि आडव्या हातावर तो डबा ठेवून रेल्वेचे डबे ओलांडत फिरणाऱ्या त्या वेळच्या तरुण मुलांत मी एक होतो. या धंद्यात एक बरे असायचे की, भांडवल-जागा वगैरेचे प्रश्न नसायचे; आणि सारा रोखारोखी मामला असल्यामुळे रात्री परत येताना जमतील ते पैसे खिशात पडायचे. त्याचा कितीतरी उपयोग होई.

मॅट्रिक झाल्यानंतर मला पुढच्या शिक्षणाचे वेध लागलेलेच होते. आर्थिकदृष्ट्या बिकट स्थिती आल्यामुळे मेडिकलला जाऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न केव्हाच हवेत

विरले होते. एकीकडे मिळेल तसे काम करायचे आणि दुसरीकडे कॉलेजला हजर व्हायचे असा दिनक्रम मी सुरू केला. त्याच वेळी म्हणजे १९४९ मध्ये मला सरकारी नोकरी मिळाली. त्या काळात मॅट्रिक झालेल्या तरुणास नोकरी मिळणे कठीण नव्हते. त्यातून आम्हा विस्थापितांना विशेष संधीही मिळाली. स्वातंत्र्यानंतरच्या भारतातल्या प्रशासकीय खात्यांत कारकुनांची भरती सर्रास होत असे. यापैकी दारूबंदी व उत्पादनशुल्क या खात्यांत (प्रोहिबिशन ॲन्ड एक्साईज) मी चिकटलो. घरच्या सगळ्या रामरगाड्याची सर्वांना कल्पना होती. आपापल्या परीने प्रत्येकजण परिस्थितीशी लढत होता. माझे वडील याही स्थितीत कधी हतबल झालेले दिसायचे नाहीत. सतत उद्योग करायचा, समोर येईल त्यांपैकी फायदेशीर काय होईल ते शोधायचे, आणि त्यातून पैसा कमवायचा असा त्यांचा स्वभावच होता. ही कार्यपद्धत सभोवतीच्या सगळ्याच सिंधी कुटुंबांतील कर्त्या पुरुषांची होती. सगळा प्रपंच उध्वस्त होऊन अशा भयकंपित वातावरणात परागंदा व्हावे लागले, परंतु आमच्या सिंधी समाजातल्या कोणीही भिक्षा मागण्यासाठी कधी हात पसरलेला नसेल किंवा आमच्यापैकी काही स्त्रियांनी दुसऱ्या घरी मोलमजुरीसाठी विचारलेसुद्धा नसेल. पुरुषाने कामधंदा घरी आणला तर त्याला घरची बाई मदत करते. पण परिश्रम आणि त्यातून कमाई करण्याला सगळे जग मोकळेच असते, अशी काहीतरी विचारसरणी आमच्यात असावी. त्यामुळे मी सकाळी कॉलेजात जाऊन आल्यानंतर उरलेल्या वेळात नोकरी करतो, याची फार काही अपूर्वाई आमच्या लोकांना नव्हती. 'त्याचा तो कमावतोय... त्याचा तो शिकतोय...' असे सगळ्यांनी मान्य केले होते.

□

चार वर्षे अशी गेली आणि १९५३ मध्ये मी अर्थशास्त्र हा खास (स्पेशल) विषय घेऊन बी.ए. झालो. आमच्या सगळ्या कुटुंबात मी पहिला पदवीधर झालो. वडिलांना, आईला खूप आनंद झाला. एव्हाना इकडे मुंबईत येऊन पाच वर्षे उलटली होती. बस्तान पुन्हा बसत चालले होते. मी आणखी दोन वर्षे शिक्षणाचा तोच ध्यास ठेवून जमेल तिथून जमेल तितके शिकून घेतले. राष्ट्रभाषा सभेच्या हिंदी परीक्षा १९५२मध्ये पास झालो. नॅशनल कमर्शियल कॉलेजमधून टायपिंग कोर्स पूर्ण केला. त्यावेळी म्हणजे १९५७ला मुंबई महानगरात घरोघरी फिरून आर्थिक सर्वेक्षण करण्याची एक कामगिरी होती. केवळ 'ऑनररी इन्व्हेस्टिगेटर' म्हणून मी ते काम केले. त्याचा अनुभव मला उपयोगी वाटला. १९५५ साली एल्‌एल्‌.बी. ची परीक्षा दिली व ६००

पैकी ३९३ म्हणजे ६६% गुण मिळून पहिला वर्ग मिळाला. मुंबई हायकोर्टातल्या 'बार काऊन्सिल'मध्ये थोडी उमेदवारी केल्यावर मला १९५७ मध्ये वकीलीची सनदही मिळाली.

१९४७ अखेरीला आम्ही मुंबईत पाय ठेवला होता, त्यावेळी कोणतीही महत्त्वाकांक्षा ठेवण्याचा प्रश्नच नव्हता. केवळ जगणे, आणि त्यासाठी पोटाला काहीतरी मिळविणे एवढेच डोळ्यापुढे होते. सात वर्षे गेली, त्या दरम्यान मी वकील झालो होतो. हे दिवस खडतर होतेच, पण दैवाच्या एवढ्या परीक्षेनंतर मिळालेले यशही कमी म्हणता येणार नाही!

माझी नोकरी व्यवस्थित चालू होती. पगार बेताचा होता तरी घरी देण्यासाठी थोडे पैसे राहायचे. माझ्या शिक्षणाला तरी घरातून घ्यावे लागत नव्हते. थोडी शिल्लकही राहू लागली. नोकरीच्या पगाराव्यतिरिक्त चिरीमिरी मिळायची हेसुद्धा आता सांगायला हरकत नाही. पगार जेमतेम दीडशे-पावणेदोनशे असेल. त्यात अशी बिकट परिस्थिती आलेली. अशा वेळी कुणी दहावीस रुपये हाती ठेवले तर ते मी मुकाट्याने खिशात घालत असे. याचे गांभीर्य त्यावेळी कळण्याचे वयही नव्हते आणि परिस्थितीही नव्हती. हे नाकारता आले असते असे आता वाटते. पण त्या काळात मुंबईतल्या कुठल्याही सरकारी कामात ही पद्धत सर्रास रूढ होती. त्याला चोरटे स्वरूप होते आणि त्याचे प्रमाणही इतकेच होते की, त्याला 'खाबूगिरी' असे म्हणता आले नसते. राजरोस मागून घेण्याइतका धीटपणा कर्मचाऱ्यांमध्ये अजूनी आलेला नव्हता. माझ्यावरच्या त्या काळच्या प्रसंगामुळे मला त्यातल्या बऱ्या-वाईट परिणामांचा विचार सुचला नाही हे खरे आहे. जे पैसे मिळतील ते माझ्या कष्टाचेच आहेत अशी मी समजूत करून घेतली.

एका खात्यात काम करत असताना दुसऱ्या शासकीय खात्यात नोकरी मिळावी म्हणून अर्ज करता येत असे. आणि त्या वेळी तशा नोकऱ्याही मिळत. माझ्या वकिली शिक्षणाचा उपयोग व्हायला हवा म्हणून मी विक्रीकर खात्याकडे नोकरीसाठी अर्ज केला. माझी पात्रता चांगली होती. त्यामुळे काहीच अडचण न येता मी विक्रीकर-निरीक्षक (सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर) म्हणून रुजू झालो.

□

इकडे आमचे घरही पुन्हा स्थिर होऊ लागले होते. मुंबईत १९४७ च्या सप्टेंबरमध्ये आम्ही उतरलो, त्यावेळी आमच्या मेव्हण्यांनी दोन खोल्यांची जागा भाड्याने घेऊन

ठेवलेली होती. सांताक्रूझ-अंधेरी या दरम्यान वाकोली रोड येथे ही जागा होती. सांताक्रूझ स्टेशनपासून चालत घरी येण्यास वीस मिनिटे लागायची. या ठिकाणी दीड एक वर्ष राहिल्यावर आम्ही ते घर सोडले. किंग्जसर्कलजवळ कोळीवाडा येथे 'सिंध हिंदू सेवा समिती' या नावाची वसाहत तयार करण्यात आली होती. तिथे प्लॉट नं.३ वर १९४९च्या मध्यावर आम्ही राहायला गेलो. इथली दोन कुटीर (बरॅक्स) आम्हाला ३६००/- रुपयांत विकत मिळाली. म्हणजे निर्वासित म्हणून १९४७ च्या ऑगस्टला शिकारपूर सोडले आणि दोनच वर्षात मुंबईत आमच्या मालकीचे पाऊलभर का असेना घर झाले! ती दोन वर्षे आम्ही तर खरोखरीचे निर्वासित होतो, पण आमच्या संपूर्ण सिंधी समाजावरचा 'निर्वासित' हा शिक्का अजूनही पूर्णत: गेलेला नाही हे अजबच!

पुढच्या चार-पाच वर्षांत म्हणजे १९६१ ला जोगेश्वरीच्या हरदेवीबाई सहकारी सोसायटीत प्लॉट नं.३ आम्ही दहा हजार रुपयाला घेतला आणि घर बांधले. त्याच सोसायटीत दुसरा प्लॉट नं.१२ हाही खरेदी केला. त्यावर तीन्ही सुनांच्या नावावर सहा फ्लॅटस्‌ची एक इमारत बांधली. आमची बहीण मूलीबाई भाड्याने दुसरीकडे राहात होती. ती याच इमारतीत राहायला आली. जवळच खार येथे 'सवानी निवास' या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर फ्लॅट नं.५ आम्ही १९६७ मध्ये घेतला. हा फ्लॅट दोन खोल्यांसह (टू रूम किचन) सुसज्ज होता. म्हणजे आधुनिक मुंबईच्या राहणीला शोभेल असा होता. खार येथेच माझी बहीण कर्माबाई तिच्या सासरी पूर्वीपासून राहात असे. तिच्या घरापासून अगदी जवळच हा फ्लॅट होता. आम्ही सर्वजण तिथे राहू लागलो. मी पुढे नोकरीनिमित्त बाहेर पडलो तरी आई तिथे राहायची. नंतर १९९५ मध्ये आमच्या भावाने व बहिणीनेच हा फ्लॅट विकला. त्याचे काही पैसे तिने दिले.

या दरम्यानच्या दहा वर्षांत आमच्या कुटुंबात खूपच उलाढाली झाल्या. स्थावर मिळकतीचे वाद झडले; आईच्या मृत्युपत्रावरून बेबनाव झाले; त्यामधून पुढे कोर्टबाजीही झाली; नंतर नाइलाजाने तडजोड होऊन या वादग्रस्त प्रकरणावर पडदा टाकण्यात आला. हे घडत गेले त्याला नेमके कारण, असे आज तपशीलवार सांगण्यात अर्थ नाही. एक गोष्ट खरी की, आम्हा भावंडांकडून किंवा त्यांच्या पुढच्या पिढीकडून; त्याचप्रमाणे संपूर्ण गोतावळ्यातल्या नातलगांकडून फारसा जिव्हाळा जपला गेलेला नाही. जो तो आपापल्या व्यापात रमला. सर्वांनी पैसा आणि इस्टेट यापायी खूप वादावादी केली. पुढे आमच्या घराण्यातली श्रमसंस्कृती कायम राहिली असेही नाही. परंतु प्रत्येकाकडे पैसा अडका! त्याचा विनीयोग कोणी कसा केला हा विषय पूर्ण वेगळा. त्याचा माझ्या पुढच्या कारकीर्दीशी काही संबंध नाही.

□

# फटिंग ते गृहस्थी

१९५७ मध्ये मी विक्रीकर खात्यात रुजू झालो होतो. मुंबईमध्ये माझे आणि आम्हा कुटुंबियांचे बस्तान बसू लागले होते. यापुढील काळात आम्ही सर्वजण मुंबईत स्थायिक होणार हेही उघड दिसू लागले होते. परंतु माझ्या अन्नाचा शेर फार दिवस मुंबईत नव्हता. जे सिंधी लोक त्या आधीच्या दशकात भारतात येऊन गावोगावी स्थायिक होऊ लागले होते त्यांपैकी बहुतेक सर्वच जण कुठला ना कुठला व्यवसाय करू लागले होते. नोकरीत शिरलेला माझ्यासारखा एखादा अपवादच.

सिंधमध्ये कोणताही व्यापार आपले व्यवहार आणि हिशोब हाटकी लिपीत ठेवत असत. तीच पद्धत आणि तोच सराव भारतात आलेल्या सिंधी व्यापाऱ्यांत होता. आमच्या मुंबई कार्यालयाच्या वतीने कल्याण भागात विक्रीकराच्या संबंधात काही धाडी टाकल्या होत्या. त्यात विक्रीकर खात्याचे जे साठ-सत्तर लोक सामील झाले होते, त्यात मीही होतो. यावेळी विक्रीकर विभागाने काही तपासण्या केल्या, त्यात व्यापाऱ्यांच्या वह्या हाटकीमध्ये लिहिलेल्या होत्या. त्या नोंदी विक्रीकर खात्यातल्या इतर कर्मचाऱ्यांना समजणे शक्य नव्हते. आमच्या खात्यातल्या काही सिंधी लोकांची त्यासाठी मदत होऊ शकली. अशा वेळी माझ्यावर ही जबाबदारी ओघानेच आली. मुंबईखेरीज महाराष्ट्रातल्या इतर शहरांत आणि विशेषत: कोल्हापूरमध्ये तसाच प्रश्न निर्माण झाला. कोल्हापूरजवळ गांधीनगर येथे सिंधी विस्थापितांची मोठी वसाहत तयार झाली. तेथील व्यवसायिकांच्या वह्या हाटकी लिपीत लिहिलेल्या होत्या. कोल्हापूरच्या विक्रीकर विभागाने तपासणीसाठी त्यांपैकी काही वह्या ताब्यात घेतल्या. त्या वाचण्यासाठी मुंबईतून कोणीतरी कोल्हापूरला बदलून जाणे आवश्यक होते. त्याकरिता मुलाखत घेऊन आम्हा तीन जणांची परीक्षा घेण्यात आली. त्यात माझी निवड पहिल्या क्रमांकाने झाली. त्यामुळे साहजिकच माझे गबाळे कोल्हापूरला

पिटाळण्याचा निर्णय झाला. १९५७ला म्हणजे विक्रीकर विभागात दाखल झाल्यापासून वर्षभरात, मी एके दिवशी कोल्हापूरला येऊन दाखल झालो. हा सगळा प्रदेश, इथली भाषा, चाली-रीती, आहार-विहार हे सर्व मला पूर्णत: अपरिचित होते. प्रवासाला जाताना आज आपण दुसऱ्या नव्या प्रदेशांबद्दल वाचून, ऐकून पुष्कळशी माहिती करून घेतलेली असते. त्यामुळे अगदी नवीन प्रदेशात जाण्याचा प्रसंग आला तरी तिथले काहीही माहिती नाही असे सहसा घडत नाही. पण मी ज्या परिस्थितीत भारताच्या एका टोकावरून इकडे आलो त्या परिस्थितीत माझ्यासारख्या काहीशा बुजऱ्या स्वभावाच्या तरुणाला नव्या प्रदेशातील सगळे वातावरण कोड्यात टाकणारेच वाटले.

□

कोल्हापूरच्या विधी महाविद्यालयाच्या वसतिगृहात काही खोल्या होत्या. मी कायद्याचाच माजी विद्यार्थी होतो, आणि या वसतिगृहात जागाही उपलब्ध होती. त्यामुळे त्यातल्या एका खोलीत माझा शिरकाव झाला. राजारामपुरीत हे वसतिगृह होते. त्याच इमारतीत दे.भ.रत्नाप्पा कुंभार राहात असत. त्यांच्याच संस्थेचे लॉ कॉलेज होते, त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांची त्यांनी सोय करून दिली होती. या वसतिगृहातला आम्हा सर्व लोकांचा मेळावा सडाफटिंग असल्यामुळे तेथील दिनक्रमही त्या अवस्थेला साजेसा होता. मला त्यावेळी एकशे ऐंशी रुपये पगार होता, आणि जवळपास तेवढीच वरकमाई असे. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे अनाहूतपणे घडत गेलेल्या या चुका अजूनही 'भ्रष्टाचार' या सदरात न टाकता 'खुशी' एवढ्याच मर्यादेत राहिलेल्या होत्या. अर्थात त्याचे समर्थन मी करून इच्छित नाही. त्यावेळी माझा वैयक्तिक खर्च अगदीच क्षुल्लक होता. पस्तीस-चाळीस रुपयात महिन्याची खानावळ भागत असे. त्यात एकवेळचे शाकाहारी व एकवेळचे मांसाहारी जेवण होते. माझ्या लहानपणी सिंधमध्ये तसाच आहार असे. त्यामुळे मला ही खानावळ पसंत होती. शिवाय कोल्हापूरचे वैशिष्ट्य असलेले, नाक्यावरच्या म्हशींचे दूध मी घेत असे. वसतिगृहातील बाकीचे विद्यार्थी रोज रात्री रमीचा डाव टाकत. पॉईंटला एक पै या दराने आम्ही पैसे लावत असू. पण मी त्यात कधी वाहवत गेलो नाही. दहाच्या सुमारास मी झोपायला निघून जात असे. त्या वयातली थोडीशी करमणूक, एवढेच या डावांचे स्वरूप होते. पैशाची उधळेगिरी माझ्या बाबतीत तरी नव्हती. परंतु मुंबईला काही वस्तू पाठविणे, या भागातून उत्तम दर्जाचे तूप खरेदी करून नात्यागोत्याला पाठविणे, आणि कोणी

सगासोयरा भेटला तर त्याच्यासाठी खर्च करणे असा माझा आर्थिक व्यवहार होता. त्यामुळे माझ्या खिशाला पैसे कमी पडले नाहीत, तरी काडीमात्र शिल्लक राहिले नाहीत. त्या प्रकारची काळजी मी घेत नसे, आणि मला ते सुचलेही नाही.

या ऑफीसात जोशी नावाचे आणखी एक इन्स्पेक्टर होते. ते माझे सहकारी असले तरी इकडचे व्यवहार ते मला शिकवत असत. कोणाकडूनही फुकटचे पैसे लाच म्हणून घेताना मला कसनुसे वाटत असे. पण हे जोशी ''घ्या की राव, न घेऊन कसे चालेल?'' असे म्हणायचे. मी तर या खात्यात आणि या मुलुखातही नवीनच होतो. माझ्यासह आणखी चार इन्स्पेक्टर कोल्हापूर कार्यालयात होते. शिवाय दहा-बारा क्लार्क असत. कोल्हापूर विक्रीकर कार्यालयाचा महसूल बऱ्यापैकी होता. मी या कार्यालयात आलो तेव्हा श्री.जाधव हे अधिकारी होते. ते दोन-तीन महिन्यातच बदलून गेले आणि त्यांच्या जागी भावेसाहेब आले. ते दोन वर्षे राहिले. त्यावेळी शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या साधारण तीन वर्षांनी होत असत. भावे यांच्यानंतर पंगारकर या नावाचे अधिकारी आले.

शासकीय कार्यालयात एकूणच हळूहळू दामाजीपंतांची वर्दळ सुरू झाली होती. अगदी बिनधास्त चरणे असे त्यांचे स्वरूप नव्हते, परंतु खुशीचा मामला म्हणून का असेना सरासरीने गैरव्यवहार चालू झाले होते. एरवी कामात हुशार नसलेली मंडळी केवळ टेबल सांभाळण्याचा हक्क म्हणून पैसे घेत असत. त्यातही एखादा राजरोस घेत असे. पण त्या काळात हे प्रकार 'चोरी चोरी चुपके चुपके' असे असत. माझ्यासारख्या काही नवख्या व भिडस्त मंडळींनी विरोध दर्शविण्याचा प्रयत्न केला तर ती व्यक्ती बाजूला पडत असे. अशा कर्मचाऱ्याच्या कामाचा अहवाल (रिपोर्ट) खराब करणे इतरांच्या हातात असे. त्यामुळे धडाकेबाजपणे 'नाही' म्हणणे पुष्कळांना शक्य होत नसे. त्यांनाही पुढे निर्ढावलेपण येत असेल.

□

माझे नोकरीतील स्थिरस्थावर झाल्यानंतर कुटुंबियांमध्ये माझ्या लग्नाचे घाटत होते. मीही अर्थातच वाऱ्यावर स्वार झालो होतो असे म्हटले तरी चालेल. आमच्या समाजात काही पंडीत-पुजारी अशा उद्योगातले लोक लग्नाची स्थळे एकमेकांपर्यंत नेत असत. अजूनही पुष्कळ ठिकाणी तोच रिवाज आहे. मुंबईतल्या एका भटजींनी एक प्रस्ताव आमच्याकडे आणला. ही मुलगी बी.ए. पास झालेली होती. मी मुंबईला ही मुलगी पाहिल्यानंतर पसंती दिली. तिचा भाऊ आमच्याकडे आला होता, पण त्यांचे

वडील चेन्नईला असत. 'त्यांच्या कानावर घालून सोमवारी पुढील गोष्टी ठरवूया' असे म्हणून ही मंडळी शनिवारी आमच्याकडून गेली. तोपर्यंत मधल्या एका दिवसात म्हणजे रविवारी मुंबईतल्याच श्री.गंगाराम तलरेजा यांची कन्या मणी ही मला सांगून आली आणि तिला पाहिल्यानंतर मी होकार देऊन मोकळा झालो. अर्थातच त्या लोकांनी गडबड करून खारच्या धर्मशाळेतल्या त्या एका दिवसाच्या भेटीत हे लग्न नक्की करून टाकले. 'लग्नाच्या गाठी योगायोगानेच जुळत असतात' हे माझ्या बाबतीत शब्दश: खरे ठरले. तलरेजा मंडळी त्या दिवशी आली नसती तर दुसऱ्या दिवशी चेन्नईवाल्यांची मुलगी मला ठरली असती. माझी वाग्दत्त वधू मणी ही इंग्रजी माध्यमात मॅट्रिकपर्यंत शिकलेली होती असे मला सांगण्यात आले. ती दिसायला सुरेख होती म्हणून मी खुशीने होकार दिला.

आमचे लग्न मुंबईतच झाले. माझे सासरे हुंडीब्रोकरचा व्यवसाय करीत. शिवाय खाजगी पैसा देण्या-घेण्याचा त्यांचा व्यवसाय होता. मुंबईतच विमा कंपनीची ते कामे करीत असत. त्यांना पाच मुली होत्या, त्यांपैकी मणी ही सर्वांत थोरली. त्या काळात लग्नखर्चापोटी माझ्या आठवणीप्रमाणे सात हजार रुपये आम्हाला देण्यात आले आणि प्रथेनुसार लग्नाचा खर्चही मुलीच्या बाजूने केला. खारला आम्ही त्यावेळी राहात असू. तिथल्या देवाला जाऊन येण्यापर्यंत घोड्यावरून वरात निघाली. बाकीचा लग्नसोहळा आमच्या घरातील नेहमीच्या प्रथेनुसार झाला. लग्नानंतर माझ्या पत्नीचे नाव 'गुली' ठेवले. गुल म्हणजे पुष्प एवढे सांगितले म्हणजे पुरे! सिंधमध्ये असताना माझ्या मोठ्या भावाचे लग्न मी पाहिले होते. त्या मानाने बदललेल्या परिस्थितीत आमचे लग्न खूपच साधेपणाने झाले. तरीही त्या काळात प्रशस्त खर्च झाला असे म्हणावे लागेल. लग्नासारखा सोहळा ऐसपैस साजरा करणे ही आमच्या समाजात रीतच होती.

लग्नानंतर आम्ही मधुचंद्रासाठी माथेरानला गेलो होतो. तिथे एक आठवडा आम्ही मजेत घालविला. माझी पत्नी साध्या वळणाची व गृहस्थीधर्म मनापासून आवडणारी होती. माथेरानला आम्ही हॉटेलमध्ये राहिलो. पण तेथील जेवणाचा सरंजाम पाहून तिने नाक मुरडले. तिला अशा प्रकारचे जेवण मुळीच आवडले नाही. म्हणून मग दोन-तीन दिवसांनी आम्ही जवळपास कुठून तरी एक स्टोव्ह, चार भांडीकुंडी, ताटल्या असे भाडोत्री आणले आणि आमच्या स्वतंत्र खोलीत आपल्या मनासारखा स्वयंपाक तिने स्वत:च बनविला आणि पुढचे पाच-सहा दिवस तिने हे काम मोठ्या खुशीने केले.

□

मुंबईच्या घरी परत आल्यानंतर मी कोल्हापूरला पुढे जावे, आणि काही दिवसांनी बिऱ्हाड थाटण्याजोगी एखादी जागा पाहून मग यथावकाश पत्नीला घेऊन जावे; ही खरे तर योग्य रीत झाली असती. त्या दृष्टीने घरात बोलणे होत असताना माझ्या पत्नीने या गोष्टीला ठणकावून नकार दिला आणि माझ्याच बरोबर कोल्हापूरला निघण्याचे जाहीर करून टाकले. वास्तविक कोल्हापूरला मी एका वसतिगृहात फटींग अवस्थेत राहात होतो. नवपरिणित पत्नीला तिथे घेऊन जाणे शक्यच नव्हते. पण अशा वेळी पत्नीने जो ठाम निर्णय घेतला तो मुकाट्याने मी मान्य केला. मला वाटते की हीच पद्धत त्यावेळपासून आमच्या घरात रूढ झाली. अर्थात असे म्हणताना मला काही चुकल्यासारखे कदापि वाटत नाही. माझा आणि माझ्या संसाराचा एकदा तिने स्वीकार केल्यानंतर एका अंशाचासुद्धा दुरावा तिने ठेवला नाही. ही गोष्ट खरेतर माझ्या समाधानाचीच होती. आम्ही दोघेही जण आमच्या बॅगा घेऊन थेट कोल्हापुरात घेऊन दाखल झालो. गावातल्या एका धर्मशाळेत आम्ही सामान टाकले. तिथे मुक्काम टाकून योग्य त्या जागेचा शोध घेणे आवश्यक होते. दुपारी त्या मोहिमेवर आम्ही बाहेर पडलो आणि संध्याकाळी चांगल्या दोन खोल्यांची जागा आम्हाला मिळाली. लगेच आधीच्या धर्मशाळेवर जाऊन आम्ही बॅगा घेतल्या आणि आमच्या नव्या घरात प्रवेश केला. माझ्या आयुष्यात पुष्कळ गोष्टी आश्चर्यकारक सहजपणे घडत गेल्या आहेत. त्यांपैकी हा एक प्रसंग म्हणून त्याचा उल्लेख करावा लागेल. प्रवासी वाहतूक क्षेत्रात आज प्रसिद्ध असलेले कोल्हापूरचे कोंडुसकर हे त्यावेळी आमचे शेजारी होते. आमोरासमोर आमची बिऱ्हाडे होती आणि संसारात नवीन असलेल्या आमच्या पत्नीला त्यांच्या घरची पुष्कळशी मदत होत असे.

मी माझ्या विक्रीकर कार्यालयात कामावर हजर झालो आणि अगदी लगेचच म्हणजे कोल्हापुरात पाऊल ठेवल्यापासून तिसऱ्या दिवशी विक्रीकर अधिकाऱ्यांचा कॅम्प विटे येथे निश्चित झाला. तिकडे मी जाण्याचे ठरले. त्यामुळे इथे कोल्हापूरात नवख्या असलेल्या पत्नीला ठेवून एक आठवड्यासाठी विट्याला जाणे मला भागच होते. ही योजना मनात काहीशा अनिच्छेने घोळवत मी घरी आलो आणि पत्नीला कल्पना दिली. याही वेळी तिने आग्रह धरला की, मी तुमच्याबरोबर विट्याला येणार. आमच्या कार्यालयात नेहमी येणारे विक्रीकर सल्लागार श्री.तारळेकर वकील हे मूळचे विट्याचे. त्यांचे विट्याला मोठे घर होते. तेही म्हणाले की, माझ्या घरी तुम्ही बिनधास्त आपलेपणाने राहू शकाल; तर दोघे मिळूनच अवश्य जा. आम्ही नको-

बिको म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. विटे येथे सरकारी कामासाठी टाकलेल्या कॅम्पसाठी मी पत्नीसह तारळेकरांच्या वाड्यावर दाखल झालो. दिवसभर ऑफीसचे काम झाले की संध्याकाळ मोकळीच असे. मी सिंध प्रांतातून मुंबईमार्गे आलेला, माझी पत्नी मुंबईत स्थायिक असलेल्या घरी वाढलेली आणि आमची जोडी लग्न झाल्यापासून दहा-बारा दिवसातच कोल्हापूरमार्गे विट्यासारख्या खेडवळ गावात एक आठवडा राहिली होती, हे आता नवलाचे वाटते.

वर्षभराने पहिल्या बाळंतपणासाठी माझी पत्नी मुंबईला गेली. तिचे दिवस भरत आलेले होते. पहिली वेळ असली तरी बाळंतपण जवळ येईपर्यंत ती कोल्हापूरातच राहिली होती. मुंबईला गेल्यानंतर लवकरच दीपकचा जन्म झाला. मी एक महिन्याची रजा घेऊन मुंबईला गेलो होतो. तिच्या बाळंतपणासाठीच्या माझ्या रजेपैकी सात-आठ दिवस आधीच संपलेले होते. बाळंतपणात एक-दोन दिवस गेले असणार म्हणजे त्यानंतर जेमतेम पंधरवड्यातच मी कोल्हापूरला परत येण्यास निघालो. आणि आता मौजेची वाटते अशी त्यावेळची गोष्ट म्हणजे याहीवेळी माझ्याबरोबर पत्नीने आपली बॅग आवरली. नवजात अर्भकासह माझ्या हाती देत तीही निघाली. आम्ही दोघेजण कोल्हापूरच्या छोट्या बिऱ्हाडात दाखल झालो.

दुसऱ्या वेळी तसाच प्रकार झाला. मुंबईत किशोर जन्माला आला आणि पुन्हा आम्ही दोघे मिळूनच छोट्या मुलांसह कोल्हापूरला येण्यास निघालो. कोल्हापूरचे एकूणच वास्तव्य आमच्या दृष्टीने ऐन तारुण्याचे आणि नव्या नवलाईचे होते. हिंडणे-फिरणे, मजेत खाणे-पिणे आणि हातात हात घेऊन बागेतील चक्कर, अधूनमधून सिनेमा असे एखाद्या प्रेमकथेत शोभावे असे आमचे ते दिवस होते. 'हम दो हमारे दो' असा संसार होता. कोल्हापूरमध्ये आम्ही नवीन असल्यामुळे बाहेरचे जग काही माहीत नव्हते. सरकारी नोकरी होती. या सगळ्यात आम्हा दोघांना खूप रस होता. अशी आमची दीड-दोन वर्षे गेली. दीपकला शाळेत घालण्याची वेळ आली. त्या काळात कोल्हापूरला आमच्या जवळपास कुठे इंग्रजी माध्यमाची शाळा नव्हती. मीही इथे फार दिवस न राहता मुंबईला 'आपल्या माणसांत' जाण्याचा विचार करत होतो. कायमचे इकडे राहायचे हे त्यावेळी मनात नव्हते. अशा स्थितीत आम्ही एकदा मुंबईला गेलो असताना माझ्या सासूबाई, म्हणजे दीपकच्या आजीकडे सहज गप्पागोष्टींत विषय निघाला. तेव्हा त्या आजीबाईंनी दीपकला आपल्याकडेच ठेवून जाण्याची सूचना केली. आम्हाला ते पटण्यासारखे नव्हते; पण सध्या त्याला कोल्हापूरात मराठी शाळेला घालण्याजोगे नव्हते. आम्हीही थोड्याच काळात पुन्हा मुंबईला येणार होतो.

दोन लहान मुले घेऊन कोल्हापूरसारख्या ठिकाणी एकटी राहण्यात पत्नीची धावपळ होई. आजीबाईंच्या घरात कोणी मुलगा नव्हता, त्यामुळे त्यांचा खूप आग्रह होता, आम्ही त्यांना नाही तरी कसे म्हणणार? आम्हाला भीड मोडता आली नाही. दीपकला शाळेसाठी थोडे दिवस आजीकडे राहू द्या, असे म्हणून आम्ही कोल्हापूरला परत आलो आणि पुन्हा आमचा संसार सुरू झाला.

कोल्हापूरात थोडे दिवस गेल्यानंतर माझी बदली सांगलीला झाली. १९५९मध्ये मी सांगलीत दाखल झालो. आत्तापर्यंतच्या नोकरीतल्या व या मुलुखातल्या अनुभवावरून सांगलीत येणे फारसे अडचणीचे वाटले नाही. आमच्या दृष्टीने कोल्हापूर काय आणि सांगली काय - फारसा फरक नव्हता. सांगलीत मी ऑफीसच्या कामानिमित्ताने आधी येऊन गेलो होतो. तिथल्या पाटील नावाच्या इन्स्पेक्टरच्या ओळखीने मी दोनतीन दिवस त्याच्या घरी राहिलो. मग एक भाडोत्री जागा पाहिली. त्यावेळच्या रेल्वेस्टेशन चौकासमोर केळकर बिल्डिंगजवळच्या बोळात शिरले की एका साध्यासुध्या घरात माडीवर ही जागा होती. श्री.जाधव यांच्या मालकीच्या या घरात आम्ही बिऱ्हाड थाटले. घराला छोटी अरुंद गॅलरी होती, साधा कठडा होता. एके दिवशी आमचा छोटा किशोर तिथून थेट खाली पडला. फार उंच अंतर नव्हते. पण एवढ्या छोट्या जिवाला धोक्याचे नक्कीच होते. किशोर पडल्यावर धावाधाव झाली, डॉक्टरकडे नेले. पण काही इजा नव्हती हे आश्चर्यच! इथेही आमचा प्रपंच एकूणात मजेत चालू होता.

□□□

□

# जीवनचक्र फिरत आहे....!

सांगलीतील माझा आयुष्यक्रम हा माझ्या व्यवसायिक आणि गृहस्थी जीवनातील यशस्वितेचा उमेदीच्या काळातील गाभा मानता येईल. नोकरी हा आमच्या सर्व सिंधी समाजाच्या दृष्टीने स्वभावधर्म नव्हता. मी शालेय शिक्षणात बिकट प्रतिकूल स्थिती असूनही चांगली कामगिरी केलेली होती, त्या गोष्टीचा फायदा किंवा सुपरिणाम म्हणून मला नोकरी मिळाली; तरी ती मी अखेरपर्यंत करत राहावी असे काही मला वाटत नव्हते. सुरुवातीला ती तातडीची गरज होती. त्यानंतरच्या चार वर्षात माझे वैवाहिक जीवन चांगले फळाफुलाला आलेले होते. पण याच प्रकारच्या स्वस्थ-निरंकारी जीवनात मला तसा रस नव्हता. शिवाय पैसा कमवायची उमेद होतीच. हा सगळा विचार करून मी मार्ग शोधत होतो. मुंबईत माझे सगळे सगेसोयरे होते, तिथे माझी चार वर्षातली उमेदवारी झाल्यामुळे मला तिथल्या अफाट संधी आणि तेथील उद्योगप्रियता खुणावीत होत्या. सांगली कोल्हापूरचे निवांत वातावरण पाहिल्यावर मी पुन्हा मुंबईला जाऊन व्यवसायात शिरायचा विचार पक्का केला. मुंबईला ताडदेवच्या प्रसिद्ध एयरकंडिशण्ड मार्केट या व्यापारसंकुलात मी जागा घेऊन ठेवली आणि लवकरच तिथे कर-सल्लागार म्हणून माझे ऑफीस सुरू करण्याचे ठरविले. हे १९५९ साल होते, आणि दोन महिन्यातच मी मुंबईला जाण्याची शक्यता स्पष्ट दिसत होती.

सांगलीतल्या विक्रीकर कार्यालयात त्यावेळी जे मोजकेच वकील लोक करसल्लागार म्हणून येत असत. त्यांमध्ये श्री.व्ही.व्ही.देशपांडे हे होते. त्यांचे प्रॅक्टीस चांगलेच होते. मी विक्रीकर खात्यातला इन्स्पेक्टर आणि ते इथे नेहमी येणारे वकील, यामुळे आमचा उत्तम स्नेह होता. त्यांच्या काही केसीस माझ्यासमोर असत. करनिर्धारण, सरकारी कायदेकानून व त्यासंबंधी कामकाज याबद्दल आमची

चर्चा होई. एकमेकांत विचारविनीमय होत असे. मी ही नोकरी सोडून मुंबईला व्यवसाय करण्यास जाणार असल्याची कुणकुण त्यांच्या कानावर असावी. एक दिवस त्यांनीच माझ्याकडे विषय काढला आणि ते म्हणाले की, 'तुमच्यासारख्याने या नोकरीत राहण्यापेक्षा स्वतंत्र धंदा करायला पाहिजे. मला सध्या भरपूर काम आहे हे तर तुम्ही पाहात आहात, पण मला तुमच्यासारखा मित्र जोडीदार म्हणून मिळाला तर हवा आहे. तुम्ही माझे भागीदार म्हणून या.' त्यांचा देकार तसा चांगलाच होता. मला माझी व्यावसायिक क्षमता अजमावता आली असती. सांगली हे तसे व्यापार-उद्योगात पुढे येत असलेले शहर म्हणून नावारूपाला येत होते. इथे व्यवसायाच्या दृष्टीने मुंबईइतकी नसली तरी माझ्या पोटापाण्याच्या दृष्टीने चांगली संधी होती. मुंबईत माझा गोतावळा आणि लागेबांधे असले तरी तिथून काही कौटुंबिक कुरबुरी एव्हाना कानावर येऊ लागल्या होत्या, त्या परिस्थितीत माझा स्वभाव 'आपण बरे, आपले काम बरे' असा असल्याने चार पावले लांब सांगलीत राहून थोडा काळ वाट पाहावी असाही एक विचार घोळत होता. या सर्वांखेरीज देशपांडे यांच्यासारखा एक सत्शील, व्यवहारी व चांगला व्यवसायिक मला भागीदार म्हणून बोलावत होता. त्यांच्या सुस्थिर झालेल्या धंद्यात मला फारसा धोका नव्हता, यशाबद्दल शंका घेण्याचे कारण नव्हते. या अनुकूलतेबरोबरच आणखी एक गोष्ट मला स्पष्ट दिसत होती ती अशी की, महाराष्ट्रात नवा विक्रीकर कायदा संमत झालेला होता, आणि तो दि.१-१-१९६० पासून प्रत्यक्ष अंमलात येणार होता. यामुळे बहुतांशी सर्वच व्यापारी-उद्योजक-व्यवसायिक यांना वकीली सल्ला व मार्गदर्शनाची नक्की गरज लागणार होती. या व्यवसायात नव्याने उतरणाऱ्याला खूप मोठे काम मिळण्याची ही संधी होती.

हा सगळा विचार करून मी नोव्हेंबर १९५९ या महिन्यात नोकरीचा राजीनामा दिला. गंमत म्हणजे माझा हा राजीनामा पुष्कळ दिवस मंजूर न होता तसाच राहिला होता. मला पुन्हा पत्र वगैरे पाठवून त्याचा पाठपुरावा करावा लागला आणि त्या कामासाठी एकदा मुंबईला हेलपाटा घालून यावे लागले. शेवटी १९५९च्या डिसेंबरमध्ये माझा राजीनामा मंजूर झाला, आणि मी व्ही.व्ही.देशपांडे यांचा पार्टनर म्हणून काम सुरू केले.

□

श्री.देशपांडे हा भला माणूस होता. त्यांच्या ऑफीसात आयकर-विक्रीकर या

दोन्ही विषयांतील काम चाले. त्यावेळी सर्वच ठिकाणी तशी पद्धत होती आणि आजही त्यात फारसा बदल नाही. श्री.देशपांडे स्वतंत्रपणी आयकर विभाग सांभाळत. विक्रीकर माझ्याकडे असे. या विक्रीकर कामात आमची १०:६ अशी आणेवारी होती. म्हणजे आजच्या भाषेत ६३% माझे व ३७% त्यांचे. मी स्वत: या कामात पूर्णत: गुंतून घेत असे. सकाळी साडेसात-आठ वाजता मी ऑफीसात येई. साडेदहाला घरी जाऊन जेवायचे आणि तिथून परस्पर विक्रीकर कार्यालयात माझ्या केसीससाठी जात असे. साडेचार-पाचला पुन्हा आमच्या ऑफीसात जाऊन दोन तीन तास काम करीत असे. आता व्यवसायिक झालो असलो तरी नोकरीमुळे तीन-चार वर्षांचा अनुभव होता. अभ्यास आणि वाचन मी करीत असे.

त्या काळात पुष्कळ कामे आम्हाला स्वत: करावी लागत. बहुतांश व्यापारी दिवाळी वर्षाप्रमाणे विक्रम संवत् व्यवहारात ठेवून त्यानुसार वह्या ठेवीत. तर काही उद्योजक डिसेंबर ही वर्षअखेर मानीत. सरकारी आर्थिक वर्ष मार्चला संपत असल्याने तशी आकडेवारी मांडून द्यावी लागत असे. टायपिंग करावे लागे. चलने-पत्रके भरणे, निर्धारण व वह्या तपासणी (असेसमेंट) ही कामे मीच करत असे. श्री.देवधर, श्री.देशपांडे व श्री.अच्युत जोशी हे त्या काळात आमच्याकडे अतिशय प्रामाणिक कर्मचारी होते. या कामी त्यांची फारच मदत झाली. आमचे अशील (क्लायंटस्) जत-इस्लामपूर-विटे वगैरे लांबलांबचे असत. त्याकाळी वाहतुकीच्या सोयी कमी होत्या. त्यामुळे तारखेसाठी एकदा आल्यानंतर त्यांचे काम होऊन जावे, त्यांना दुसरा हेलपाटा करावा लागू नये अशी काळजी मी घेत असे. माझी ही सगळी पद्धत श्री.देशपांडे जवळून पाहात होते. त्यांना तर इकडे लक्ष देण्याचे कारणही न पडता, त्यांच्या स्वत:च्या कामावर भर देता येत असे. दीड दोन वर्षांनंतर ते होऊन म्हणाले की, विक्रीकराचे सर्व काम तर तुम्हीच ओढून नेत आहात त्यामुळे त्या नफ्यापैकी ३७% एवढा हिस्सा मी घेणे उचित नाही. तेव्हा तुमचा वाटा आणखी दोन दोन आण्यांनी म्हणजे सुमारे दहा टक्के वाढवून घ्या. श्री.देशपांडे यांचा भलेपणा त्यांच्या या दृष्टिकोणातून लक्षात येईल. माझे त्यांचे व्यावहारिक-व्यावसायिक संबंध तेवीस-चोवीस वर्षे राहिले याचे श्रेय आज मी माझ्या कामसूपणालाही घेईन, पण तितकेच ते त्यांच्या सभ्यतेला व चांगुलपणालाही निश्चितच देईन. त्यांच्या पत्नी तितक्याच सुस्वभावी आहेत. मला मोठ्या भावजयीचा आधार त्या वाटत.

यथाकाल आमचा तेथील शेर संपला. त्या दरम्यान श्री.देशपांडे यांचा मुलगा व्यवसायात आला. श्री.सुहास देशपांडे यांचे माझ्याशी चांगले संबंध होतेच. त्यांचे

वडील व्ही.व्ही.देशपांडे हे मुलाकडे व्यवसाय सोपवून ठाणे-मुंबईला गेले. पण जाताना मला सूचना देऊन गेले की, त्यांच्या मुलासमवेत आणखी तीन वर्षे तरी मी भागीदारी ठेवावी. आम्हा दोघांत योग्य नफा वाटणी ठरली. या काळात श्री.सुहास देशपांडे यांच्याशी माझा कधी वादविवाद झाला नाही. हे सर्व असले तरी दीर्घकाळ हे संबंध इतकेच चांगले राहावेत असे मला नेहमी वाटत राही. सुहास देशपांडे हेही उत्तम काम करीत. शिवाय मोठ्या देशपांड्यांना मी शब्द दिला होता, त्याप्रमाणे तीन वर्षे होईपर्यंत वेगळा काही विचार करणे उचित नव्हते. पण एके दिवशी श्री.सुहास देशपांडे यांच्याकडूनच प्रस्ताव आला आणि मी हो म्हणालो. निवृत्तीनंतर व्ही.व्ही.देशपांडे सांगली सोडून गेले होते. या बदलत्या स्थितीत सुहास देशपांडे यांच्याशी असलेली भागीदारी अत्यंत समजूतदार वातावरणात संपवून मी बाजूला झालो आणि आपापल्या कामांत आम्ही रमून गेलो. आजही आमचे व्यावसायिक संबंध जिव्हाळ्याचे आहेत. माझ्या आयुष्यात व्ही.व्ही.देशपांडे यांना वेगळे स्थान आहे.

□

किशोर बी.कॉम.पदवी पास झाल्यावर माझ्या ऑफीसात हळूहळू येऊ लागला होता. त्याने एलएल.बी.ला नाव घातले. माझाच व्यवसाय तो करणार हे अलिखित ठरलेच असणार. माझ्या ऑफिसात तो शिकत होता. १९८४ पर्यंत तो तयार झाला, डबल ग्रॅज्युएट झाला. त्याच्या डोक्यात वेगळ्याच उड्या चालू होत्या. तो इंग्लंडला जाऊन तिकडे स्थायिक व्हायचे म्हणत होता. आपले घर-गाव सोडून नव्यानव्या ठिकाणी कुठेतरी जाणे यात आम्हा लोकांना फारसे काही वाटायचे एव्हाना कारण नव्हते, पण इंग्लंड अथवा तशा दूरदेशी व्यवसायधंद्यासाठी जाणे आमच्या कल्पनेत बसत नव्हते. तो पदवीधर झाल्यावर एकदा इंग्लंडला जाऊन येण्याचे ठरले. तो, अरविंद चाफळकर आणि सुहास देशपांडे असे तीघेजण इंग्लंड-युरोप प्रवासाला जाऊन आले. का कुणास ठाऊक, पण तिकडून परत आल्यावर त्याचे इंग्लंडला राहायला जाणे बारगळले. तिकडचे एकूण जीवनमान पाहिल्यावर 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' हे त्याला कळले असावे. मग मात्र त्याने माझ्याच व्यवसायात सामील होण्याचे नक्की केले. त्याने थोड्या धाडसाने आणि पूर्ण विचारांती आंबराई रोडला अभ्यंकर कॉम्प्लेक्समध्ये मोठी जागा ऑफीससाठी घेतली. मी माझ्यासाठी पूर्वीच्या ऑफीसात एक सुंदर टेबल बनवून घेतले होते.

'त्याच्यासह तुम्हास इथले जे आवश्यक आणि योग्य वाटते ते न्या.' असे श्री.देशपांडे म्हणाले. माझ्या नव्या ठिकाणी तातडीची गरज म्हणून मी तेथील दोनपैकी एक टाईपरायटर तेवढा आणला. फर्निचरपैकी त्या टेबलसह काहीही मी आणले नाही. त्यांनीही जागाभाडे वगैरे हिशेबात घेतले नाही. शांतपणे मी बाजूला होऊन नव्या ऑफीसात आलो.

सरकारी कामात भ्रष्टाचाराने आपले पाय वेगाने पसरण्यास सुरुवात केली होती. मी त्यात माझा सहभाग येऊ न देण्याची दक्षता घेत असे. असेसमेंटच्या आधी माझ्या अशीलाच्या वह्यांचा अभ्यास करून मी सगळे व्यवहार नीट समजून घेत असे. कर वाचविण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करीत असे, पण कोणतीही लपवाछपवी व चुकवेगिरी न करण्याची सूचना देत असे. पहिल्यांदा त्यांची समजूत काढावी लागे. पण दीर्घकाळात त्यांचा फायदा होई. मोठ्यामोठ्या व्यापाऱ्यांचे करनियोजन (टॅक्स प्लॅनिंग) मी करून देत असे, त्यामुळे एक प्रकारे आर्थिक शिस्त लागून त्यांनाही त्रास होत नसे. पैसे घेण्या-देण्याचे प्रमाण होते आणि ते हळूहळू वाढत होते. पण ते मी कधी माझ्या अंगावर घेत नसे. क्लाएंटला भय दाखवून किंवा त्याला अंधारात ठेवून आपल्या हाती व्यवहार हाताळण्याचा 'मध्यस्थीपणा' मी कधी केला नाही. त्याही काळापासून माझी फी इतरांपेक्षा जास्त आहे. ती मी आग्रहपूर्वक वसूल करतो. पण तरीही माझ्याकडे सर्वाधिक क्लाएंटस् आहेत. कारण मी उघड व्यवहार ठेवले, आणि देण्याघेण्याचे काम सरकारी कर्मचारी व माझे क्लाएंट यांच्याकडूनच परस्पर करावे अशी पद्धत ठेवली. माझ्या कष्टाचे, बुद्धीचे पैसे मला मिळायचे व त्यावर मला समाधान होते. या चोवीस-पंचवीस वर्षांत मी सांगलीच्या जीवनात चांगलाच सुस्थिर झालो. व्यावसायिक संमेलनांच्या (सेमिनार) निमित्ताने मी दोन वेळा सिंगापूरला आणि एकदा दुबईला जाऊन आलो.
□

जवळपास चाळीस पन्नास वर्षे मी या कामाशी जवळून परिचित आहे. मी माझ्या गतजीवनाचा आढावा घ्यायचा म्हटले तर माझ्या या करविषयक कारकीर्दीचा पल्लाच जास्त मोठा आहे, त्याची हकीकत फार तपशीलाने सांगण्याजोगी नाही. एक वकील या नात्याने त्या व्यवसायिक कारकीर्दीबद्दल काही सांगू म्हटले तर सर्वांच्या भुवया उंचावणे स्वाभाविक आहे. कारण या काळात ज्या खास सरकारी सवयी रूढ झाल्या, त्याबद्दल मी काय नि कसे सांगतो याचीच उत्सुकता असणार.

खरे सांगायचे तर त्या सरकारी पद्धती व भ्रष्टाचार हे एक उघड गुपित आहे. त्याबद्दल मी तरी काय नि कसे सांगावे हा प्रश्नच आहे. गैर गोष्टी चघळून काय मिळणार? म्हणून या काळातले केवळ एक अपवादात्मक वैशिष्ट्य म्हणून मी श्री.जोगळेकर यांचा उल्लेख करेन. श्री.जोगळेकर हे अतिशय कामसू, दक्ष आणि चोख असे व्यक्तिमत्त्व होते. सरकारी कचेऱ्यांतून सरसकट भ्रष्टाचार चालत असल्यामुळे 'आपणही सोवळे राहू म्हटले तरी ते शक्य होत नाही' असे मलादेखील वाटत असे पण त्याला जोगळेकर हे चोख उत्तर होते. जे भ्रष्टाचाराच्या विरोधात असतात ते आपला संताप तीव्र आक्रमकतेने व्यक्त करू पाहतात, आणि भ्रष्टाचाऱ्यांच्या षड्यंत्रात अडकू शकतात. त्यामुळे त्यांचेही नुकसान होते, ते एकटे पडतात आणि मग गैरमार्ग अधिक प्रशस्त होतो. श्री.जोगळेकर हे स्वत: अत्यंत शुद्ध आणि स्वच्छ होते, इतरांचे गैरप्रकार त्यांना ठाऊक असत पण ते तिकडे कदापि लक्ष द्यायचे नाहीत. स्वत:चा मार्ग स्वत: निष्ठेने चालत राहणे यांनी पसंत केले. नियमानुसार आपल्या कामांतून त्यांना बढती मिळाली आणि ते खऱ्याखुऱ्या सन्मानाने शांतपणे निवृत्त झाले. त्यांची राहणी अत्यंत साधी, विनम्र असे. त्यांच्या बाबतीत असेही घडले आहे की, इतरत्र चटके खाल्लेल्या एखाद्या कुणी त्यांना 'काही' देऊ केले तर ते देणाऱ्यावर उखडत असत. पैसे देण्याघेण्यापेक्षाही आपल्याला या माणसाने 'त्यातला' समजावे याचा त्यांना विलक्षण संताप येत असे. काही काळाने त्यांना जाणवे की, यात त्याची चूक नाही. आपले वेगळेपण त्या बिचाऱ्याने कसे ओळखावे? श्री.खान किंवा जमादार अशा काही नावाचे एक मुस्लिम अधिकारी होते. तोही स्वच्छ हाताचा माणूस. अलीकडच्या काळात एक महिला अधिकारी आहेत, त्या पूर्वी घेत असत पण हल्ली कठोरपणी नाकारतात असे ऐकतो. त्या आता सांगलीत नाहीत. हे मला भेटलेले व अनुभवता आलेले अपवाद; बाकीच्यांबाबतीत काही बोलण्याचा मला अधिकार नाही.

□

इकडे माझी कौटुंबिक आघाडी उत्तम सांभाळण्याचे काम माझी पत्नी गुलीबाई हिने केले. थोरला मुलगा दीपक अडीच वर्षांचा असताना, त्यावेळची सोय म्हणून त्याच्या आजीकडे राहिला. माझे सासरे वारले, त्यानंतर सासूबाईंना एकटे करमत नाही म्हणून त्याला त्या आजीने ठेवूनच घेतले. त्यांना त्याचा लळा लागला. त्यांनाही मुलगा नव्हता, यालाच त्या आपला वारस समजू लागल्या. दीपक मुंबईत

शाळेला जाऊ लागला. लहानाचा मोठा झाला. सांगलीत आमच्याजवळ किशोर होता. तो अभ्यासात चांगला होता, नापास तर कधीच नाही. चौथ्या-पाचव्या नंबरात असे. ऐनवेळी काम फत्ते करण्यासाठी तो मेहनत घेत असे, पण एकंदरीत तो काहीसा हूड होता. माझी पत्नी संसारातील सर्व जबाबदाऱ्या घेई. सांगली भागात सिंधी समाजाची पुष्कळ घरे आहेत, त्यांच्यात आमचे कुठे नातेसंबंध नाहीत. वेळप्रसंगी-सणउत्सवाला आम्ही एकत्र जमायचो. मी बाहेरच्या बाहेर त्या मंडळींत अधूनमधून जाई. किशोर सांगलीतल्या पटवर्धन हायस्कूल या शाळेत होता, तो पूर्ण मराठीच बनून गेला. पत्नीला संसार-शेजार-पैपाहुणे-स्वत:ची हौस या सगळ्यात आनंद होता. माझी ती पहिल्यापासून खूप काळजी घेते. आमचे कधी भांडणही होते, पण त्यात आमच्या गुलीबाईच्या हिशोबी पहिले स्थान स्वत:, स्वत:चे घर, इभ्रत-पैसा याला असते.

राम मंदिराजवळ 'श्रीकृपा' नावाची धनी वेलणकरांची इमारत आहे. तिथे पुढच्या काळात आमचे घर भाडोत्री होते. तेही कुठे बदलले नाही. अगदी सुरुवातीला माझ्या पत्नीला दुपारचे मोकळेपण असे. आमच्या घरापासून जवळ इमॅन्युएल इंग्लिश स्कूल होते. तिथे एक बाई शिक्षिका होत्या. आमच्याकडे त्या अधूनमधून येत, आमच्या घरी काही वेळा त्यांच्या शिकवण्यांचा तास घेत. ते पाहून व त्यांच्यामुळेच माझी पत्नीही दुपारच्या वेळेत इंग्रजी विषयाच्या शिकवण्या घेऊ लागली. तिचे शाळेतले शिक्षण इंग्रजीतून झालेलेच होते. आणि शिकविण्याची तर तिला मनापासून हौसच आहे. आमच्या प्रपंचाला थोडा हातभार म्हणून ती हे करीत असे.

मला घरी फार वस्तूंची गरज लागायची नाही. खाणे पिणे आवडायचे, तेवढे पत्नी द्यायची. ऑफीस घर वगैरे हेलपाटे मी चालत जात असे. माझी कातडी बॅग नि मी किती चाल केली कुणास ठाऊक! ८५-८६ पासून किशोर हाताशी आल्यावर माझी जबाबदारी संपल्यासारखीच होती. माझ्या वयाने आता साठीच्या जवळपासचा टप्पा गाठला होता. मला कामात उत्साह होता, पण स्वस्थपणाही मिळू लागला होता. किशोर सेल्सटॅक्सचे काम पाहू लागला आणि नव्या ऑफीसात मी आयकर विषयक काम पाहू लागलो. पूर्णत: स्वतंत्र व्यवसाय म्हणून माझ्या व किशोरच्या नावांच्या पाट्या आमच्या ऑफीसवर झळकू लागल्या, क्लाएंटची संख्या खूप वाढली. पैसा चांगला मिळू लागला. गाडी-बंगला अशा सुखसोयींनी बरे दिवस आले. आमच्या वकीली धंद्याशिवाय किशोरने प्लॉटस्च्या धंद्यात नाव आणि पैसा

मिळविला. चांगले पैसे मिळू लागल्यावर स्वत:साठी घर बांधायचे ठरले. एके दिवशी अचानकच आडिगा हॉस्पीटलजवळचा सध्याचा प्लॉट माहितीत आला. जागा पाहिली आणि एकाच दिवसात ती नक्की करून टाकली. त्यावेळी दहा रुपये चौरस फूट असा काही दर होता. घराचा नकाशा, बांधकाम, सजावाट, देखरेख, बदल... जे काही झाले ते सर्व किशोरने केले. तो सांगेल त्या चेकवर मी सह्या केल्या आणि पूर्ण झालेल्या आमच्या 'अतीत' बंगल्यात राहायला आलो, इतकेच! आम्ही सिंधी लोक भारताच्या वायव्य प्रांतातून उद्योगी संस्कृतीचा नाइलाजाने त्याग करून आलो. मला आश्चर्य वाटते की, माझ्या एका छोट्या आयुष्यात परिस्थितीचा एवढा मोठा झोका त्या टोकापासून या टोकापर्यंत कसा काय घेतला गेला? मला भोवळ कधीच आली नाही. श्रद्धा आणि श्रम यांचे दोर दोन्ही हाती मी घट्ट पकडले होते.

या झोक्याच्या प्रारंभी सिंधूसारखी एक सरिता आमच्या संपन्न जीवनाचे अंग बनून राहिली होती. आता इथला कृष्णाकाठ आम्हाला कुशीत घेत असल्याचा भास होतो. या जीवनदायी निसर्गदेवताच चिरंतन वाहात राहणार आहेत, मनुष्य केवळ निमित्तमात्र!

□

आमच्या घरचा गोतावळा सध्या तसा मर्यादित आहे. दीपक आणि किशोर या दोघांची लग्ने-कार्ये होऊन त्यांचे प्रपंच मार्गी लागले आहेत. चार नातवंडांना देण्यासाठी आम्हा दोघांना वेळ कमी पडतो. सुनीता आणि अनिता या सुना मला तर लेकींच्या ठिकाणी आहेत.

या खेरीज आमच्या निकटचा परिवार बराच मोठा आहे. राजकुमार रडोमल यांचा कापडव्यापार आहे. त्यांच्या सर्व कुटुंबियांशी आमचे चांगले संबंध आहेत. धननिरंकार पंथाच्या सत्संगानिमित्ताने आजही आम्ही त्यांच्या घरी जातो. एशियन रेडिओवाले आसनदास व परमेश्वरी आणि जयदेव व विद्या ही दोन्ही नानवाणी कुटुंबे आमच्या घरोब्याची आहेत. त्यांचे आयकराचे काम सर्वप्रथम माझ्याकडे आले. हुंदराज दयाराम लुल्ला हे आमचे आडनावबंधू. विशिनदास गिडवानी हे सिंधी पंचायतीच्या कामांतून खूप जवळ आले, इतरही बरेच बांधव आमच्या सामाजिक किंवा घरगुती कारणांसाठी एकत्र येतात.

याशिवाय नावंधरकाका, तारळेकरमामा हे खास मित्र बनून गेले. टेक्सेशन

कन्सल्टंटस् असोसिएशनच्या कामात विठ्ठलराव ठाणेदार, के.बी.कायस्थ या वकील मंडळींची खूप मदत झाली आणि स्नेह जमला. एस.एस.शहा हे तर मला अगदी घरच्यासारखे वाटत. ते माझे सहकारी - मित्र - शेजारी सगळेच होते. पट्टणशेट्टी आणि कुलतारसिंग चढ्ढा हे सध्याचे शेजारी माझ्या रोज सकाळच्या फिरण्याच्या गटात असल्यामुळे आम्ही गप्पीदास बनलो आहोत. सुनील कोकीतकर हा खरे तर किशोरचा वर्गमित्र, पण माझ्याशी दोस्ती करून फिरायला सोबत करतो. दत्ता पालकर हा वयाने किशोरहून लहान आहे, पण आमच्या व्यवसायात भागीदार आहे. त्याची समजदारी, प्रामाणिकपणा, सरळपणा हे गुण मोलाचे आहेत. जमीन खरेदी-विक्रीच्या धंद्यात किशोरचा भागीदार असलेला अरुण शहा याच्याबद्दल मी काय म्हणायचे ते कळत नाही. त्याला मित्र म्हणू, घरचाच म्हणू की मुलासारखा म्हणू? त्यापेक्षा तो वेगळा कुणीतरी आहे.

ज्यांचा संबंध व्यवसाय, नाते, देणेघेणे, जातगोत वगैरे कशाशीही नाही अशी दोन कुटुंबे आमच्या खास घरोब्याची बनली; ती म्हणजे अशोक तेलंग आणि वसंत आपटे. त्यांच्याशी आम्ही का निकटचे आहोत हे सांगता येत नाही. आमच्याकडे काम करणारा अशोक कांबळे याला तर घरी चिडवतात की, त्याचं तेवढं मी ऐकतो म्हणे! ऑफिसातली उमेश, शर्मिला, अमोल वगैरे पोरं माझी खूप काळजी करतात-जीव लावतात.

यादी आणखीही वाढेल, ही सगळी माणसं कधीतरी आमची झाली. ऋणानुबंधाच्या गाठी बसत गेल्या. काही सैल, काही घट्ट तर काही अगदी निरगाठीच!

□□□

□

# ढळला रे ढळला दिन सखया संध्याछाया ‘रमविती’ हृदया.....

..... तर असा हा माझ्या आयुष्याचा धावता चित्रपट. आज डोळ्यापुढे तो सरकत जात असताना कुठे रेंगाळतो, केव्हातरी वेगात पळतो तेव्हा त्यातली चित्रे मिसळून गळबटून जातात. - मलाही नीटशी समजत नाहीत, कधीतरी त्याची फिल्म तुटते - पुन्हा सांधली जाते. असा स्वस्थ राहिलो की, मी खूप वेळा तो चित्रपट पुन:पुन्हा उलगडून पाहतो. मला वाटते, त्यामुळे ती फिल्मही आता जीर्ण होईल की काय!

माणूस म्हणजे हा साडेतीन हाताचा देह नव्हे असे हल्ली मी ऐकतो. गेल्या कित्येक वर्षांतील प्रपंचासाठीच्या धावपळीत मी कधी अध्यात्माकडे वळलो नव्हतो. हल्ली वयाचा परिणाम असेल किंवा आर्थिक स्वस्थतेचा प्रभाव असेल... फार तर परिस्थितीच्या अस्वस्थतेचा प्रभाव असेल; पण हल्ली प्रवचन, सत्संग अशा ठिकाणी अधूनमधून जातो. तिथल्या सगळ्या गोष्टी माझ्या व्यवहारी मनास पटतात असे नाही. पण वेगळ्या एका वातावरणात जावे असे हल्ली वाटत असते. पत्नी किंवा कुणी मित्र ‘चला’ म्हणतात. .... या सर्वांपेक्षा माझ्या मनाने जे अनुभवले त्याचे स्मरणसुद्धा मला आता मनोरंजक वाटत असते. माझे मन, माझा स्वभाव, माझ्या सवयी, माझे एकूण वागणे हे सगळे आता मी स्वत:च थोड्याशा अलिप्तपणाने पाहू शकतो.

मला लहानपणापासून काम करायला खूप आवडते. पण कामाचा ताण-तणाव मला कधी जाणवत नाही. मी डॉक्टर होणार होतो, पण वकील झालो. दोन्ही व्यवसाय दोन टोकांचे असले तरी माझ्या पद्धतीत काही फरक झाला नसता. एखाद्या पेशंटच्या आजाराचा तपशील शोधत मी उपचार केले असते, तशाच प्रकारे माझ्या अशिलांची केस मी हाताळत आलो. खोट्याचे खरे करण्याची कला मी बाणवली नाही. त्यामुळे

कधी माझी चूक झाली तरी मला त्याचे वाईट वाटले नाही. कारण मी त्याला माझे अपयश म्हटले नाही. डॉक्टर काय आणि वकील काय तो धंदा करीत नसतो, 'प्रॅक्टीस' करतो. त्यात चूक होऊ शकते. पण अशा चुकासुद्धा मी हलगर्जीपणाने केल्या नाहीत.

हलगर्जीपणा माझ्या स्वभावातच नाही. हल्ली कधीतरी आमचा किशोर त्याच्या सामाजिक कामातले एखादे प्रकरण माझ्यावर सोपवतो. मला त्या सामाजिक कार्यातले काही म्हणता काहीही कळत नाही. पण त्याचे काम करण्यासाठी ते सगळे प्रकरण मी पुरेपूर अभ्यासतो, मग हाती घेतो. शेवटपर्यंत लावून धरतो. मग किशोरचे मित्र-सहकारी मला त्याचे श्रेय देतात. मलाच सामाजिक कार्यकर्ता म्हणू लागतात. सामाजिक कार्य करणे म्हणजे सोपी गोष्ट नाही. किशोर अलीकडे अशा काही उपक्रमांत ओढला गेलाय. तो काहीतरी सांगतो, करतो, कुठेकुठे जातो. त्याची धावपळ पाहून मीच दमून जातो. त्याच्या विचाराने कुठच्या व्यक्तीला, संस्थेला, कार्याला पैसे किंवा कसली मदत द्यायची असली तर मी कधी नाही म्हणत नाही. का नाही म्हणू? परमेश्वराने माझ्या कर्तबगारीच्या तुलनेत उदंड दिले आहे. हे 'त्याचे' आहे. माझ्या हाती येते आणि जाते. मी आपण होऊन द्यायला जातो असे नाही. तो अधिकार किशोरचा आहे.

आपण होऊन मी कुठलीच गोष्ट करीत नाही. माझ्या घरच्यांचा - विशेषत: पत्नीचा तर असा आक्षेप असतो की, मी कामाशिवाय काही करतच नाही. तिला नात्यागोत्याची, खरेदी-प्रवास-सणसमारंभ अशा सगळ्याची खूप हौस आहे. मी तिला कधी नाही म्हणत नाही. मी खरे तर कुणालाच कधी नाही म्हणत नाही. स्वत:हून सिनेमाला गेलो नाही, पण घरच्यांसोबत कित्येक सिनेमे पाहिले. हॉटेलात गेलो. मला चंगीभंगीपणा, चंगळ आवडतच नाही. त्यामुळे साधी पोळी-भाजी, वरणभात यापुढे माझी धाव कधी जात नाही. हे जिन्नस घरातही सहज मिळतात. मग त्यासाठी पैसे खर्च कशाला करायचे? माझ्याकडे पैसे असतात, मी कंजुष नाही, सोबतच्या बायको-मुला-नातवंडांनी खाल्ले प्याले तरी मला आनंद होतो; पण मला स्वत:ला ते जमत नाही. त्यांच्या खाण्याने मला आनंद होतो, मी ते न खाताही मला आनंद होतो.

आमच्या लहानपणी खूप मोठा गोतावळा होता. आता खूप कमी होत होत पार रोडावला आहे. माणसे संख्येने कमी झाली नाहीत, पण ती दुरावली. मी होऊन कधी कुणाकडे जायचो नाही. बहिणींशी-भावांशी कौटुंबिक संबंध टिकले नाहीत. काही

वेळा कोर्टबाजीपर्यंत मजल गेली पण त्यातून मी अंग काढून घेतले. ऐन तारुण्यात मुंबईत फिरलो-राहिलो. पण नंतर तिथे राहणाऱ्या भावा-बहिणीकडे कधी जाऊन यायलाही जमले नाही. इकडे कोल्हापूर-सांगली भागात माझे सगळे उत्तरायुष्य गेले. पण आमचे फारसे नातलग या भागात नाहीत. सिंधी समाजाची कित्येक मंडळी सभोवती आहेत. त्यांचे काही कार्यक्रम, सभासंमेलने, धार्मिक उत्सव वगैरे होत असतात. मी त्यात थोडासाच भाग घेतो. परिचयातल्या कुणाच्याही घरचे कसलेही कार्य असले तर मात्र आवर्जून जातो. मला त्यांच्या आनंदात सहभागी व्हावेसे वाटते, पण तेही अगदी जितक्यास तितकेच!

माझे सगळ्या जगाशी जमते असा माझा दावा नाही. माझ्या पत्नीने मला कठीण काळातही साथ दिली, पण माझे तिच्याशीही पूर्णांशाने जमले असे मी बिनधास्त म्हणू शकत नाही. तिचा आणि माझा स्वभाव पुष्कळ वेगळा आहे. त्यातून कधीमधी खटके उडतात. पण हे चालणारच. वाढलेला तणाव लक्षात घेऊन मी स्वस्थ राहणे पसंत करतो. काही काळाने पुन्हा नेहमीचे जीवन सुरू करणे याइतका सुखद पर्याय मलातरी दुसरा कुठला सापडलेला नाही. तिला तिच्या आवडीप्रमाणे-स्वभावाप्रमाणे काहीही करण्याला माझा विरोध नसतो. मला कुणी 'असे करा, तसे करा' म्हटले तर नाही म्हणत नाही, पण मी करतोच असेही नाही. पुष्कळदा आम्हा दोघांची खूप वादावादी होते. त्या प्रत्येक वेळी वाद थांबविताना अखेरचे वाक्य माझेच असते! ते म्हणजे, 'बरं बाई, तू म्हणतेस तसं करूया!'

उगीच कुणाबद्दल कृत्रिम जिव्हाळा दाखवावा किंवा भावभावनांचे कढ आणावेत हे मला जमत नाही. आताची परिस्थिती एकंदरीत छान आहे. किशोर आणि त्याचे कुटुंब सोबतीला आहे. पत्नीच्या आणि माझ्याही व्याधी आहेत. म्हातारपणी त्या हव्यातच. पैसा-अडका मिळेल त्यात जमवून घ्यायला हवे. मुंबईला दीपक आणि त्याचे कुटुंब त्यांच्या जगात आनंदी आहे. आमच्या सगळ्या गोतावळ्यात मी वेगळाच आहे असे मला स्पष्ट जाणवते. तरुणाईत एक धक्का बसला आणि माझी चारसहा वर्षे ओढाताणीत गेली. तेवढी वगळता मला कधी पैशाची टंचाई जाणवली नाही. कारण मी पैशाच्या मागे नव्हतो. कष्ट केल्यावर गरजेपुरते मिळते. मला कसले व्यसन लागले नाही. सिंधमधल्या राहणीप्रमाणे मी काही काळ बिअर घेतली. पण गेल्या दहा वर्षांत तर चहासुद्धा घेतला नाही. सगळ्या तरुण पिढीला-मुलांना, सुनांना, पत्नीला काहीतरी काळज्या आणि त्यातून येणाऱ्या तब्येतीच्या तक्रारी आहेत. कुणी वजन वाढले म्हणते, कुणी गुडघे निकामी म्हणते, तर कुणाला साखर जास्त म्हणतात.

मला त्यातले काहीही नाही. मी सिंगापूर वगैरे फिरून आलो, मला त्यात फारसे थ्रिल वाटले नाही. माणसासारखी माणसं काय बघायची? पण कुणी 'ट्रिपला जाऊया' म्हटले तर मी 'चला' म्हणतो. याही बाबतीत मी वेगळा आहे. इकडच्या मराठी लोकांच्यात वावरताना एक वाक्य कानावर येते; ते असे ---

तुका म्हणे उगी राहावे
जे जे होईल ते ते पहावे।

मला वाटते त्या तुकारामाने चारशे वर्षांपूर्वी ते वाक्य माझ्यासाठीच लिहून ठेवले आहे....

`□□□

पाहता पाहता काळोख सभोवती पसरत गेला आहे.
उंच आभाळात चांदण्या भरल्या आहेत.
घरची माणसे परत येण्याची वेळ झाली असावी.
किती वेळ गेला कुणास ठाऊक!
समोरचा आमचा अतीत बंगला इतका वेळ मला दिसतही नव्हता.
पण आता एका बाजूनी रस्त्यावरच्या दिव्याचा उजेड त्यावर पडला आहे.
मला अस्वस्थता नव्हती; पण आता कुणीतरी यावे असे वाटत होते.
एक दीर्घ उसासा सोडून मी उठून पाहिलं, आणि पट्कन कुणीतरी समोरचे दिवे लावले.
मुलंबाळं परत आलेली होती.
त्यांनी विचारलं, 'इतक्या काळपर्यंत एकटेच काय करीत होता?'

गेल्या एक्काहत्तर वर्षांत मला ते कळलेले नाही!

□□□
`

□

# बहुतांची अंतरे

'समानशीले व्यसनेषु सख्यम्' (अ फ्रेंड इन नीड, इज फ्रेंड इन्डीड) असे म्हणतात. पण मला वाटते की, मित्र या संज्ञेची ही व्याख्या तशी अपूर्णच आहे. मित्र या शब्दाला कितीतरी पैलू असतात. एखाद्या व्यक्तीच्या आवडीनिवडी कळाव्या लागतात; मानसन्मान किंवा पूर्वग्रह समजावे लागतात; गप्पा आणि चर्चा यांच्यासाठी काही समान विषय असावे लागतात; सवयी-खोडी माहिती व्हाव्या लागतात; अशा कितीतरी गोष्टी असतात की ज्यामुळे त्यांची मैत्री दृढतर होत जाते.

बाप-लेक, गुरुशिष्य, मालक-सेवक; अशा कितीतरी नात्यागोत्यांचे संबंध दोन व्यक्तींचे असू शकतात. पण दोघा मित्रांचे एकमेकांशी असणारे निखळ मैत्रीचे नाते हे सर्वेषाम् भिन्न, सर्वस्वी वेगळेच असते! त्या मैत्रीतील आवश्यक घटक म्हणजे समान जीवनशैली, समान विचार, समान वयोगट, एकसारख्या सवयी इत्यादी. हे सगळे निकष लावल्यानंतर मी अगदी कॉलर ताठ करून असे म्हणू शकतो की, ''श्री.लुल्ला हे माझे घनिष्ठ मित्र. आमच्या दोघांत कितीतरी सारखेपणा. आम्ही साधारण एकाच वयाचे आहोत. आम्ही एकाच व्यवसायात आहोत आणि आम्हा दोघांना एकमेकांबद्दल खूप आदर आहे.

श्री.लुल्लांच्या भेटीगाठींचे खूप प्रसंग माझ्या आयुष्यात आले आहेत. मी त्यांच्या घरी भेटलो आहे, त्यांच्या ऑफीसात भेटलोय, कोर्ट-कचेऱ्यांमधून आमच्या भेटीगाठी झाल्या, शिवाय कधी आमची संमेलने, शिबीरे, सेमीनार, अभ्यासमंडळ, मीटिंग, प्रशिक्षण कार्यक्रम वगैरे कित्येक प्रसंगांतून आम्ही एकत्र आलो. अशा वेळी मला त्यांच्यातील कायद्याच्या सखोल ज्ञानाची आत्यंतिक ओढ दिसून येई. त्यांच्या सर्व आयुष्यभरात ते एक विद्यार्थी म्हणूनच वावरले.

स्वभावाने ते अगदी नाकासमोर चालणारे–सरळमार्गी आहेत. भ्रष्टाचार आणि अन्याय यांविरुद्ध झगडण्यात ते नेहमी आघाडीवर असतात. त्यांना स्वत:ची बाजू योग्य असल्याची खात्री असेल तर ते कधीच माघार घेणार नाहीत. त्यांच्या अशीलाने (क्लाएंट) जरी त्याच्या केसमध्ये 'जाऊद्या हो' म्हणून एखाद्या प्रकरणात कच खाल्ली तरीसुद्धा त्याच्या केसमध्ये लढायला उभे राहतील. मला तर असे एक उदाहरण माहिती आहे की, जेमतेम पाचशे रुपयांसाठी हे महाशय इरेला पडले होते. परंतु तत्वाचा आणि कायद्याचा सवाल होता. हे प्रकरण त्यांनी मुंबई हायकोर्टात नेले. त्यासाठीचा कोर्टखर्च वगैरे स्वत:च्याच खिशातून केला. आजच्या जगात तत्त्वासाठी इतके झगडणारा वकील माझ्या पाहण्यात तरी दुसरा कुणी आलेला नाही.

जुन्या पिढीचा हा एक सच्चा प्रतिनिधी आहे. प्रामाणिक, नम्र–भोळसर, पण सरळमार्गी!

– पी. व्ही. सुरते

☐

विक्रीकर अधिकारी म्हणून मी निवृत्त झालो. या कारकीर्दीतील सरकारी कामाच्या संबंधाने अगदी प्रकर्षाने ज्यांची आठवण मला होत राहील अशी व्यक्ती म्हणजे ॲडव्होकेट टी.बी.लुल्ला. चाळीस वर्षे मी त्यांना ओळखत असे. वास्तविक मी शासकीय अधिकारी आणि ते खाजगी व्यवसायिकांचे वकील. त्यामुळे ते आणि मी समोरासमोर लढायला उतरल्याच्या पवित्र्यात असायला हवे. पण लुल्ला हे धर्मयोद्धे. लढाईच्या वेळी शौर्याने अटीतटीने लढत पण लढाई संपली की कोणाच्याही जखमा बांधायला आपुलकीने पुढे येत. हा विशेष मी केवळ लुल्ला वकीलांच्या ठिकाणी पाहिला.

त्यांचे प्रॅक्टिस उत्तम होते. मोठमोठ्या केसीस त्यांच्याकडे असत. पण एखाद्या छोट्या केसमधील किरकोळ मुद्दाही ते तितक्याच तडफेने लावून धरत. 'त्याला पैसे भरणे कठीण नाही. पण विनाकारण त्याच्यावर अन्याय कशासाठी?' असा त्यांचा सवाल असे. टॅक्स कन्सल्टंट असोसिएशनच्या निमित्ताने त्यावेळच्या पाच–सात वकीलांनी संघटित काम सुरू केले. त्यांच्या वतीने चर्चासत्रे होऊ लागली. सर्वांना अभ्यासूपणाची सवय लागली. या सगळ्यात लुल्लांचा पुढाकार होता. या चर्चेचा आधार घेत दुसऱ्या दिवसापासून आम्हा अधिकाऱ्यांना ते प्रश्न

विचारीत; आम्हालाही कामाला लावत.

कायद्याचा सखोल अभ्यास हे लुल्लासाहेबांचे वैशिष्ट्य होते. त्याचप्रमाणे माझ्यासारख्याशी थेट संवाद साधण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळे मलाही खूप शिकायला मिळत असे. चुकवेगिरी न करता त्यांच्या अशिलांना योग्य करयोजना (टॅक्स प्लॅनिंग) ते शिकवीत. त्यामुळे आम्हा अधिकाऱ्यांचेही काम सोपे होत होते.

**– व्ही. जी. बागणीकर**

□

माझे आणि टी.बी.लुल्लांचे संबंध फार मजेशीर आहेत. त्यांच्या निकट वर्तुळात मी राहिलो. आम्ही मित्र बनलो, व्यवसायातले स्पर्धक झालो, अधिकाऱ्यांशी संघर्ष करताना जोडीदार झालो, प्रवास-सहलीत एका ग्रुपचेच झालो. त्यांची पत्नी मला 'भाऊ' म्हणते, राखी बांधते. माझी मुलगी त्यांच्या किशोरला राखी बांधते. सगळ्या सुखी-दु:खी प्रसंगात आम्ही जवळ आहोत, तरीही एकमेकाला चांगले 'ओळखून' आहोत.

सेल्स टॅक्सचा कोणी क्लाएंट इकडून तिकडे आला-गेला तर आम्हास त्याचे काही वाटत नसे. अभ्यास, अचूकपणा व परिश्रम यांमुळे एक वचक त्यांनी निर्माण केला. त्या जोरावर काही गैरप्रकार किंवा अनैतिक व्यवहार करण्याला विरोध करण्याचे धाडस ते दाखवू शकले. 'खुशी'ची मर्यादा ओलांडून कोणी कर्मचारी वखवख दाखवू लागला तर थेट त्याच्यासमोर जाऊन सुनवायचे, असे आम्ही काहीजण करत असू. त्यामुळे आमच्यामार्फतच्या असेसमेंट करताना अधिकारीसुद्धा वचकून असत. माझ्याकडील काही मोठ्या पेढ्यांची-कंपन्यांची बारा-पंधरा वर्षे असेसमेंट न होता, पत्रके स्वीकारली जात इतका विश्वास निर्माण झाला.

सांगलीत या क्षेत्रात आम्ही एका निकटवर्ती ग्रुपचे होतो. त्यातून पुढे टॅक्स कन्सल्टंट असोसिएशनचा जन्म झाला. त्यात मी, लुल्ला, नावंधर, कायस्थ, मिरजेचे करंदीकर, तारळेकर इत्यादि होतो. या संस्थेचे काम चांगले विस्तारले. आम्ही दोघांनी त्या संस्थेत पदे भूषविली, संस्थेच्या स्थावर वास्तूसाठी सांगली शहर व जिल्ह्यातील सर्व व्यापारी जगताने मोठी आर्थिक मदत केली हे मुद्दाम सांगायला हवे. आम्हा सर्वांच्यावर असलेल्या विश्वासाचे ते चिन्ह मानता येईल.

माझ्या बाबतीत व्यक्तिगत स्वरूपाचा एक अनुभव सांगण्यासारखा आहे. पंचाहत्तर साली मी घर बांधले. त्यानंतर माझ्या मिळकतीवरून व्हॅल्यूएशन करून घेण्याचा आदेश आयकर खात्याने दिला. त्यासाठी कोणी एक व्हॅल्यूएटर आले, चौकशी करून त्यांनी सहायक आयुक्तांकडे अहवाल दिला. यासंबंधीची सुनावणी जेव्हा ठरली त्यावेळी तारखेला माझ्याबरोबर हे सर्व वकील मित्र माझी बाजू लढविण्यासाठी म्हणून आयकर कार्यालयात येऊन दाखल झाले. वास्तविक तसे काही ठरवून वगैरे घडले नाही. पण प्रत्येकाला वाटले, आणि जो तो आपापला येऊन हजर झाला. एवढी आपुलकी आणि एकी आमच्यात होती. अर्थातच हे पाहून साहाय्यक आयुक्तानी फाईल निकाली काढली.

महाबळेश्वर-माथेरान अशा ठिकाणी सहलीला आम्ही कुटुंबासह मिळून जायचो. तिथे लुल्ला एकदम खुलायचे. टिंगल-टवाळी चालायची, मजा यायची. परत येऊन पुन्हा कामाशी भिडले की मग आपापले मार्ग वेगळे असत. एवढ्या सहली प्रवास वगळले तर लुल्लांना धंदा आणि कामाशिवाय काही सुचत नसे. मी अन्य कामांत रस घेत असे. लुल्लांना म्हणत असे; बँकेचे संचालक व्हा, एखाद्या पार्टीचे काम करा, निवडणूक प्रचाराला चला.... वगैरे! पण ते कुठेही येत नसत. आले तर अगदी जेवढ्यास तेवढेच.

आमची दोस्ती पूर्वी रगेल होती, आता त्यात हळवेपण आले आहे असे उगीचच मला वाटते. लुल्लांसारख्या मित्राची साथ मिळणार असेल तर अजूनही या मैदानात चार डाव खेळण्याची मला उमेद आहे.

**- एस.एस.शहा**

□

सुमारे दोन अडीच वर्षांपूर्वीची घटना आहे. माझी इचलकरंजीला दिलेली मुलगी तिच्या सासरच्या लोकांबरोबर राजस्थानला रेल्वेने चालली होती. तिची मुलगी म्हणजे माझी नात त्यांच्यात होती. ही पोरगी तशी उमलत्या वयाची होती. स्लीपर कोच डबे आतून एकमेकाला जोडलेले असतात. त्या मार्गाने या डब्यातून त्या डब्यात जाता येते. तिथे जाड ताडपत्राचे घडीचे पडदे बाजूला असतात, त्यामुळे एक प्रकारे सुरक्षित बोगदा तयार होतो. त्या दोन डब्यांत हे पडदे त्या दिवशी नव्हते. ही मुलगी धावत्या गाडीत इकडून तिकडे जात असताना दुर्दैव आडवे आले. दोन्ही डब्यांच्या मधल्या सांध्यातून ती सरळ खाली गेली आणि

खेळ खलास झाला. काही दिवस सर्वत्र शोकमग्न वातावरण होते, ते हळूहळू थोडे निवळले. व्यवहार पूर्वपदावर येऊ लागले.

एके दिवशी श्री.टी.बी.लुल्लांचा फोन आला, ''तुमचे दु:ख ते माझे दु:ख आहे. मुलगी जायची होती ती गेली; पण रेल्वे खात्याने जो निष्काळजीपणा दाखविला तो दुर्लक्ष करण्यासारखा नाही. आज आपल्यावर प्रसंग आला, उद्या दुसऱ्या कुणावर येऊ शकतो. म्हणून आपण धीर गोळा करून रेल्वेकडून नुकसानभरपाई मागूया.''

मी तर चक्रावून गेलो. नुकसानीचे पैसे घेऊन या पोरीचा जीव परत येणार होता थोडाच? पण लुल्लांनी आग्रह धरला, ''तुम्हाला पैशाची काही गरज आहे म्हणून नव्हे, ही केस लढविणे म्हणजे तुमच्या दु:खावरची खपली काढणे आहे हे मलाही ठाऊक आहे. पण रेल्वेची व्यवस्था पुढे सुधारायची असेल तर आपण ही तक्रार दाखल करून पैसे वसूल करू. त्या पैशाचा विनियोग काय करायचा ते नंतर पाहूया.''

आम्ही लोक कसेतरी तयार झालो. ग्राहक संरक्षण कायद्याखाली हे प्रकरण श्री.लुल्लांनी रेल्वेविरुद्ध दाखल केले. सगळे कागदपत्र, पंचनामे वगैरे गोळा केले. स्वत: केस चालविली आणि दोन लाख रुपये नुकसानभरपाई म्हणून रेल्वेकडून मिळवून दिले. एवढ्यावरती संपले नाही. रेल्वेने प्रवाशांच्या जीवावर बेतलेली निष्काळजी सेवा देऊन पुन्हा त्याबद्दल बचाव करण्याचा अन्याय्य प्रयत्न केला, म्हणून इतक्या विलंबासाठी या रकमेवर व्याज द्यायला पाहिजे, म्हणून पुन्हा तक्रार दाखल केली. आम्ही म्हणत होतो की, 'झाले एवढे पुरे झाले! कशाला त्यात कायदा नि कोर्ट करत बसायचं?' पण लुल्लांची माघार नाही. 'तुम्हाला चार पैसे मिळण्याने गेलेला जीव परत येत नाही, पण हा व्यवहार रेल्वेला शिकविणे हे आपले कर्तव्य आहे.' असे ते म्हणतात. आम्ही लुल्लांसाठी होय म्हणतो. या प्रकरणात लुल्लांनी खूप मेहनत घेतली, स्वत: प्रवास केला. आपलं म्हणून भांडले. पैसे मिळाले. त्याची फी किती घेतली? -शून्य!

ते सांगलीला विक्रीकर खात्यात आले, त्याच्या आधीच दोन वर्षे मी वकिली व्यवसाय सुरू केला होता. त्यांच्यापुढे माझ्या केसीस चालत. माझ्याकडून कधी वावगा पैसा लुल्लांनी त्याही काळात घेतला नाही.

माझी त्यांची मैत्री झाली, पण अजूनी हा माणूस मला परिपूर्ण कळला असे वाटत नाही.

– एम.एन.नावंधर

□

त्यावेळी सांगलीत करविषयक काम करणारी मोजकीच वकील मंडळी होती, त्यात श्री.लुल्ला यांच्या कामाचाही एक प्रकारे दबदबा होता. मी काही वर्षे विक्रीकर खात्यातच काम केलेले, त्यांचे माझ्याबद्दलचे मत फार चांगले असावे. लुल्लांच्या हाताखाली मी जी दीड–दोन वर्षे काढली त्यात त्यांच्याकडून इतर पुष्कळ गोष्टी मला शिकता आल्या.

व्यापारी–ग्राहकांशी (क्लाएंटशी) त्यांचे वागणे सावकाश, संथ, आश्वासक असे. 'नंतर पाहू', 'बघून सांगतो', 'प्रयत्न करूया' अशी वाक्ये ते बोलायचे नाहीत. क्लाएंट येण्यापूर्वी त्याचे सगळे कागदपत्र त्यांनी नीट बघून ठेवलेले असायचे. त्याची पत्रके स्वत: तयार करून ठेवलेली असायची. त्यामुळे त्यांनीच नव्वद टक्के असेसमेंट संपविलेली असायची. त्यांचे सकाळी वेळेवर येणे आणि संध्याकाळी मात्र काम संपवून परत जाणे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे होते; कारण स्वाभाविकच आम्हाला त्यांच्या आधी दोन–पाच मिनिटे हजर व्हावे लागायचे. तसे त्यांनी आम्हाला कधीच सांगायची पाळी आली नाही, पण वेळ सांभाळण्याची ही शिकवण न बोलता त्यांनी दिली. कच्च्या आकडेमोडीला पाठकोरे कागद वापरणे, आलेले लखोटे पुन्हा दोनतीनदा वापरणे या त्यांच्या सवयी म्हटल्या तर किरकोळ; पण त्या माझ्या अंगवळणी आपोआप पडून गेल्या.

– श्री.धों.फडके

□

१९७६ची हकीगत. तेव्हा आमचा धंदा तसा बेताचाच होता. आणीबाणी होती. आमचे करविषयक सल्लागार हे संघ परिवारातले असल्यामुळे सरकारी कृपेने गजाआड होते. त्यांची सुटका होण्याचे तूर्त काही सांगता येत नव्हते. म्हणून मग नाइलाजाने दुसरा वकील शोधून पर्यायी काम चालविणे आवश्यक होते. त्यावेळी टी.बी.लुल्लांचा दबदबा होता, बरेच नाव होते. त्या अर्थाने माझे काम त्यांच्या दृष्टीने जरा 'हे'च! ते माझी किरकोळ केस घेतील की नाही अशी शंका होती. मी जरा भीतभीत त्यांच्याकडे गेलो. परिस्थिती सांगितली. त्यांनी सगळं काही नीट ऐकल्यावर किरकोळ प्रश्न विचारून फाईल मिटत म्हणाले, 'एकदोन दिवसात या, सगळं तयार करून ठेवतो.' मग मी धीर करून नाजूक प्रश्न विचारला, 'फी किती

द्यायची?' त्या प्रश्नाचे उत्तर ऐकून मी अवाक् झालो. ते मऊ आवाजात म्हणाले, ''तेलंग, तुमचा वकील तुरुंगात गेलाय, तो काय गुन्हेगार न्हाई. तुमी बी संघवाले. तेव्वा मी समजो तुमचा काम बिगरफी करनार. तुमचा वकील बाहेर आला की त्याला ही फाईल परत देणार. आपन काम करूया.'' त्यांचं ते सिंधी वळणाचं रांगडं मराठी उत्तर अजूनही माझ्या कानांत घुमतंय. करसल्लागार म्हणून आमच्या धंद्याचा जो पत्कर त्यांनी त्यावेळी घेतला तो तसाच कायम राहिला. उलट ते नातं हळूहळू मित्रत्त्वात रूपांतरित झालं.

यानंतरची वर्षे या कुटुंबाशी एकरूप होऊन गेली. 'लुल्लासाहेब' आमचे 'डॅडी' होऊन गेले. आमचा आणि आमच्या दोन्ही कुटुंबांचा स्नेह सतत वर्धिष्णू राहिला. घरातली, व्यक्तिगत सुखदु:खे एकमेकाला सांगण्याइतका तो दृढ झाला. ग्राहक पंचायतीच्या संघटन कार्यात किशोरने मला केव्हाच 'ओव्हरटेक' केलंय – शिष्यादिच्छेत्पराजयम्। पण डॅडींना मात्र वाटतं किशोरला अजूनी मीच सल्ले देत असतो!

किशोर ग्राहक संघटन कार्यात गुंतला. तथापि ग्राहक संरक्षण कायदा हा विषय डॅडींच्या स्वारस्याचा बनला. आमच्या सगळ्या मित्रमंडळींना जे प्रश्न सुचतील त्यास अनुसरून ग्राहक न्यायमंचात लावून धरण्यासाठी ते सल्लामसलत करू लागले. इतकेच नव्हे तर त्या सगळ्या प्रकरणांची पद्धतशीर मांडणी ते करून देत. अर्थात या सगळ्या 'मुलां'बरोबरच त्यांचीही भूमिका कार्यकर्त्याचीच असल्यामुळे वकीली मोबदल्याचा प्रश्नच उद्भवत नसे. त्यांचा अनुभव आणि कायद्याचा अभ्यास फार मोठा असायचा. त्यामुळे ग्राहकाच्या बाजूने निकाल मिळण्यात काहीच अडचण नसे. एवढ्यावर ते ग्राहक न्यायालयात उत्तमपैकी वकीली व्यवसाय करू शकले असते. पण त्यांची ग्राहक कार्यकर्त्याची भूमिका कधीच बदलली नाही. पैशाच्या बाजूची ऐसी की तैसी!

मार्गदर्शन आणि सल्ले देण्याचे तर सोडाच, पण स्वत:च्या ऑफीसखालची प्रशस्त जागा उत्तम प्रकारे सजवून त्यात पंखे-खुर्च्या वगैरे सुखसोयींसह त्यांनी ग्राहकपंचायतीच्या कामासाठी विनामूल्य दिली. या जागेची वीजपट्टी, पालिकेचे कर हेसुद्धा त्यांनीच भरले. या सगळ्या दिलदारी व्यवहाराचे पैशात मोल करायचे झाले तर कोणते मोजमाप लावायचे? या 'बेसमेंट' जागेत सभा, वर्ग, जेवणे, बैठका वगैरे वाट्टेल ते होत असे. त्याची वर्दळ होई. कचरा-घाण होई. हे सगळं मुकाटपणी निस्तरले जाई.

डॅडींच्या ऑफीसातील सहकारी असोत किंवा गाडीचा ड्रायव्हर असो. सर्वांच्या घरची काळजी यांनाच असते. लग्नकार्य, घरजमीन, संसार या – सगळ्याची चौकशी असते. यातल्या कुणाचाही घरातल्या कोणत्याही खोलीपर्यंत मुक्त वावर असतो. डॅडी ऑफीसात आपल्या जागेवरून उठले की कोणत्याही क्लार्कच्या किंवा एखाद्या पोरीच्या टेबलाशी समोरच्या खुर्चीत बसतील आणि आपणच म्हणतील, ''काय बाबा, एवढा काम कशाला करतात तुमी? च्या-पानी करता की नई?'' ही वत्सलता पाहिल्यावर ती पोरं यांच्या कुटुंबातली होऊन गेल्यास नवल काय? आदर हा मागून मिळत नसतो तो आपल्या वर्तणुकीतून मिळतो हे डॅडींकडे पाहून समजते.

– अशोक तेलंग

□

स्वत:च्या धंद्याशी कमालीची निष्ठा असणारी थोडी माणसे असतात, त्यापैकी श्री.टी.बी.लुल्ला एक! एखादा 'कायदा कोळून पिणे' हा वाक्प्रचार मराठीत बहुधा त्यांच्यावरूनच आलेला असावा. त्यांचा रक्तगटसुद्धा 'सेल्सटॅक्स पॉझिटिव्ह' असा असावा.

व्यवहारात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा हे त्यांचे दुसरे वैशिष्ट्य आहे. विक्रीकर विभाग आणि व्यापारी यांचे जे 'गूळपीठ' असेल त्याच्याशी वकील म्हणून त्यांचा काहीही संबंध नसे. असेसमेंट झाली की ते सांगत 'आपले काम झाले आहे. आता बाकीचं काय जे असेल त्याबद्दल तुम्ही सरळ साहेबांना जाऊन भेटा.' त्यांचा कटाक्ष कर वाचविण्यावर असायचा. कर चुकविणे बरोबर नाही म्हणायचे. एखाद्या छोट्या करदात्याचा (क्लाएंट) अगदी थोडासा जरी परतावा (रीफंड) असेल तरी त्यासाठी खूप वेळ व श्रम खर्चून ते मिळवून देत. इथे त्यांचा काटकसरी स्वभाव कामी यायचा. एखादे काम अवघड किंवा किचकट असेल तर ते आव्हान म्हणून अंगावर घेत, आणि करदात्याला हमखास न्याय मिळवून देत. अशा प्रकरणात विक्रीकर खात्यातले कोणी जर त्रास देऊ लागले, वेगळा मार्ग सांगू लागले तर अशा वेळी श्री.लुल्ला वाघासारखे चवताळून जात. एरवी शांत वाटणारा हा माणूस स्वत:च्या ज्ञानाला कुणी शॉर्टकटचा पर्याय दिला की शब्दश: रुद्रावतार धारण करीत असे.

वकील म्हणून वावरलेले टी.बी.लुल्ला हे सगळ्या वर्तुळात लोकप्रिय असत.

दुसरे वकील किंवा विक्रीकर अधिकारीसुद्धा त्यांच्याशी चर्चा करून मार्गदर्शन घेत. इतकेच नव्हे तर दुसऱ्या वकीलाकडील एखादे अशिल (क्लाएंट) जरी सल्ला घेण्यासाठी आले तरी त्यास आपले मानून योग्य असेल ते सांगत. शिवाय पुढे, ''तुम्ही तुमच्या वकीलांना पुन्हा विचारून घ्या हं'' असेही स्पष्ट करीत.

**– अरुण शहा**

□

मला 'यांचे' स्थळ अगदी अचानक आले, आणि त्याच दिवशी मला दाखवायला म्हणून खार-मुंबईच्या धर्मशाळेत नेले. समोरून जाता येता मी त्यांना पाहिले. वकील झालेला, दिसायला गोरागोमटा हा मुलगा मला कशाला पसंत करेल? तसे मी घरी आल्यावर बोलूनही दाखविले. कारण मी रंगाने डावी आणि आठवी शिकलेली. माझ्या मामानी लग्न जमविण्यासाठी मी मॅट्रिकला असल्याचे तिकडे बिनधास्त सांगितले होते; हे मला नंतर कळले.

आमचे लग्न ठरल्यानंतर, माझ्या सासूबाई विशेषच कडक असल्याची कुणकुण आमच्या कानावर आली. आधीच्या दोन सुनांना त्यांनी वेगळे काढून लावले हे कळले. आता जे असेल ते पत्करणेच योग्य मानून आमच्या बाजूने लग्नाची तयारी केली. लग्न होऊन मी नव्या घरी आले तेव्हा आगत-स्वागत, पूजन चालू असताना माझ्या एका नणंदेने ओरड सुरू केली की, तिच्या अंगठीतला हिऱ्याचा खडा कुठेतरी पडला. अर्थातच मी अवगुणी, अशुभ पायाची ठरू लागले. हा मला पहिला धक्का होता. त्यामुळे पुढे लगेचच जेव्हा हे कोल्हापूरला कामावर चालले तेव्हा मी मुंबईतल्या घरी न थांबता यांच्याच बरोबर निघायचा निर्णय घेतला. पण नंतर मी दर दीड-दोन महिन्यांतून मुंबईला येई त्यावेळी सासू-सासरे माझ्यावर खूश असल्याचा अनुभव मला येत असे. घरकाम व स्वैपाकपाणी मी झटपट वेगाने उरकत असे. त्यावरून सासरे म्हणायचे, 'ही फ्रंटियर मेल आलीय, तिला स्वैपाक करूद्यात, चांगला करते!'

कोल्हापूरला आठ-दहा महिनेच राहून आम्ही यांच्या बदलीमुळे सांगलीला आलो. म्हणजे माझे लग्नानंतरचे सगळे आयुष्य सांगलीत गेले. यांच्या समवेत ही चव्वेचाळीस वर्षे काढली, ती कधी संपली ते कळले नाही. आमच्या आयुष्यात दोघांनी सतत तडजोडी केल्या आहेत. आमचे दोघांचे स्वभाव खूप वेगळे. सासरची इतर माणसे नेहमी तिरकी चाल खेळत. त्या प्रत्येक वेळी मला समजून

देऊन गप्प राहण्यास हे सांगत. कुणाशीही वाकडेपणा येऊ नये अशी काळजी हे घेत आणि मला तर कुणाचे फट् ऐकून घेणे कठीण व्हायचे.

आम्हा दोघांचा अतूट विश्वास एकमेकावर असे पण प्रत्यक्ष व्यवहारात दोन टोके! हे घरी यायच्या वेळी दाराला कुलुप असलेले त्यांना चालत नसे. मी घरी असले पाहिजे. त्यांना खाण्यापिण्याची खूप आवड, पण हॉटेलचे अजिबात नाही. घरी भाजी-भात-पोळीचे जेवण, फळे-दूध आणि चार जिन्नस खायला हे मात्र अगदी तयार ठेवावे असायचे.

माझ्यासंगे सिनेमाला हे यायचे आणि झक्कपैकी झोपायचे. 'अहो, बघा की चांगला सीन आहे....' असं म्हणून ढोसलं तर डोळे उघडत, 'हां, होय, बघतोय ना!' एवढं म्हणायचे. अशी रसिकता. सकाळी ऑफीसला गेले की एकदम संध्याकाळी सुट्टी. मधे जेवायला-खायला येत. त्यावेळी जेवण एवढेच काम. थोडे गप्पागोष्टी करत बसतील तर शपथ! तिखट त्यांना अजिबात चालत नसे. त्यासाठी सहसा दुसरीकडे जेवायला जात नसत. पूर्वीपासूनच त्यांची ऑफीसची बॅग आणि फाईल या मी माझ्या सवती म्हणत असे. घरीसुद्धा पुष्कळदा त्यात डोके घालून बसत. घरकाम, स्वैपाक यात चुकून कधी हात लावणार नाहीत. माझी फार तारांबळ झाली तर 'तू एवढे कशाला करतीस' असे म्हणणार. मग करणार कोण? मुलांवर कधी चुकून ओरडायचे नाहीत, ते काम माझ्याकडे असे. त्यामुळे माझे तोंड, माझा झपाटा सर्वांना दिसे. यांनी प्रपंचात कधी लक्ष घातले नाही तर मी घालायला नको? - हे अर्थात यांनाही मान्य होते. 'तू करते आहेस ना? कर!' हा त्यांचा ठेका.

हे कामात खूप हुशार, अभ्यासू वगैरे आहेत हे मलाही कळायचे, पण भोळे-गरीब वगैरे अजिबात नव्हते. बाहेरच्या जगाला शिवशंकर अलिप्त-भोळा वाटतो, यांना पुष्कळजण 'भोळेसांब' म्हणतात! -पण माझा अनुभव, माझे दुखणे त्या पार्वतीमाईला माहीत. कर्तृत्वान असला तरी असा पती सांभाळून घेणे तिच्या दृष्टीने सोपे नव्हते. अर्थात शिवपार्वतीइतकेच आमचे अतूटपण राहिले याचे समाधान नक्कीच आहे.

- गुलीबाई लुल्ला

☐

आम्ही दोघी सख्ख्या बहिणी, आता लुल्लांच्या घरात सख्ख्या जावा झालो. डॅडी अलिप्त असायचे. घरात कोणताही पदार्थ केला तरी आवडीने खायचे. त्यांना एखादा पदार्थ आवडला नाही तर ते त्याच्या कमी खाण्यावरून ओळखायचे, प्रत्यक्ष सांगायचे नाहीत. मीठ कमी - गूळ जास्त, असले बारीकसारीक फरक त्यांच्या लक्षातही यायचे नाहीत. 'हे असं काय झ्याला, बरोबर लागत नसनार' एवढे कधीतरी म्हणायचे.

डॅडींना आमच्या वडीलांशी किंवा अशा कुणाही इतर व्यक्तीशी गप्पा मारता यायच्या नाहीत. ते स्वत: होऊन कुणाला फोन-बिन करायचे नाहीत. पण मुलांच्यात मात्र छान जमायचे.

त्यांना आम्ही दोघी लेकींसारख्याच म्हटले तरी वडील आणि सासरे हा फरक राहणारच. आम्ही या घरात आलो, त्यावेळी आमच्यावर असलेले संस्कार व घरचे वळण यांचा प्रभाव होता. त्यामुळे डॅडींसमोर येणे, वागणे घडायचे नाही. नंतर त्यांचा स्वभाव कळला, आम्ही या घरात रुळलो. नंतर त्यांच्याशी आमचे बोलणे-चालणे खूपच मोकळेपणाने होत असे.

आमच्या मुलांनी कुठे परीक्षेत-खेळात-कलाकुसरीत यश मिळवले तर कौतुक करायला त्यांना सवड नसते, पण त्यांचा आनंद लपून राहात नाही. त्यांचा चेहरा बोलू लागे. शब्दांनी व्यक्त होणारी भावना डॅडींच्या चेहऱ्यावरून खूपदा ओळखता यायची. त्यांच्या कामगिरीचे, सुस्वभावाचे, परिश्रमांचे मोल विशेष जाणवते. आम्ही त्यांच्या अधिकाराबरोबरच कर्तृत्त्वापुढेही नतमस्तक होतो.

**- अनीता आणि सुनीता लुल्ला**

□

कोणत्याही व्यवहारात समोरच्या माणसाची चाल सरळ नाही एवढे ओळखले की, डॅडी त्याच्या मागे लागायचे नाहीत, नाद सोडून द्यायचे. त्याचवेळी काय आर्थिक नुकसान व्हायचे ते होते. अशा प्रसंगात ज्याचा अनुभव चांगला नसतो, त्याच्याशी पुन्हा कधीही ते संबंध ठेवायचे नाहीत. 'जाऊद्या की, आपले नशीब तर कुणी नेत नाही!' असे म्हणून मन:स्ताप देणाऱ्या त्या वादावर पडदा टाकून द्यायचे.

लहानपणी मी शाळेत असताना डॅडी कधीतरी मुंबईला येऊन चार दिवस राहायचे. त्या काळात ते माझा अभ्यास घ्यायचे. किशोरला हा अनुभव कधी

आला नाही, त्याला यातली मजा माहीत नसेल. बहुधा त्याबाबतीत भाषेचा प्रश्न असावा. किशोर सांगलीच्या अस्सल मराठी वातावरणात होता, मी मुंबईला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत होतो. डॅडींचे फर्डा इंग्रजी असल्यामुळे मला शिकवायला त्यांना आवडत असावे. दुपारी पुष्कळ वेळ माझी शिकवणी झाली की आजी म्हणायची, ''आता पुरे करा की, त्या पोराला दुसरं काहीतरी द्याल की नाही?'' मग पुस्तक-दप्तर आवरून मी डॅडींबरोबर बाहेर जात असे. चौपाटी, ग्राऊंड, बाग असे कुठेतरी न्यायचे. पाणीपुरी-भेळ-शहाळे असला काहीतरी कार्यक्रम हमखास असायचा.

ते माझ्याशी अगदी बरोबरीच्या मित्रासारखे वागत. पूर्वी जेव्हा मुंबईला येत त्यावेळी मला म्हणायचे, ''चल दीपक, जरा खाऊ-पिऊन येऊ.'' आम्ही दोघे मिळून बाहेर जायचो. फूटपाथवर चणेफुटाण्यांपासून ऐटदार हॉटेलातल्या स्पेशल डिशपर्यंत काहीही चालत असे, कधी सिनेमा व्हायचा. पण आमच्या अशा मजा मारण्यात प्रकरण कधीही पुढच्या पायरीला गेले नाही. इतका मोकळेपणा डॅडींचा सर्वांशी होता. त्यांच्या सुना, नातवंडे यांच्याशी त्यांचे मजा करणे चालू असे.

– दीपक लुल्ला

☐

आपल्या धर्मामध्ये प्राचीन काळापासून 'धर्मो रक्षति रक्षित:' अशी घोषणा आहे. तुम्ही धर्माचे संरक्षण कराल तर धर्मही तुमचे रक्षण करतो. आपल्या धर्माची ही घोषणा म्हणजे वेडगळ समजूत असावी असे काहींनी गृहीत धरले; परंतु इतिहासाने जगाला हे सिद्ध करून दाखविले आहे की, कोट्यवधी हिंदूंनी पाकिस्तान निर्मितीच्या वेळी 'हिंदुस्थान आमचा देश आहे' म्हणून हिंदुस्थानात प्रवेश केला. आज ते निर्वासित न राहता या देशाचे खऱ्या अर्थाने नागरिक झाले आहेत. मानव समाज उघडा पडला, त्याला वाऱ्याने झोडपले, राजाने रस्त्यावर फेकले, तरीही धर्म हे आमचे संरक्षक कवच आहे हे जगाला आम्ही सिद्ध करून दाखविले आहे. पाकिस्तान निर्मितीच्या काळात पंजाब-सिंध-सरहद्द प्रांत-आसाम-बंगाल या भागातून जे कोट्यवधी हिंदू स्थलांतर करून भारतात आले ते सर्व या देशाचे सन्मान्य नागरिक झाले. लुल्ला हे भारताचे असे मान्यवर नागरिक आहेत.


मी त्यांना सांगलीतल्या प्रारंभकाळापासून ओळखतो आहे. उत्तम नागरिक,

उत्तम वकील, उत्तम सामाजिक कार्यकर्ता अशा विविध नात्यांनी त्यांनी महाराष्ट्रात नावलौकिक मिळविला आहे. एक निर्वासित म्हणून आपल्या देशात आलेल्या तोताराम लुल्ला या व्यक्तीच्या जीवनाची वाटचाल पाहिल्यानंतर त्यांच्या कर्तबगारीबद्दल अभिमान वाटतो. मातृभूमी, धर्म या संकल्पना या व्यक्तीच्या जीवनक्रमातून सहजगत्या अधिक स्पष्ट होतील. पंतप्रधान आदरणीय श्री.अटलबिहारी वाजपेयीजी यांनी आपल्या मातृभूमीचे जे वर्णन केले आहे त्याची प्रचितीही या निमित्ताने येते–

यह जमीन का तुकडा नही
ये जिता जागता भारत है
यह अर्पण की भूमी है
यह तर्पण की भूमी है
यह राजर्षियों की भूमी है।
माता का हर कंकर कंकर शंकर है
और बिंदू बिंदू गंगाजल है
हम जियेंगे तो इसके लिये, और
मरेंगे तो इसके लिए।

**– बा. भा. पुजारी**

□□□



□

# माझी इनिंग

*डॅडींचा जीवनप्रवाह सिंधूपासून कृष्णेपर्यंत येऊन तिथे स्थिरावला. त्यांच्या अंतकाळी तो एखाद्या डोहासारखा समृद्ध झालेला होता. मी माझ्या परीने तो पुन्हा पुढे वाहता केला. डॅडींच्या जाण्यानंतर एक तपाचा प्रवासटप्पा ओलांडून मीही आता वानप्रस्थाशी आलो. माझीही साठ-पासष्ट वर्षे अगदीच कशीतरी काहीतरी संपलेली नाहीत, असे मला प्रामाणिकपणे वाटते. आधीच्या पिढीने आपल्या हाती जे दिले, ते अधिक विकसित करून पुढच्या हाती द्यावे, यातून नित्यनूतन संस्कृती बहरत राहते. सिंधू तर अशा संस्कृती-सर्जनासाठी विश्ववंद्य ठरलेली आहे; आणि इथे कृष्णेनेही आपल्या तीरावर तसे मळे फुलविले आहेत. मला माझ्या सुकृताने लाभलेला स्रोत मी वळवत - वाढवत इथवर आणला, त्याची कहाणी सांगावी असे मलाही वाटले. म्हणून आधीच्या आवृत्तीत मी माझ्या इनिंगची भर घालून ते पुस्तक २०१६ साली केले.*

*त्यानंतरच्या घडामोडींतून जे विचार येत गेले, त्याची ही कहाणी आठवेल तशी साठवण्याचा प्रयत्न करण्याचे ठरल्यावर मी माझ्या परिवाराचाही अंदाज घेतला. आत्मकथनास अभिमान, गर्व, प्रौढी, स्तुती असे काहीतरी रूप येईल काय अशी शंका वाटत होती. माझ्या विचारांत किंवा वर्तनांत ज्या त्या कालाप्रमाणे बदल झाले आहेत; पण मनाशी प्रामाणिक राहून मी निर्णय घेतले व त्यांच्याशी ठाम राहिलो. तीच माझी कहाणी आता नव्याने सांगतो.*

*- किशोर लुल्ला*

□

# डॅडींचे निर्वाण

आमच्या 'अतीत' बंगल्याच्या दाराशी असणाऱ्या झोपाळ्यावर माझे डॅडी पुष्कळदा बसायचे.विचारांत गढून जायचे. त्याच झोपाळ्यावर तशाच कातरवेळी आज मी एकटाच निवान्त बसलो आहे. इतका निवांत बसलेला मला आजवर कुणी पाहिले असते तर त्याने, ''अरे! किशोर, तब्येत बरी आहे ना?'' अशा शब्दांत नक्की हटकले असते. पण आता अलीकडे असा 'मनाशी संवाद' करत राहणे मला आवडू लागले आहे. काल-परवापर्यंत या झोपाळ्यावर मी कधी एकटा बसल्याचेही आठवत नाही. बायको-पोरांसोबत चहा-खाणे-गप्पागोष्टी करत घटकाभर बसायचे तर, आमच्या गॅलरीतल्या खुर्च्या ही आमची लाडकी जागा. अशा लोखंडी झोपाळ्यावर झुलत बसायला जरा रोमँटिक मूड असायला हवा. पण तक्क्याला टेकून हे निवांत एकटे बसणे आज बरे वाटत आहे.

अशा तऱ्हेने उगीच शून्यमनस्क बसणे माझ्या स्वभावात नाही, प्रवृत्तीत नाही. सतत काहीतरी काम-उद्योग-कृती करायलाच हवी असा माझा पिण्ड घडलेला आहे. आमचे डॅडी उलट प्रकृतीचे होते. कुठल्याही बाबतीत त्यांची प्रतिक्रिया थंड असायची. 'तुका म्हणे उगी राहावे। जे जे होईल ते ते पाहावे' असे त्यांचे जीवनसूत्र होते. त्यांच्यात आलेली ती स्थितप्रज्ञा अनुभवांच्या चढउतारांतून आली असावी. सांगलीच्या गजानन मिलमध्ये एक ओवी भिंतीवर दिसायची, 'कामे पडली अनंत, वेळ मात्र मर्यादित। म्हणोनी व्यर्थ बसण्यात, कालक्षेप न कीजे।' हे सूत्र मला आजवर खूप रुचले. पण आता डॅडींच्या त्या झोपाळ्यावर आज मी असा स्वस्थ बसलो, तरी त्याचेही मी ठोसपणे समर्थन करेन की, ''हे स्वस्थ बसणे नव्हे. मागे वळून पाहात, गत आयुष्याचा आढावा घेत, आपणच आपल्या वाटचालीकडे त्रयस्थपणे पाहता यायला हवं. हे चिंतनसुद्धा अलिप्तपणे करता आलं पाहिजे. हे निरर्थक गप्प बसणं नव्हे, तर

त्यातून खूप लाभ होतात. त्या विचारचक्रातून आपण इतरांनाही बरंच काही देऊ शकतो....'' मलाच माझे हसू आले. यशस्वी वकिली यालाच म्हणत असतात ना? एकाच गोष्टीच्या दोन्ही बाजू 'आपल्या' म्हणून मांडता आल्या पाहिजेत. ते जरी खरं असलं तरी असल्या वकिली यशाचे रहस्य, या - त्या बाजूंना ढकलून, एका टप्प्यावर कधीतरी आपल्या मनाशी खऱ्या-खोट्याचा ताळा करून पाहावा लागणारच की! तसा ताळमेळ करायला असे स्वस्थपण हवे!

सात दशकांपूर्वी सिंधूकाठावरून जिवाच्या आकांताने नेसत्या वस्त्रानिशी 'निर्वासित' झालेलो आम्ही, आज कृष्णाकाठीच्या बंगल्याशी झुलत बसलो आहोत. १९४७च्या अखेरीस रात्रीच्या जेवणाची भ्रांत असणारे माझे डॅडी, आज स्वर्गातून माझी कोट्यवधींची मालमत्ता पाहून, त्यांच्या स्वभावाप्रमाणे तसेच स्वस्थचित्त, स्थितप्रज्ञ असतील ही मला खात्री आहे. या आर्थिक बदलाचे मलाही खूप समाधान असले तरी गर्व नक्कीच नाही. पण या परिवर्तनातून मी नेमके काय साधले, हा प्रश्न मला विचारात पाडतो.

झोपाळ्याचे झुलणे या प्रश्नांच्याच गुंतावळ्यात कधी अडकले ते कळले नाही. उत्तरांच्या शोधात मी हरवून गेलो.पापण्यांच्या ओलाव्यातून हाताच्या अंतराचे मला दिसेना, पण माझ्याच साठ-पासष्ट वर्षांचा पट, मला डोळ्यासमोर स्पष्ट दिसू लागला.

❐

डॅडींची एकाहत्तरी २००३साली झाली. त्या सोहळ्यात मुंबईचे माजी खासदार झमटमल वधवानी, मुंबईचे ख्यातनाम वकील पी.व्ही.सुरते आणि अफाट जनसमुदाय उपस्थित होता. डॅडींच्या स्वभावाप्रमाणे त्या सोहळ्यात मानसिक दृष्ट्या ते फारसे अडकले नव्हतेच; पण आम्हा सर्वांना त्यांच्याविषयीची कृतज्ञता प्रकट करायची होती. आमच्या संबंधित परिवारासही त्या सोहळ्याने कृतज्ञतेचा व तृप्ततेचा अनुभव दिला. त्या सोहळ्यास जमलेल्या लोकांकडून डॅडींना आलेल्या मान-वस्त्रांचा आणि पुष्पगुच्छांचा डोंगर, आम्हा सर्वांच्या आनंदाश्रूंत भिजत होता. या चिरस्मरणीय सोहळ्यानंतर डॅडींची प्रकृती कमीजास्त होत राहिली. तब्येत चांगली असेल, त्यावेळी ते ऑफीसला येत. तिथे वृत्तपत्र-वाचन, किरकोळ कामकाज, फोन, सल्ला, भेटीगाठी असे चालत असे. रोजच्या कारभारात ते फारसे लक्ष घालेनासे झाले, पण ते ऑफीसला येतात त्याचाही एक प्रकारे दरारायुक्त आब सर्वांना जाणवत असे. अशी चारपाच वर्षे गेली. २००८पासून त्यांनी व्यवसायातून पूर्णत: निवृत्ती घेतली. ते ऑफीसला येणे थांबले. प्रकृती बेताचीच होती. साठ वर्षांचे शारीरिक परिश्रम आणि मानसिक झोके यांमुळे ते शिणून गेले होते. डॉक्टरांची वर्दळ आमच्या घरी वाढली होती.

प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य, सुखदु:ख या भावना प्रत्येकाच्या अंगी असतातच, पण मी तसा पक्का व्यवहारवादी. वेळ-श्रम-पैसा हे खर्च करताना, त्यांतून जास्तीचे काही परत मिळेल का, असा विचार करतो. ही सिंधी वृत्ती असेल; त्यात मला काही गैर किंवा चूक वाटत नाही. त्यामुळे या जगातल्या प्रत्येक प्रश्नाला व्यवहारी उत्तर आहे अशी माझी धारणा असते. देव-देऊळ व तशा प्रकारची धार्मिक कर्मकांडे यांवर माझा काडीमात्र विश्वास नाही. पण काही प्रसंग माणसाला निरुत्तर करणारे असतात. या कातरवेळी माझ्या डोळ्यापुढे डॅडींचा जाण्याचा दिवस स्पष्ट तरळू लागला.

माझे लग्न १९८५ सालचे. त्यामुळे २०१० साली आमच्या लग्नाला २५ वर्षे पूर्ण होणार. हा असला योग दुर्मीळ वगैरे नव्हे, पण आमच्या उत्सवप्रिय समाजात उधाण येण्यास तेवढेही निमित्त पुरे असते. आम्ही साऱ्या कुटुंब-काफिल्यासह आमच्या लग्नाचा रौप्यमहोत्सव साजरा करण्याचे योजिले. साऱ्या दिमाखाची तयारी सुरू झाली. खर्च किती, हा विचारच नव्हता. कुठले हॉटेल, किती लोक, मेन्यू काय, कार्यक्रम कोणते, नृत्यगाण्यांचे काय अशा सगळ्या चर्चा होत्या. मला त्या साऱ्यांत खूप रस होता असे नव्हे; ते टाळायलाच हवे असा हट्टही नव्हता. एकीकडे डॅडींच्या प्रकृतीमुळे मनातील शंकेची पालही चुकचुकत होती. गेल्या दीड-दोन वर्षांत त्यांची प्रकृती नरम होत चालली होती. त्यांना असे अंथरुणावर पडून राहिलेले पाहून मला कसेतरी वाटायचे. या स्थितीत आमच्या कार्यक्रमात ते कसे काय सहभागी होऊ शकणार होते? आणि त्यांना व अर्थातच त्यांच्यासोबत मम्मीला इथे घरी ठेवून आम्ही लग्नाच्या पंचवीसाव्या वाढदिवसाची मौजमस्ती काय करणार होतो? तब्येतीत सुधारणा... किंवा सुटका, अशा एका अनिश्चित श्रान्त अवस्थेत डॅडी होते.

☐

देवधर्मभोळेपणावर माझा विश्वास नसला तरी, पत्नी सुनीताचा तो होता; आहे! कधीतरी एकदा ती आमच्याच कुटुंबातले प्रश्न घेऊन साताऱ्याच्या एका ज्योतिषीबाबाना भेटली होती. त्यावेळी त्यानी तिला नगर जिल्ह्यातल्या शनीशिंगणापूरचे दर्शन घेण्यास सांगितले होते. आज-उद्या, -बघू नंतर... असे करत तिचे हे म्हणणे कधीच मागे पडले होते. तिची शिर्डीवाले साईबाबांवरही खूप श्रद्धा आहे. मी आपला आजवर तिच्या हो ला हो म्हणत आलो होतो. पण डॅडींची क्षीणता, मम्मीची अस्वस्थता, माझी द्विधावस्था असे वातावरण होते. घरात एकजण आजारी असले की सारे घर आजारी होते म्हणतात. या सगळ्या वातावरणात सुनीताने ही देवदर्शनाची मनस्वी इच्छा लावून धरली. तिला संमती देऊन आम्ही त्या यात्रेला निघालो. सोबतीला

आमचा सश्रद्ध सहकारी अमोल माने आणि त्याची पत्नी वंदना हे दोघे होते. घरून निघाल्यावर राहुरी येथे, ग्राहक पंचायतीमुळे परिचित झालेल्या सुचेता कुलकर्णी यांच्याकडे मुक्काम केला. शनी-शिंगणापूरला पोचण्यात दिवस गेला. दर्शन केल्यावर तिथून घरी फोन केला. डॅडींची प्रकृती अगदी ठीक असल्याचे समजले. नुसते आमच्या या देवदर्शनाने तिकडे डॅडींना बरे वाटू लागले, हे मला मान्य होणे फारच कठीण होते. पण माझ्या पत्नीला त्याचे बरे वाटले, याचे मला बरे वाटले.

आता डॅडी ठीक आहेत, आणि असेही घराबाहेर पडलोच आहोत तर शिर्डीचा टप्पाही उरकून टाकू; असा विचार करून आम्ही पुढचा रस्ता धरला. एक मुक्काम वाढला. घरचे ठीक असल्याचे फोनवर कळतच होते. शिर्डीला पोचलो. तिथे आपल्या सोबतचे सामानवस्तू, सेलफोन वगैरे मंदिरात नेता येत नाही. बाहेरच्या दुकानदाराकडे पूजासाहित्य घेतले. तिथेच आमच्या चपला ठेवल्या, फोनही ठेवला. ती वेळ नेमकी साईबाबांच्या आरतीची होती, ती साधली गेली यात पत्नीला खूप आनंद झाला. मी आपला नेहमीसारखा, 'त्यात काय विशेष?'- या मताचा.

मंदिरात आरती असल्यामुळे दर्शनरांगेत जरा जास्त वेळ गेला, पण व्यवस्थित दर्शन झाले. बाहेर येऊन फोन-पिशवी वगैरे घेतले. लक्षात आले की, एवढ्या वेळातच घरून दोन मिस्ड कॉल येऊन गेले होते. चपला घालत होतो, तोवर पुन्हा घरून फोन वाजला. बटन दाबून हॅलो म्हणेतो तिकडून हुंदकाच ऐकू आला. आम्ही साईंपुढे उभे होतो त्याचवेळी इकडे डॅडींनी त्यांची यात्रा संपवली होती. 'हे कसे काय?' या प्रश्नापुढे आता मात्र मी 'त्यात काय विशेष!' असे म्हणू शकलो नाही, गळ्याशी आलेला आवंढा गिळला, कारण त्या प्रश्नाला उत्तर नव्हते.

फोनवरून सांगलीतील माझ्या जवळच्या मित्रांना सूचना दिल्या. पुढची तयारी करायला सांगितली. शिर्डीपासून सांगलीचे दूर अंतर लक्षात घेता, 'माझी वाट पाहात थांबण्याचेही कारण नाही' असे म्हटले; पण माझे आप्तस्वकीय तितके व्यवहारी नसावेत. अमोल गाडी चालवत होता. त्याने सलग बराच वेळ ड्रायव्हिंग केले, त्यामुळे तोही थकला होता. पण माझी मन:स्थिती लक्षात घेऊन तोच गाडी रेटून नेत होता. मला राहावले नाही. त्याला बाजूला करून मी स्टिअरिंगवर बसलो. याही स्थितीत न डगमगता परिस्थितीला तोंड देण्यात मला एक प्रकारचे आव्हान वाटत असते, आणि ते मी अंगावर घेतो. अमोलने जेमतेम अर्धा तास बाजूला बसून विसावा घेतल्यावर त्याने मला बळेबळे उतरवून पुन्हा स्वत: गाडी चालवायला घेतली. अशा सोबत्याविषयी मी काही म्हणण्याऐवजी तोच माझ्या घट्टपणाचे, धीराचे कौतुक करत

होता.

आम्ही घाईने निघून घरी पोचलो, तोपर्यंत सगळी तयारी करून मंडळी थांबली होती. कृष्णाकाठी घाटावर पोचलो. मी खंबीरपणाचे उसने अवसान आणले होते. पण ज्वाळा धडधडू लागल्या तसा मी मनाने सभोवतालच्या अतीत जाऊन पोचलो होतो. भारताच्या वायव्य प्रांतात सिंधुकाठी या जगात प्रवेश केलेले माझे डॅडी, कुठल्या कुठे दूर इथे कृष्णाकाठावरून अनंताकडे परत निघाले होते. त्यांच्या प्रवासाच्या राहुट्या इथे पडल्या होत्या. त्यांची 'जननी जन्मभूमिश्च' सिंधूकाठी होती; माझी इथे कृष्णाकाठी झाली! आता मी निर्वासित नव्हतो, कृष्णेच्या कुशीत आसरा घेऊन प्रतिष्ठित धनवान झालो होतो. परंतु डॅडींच्या जाण्याने मला क्षणात पोरकेपण आले, पोरपण संपले आणि मी मोठा झालो असे वाटले; तरीसुद्धा आधारासाठी मी मित्राच्या खांद्यावर हात ठेवून पाऊल उचलले.

'तुम्ही पाठीशी असताना
जग जिंकेन असं वाटत होतं
तुमच्याशिवाय राहताना
मनातून अगदी पोरकं वाटतं.'

या कोणा कवीच्या ओळी मला आठवत होत्या.

घरी परत आलो. सगळेजण दुखाश्रूंत बुडून गेले होते. भेटायला येणाऱ्या लोकांचे लोंढे घरात येत होते. मी त्या सगळ्यांसमोर धीर गोळा करून वावरत होतो. 'निसर्गनियमाप्रमाणेच हे झालेले आहे, त्यात एवढा शोक करण्याजोगे फार काही नाही' असे वरकरणी म्हणतही होतो. लोकांची ही रीघ पाहून मला आमच्या कुटुंबाने केलेल्या लोकसंग्रहाचा प्रत्यय येऊन एकीकडे समाधान वाटत होते. डॅडींच्या माघारी आपण एकटे पडणार नाही याची खात्रीही वाटत होती. अंथरुणावर पडलो. झोप येत नव्हती,

'दिवस कसाही निघून जातो
सांजवेळ सरता सरत नाही
तुमची आठवण येताक्षणी
मी माझा राहातच नाही.'

अशी काहीतरी माझी अवस्था होती. डोळ्यांपुढे भूतकाळ नाचत होता. आधीचे दिवस आठवत होते...

□□□

□

# माझे डॅडी

साधारणपणे असा समज असतो की, वडिलांचा वारसा मुलगा चालवितो. व्यवसायधंदा – स्थावरपैसा – रूपगुणांप्रमाणेच स्वभाव, लकबी, आवडनिवड – अशा कितीतरी गोष्टी आधीच्या पिढीतून येत असतात; आणि वडिलांचे तर अनुकरणच होत असते. आमच्या डॅडींकडून मी काय काय घेतले? त्यांच्या ऑफिसात मी जाऊ लागलो, म्हणून त्यांचा धंदा घेतला असे म्हणता येईल फारतर! पण त्यांच्यासारखे काम मी कधी करू शकलो नाही. त्यांच्या घरी राहू लागलो म्हणून घर मिळाले असे म्हटले तरी त्यांच्या राहणीमानाशी माझे सूत्र जुळत नाही. स्वभाव आणि जीवनशैलीत तर इतका फरक की, मला बाकीचे लोक म्हणायचे, 'या बापाचा तू मुलगा असा कसा?'

माझ्या आईची आई म्हणजे आजी, तिला पाच मुलीच. डॅडी मुंबईत राहात होते. त्यांच्या नोकरीची सुरुवात होती तेव्हा त्यांचे लग्न झाले; दीपकचा जन्म झाला. त्याच्या पाठीवर दोन अडीच वर्षांनी मी. या दरम्यान डॅडींची बदली कोल्हापूरला झाली होती. दीपकला आजीकडेच ठेवले, मी मात्र तान्हे बाळ म्हणून डॅडींच्यासोबत आलो आणि त्यांच्याच सावलीत राहिलो. इतक्या वर्षांच्या सहवासात माझे लक्ष डॅडींकडे कधी म्हणावे तितके गेलेच नाही, असे मला वाटत राहायचे.

डॅडी हे माझे वडील, गुरू, सल्लागार, मित्र आणि असिस्टंटसुद्धा होते! एकाच व्यक्तीशी इतकी नाती असणे ही गंमतच. डॅडी म्हणजे सरळमार्गी, पापभीरू, साधासीधा माणूस. सगळ्या लुल्ला कुटुंबात माझे डॅडी त्याकाळी शिकलेले – डबल ग्रॅज्युएट; त्यांच्यानंतर मी! बाकीचे सगळे अशिक्षित किंवा अल्पशिक्षित. ते तीघे भाऊ, पाच बहिणी. सर्वांपेक्षा डॅडी वेगळे, अलिप्त

असत. वडिलांकडील इस्टेट-पैसा यात त्यांना स्वारस्य नव्हते. मिळाले तर असू दे; पुन्हा त्याबद्दल शब्द नाही!

मी लहान असल्यापासून माझे कौतुक ते फारच करीत असत. शाळेला सुटी लागली की मी आईबरोबर मुंबईला जात असे. माझे आजोबा मुंबईत; तसा डॅडींकडील गोतावळाही मुंबईतच. आई त्यावेळी तिच्या बहिणी-तिचे आईवडील यांच्यात असे. तेवढ्या मुक्कामात डॅडी कधी मुंबईला फारसे येत नसत. आम्हाला न्यायला एखाददुसरा दिवस यायचे तेवढेच! बाकीचा एकदीड महिना ते सांगलीतच राहायचे. आईला आणि मलाही सिनेमा पाहायला खूप आवडायचे. आमच्या हट्टासाठी ते दर रविवारी संध्याकाळच्या हिंदी सिनेमाला आम्हाला नेत. माझ्या लहानपणीचा हा कित्येक वर्षांचा क्रम असे, अगदी माझे लग्न होईपर्यंत! नंतर ते दोघे जात, पुढे मग नातवंडांना नेऊ लागले. ते इतके सिनेमे पाहात पण त्यानंतर त्याचा कुठलाही तपशील त्यांना सांगता येत नसे. सिनेमा पाहण्यात त्यांना आनंद असायचा, आणि बाहेर पडल्यावर तो विसरून जाण्यात अधिक आनंद असायचा. त्या सिनेमाबद्दल त्यांची कुठलीही प्रतिक्रिया नसे. पुढच्या आठवड्यात पुन्हा आम्ही म्हणायचा अवकाश; की डॅडी चला म्हणायचे!

माझा अभ्यास त्यांनी कधी घेतला नाही, कधी मला शाळेला पोचवायला आले नाहीत. माझी परीक्षा आहे म्हणून पुस्तकातले प्रश्न कधी विचारले नाहीत. पण शाळा सुरू होण्याच्या आधी उत्साहाने कपडे-पुस्तके-वह्या यांची खरेदी चालायची. मला जे आवडेल ते पट्कन मिळायचे. आईचे काही तरी म्हणणे असायचे, पण डॅडींना सगळेच चांगले वाटायचे.

त्यांना फारसे मित्र नव्हते. प्रसंगाने, काही निमित्ताने जो थोडा जवळ येईल तो त्यांचा तेवढ्यापुरता मित्र व्हायचा. माझ्या लहानपणी आम्ही सध्याच्या वेलणकर कार्यालयासमोर राहात असू. श्री.एस.एस.शहा वकील आणि श्री.एस.डी.शेवाळे हे विक्रीकर अधिकारी आमच्या जवळपास राहात. दिवसभरच्या कामकाजातही त्या दोघांशी संबंध येत असल्यामुळे त्यांची अधिक जवळीक होती. हे तीघेजण सहकुटुंब महाबळेश्वर सहलीस गेले होते ते मला आठवते. अशा सहलीत डॅडी खूप रमायचे.

घरगुती वातावरण आणि घरगुती जेवण त्यांना मनापासून हवे असायचे. आई माहेरी जायची तेव्हा त्यांचे ठरलेले हॉटेल असायचे - स्टेशन चौकातले

– ‘आवडनिवड’. तिथले त्यांचे साधे जेवण ठरलेले होते. त्यातली दह्याची वाटी ते काढून परत देत आणि त्या बदली एक चपाती मागून घेत; असा मजेदार हिशेबीपणा असे. बाकी खाण्यापिण्यात काही तऱ्हा नाहीत; पापड मात्र अतिप्रिय होता. खाण्यात बिलकुल तिखट नाही. मिरची नुसती दिसली तरी पाणी मागायचे. स्वत: स्वैपाकघरात कधी लुडबुड नाही. चहासुद्धा त्यांना करता यायचा नाही. मात्र कधी लहर आली तर स्वत: पापड खरपूस भाजून खायचे. लाल रंगीत भावनगरी जाडसर शेव हा तितकाच आवडीचा दुसरा पदार्थ. पण अगदी पंचपक्वान्नाची ताटे ज्यासाठी दूर ढकलून देतील असा खाद्यपदार्थ म्हणजे भुईमुगाच्या शेंगा. कच्च्या, भाजलेल्या, उकडलेल्या, ओल्या, वाळल्या.... कसल्याही शेंगा त्यांना खूप आवडत. कित्येक वेळी, म्हणजे जवळजवळ रोजच –ऑफीसातून येताना ते कुठल्यातरी हातगाड्यावर शेंगा विकत घ्यायचे आणि दाणे तोंडात टाकत घरी यायचे. आम्ही मुले पुढे आलो की त्यातले उरलेले चारसहा शेंगदाणे आमच्या हातावर येत असत. कधी हॉटेलमध्ये आम्ही सगळे मिळून जेवायला गेलो तर कोणकोण काय काय खाणार याबद्दल मेनूकार्डाच्या आधारे इतर सगळ्यांची तासभर चर्चा होई. डॅडींच्या हाती मेनूकार्ड देऊन ‘तुम्हाला काय मागवूया?’ असे विचारले की, ते सगळ्या यादीवर दुर्लक्ष करून उजव्या बाजूचे दर आधी वाचत; मग ते कार्ड सावकाश खाली ठेवून म्हणत, ‘मला एक चपाती पुरे.’ ती घेऊन कुणाच्याही वाटीतल्या भाजीचा थोडा स्पर्श करून ते खाऊन टाकायचे.

त्यांनी कधी व्यायाम–उपास वगैरे केला नाही. योगासने, प्राणायाम, पोहणे, पळणे या गोष्टी फारच दूरच्या! सुटीच्या दिवशी घरात काम आणले तर फायली काढून बसायचे;नाहीतर झक्कपैकी ताणून द्यायची. झोप लागली नाही तर लोळणेश्वर. गुडघ्याखाली एक जादा उशी मिळाली की ते स्वर्गसुखात असायचे. कधी आजारी पडल्याचे मला आठवत नाही. त्यांना टाचदुखीचा त्रास(गाऊट) खूप वर्षांपासून होता. त्यामुळे क्वचित कधीतरी पाय सुजत. अगदीच असह्य झाले तर तीन चार दिवस विश्रांती घेत. काही थोडे औषध–गोळ्या घेत. पुन्हा ऑफीस चालू! रात्री जागरण नाही. रात्री साडेनऊच्या आधीच अंथरुणावर आडवे होत. वृद्धपणी मात्र लवकर उठत. पहाटेचे फिरायला जात. माझ्या आठवणीत त्यांनी बूट कधीच वापरले नाहीत.

त्यांना सायकल चालवता येत नसे. घर कुठे आणि ऑफीस कुठे हा

विचार गौण होता. बॅग घ्यायची आणि चालत निघायचे. सायकलच नव्हे तर आमच्या घरात आलेली कोणतीही वस्तू डॅडींच्या मागण्यावरून किंवा त्यांना हवी आहे म्हणून आली नाही. देवदयेने बंगला-गाडी-फ्रीज-टीव्ही सगळे काही आले. पण यातली 'अमूक वस्तू आपल्या घरी आणूया' असे त्यांनी आपण होऊन कधीच म्हटले नाही. त्यांना शर्ट शिवायला हवा, हेसुद्धा आईने किंवा आमच्यातल्या कुणीतरी लक्षात आणून द्यायचे. तोपर्यंत तेच ते कपडे कित्येक दिवस वापरत. कपडे जीर्ण झालेले त्यांना कळत नसायला काय झालं? पण स्वत:साठी वेगळे काहीतरी आपण होऊन करावे हे त्यांच्या मनास स्पर्शत नसे. रंग, कापड यातला चोखंदळपणा नाही. नवा कपडा आणल्यावर तो घालून एकदा स्वत:शीच लाजल्यासारखे पाहात; आणि तेवढ्यावरच त्याचे नवेपण विसरून जात. नवी वस्तू आली की ती स्वीकारण्याचा आनंद त्यांना हवा असे; मग रंग, कंपनी, साईज, किंमत यांचा प्रश्नच नाही. आमची आई (मम्मी), मी व दीपक यांचे सगळे म्हणणे ते ऐकायचे. मागण्या मान्य करायचे. हट्ट करावा लागायचा नाही. घरात कोणता रंग द्यायचा, गाडी कोणती घ्यायची, कोणत्या हॉटेलात जेवायचे, कोणता सिनेमा पाहायचा याविषयी त्यांचे मत नसे. कारण त्यांचा पहिला मुद्दा असे, 'कशाला पायजे? आहे हे काय वाईट आहे?' त्यानंतर मग त्यांच्या दृष्टीने सगळे चांगलेच, कुठलेही निवडले तरी चालेल!

पैसे वाचविणे हा त्यांचा प्रकृतिधर्म होता. लाखभर रुपयांच्या व्यवहारात कुठे एक रुपाया वाचत असेल तर ते त्यासाठी खूप मेहनत घ्यायचे. मी शिक्षण संपवून त्यांच्या हाताखाली काम करू लागलो. तेव्हा त्यांचे असिस्टंट अच्युत जोशी नावाचे गृहस्थ होते. त्यांनी मला पुष्कळसे कामकाज शिकविले. मी हळूहळू त्यांचा धंदा हाती घ्यायचा हे अप्रत्यक्ष ठरलेलेच होते. सिंधी लोकांत ती पद्धत आहे. आधी सिंधी तरुण नोकरी सहसा करणार नाहीत, त्यातून बापाचा धंदा असल्यावर विचारायलाच नको! डॅडींच्या समवेत काम करायला लागल्यानंतर या क्षेत्रातल्या इतरांचेही अनुभव माझ्या गाठीशी आले आहेत. अशा स्थितीत डॅडींच्या व्यावसायिक पद्धतींची खास वैशिष्ट्ये मला जाणवत.

मी व्यवसायात येण्यापूर्वी, म्हणजे ते एकटे असताना 'आवश्यक ती माहिती, कागदोपत्री करून आण' असे व्यापाऱ्याला कधी सांगत नसत. त्याच्या कीर्दी-खतावण्या स्वत: घेऊन बसायचे आणि सगळी आकडेमोड करून पत्रके

तयार करायचे. त्या काळात ते प्रत्येकासाठी कधी काय करत होते देव जाणे! विठ्ठलराव देशपांडे करसल्लागार हे त्यांचे मार्गदर्शक, त्यांना ते मनोमनी मानतात. 'देशपांडेसाहेबांनी मधे पैसे खाण्याचा अनैतिक व्यवहार कधीच केला नाही, त्यामुळे मलाही तशी कधी बुद्धी झाली नाही' असे ते कधीतरी सांगत. आयकर-विक्रीकर अथवा कोणत्याही शासकीय खात्यांशी संबंधित लोक एवढ्या निग्रहाने स्वच्छ राहणे आजकाल दुर्मीळच म्हणावे लागेल. ट्रायब्यूनलची प्रकरणे असतील तर मुंबईतल्या एकाच वकीलाकडे देत असत, त्यांचे नाव पी.व्ही.सुरते. हेही सद्गृहस्थ डॅडींच्याच स्वभावाचे. आज मी कधी त्यांच्याकडे जातो, तेव्हा दोघेही एकमेकाला किती मानतात हे जाणवते. डॅडी म्हणत, 'सुरते आमच्याजवळ असते तर सगळी ऑफीस सुधारली असती.' तर सुरते म्हणत, 'टी.बी.लुल्लासारखा अभ्यासू आणि हुशार वकील मुंबईत असता तर आज कुठल्या कुठे गेला असता.'

डॅडींच्या कामाचा उरक दांडगा. कोणत्याही करदात्याला कधी दहा-पंधरा मिनिटांपेक्षा जास्त थांबवायचे नाहीत. पुढच्या वेळी पुन्हा भेटायचे ठरले तर यांचे सगळे मुद्दे, टिपणे त्यावेळी तयार असतील. आमचे करदाते ग्राहक, व्यापारी, त्यांचे दिवाणजी सगळे खूश राहात. काम रेंगाळत ठेवून डॅडींना चैन पडायचे नाही.

त्यांनी ज्यांची कामे करून दिली, डॅडींच्या सल्ल्यामुळे ज्यांचा फायदा झाला, किंवा संस्थेचे काही काम केले तर त्यांच्याबद्दल कुठे वाच्यता ते कधीच करायचे नाहीत. संस्थेसाठी पैसा गोळा करण्यात ते - अंगावरच घेतले तर - हयगय करायचे नाहीत. पण 'मी एवढे पैसे गोळा केले' असे मम्मीजवळसुद्धा बोलायचे नाहीत. कधी कुणाचा सत्कार त्यांच्या हस्ते झालेला असे; कधी ते कुणाला मुंबईपर्यंत घेऊन गेलेले असत, कधी कुणाला त्यांनी पैसे दिलेले असत - काहींनी ते बुडवलेही असत - पण यांतले अन्य कुणाला माहीत नाही. कर(टॅक्स) या विषयासंबंधी त्यांचे वाचन सतत चालू असे. त्यातल्या पुस्तकांचे एकही पान त्यांच्या नजरेतून सुटले नसेल. पूर्वी 'फ्री प्रेस जर्नल' घ्यायचे. ऑफीसमधून घरी आल्यावर सगळा पेपर वाचून काढणे हा त्यांचा छंद. त्या व्यतिरिक्त वाचन म्हणजे करविषयक साहित्य, बस्स! कथा-कादंबरी कधी हातात धरली नाही. कुठले नवीन पुस्तक त्यांना कुणी दाखवले तर उलटसुलट उलगडून विचारतील, 'यात प्रॉफीट झाला काय?'

वकिलीखेरीज त्यांनी एक वेगळा छंद केला. त्यांचेच ज्येष्ठ मित्र-मार्गदर्शक व्ही.व्ही.देशपांडे यांच्याबरोबर त्यांनी हॉटेल धंद्यात पैसे घातले. स्टॅन्डपासून जवळ 'तृप्ती लॉजिंग अॅन्ड बोर्डिंग' हे हॉटेल त्यांनी सुरू केले. -म्हणजे पार्टनर म्हणून फक्त पैसे घातले. यांचे त्यात काम काय? -तर मला आणि मम्मीला घेऊन दर रविवार या 'आपल्या' हॉटेलात अर्धा-पाऊण तास जायचे. पुढे हे हॉटेल विकून टाकले. यांना थोडा मनस्ताप झाला, पण त्याबद्दल कुणाला दोष दिला नाही. चार दोन दिवसांत ते विसरून गेले असणार! हळद, चिंच, शेअर्स अशा काही व्यवहारात त्यांनी पैसे गुंतवले; पण कुणाला तरी त्या धंद्यात मदत करावी हा मूळ हेतू. त्यात जास्त पैसे काढावेत, तेजीमंदी करावी, नवीन काही शोधावे असे मनातही नाही. कुणीतरी यांचा सोयरा मुंबईत असतो. तो म्हणायचा, 'माझ्यासाठी उत्तम हळद पाठवा' मग हे एखाद्या अगदी खास ओळखीतल्या व्यापाऱ्याला सांगून तेवढी तरतूद करत. एवढ्या उलाढालीत चार पैसे मिळाले की बास्स. यात कसला धोका नाही, जुगार नाही, धाडस नाही. पण फुकटचा व्याप केलाय असेही नाही.

कुणाच्याही जीवनात काही चढउतार असतात. डॅडींच्या जीवनात ऐन तारुण्यात एक प्रचंड आंदोलन येऊन गेले. पण एरवी हा जीवनप्रवाह संथ, निरामय होता. सिंधू नदी मी पाहिली नाही, पण तिच्या काठी भारतवर्षातील अनेक घटना घडविणाऱ्या प्रेरणा निर्माण झाल्याचे इतिहास सांगतो. मला त्या प्रवाहाशी डॅडींशी तुलना करण्याचा मोह आवरत नाही. त्यांच्या सहवासात खूपजण घडत गेले, मोठेही होत गेले, काही सामाजिक कामे चालली, विचार-विनीमय झाले, वाद-विवाद झडले. पण डॅडी सर्वांतून अलिप्त राहिले, काठाशी येणाऱ्याला आनंद देत, तृषा भागवीत निखळपणे वाहात राहणाऱ्या सिंधू किंवा कृष्णेसारखे!

□□□

□

# वारा प्यालेले वासरू

बिल गेट्स या करोडोपती उद्योजकाची गोष्ट सांगतात की, त्याचा मुलगा एका हॉटेलात जेवायला गेला. बाहेर पडताना त्याने वेटरला दहा डॉलर टिप दिली. दुसऱ्या दिवशी स्वत: बिल् त्याच हॉटेलात गेला, त्याने एक डॉलर टिप दिली. उत्सुकतेने विचारल्यावर बिल म्हणाला, 'तो बिल् गेट्सचा मुलगा आहे आणि मी एका सामान्य शेतकऱ्याचा!' काहीजण हीच गोष्ट निक्सनची म्हणून सांगतात. कुणाची का असेना; आमच्या डॅडींनाही त्यांचे व माझे वागणे पाहून हाच प्रश्न विचारला गेला असेल. त्यांनी उत्तर दिले असणार की, ''तो एका मोठ्या वकीलाचा मुलगा आहे आणि मी एका निर्वासित व्यापाऱ्याचा!'' डॅडींनी शून्यातून सारे घर उभे केले, पण स्वत:साठी काही घेतले नाही आणि काही ठेवले नाही. आयुष्यात त्यानी काही उपभोगलेही नाही. जाताना सगळे पुढच्यांना देऊन टाकले.

□

मला उत्तम शाळा, खूप लाड - कौतुक मिळाले. आठवले विनय मंदीर, पटवर्धन हायस्कूल, चिंतामणराव कॉमर्स कॉलेज, एन एस लॉ कॉलेज आणि नंतर गव्हर्मेंट लॉ कॉलेज अशा चांगल्यात चांगल्या शाळा आणि कॉलेज माझ्यासाठी त्यानी निवडल्या. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आल्यासारखे माझे बालपण होते. वडील काय कष्ट करत असतील ते असतील, ते मी पाहातही होतो, पण त्यामुळे काही वेगळा हळवा विचार माझ्या मनात त्यावेळी तरी येत नसावा. मला माझ्या त्या बालपणात कोणतेही हाल, कसलीही अपेष्टा त्यानी दिसू दिली नाही. पैशाची कधी चणचण नाही, कसलेही बंधन नाही, मुक्त स्वातंत्र्य होते. बडे बाप का बेटा असल्यासारखा मी स्वच्छंद मौजमजेत मोठा होत होतो. थोडक्यात म्हणजे त्या वयात मला बिघडायला

भरपूर वाव होता.

दोन वर्षांचा असतानाची आठवण मला पक्की राहिली आहे, ती म्हणजे कपाळमोक्ष झाल्याची! आम्ही त्यावेळी खणभागातल्या चाळीत वरच्या मजल्यावर राहात होतो. तिथून मी खेळता खेळता सरळ खाली फरशीवर डोक्यावर पडलो होतो. कडेच्या गटारीचे पाणी माझ्या रक्ताने लाल झालेले पाहून आईच्या काळजाचेही पाणी झाले असणार.

माझ्या वाढत्या वयाबरोबर आईचे मात्र माझ्यावर पूर्ण लक्ष असायचे. डॅडींचे लाड आणि मम्मीची छडी! आज लक्षात येते की, बहुधा त्यांनी या भूमिका आपापसात ठरवून घेतलेल्या असाव्यात.माझा अभ्यास, खेळ, व्यायाम, योग, एकूण शिस्त संस्कार असल्या भानगडीत वडिलानी कधी लक्षच दिले नाही, त्याबद्दल चर्चा तर राहोच परंतु एखादा शब्दही उच्चारला नसेल. तुम्हाला काय पाहिजे ते करा, आपण भले आणि आपले काम भले... असा त्यांचा खाक्या होता. त्यामुळे माझे खाते आमच्या मम्मीकडे सोपविलेले असायचे. शाळा, शिकवणी, सिनेमा, सहल, कपडे या सगळ्या बाबतीत आई सतत जागरूकतेने लक्ष घालायची. तिला अशा घर प्रपंचात आवड असल्यामुळे त्यात कुठे कशालाही कमी किंवा काटकसर नव्हती, पण कुठेही सैलपणा नव्हता. त्याचाच परिणाम असेल की, मला सगळ्या चांगल्याच गोष्टी माहिती झाल्या.. बरेच व्यवहार मला लवकर कळू लागले आणि शारीरिक दृष्टीनेही मी चांगला हुंदडणारा घडलो. प्रौढत्वापर्यंत मला कधी फारसे आजारपण नव्हते.

शाळेत मी खूप ॲक्टीव्ह होतो. क्रिकेट, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, टेबलटेनीस, रिंगटेनीस अशा सगळ्या खेळांत मी भाग घेत होतो, पण त्यांपैकी कुठल्याही खेळात मी चॅंपियन झालो नाही. ऑलिंपिकच्या मैदानात बक्षिस मिळविण्याला महत्त्व असतेच, पण त्या स्पर्धेत खेळण्याचेही महत्त्व कमी नव्हे; त्यांच्या भाषेत याला 'ऑल्सो रॅन' असे म्हणतात. आपल्याकडे मला कुणी 'मास्टर ऑफ नन्' म्हणावे असे माझे क्रीडापटुत्व सर्वसंचारी होते. आमच्या घरासमोरच सांगलीतील प्रसिद्ध गजानन मिल होती. त्याचे धनी दादासाहेब वेलणकर यांच्या तालमीत मी व्यायामासाठी चक्कर टाकायचो. त्यांच्याच आवारात मी सायकल चालवायला शिकलो. अभ्यासातही मी मागे नव्हतो. पुष्कळदा तिसराच नंबर यायचा, पाचच्या खाली तर कधीच नाही; पण दुसरासुध्दा कधी गाठता आला नाही. रमेश मालू याचा कायम पहिला नंबर, तो त्याने कधीच सोडला नाही आणि मला कधी मिळाला नाही. मला या गोष्टीची चीड यायची. सहल-संमेलन-दंगा,अशा शाळेतल्या इतर कोणत्याही बाबतीत मी कधी मागे राहायचो

नाही.

वांडपणा म्हणावा, इतक्या उचापती मी शाळेत(ही) करत असे. पटवर्धन हायस्कूलात असताना, रोजच सकाळी शाळेचे दार उघडायच्या आधी मी, शेखर जोशी, सुनील कोकीतकर असे आम्ही शाळेत हजर व्हायचो. बदाम आणि बकुळीची चार झाडे शाळेच्या आवारात होती, त्यांची फळे काढून ती चाखायची हा त्यात हेतू. त्यांतील टणक फळे व बिया फेकून पोरांच्या डोक्यात मारायच्या, आणि दुसरीकडे तोंड फिरवून आपण त्या गावचेच नाही असे भासवायचे, हाही लाडका खेळ ! एकदा चिंचेच्या झाडावर दगड उंच फेकून मारला पण तिथेच खाली मी उभा राहिलो, तोच दगड सरळ माझ्या डोक्यात! असल्या वागण्यामुळे आमच्या शिस्तप्रिय आईचा मार पुष्कळदा लाभत असे. असेच तिचे एकदा दुर्गानाट्य सुरू असताना त्या भरात तिने मला ढकलून दिले. मी कोलमडलो आणि टेबलाचा कोपरा माझ्या कपाळावर बडवून मला खोक पडली. कदाचित यामुळेच मेंदू तल्लख झाला.

खेळात मला खास प्रावीण्य नसले तरी खुमखुमी सगळ्या खेळांची यायची. शाळेत त्यावेळी टेनीस वगैरे भारी 'गेम्स' दुर्मीळच. मी तो खेळ सांगलीच्या जिमखान्यावर पाहात असे. शाळेतली मुलं टेनीसचा चेंडू क्रिकेटसाठी वापरायची, पण मला टेनीस खेळायची जबर इच्छा झाली. मी आईकडे रॅकेटसाठी हट्ट सुरू केला. तिने आधी समजूत, मग जरब, मग धाक वगैरे सगळी आयुधं वापरली, पण मी माघार घेतली नाही. कारण आतापर्यंतच्या अनुभवावरून माझ्या हट्टाचा विजय होणार याची मला खात्रीच होती. दोन महिने हा तगादा चालवल्यावर आईने माघार घेतली आणि माझ्यासाठी पस्तीस रुपयांची मस्तपैकी टेनीस रॅकेट आणून दिली. पुढचे तीनचार दिवस माझ्यात रामनाथन् कृष्णन् संचारला होता. त्याचा परिणाम म्हणजे ती रॅकेट चौथ्या दिवशीच मोडली. तुटलेल्या स्टीकचे मम्मीने माझ्याच पाठीवर आणखी तीनचार तुकडे केले, आणि माझे लॉनटेनीस संपले.

माझ्या तरुण वयात आईलाच माझ्या मागे सारखे लागणे योग्य वाटेनासे झाले असेल, त्यामुळे तिने माझी पाठ सोडली. मात्र वारंवार नव्यानव्या अपघातांनी ती कसर भरून निघू लागली आणि माझ्या कडमडण्याचा सिलसिला जारी राहिला. शाळेच्या वयातच क्रिकेटची मॅच खेळायला आम्ही एकदा देवराष्ट्रे या गावी गेलो होतो. मी आमच्या टीमचा विकेटकीपर. त्या सामन्यात पहिल्यांदाच लेदर बॉल वापरण्यात आला. मला तर त्याची कधी सवय नव्हती, पण तसे काही भासवू न देता मी दाबात स्टंप्सच्या मागे उभा राहिलो. विवेक भिडे याचा पहिलाच बॉल आला,

त्याने थेट माझ्या कपाळाचा नेम साधला. सहा टाके घालून जखम बांधावी लागली आणि संध्याकाळी मॅच 'संपवून' घरी आलो. पुढे एकदा माझा एकमेव जिवलग मित्र सुनील कोकीतकर याच्यासह स्कूटर ताबडत चाललो होतो. वय आणि रग अशी की गाडीचा वेग फारच कमी वाटावा! आमची ही सवारी पाहायला एक गाढव मधे आले; पुढे काय झाले असणार? आमचा गाढवपणा त्या गाढवाने अनुभवला.

मी आठवीत असताना १९७३ला मला सायकल घेतली . माझ्या अंगात ते वारे भरले. पुढची सहा सात वर्षे ते टिकून होते. १९८०ला मला स्कूटर घेतली, तेव्हा मी १९ वर्षांचा होतो. लगेचच त्या वर्षभरात आमच्या घरी चार चाकी गाडी आली. ही पहिली कार सेकंड हँड, साडेसोळा हजाराला घेतली. आमच्या कुटुंबाचे स्नेही असणारे साखरव्यापारी कन्हैयालाल गिडवाणी यांनी ती गाडी आम्हाला घेऊन दिली होती. आमच्या वडिलांना तर सायकलवरही बसता येत नव्हते, याउलट विसाव्या वर्षात माझ्या ताब्यात गाडी आली, तशी तिच्या चार चाकांना पंख फुटले. त्याच वर्षाच्या अखेरीस म्हणजे ३१ डिसेंबरसाठी आम्ही पाचसहा मित्र 'जिवाचे गोवे' करायला त्या गाडीतून निघालो. पहाटे पाच वाजता सांगली सोडली. कोल्हापूर ओलांडून आम्ही निपाणीच्या अलीकडे घाटाजवळ आप्पाची वाडी म्हणून गाव आहे. तिथे दीडदोन तासातच पोचलो. माझा मित्र सिराज पन्हाळकर हा गाडी चालवत होता. त्याचा ताबा सुटला. चार कोलांट्या खाऊन गाडी रस्त्याच्या बाजूला रानात जाऊन पडली. किरकोळ दुखापतींवर आमचे निभावले पण गाडीची पार दामटी झाली. ती पाहून येणारे जाणारे विचारत होते, ''किती गेले?'' हा अपघात आमचा आम्ही निस्तरणारच होतो, पण पोलीसांनी काही मदत करण्याऐवजी त्यांच्या नेहमीच्या प्रथेला स्मरून आम्हाला पेचात धरले. मीच स्वत: पुढे होऊन त्यांची भागवाभागवी केली आणि आम्ही संध्याकाळी घरी परत आलो. ही बातमी सगळीकडे पसरलीच होती, त्यामुळे काळजीपोटी लोकांची रीघ लागली. आम्ही काहीतरी हीरोगिरी करून आल्याप्रमाणे सर्वांपुढे त्या साऱ्याचे वर्णन तिखटमीठ लावून करत होतो. असल्या भानगडीचा कोणताही पूर्वानुभव मला वयाच्या विशीच्या आत येण्याचे कारणच नव्हते, परंतु कर्नाटकी पोलीसांना गुंडाळून, त्या बिकट प्रसंगातून आम्ही सहजासहजी बाहेर पडलो. त्यामुळेच बहुधा पुढच्या आयुष्यात कोणत्याही प्रसंगातून बाहेर पडताना कधी अडचण भासली नाही.

शाळा कॉलेजच्या वयापासून मला सामुदायिक कामांची हौसच होती . त्याला त्या काळात 'सामाजिक कार्य' म्हणता आले नसते, पण अशी बाहेरची कामे अंगावर घेण्याची आवड होती. त्या निमित्ताने काही वाचन करणे, भाषण ऐकणे वगैरे मी करीत

असे. तक्रारखोर स्वभाव तर होताच. कॉलेजातल्या वर्गात प्राध्यापकास शिकवता येत नाही म्हणून प्राचार्यांकडे तक्रार घेऊन जाणाऱ्यांत मी पुढे होतो. कॉलेजचा जिमखाना बंद असतो म्हणून काही मुलांना एकत्र करून मी तक्रार नेली. वर्गप्रतिनिधी चांगला निवडला जात नाही, त्यात राजकारण आणतात असे मी सर्वांना सांगत असे. त्यातून मीच ती निवडणूक लढवावी अशा भरीला पडलो, तशी निवडणूक मी बीकॉम ला असताना आणि पुन्हा लॉ कॉलेजातही लढवली. जोशी'ज अकाउंटंन्सी क्लासला असताना आम्ही मागणी करून तिथे निवडणुका घेण्याचा निर्णय अंमलात आणला. एकंदरीत असल्या चळवळ्या कामांत मला खूप स्वारस्य होते.

'क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थंच साधयेत्' (क्षणाक्षणााने विद्या मिळवावी आणि कणाकणाने धन जोडावे) असे सुभाषित आम्हाला शाळेत शिकवले होते. त्यापैकी विद्या माझ्या कुवतीप्रमाणे मी मिळवली. सापडेल तिथून धन गोळा करण्याची प्रवृत्ती आमच्या सिंधी रक्तातच असते. मला तसे पैसे खेचण्याचे उपजत आकर्षण होते. चिंतामणराव कॉमर्स कॉलेजात असताना त्या कॉलेजचे वार्षिक मॅगेझीन काढायचे होते. त्यात जाहिराती गोळा करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून विद्यार्थ्यांना ३० टक्के कमीशन देऊ करण्यात आले होते. मी लगेच कामाला लागलो, डॅडींकडील पक्षकारांनाच गाठले. त्या वशिल्यावर बऱ्याच जाहिराती मिळवल्या. चांगले पैसे कमावले. माझा बालमित्र सुनील कोकितकर याच्यासोबत असाच एकदा फिरत होतो. कुपवाड भागात आम्हाला, प्लॉट एजंट म्हणून काम करणारे दोघेजण ओळखीचे भेटले. गप्पा मारता मारता त्यांच्याकडे काही बिगरशेती प्लॉटस् उपलब्ध आहेत हे समजले. त्यांच्याशी घासाघीस करून आम्ही २ रु.चौ.फूट दराने दहा प्लॉट्स घेतले. डॅडींच्या पक्षकारांपैकी काहीजणांना गाठून मी ते ४ रु. दराने विकले. अर्थातच चांगले पैसे मिळाले. जमीन खरेदीविक्रीच्या धंद्यात पुढे मी शिरलो; पण त्या वयात याची पुसटशी कल्पनादेखील नव्हती.

पैसे कमावण्यासाठी इकडच्या लोकापवादाप्रमाणे खास सिंधी प्रकारही आम्ही करून पाहिला. एकदा मी आणि माझा भाऊ दीपक असे दोघेजण, आमच्या मद्रासच्या मावशीला मुंबईहून गाडीत बसवून देण्यासाठी बोरीबंदर(व्ही टी) स्टेशनवर गेलो. मावशीचे तिकीट तिच्याकडे होतेच, आमच्या दोघांचे आठ आठ आण्यांचे प्लॅटफॉर्म तिकीट आम्ही घेतले होते. मावशीची गाडी गेल्यानंतर आम्ही स्टेशनबाहेर आलो, तिथे प्लॅटफॉर्म तिकीट घेण्यासाठीच मोठी रांग आम्हाला दिसली, आणि आमची सिंधी डोकी हलली. आमच्या जवळचे तिकीट रांगेतल्या दोघांना विकले, आणि आमचा

रुपाया परत मिळवला. पण हा प्रकार अंगलट आला. तिथल्या हवालदाराने आमची गचांडी धरली, रेल्वेच्या पोलीस स्टेशनमध्ये नेऊन बसवले, तिथे दहा रुपये भरून आमची सुटका झाली. 'सर सलामत तो पगडी पचास' हे बाळकडू आमच्या कित्येक पिढ्यांनी घेतलेले होते !

या प्रकाराने विद्या आणि धन मिळवताना पुष्कळदा चकवा मिळतो. तोही सहजपणे झेलावा लागतो. कॉमर्सचा पदवीधर झाल्यावर वडिलांच्या टॅक्सेशन धंद्यात शिरण्यासाठी वकिलीची परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे होतेच. सांगलीत सुरू झालेल्या एन एस लॉ कॉलेजात मी प्रवेश घेतला, पहिली दोन वर्षे पार केली. तिसरे म्हणजे शेवटचे वर्ष करण्यासाठी मी मुंबईला गेलो आणि गव्हर्मेंट लॉ कॉलेजात प्रवेश घेतला. तिथे मला दोन विषय जास्त घ्यावे लागले. एकूण आठ विषयांचा बोजा झाला त्यामुळे अभ्यास खूप करावा लागणार होताच. पण माझ्या स्वभावानुसार मी त्यात कुठेही मागे राहिलो नाही. परीक्षा दिली, पेपरही चांगले गेल्याचे मला जाणवत होते. रीझल्ट लागला, आणि माझी दांडी उडाली. ज्या विषयावर माझ्या पुढच्या धंद्याचा भरवसा होता, त्या विक्रीकर विषयात मला नापास केले होते. 'केले होते' असेच म्हणायला हवे. ज्या व्यवसायात मी आयुष्यभर करिअर केले त्याच विषयात नापास! मी पुन्हा ऑक्टोबरच्या परीक्षेला बसण्यासाठी फॉर्म भरला, पण इकडे फेरतपासणीसाठी अर्जही केला. त्याचा कितीसा उपयोग होणार याची शंका असतेच, म्हणून मी पुन्हा परीक्षेला बसण्याच्या दृष्टीने अभ्यास सुरू केला, तेवढ्यात मुंबई विद्यापीठाचे पत्र आले. मला त्या विषयात ३५चे ६५ मार्क झाले, आणि मी सुटलो.... म्हणजे अगदी सुसाट सुटलो!

□□□

□

# व्यवसायाला लागलो

१९८०ला मी वकिलीची परीक्षा पास झाल्यावर वडिलांच्या ऑफीसातले एक टेबल माझी वाटच पाहात होते. श्री.विठ्ठलराव देशपांडे वकिलांनी माझ्या वडिलांना व्यवसायात आणले होते, त्या दोघांनीही अतिशय इमाने इतबारे आपल्या भागीदारीचे पालन केलेले होते. देशपांडे वकिलांचा मुलगा सुहास याच्याशीही माझ्या वडिलांचे उत्तम संबंध टिकून होते. मुख्यतः आयकर विषयक काम देशपांडे सांभाळत. माझे वडील विक्रीकराच्या केसेस आणि सिंधी व्यापाऱ्यांची आयकराची कामे पाहात. मी कामात आल्यावर आयकराकडे लक्ष घातले नाही. वडिलांकडे विक्रीकराच्या सुमारे अडीचशे केसेस होत्या. माझ्या डॅशिंग प्रवृत्तीमुळे व्यवसाय झटपट वाढू लागला. जागा कमी पडू लागली. आम्ही आमचा व्यवसाय वेगळा करण्याचे ठरवले. या सर्व निर्णयामागे माझा पुढाकार होता. सुहास देशपांडेनीही आनंदाने परवानगी दिली. वडीलांचे एकमेव क्लार्क अच्युत जोशी यांनी मला संपूर्ण विक्रीकर शिकवला.

ऑफीससाठी आंबराई रोडवर अभ्यंकर कॉम्प्लेक्स येथे जागा विकत घेतली. ही जागाही सहजावरी घेतली. आंबराई रस्त्याला आयुर्विमा मंडळाचे कार्यालय आहे; त्यांच्याच इमारतीत पूर्वी विक्रीकर ऑफीस होते. मी तिथे नेहमीच्या कामाला जात असताना, शेजारी 'जागा विकणे आहे' असा फलक पाहिला. लगेचच त्या जागेचे मालक अभ्यंकर यांना पुण्याला फोन केला, आणि व्यवहार पक्काच केला. आम्हाला त्यावेळच्या ऑफीसकरिता चार टेबले बसतील इतपत जागा पुरेशी होती; पण त्याबरोबरच पुढचे दोन दुकानगाळे आणि सगळे तळघर विकत घेतले. म्हणजे गरजेपेक्षा पाच पट जास्त जागा. हे धाडस जरा जास्तच होते. डॅडींचा स्वभाव आणि आजवर त्यांनी सोसलेली परिस्थिती यांमुळे त्यांची या निर्णयास तयारी नव्हती. तसे धाडसही त्यांच्याकडे नव्हते. 'आहे हे ठीक आहे ...' अशी त्यांची वृत्ती होती. पण माझा हट्ट

त्यानी मान्य केला, आणि आमचे स्वतंत्र ऑफीस स्वतःच्या जागेत सुरू झाले. थोड्या काळाने पुढचे गाळे विकले आणि प्रशस्त ऑफीस फुकटात पाडले. काम वाढत चालले. मीही मनापासून काम शिकू लागलो. अभ्यास आणि अनुभव वाढत चालला. वडिलांनी त्यांच्या सर्वच ग्राहकांचा आणि खात्यातील अधिकाऱ्यांचाही विश्वास संपादन केला होता, मी त्यात कुठे कमी न पडता हळूहळू त्यांच्या बरोबरीला आलो. १९५९ साली ते सांगलीत आले, तेव्हा मुंबई विक्रीकर कायदा नवीन आला होता; त्यामुळे सर्व व्यापाऱ्यांची नव्याने नोंदणी करून घेतली गेली. त्यातला पहिला :'एन ३१ - ई १' हा नंबर मे. मथुरादास मगनलाल यांना माझ्या वडिलांनी काढून दिलेला होता.

❑

कॉलेजला असल्यापासून मला चांगल्या चांगल्या वस्तूंचे खूप आकर्षण होते. चांगले म्हणजे विदेशी, ही तर त्या काळात सर्वांगाने सर्वत्र रुजलेली कल्पना होती. मला फॉरेन म्हणजे स्वर्ग वाटायचा. आमचा सिंधी समाज एकंदरीत चंगीभंगी वृत्तीचाच असायचा. पैसा कमाओ, खाओ-पिओ, मजा करो असा साधारण खाक्या! त्यातल्या त्यात १९४७ चा मोठा फटका बसल्यानंतर मंडळी जरा भानावर आलेली होती. तरीपण इथल्या समाजाच्या राहणीमानापेक्षा आम्हा सिंधी लोकांचा खाक्या बराच वेगळा दिसून येई. त्या बाबतीत आम्ही कृष्णा काठच्या साधेपणात अद्यापि परिपूर्ण सामावून गेलो होतो, असे काही म्हणता यायचे नाही. याचाही परिणाम असेल, पण आमच्या घरी मातृभूमीच्या प्रेमाचे सगळे छान वातावरण असूनही मला फॉरेनचे डोहाळे लागले होते हे खरे आहे. माझ्याकडे 'सोनी'च्या कॅसेट्स, 'तोशिबा'चा रेकॉर्डर डेक, 'नॅशनल पॅनासोनिक'चा व्हिडिओ, तसेच परदेशी कॅल्क्युलेटर्स वगैरे वस्तू असायच्या आणि मी त्या मोठ्या अभिमानाने मित्रांच्यात मिरवायचो. १९८२साली मी लॉ कॉलेजला होतो, सांगलीतल्या प्रताप थिएटरचे मालक अरविंद चाफळकर, वडिलांचे त्यावेळचे भागीदार व आयकर सल्लागार सुहास देशपांडे असे सपत्नीक युरोपच्या प्रवासाला निघाले होते. सांगलीचेच असलेले, सध्या लंडनला डॉक्टर असणारे अरविंद शहा यांच्याकडे मुक्कामाची सोय ठरवून त्यांनी प्रवासाचे सारे नियोजन केलेले होते. मी त्यांच्या सोबतीने प्रथमच इंग्लंडला गेलो. अंतरीची एक कुक म्हणावी तशी मनात होतीच, ती म्हणजे जातोच आहोत तर तिथेच काही तरी वाट शोधावी आणि तिकडेच कायम राहावे. पण तिथे राहण्यासाठी व्हिसा च्या भानगडी, आणि आमच्या डॅडींचा, मी परत येण्याबद्दलचा हट्ट यांमुळे 'गड्या आपुला गाव

बरा...' असे म्हणत माझे विमान मी परत सांगलीकडे वळवले. .

वडिलांच्या काळापासूनच आमच्या धंद्याचा दबदबा महाराष्ट्रात आणि मुंबईतही झालेला होता. त्यांच्या बरोबरीने मीही तो वाढता ठेवला. आमच्या नावाला त्या क्षेत्रात एक प्रतिष्ठा प्राप्त झाली. माझ्या कामातून मी ती टिकवली, आणि वाढवलीसुध्दा ! सांगली जिल्ह्यातले तर मोठेसे म्हणता येतील असे बहुतांशी सर्व व्यापारी - व्यवसायिक पेढ्या यांच्या विक्रीकर कामासाठीच्या केसेस आमच्याकडे होत्या,.... आहेत! डॅडींच्या हाताखाली काम करत असताना माझा हट्ट मी बराचसा चालवत असे. विक्रीकर संबंधातील संपूर्ण काम, त्यातील खाचाखोचा मी मन लावून शिकलो. कामावर मला प्रभुत्व आले. माझ्या डॅडींनी त्यांच्या काळात जे आणि जितके नाव कमावले होते, त्यांच्यापेक्षा काकणभर अधिक पुढे मी गेलो. कालांतराने माझ्या कारकीर्दीत व्हॅट कायदा आला, नंतर एलबीटी आला, या सर्व बाबतीत मी आणि माझी टीम अभ्यासपूर्ण होती. विक्रीकर अधिकाऱ्यांच्या आधी, माझा त्या विषयांचा अभ्यास तयार असे. हे व्यावसायिक कौशल्य मी डॅडींच्या मार्गदर्शनाखाली माझ्या परिश्रमांची जोड देऊन मिळविले होते हे खरे असले तरी, मला डॅडींच्या उमेदीच्या काळात त्यांनी केलेले कष्ट आठवत होते. त्या काळातील माझे दिवसभरचे काम डोळ्यांपुढून सरकत होते.

मुळात आम्ही सिंधी लोक पैशाला लुब्ध असतो असे म्हणतात, त्यात काही कमीपणा मानावा असे मुळीच नाही. त्यातही आमचा व्यवसाय विक्रीकरासारख्या क्षेत्रातला, सरकारी साहेबांशी आणि व्यापाऱ्यांशी नित्याचा संबंध. पण भ्रष्टाचाराविषयी मला भयंकर चीड आहे. माझ्या कामात तसले व्यवहार टाळण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीत असे. त्याकरिता अभ्यास खूप करावा लागत असे. तत्वासाठी भांडणारा एखादा व्यापारी भेटला तर मला खूप आनंद व्हायचा. मग मीही माझ्याकडून कसोटी लावून त्याची केस लढवत असे. तरीही कोणी अधिकाऱ्याने दुराग्रहातून विरुध्द निकाल दिला तर ट्रायब्यूनलपर्यंत मी ती केस विनाशुल्क लढवत असे. त्यासाठी हेलपाटे, वाद, पुन्हा अभ्यास, खर्च, यांची काळजी न करता त्या व्यापाऱ्याची बाजू मी लावून धरलेली आहे. तत्वाने वागायचेच ठरवले तर त्यासाठी खूप किंमत मोजावी लागते हे खरेच आहे. एखाद्या वेळी जिद्दीला पेटून तसा लढा देता येतो, पण सारखे असे लढत राहणे शक्य नसते! ते व्यवहार्य तरी आहे काय? व्यापारी किंवा व्यवसायिक लोकांना त्यांच्या त्यांच्या रोजमरीतून ते शक्य होत नाही. त्यामुळे काहीतरी देवाणघेवाण तडजोड करून पुढचा मार्ग चालू लागणे हेच त्यांना श्रेयस्कर वाटणे स्वाभाविक आहे, पण हे रोजचे गैरव्यवहार पाहण्यातून माझ्या जिवाची घालमेल होत असे.

□

# लग्नाची सुखद बेडी

एव्हाना माझा भाऊ दीपक याचे लग्न झाले आणि त्याचा संसार सुरू झाला, तसे मलाही माझ्या लग्नाचे वेध लागले. मी पहिल्यापासून जरा डॅशिंग प्रकृतीचा असल्यामुळे माझ्या भविष्याच्या दृष्टीने मी पत्नीसंबंधीच्या काही अपेक्षा मनाशी नक्की केल्या होत्या. ती स्वभावाने गरीब गाय असणे योग्य ठरले असते. कारण तीही जर माझ्यासारखीच बोल्ड व धडपडी असेल तर रोज झकाझकी! त्यामुळे मला तोडीस तोड पत्नी नकोच होती. माझ्या मनात तशी कोणी वधू नक्की झालेली होती अशातला भाग नाही, पण जी निवड करायची ती पूर्णतः विचाराने व व्यवहारीपणाने करायची हा माझा विचार होता. माझ्या मनात या प्रकारचे खेळ चालत असले तरी अजून त्या विषयावर घरात काही चर्चा सुरू झालेली नव्हती. त्यामुळे ते सारे केवळ गोडगोड हुरहुरीपुरते किंवा मित्रांशी गप्पांपुरते होते. एकदा आमच्या घरात माझ्या लग्नासंबंधी विषय निघाला तेव्हा मीच एक स्थळ सुचवले. माझ्या मोठ्या भावाची मेव्हणी लग्नाची होती. तिला मी पाहात होतो, घरच्या साऱ्यांनाही ती ठाऊक होती. ती अबोल आणि गरीब स्वभावाची होती हे मला ठाऊक झाले होते, तरीही बाकी काही गोष्टी तिच्याशी बोलणे योग्य झाले असते. मी आमच्या आईला त्या मुलीबद्दल सुचविले. आईलाही तो प्रस्ताव मान्य झाला. वडिलांचा काहीच प्रश्न नव्हता. 'जो तुमी लोक काय ठरवणार, त्यात गैर काय असनार आहे', असा त्यांचा सरळ मामला होता.

माझ्या आईची आई –म्हणजे माझी आजी मुंबईत असायची. माझा भाऊ दीपक लहानपणापासून तिच्याकडेच राहिला होता. माझ्या आईने सांगलीहून तिच्या आईला म्हणजे आमच्या आजीला मुंबईस फोन केला. माझ्या भावाशी

आणि त्याची बायको अनिता यांच्याशी चर्चा केली. सर्वांना ही कल्पना आवडली, पण 'त्यांच्या'कडे आपण कसे सुचवावे, असा एक जरा नाजूक म्हणावा असा पेच होता, तो कुणीतरी तितक्याच पोक्तपणाने हाताळणे आवश्यक होते. मग आमच्या आजीने त्या मुलीच्या आजीला फोन केला, आणि जरा साळसूद आवाजात सांगितले की, ''आज सकाळी मी 'गुरू ग्रंथसाहिबा'चे वाचन करीत होते; त्या पुण्यकालात गुरूंच्या कृपेने असे मनात आले की तुमच्या घरातील दुसरी मुलगी पण आमच्या घरी सून म्हणून यावी...'' हा कोवळा पेच तिच्या आजीने भलताच मनावर घेतला असावा. कारण दोनच दिवसांत 'त्यांच्या'कडून होकार आला.

पुढची बोलणी करण्यासाठी त्यांनी आम्हाला मुंबईला बोलावले. आमचे सारे पै पाहुणे मुंबईतच असल्यामुळे आम्हाला ते सोयीस्कर होते. लग्नाच्या दृष्टीने बाकीच्या गोष्टी ठरून जाण्यात काही अडचण अशी नव्हती, पण मी मात्र 'भावी वधूशी नीट बोलून घेतले पाहिजे' असे म्हणत होतो. त्या म्हणण्याला जरा अटी(तटी)चे स्वरूप आले, तसे आमचे बंधुराज चिडले. त्याच्या मते मी जर त्या मुलीची वकिली उलट तपासणी करून नकार दिला तर त्याचे त्याच्या सासुरवाडीशी असलेले संबंध बिघडू शकतात. कारण त्यानेच तर पुढे होऊन हा मेळ, माझ्या सूचनेवरून जुळवून आणला होता. हे सगळे असले तरी माझा हट्ट मी खरा करणारच होतो. मुंबईच्या वॉर्डन रोडवरचे माझ्या भावी वधूचे घर मी गाठले, आणि त्यांच्या घरातच मी तिच्याशी तब्बल पाच मिनिटे प्रदीर्घ चर्चा केली. माझ्या अपेक्षा तशा साध्याच होत्या, पण अटींच्या तालावर मी त्या रुबाबात सांगितल्या. एक म्हणजे माझ्या आयुष्यात मित्रांना सर्वोच्च प्राधान्य असणार, दुसरे म्हणजे मी मांसमटण खाण्याचे सोडणार नाही. त्यापैकी मांसमटण खाण्याचे तिला विशेष नव्हते, कारण आम्हा सिंधी लोकांत ती चाल आहे. मित्रांचा ताप असून काय असणार, असे तिला त्याहीवेळी वाटले असेल. तिने हो- नाही काहीच म्हटले नाही, पण एकूण या दोन्ही 'अटी' तिने न बोलताच मान्य केल्यासारख्या मला दिसल्या, आणि तिचा अबोला होकारार्थी घेऊन मी माझे घोडे पुढे दामटले.

☐

मुंबईच्या महालक्ष्मी मंदिराच्या हिरवळीवर २८ नोव्हेंबर १९८५ ला आमचे दोनाचे चार हात झाले. लग्न उरकून सांगलीला परत आल्यावर इथे स्वागत समारंभ करण्याचे ठरले. एव्हाना आमचे घरही पूर्ण झाले होते. वास्तूशांत आणि हा समारंभ एकत्र करण्यात आला. म्हणजे थोडक्यात पैसे वाचवले. बऱ्याच लोकांना निमंत्रणे दिली होती. जेवणासाठी बासुंदीचा बेत होता, पण साऱ्या सोहळ्यात मिठाचा खडा पडला.मुख्य बासुंदीच बिघडली, खराब झाली. पण लगेच आमच्या मित्रांची फौज मैदानात उतरली, त्यांनी साऱ्या सांगली शहरभरात फिरून श्रीखंड गोळा केले आणि प्रसंग बिनबोभाट साजरा केला. नंतर ही गोष्ट कळल्यावर, माझ्या प्राधान्यक्रमावर मित्रमंडळ कसे याचा उलगडा पत्नीला झाला असणार! मला हे मान्य करायलाच हवे की गेल्या तीस वर्षांत तिने मला दोन्ही 'अटीं'बाबतीत कधी विरोध तर केला नाहीच, उलट उत्तम साथ दिली.आमच्या मित्रमंडळातच ती सामील झाली.

□□□

□

# घर गृहस्थी

नव्याचे नऊ दिवस भुर्रकन उडाले. घरात पत्नी नांदू लागली पण सगळे काही आलबेल नव्हते. सासू सुनेचा खेळ अधूनमधून कानावर यायचा. चेंडू कधी या कोर्टात तर कधी त्या कोर्टात पडायचा. त्यात माझ्यासारखा अंपायर कितीही निष्पक्ष राहू पाहात असला तरी दोष त्याच्यावरच शेकणार ना! त्यामुळेच कदाचित डॅडींनी तो सामना पाहण्याचेही टाळले असावे. त्या सामन्यांत प्रशिक्षक, व्यवस्थापक, अंपायर, वॉटरमन, लाइनमन अशा सगळ्या भूमिका मी सांभाळत होतो. अशा वातावरणातही आमच्या उभयतांचे वैवाहिक जीवन मजेत चालू होते. 'तू मी दोघे मिळुनी सखया। चल चंद्रावर स्वारी करु या।।' या अनुभवांचा आस्वादही आम्ही घेत होतो. माझ्या पत्नीचे कागदोपत्री अधिकृत नाव सुनीता असले तरी तिला माहेरी व आता सासरीही सगळे सोनू म्हणतात. तिचे तेच नाव सगळीकडे रूढ झाले.

लग्नानंतर मधुचंद्रासाठी कुठेतरी फिरायला जायचे हा आमच्या खानदानात साधा रिवाज, तो आम्हीही पाळू शकणार होतो. पण नव्या घराचे फर्नीचरचे काम पूर्ण झाल्यानंतर निवांतपणी कधीतरी जाऊ असा विचार करून आम्ही थांबलो. पण तोवर बाळाची चाहूल लागली आणि मग वेगळे मधुचंद्रासाठी जाण्याचे काही कारण उरलेच नाही. आमचे घर पूर्ण झाले, तत्पूर्वी घरासाठी नाव माझ्या मनात नक्की झालेलेच होते. मला सिनेमा बघायचा नाद लहानपणापासून होता, पण आयुष्यात मला सर्वात जास्त आवडलेला सिनेमा म्हणजे 'कभी कभी'. त्याचा नायक अमिताभ बच्चन. त्या सिनेमातील त्याच्या बंगल्याचे नाव होते 'अतीत'. त्या प्रभावामुळे माझ्या बंगल्याचे नाव तेच ठेवायचे हे ठरलेले. शिवाय त्यानंतर लवकरच आम्हाला मुलगा झाला, त्याचे नाव 'अमित' ठेवले.त्याच सिनेमातील नायकाचे ते नाव होते. यापुढे 'अ' हे आद्याक्षर ठरून गेले. त्यामुळे अमित पाठची अमृता झाली. माझा भाऊ दीपक याने

काही व्यवसाय केले, त्या प्रत्येकास नाव देताना अजंठा प्लास्टिक, ॲडव्हेंट गिफ्ट्स, ॲडव्हेंट इंटरनॅशनल याप्रमाणे ‘अ’कार सांभाळला गेला.

❐

सोनूला दिवस गेले, सहावा महिना होता. नानवाणी यांच्याशी आमचा घरोबा होता. नेहमीप्रमाणेच सोनू सहज एका कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्याकडे गेली होती. त्यांच्या घरातल्या लाकडी कडीपाटाच्या झोपाळ्यावर त्या काही मैत्रिणी बसल्या असताना अचानक झोपाळा तुटून पडला आणि सगळ्याजणी जमिनीवर आदळल्या. सोनूचा पाय फ्रॅक्चर झाला. सांगलीच्या पोस्टात काम करणारे जगताप नावाचे एक गृहस्थ होते, ते असे अपघाती मोडलेले हाड नीट बसवण्यात वाकबगार होते. वेलणकरांच्या गजानन मिलजवळच्या पोस्टाशी मी सोनूला घेऊन आलो. गाडीत सोनू बसलेली असतानाच त्या जगतापनी तिचा पाय थोडा चोळून ओढून हाड ठीक बसवून टाकले. आम्ही एकीकडे त्याचे नवल करीत होतो, आणि दुसरीकडे समाधान मानत होतो. कारण हाडांच्या डॉक्टरकडे जाऊन प्लॅस्टर करणे, गोळ्या औषधे घेणे हे सर्व व्याप कमी झालेच पण त्यापेक्षा तिच्या गरोदरपणात हे सारे टाळता आले हेही महत्वाचे होते. आमच्या होणाऱ्या बाळाचा तो तर जन्मापूर्वीच पुनर्जन्म होता.

यानंतर दोन तीन महिन्यातच सोनूच्या बाळंतपणाची तारीख होती. त्या काळात तिला चालणे, व्यायाम वगैरे आवश्यक होते; पण त्यावर बंधने आली आणि पूर्ण विश्रांतीचा सल्ला मानावा लागला. त्यावेळी सांगलीत सुप्रसिध्द असलेले डॉ.आडिगा यांचे प्रसूतिगृह सोडून आम्ही एका दडपणाखाली मिरजेचे मिशन हॉस्पिटल जवळ केले. सोनू प्रसूत होईपर्यंत सर्वांच्यावर एक ताण होताच, पण सगळे सुखरूप पार पडले आणि ३०-१०-१९८६ ला आम्हाला मुलगा झाला. हा त्याचा खराखुरा जन्म. थोड्याच दिवसांत सोनूला घरी आणले, पण बारसे मात्र थोडे लांबणीवर टाकले. यथावकाश बाळाचे बारसे करून सगळ्यांना बोलवायचे म्हणून, नंतर चांगला ऐश कार्यक्रम ठरवला. गावभागातील गोरे मंगल कार्यालय घेतले, मोठा समारंभ झाला. पाचशेभर पान जेवले. बाळाचे नामकरण झाले.

या साऱ्या दगदगीचा त्या नाजूक बाळाला त्रास झाला असावा. दुसऱ्याच दिवशी त्याचे पोट बिघडले. सीव्हिअर डायरिया असल्यामुळे बाळ-बाळंतिणीला रुग्णालयात दाखल करावे लागले. त्या सात दिवसात त्याला सात बाटल्या सलाईन द्यावे लागले. कशाला कुणास ठाऊक, पण त्याच दिवसांत त्याचा एक फोटो

काढलेला आहे; आज त्या फोटोकडेही पाहावत नाही! आम्ही या प्रसंगाला आमच्या अमितचा तिसरा पुनर्जन्म म्हणतो. असे त्याच्या बाबतीत का व्हावे, याला काही उत्तर नाही. जवळच्या लोकांनी 'नजर लागली, -दृष्ट लागली' असा सोपा अर्थ लगेच काढला. पण माझा तसल्या गोष्टींवर विश्वास नव्हता, आजही नाही!

□

एकूणातच असल्या गोष्टींवर माझा विश्वास नाही. परमेश्वर या नावाची काहीतरी अजब शक्ती आहे याचा प्रत्यय आपल्याला अनेकदा येतो. पण त्यामुळे हतबल होऊन त्याच्या आहारी जाणे मला अजिबात पटत नाही. सरळ माणसावर विश्वास ठेवणारा मी प्रयत्नवादी आहे. माणसाचे प्रयत्न पुष्कळदा चुकतात, दिशा चुकते, काही कारण नसताना किंवा पुरेपूर काळजी घेऊनही अपयश येऊ शकते हे तर आपण पाहतो, अनुभवतो! पण त्याचा संबंध लगेच देवाशी किंवा तसल्या काही गूढ शक्तींशी घालण्याइतका मी देवभोळा नाही. त्यामुळे अमितच्या त्या जीवघेण्या आजारातही त्याची दृष्ट काढावी, त्याची जन्मपत्रिका दाखवावी, काहीतरी तोडगा विचारावा अशा वाटेला मी गेलो नाही. त्यानंतरच्या आयुष्यातही असे कितीतरी प्रसंग आले... आणि गेलेही; पण माझ्या मनात तसा अंधश्रध्द विचार कधी आला नाही. मात्र हेही खरे आहे की, आमच्या घरातील पत्नी किंवा आई-भाऊ अशा कोणीही त्याबद्दल विश्वास दाखवू लागला तर मी त्यास कडवा तीव्र विरोधही करत नाही. मला देव माहीत नाही, पण माणूस कळतो, त्याच्यावर माझी श्रध्दा आहे.

काही वेळा अशा अतर्क्य गोष्टी घडतात की त्याला 'केवळ नशीब' एवढेच म्हणता येते. नशीब ही गोष्ट त्या देवाधर्माच्या किंवा अंधश्रध्देच्या कप्प्यात टाकायची की नाही हे पुन्हा ज्याचे त्यानेच ठरवावे लागते. नेपोलियन या जगप्रसिध्द योध्दयाची एक गोष्ट मी ऐकली होती. तो आपल्या सेनापतींच्या नेमणुका करताना म्हणे त्यांचा सारा तपशील पाहायचा; त्याने किती लढाया मारल्या, किती जिंकल्या, त्याचे कौशल्य कोणते ...वगैरे. पण शेवटी तो एक प्रश्न विचारायचा, 'व्हेदर ही इज् लकी?' .... त्या सेनापतीच्या बाबतीत तो नशीबवान असणे ही जमेची बाजू म्हणून नेपोलियनसुध्दा लक्षात घेत असे. एरवी देवबिव न मानणाऱ्या मला ही गोष्ट पटते.

पूजा-देवधर्म अशा बाबतीत आमच्या ऑफीसमध्ये प्रस्थ नाही, तरीही काही घटना अशा घडत की मलाच फेरविचार करण्याची पाळी यायची! एका रॉकेल व्यापाऱ्याच्या दुकानाची विक्रीकर विभागाने तपासणी केली. गडबडगोंधळाचा बराच

व्यवहार सापडला. त्याला वाचविण्याचा बराच प्रयत्न, वकील या नात्याने मी केला. शेवटी त्या व्यापाऱ्यानेच स्वत: मोठ्या साहेबाला भेटण्याविषयी माझ्याकडे विनंती केली. मोठ्या साहेबाकडे जात असताना वाटेत गजानन महाराजांचे एक मंदिर होते, तिथे तो मला घेऊन गेला. दर्शन करून एक श्रीफळ आणि शाल मला देऊन त्याने नमस्कार केला, आणि तसाच एक संच साहेबांकरिता म्हणून आपल्याबरोबर घेतला. साहेबाच्या केबिनमध्ये गेल्यानंतर एक शब्दही न बोलता त्याने साहेबांच्या हाती श्रीफळ दिले आणि शाल पांघरली. नमस्कार करून तो बाहेर आला. यापूर्वी चार वेळा चर्चा करून देखील, त्याला कोणतीही सवलत मिळणार नाही या निर्णयाशी साहेब आले होते, त्याच साहेबांनी सहीसाठी कागद पुढे ठेवले आणि 'त्याचे काम झाले असे समज' असे मला सांगितले. याला काय म्हणायचे याचे उत्तर माझ्याकडे नाही. दुसरी अशीच घटना म्हणजे माझे वडील मृत्यूपूर्वी दोन वर्षे अंथरुणावरच होते. एका ज्योतिष्याने शनीशिंगणापूरचे दर्शन घेऊन यावे असे पत्नीस सांगितले होते. तिची साईबाबांवर श्रद्धा होती म्हणून आम्ही या दोन्ही देवस्थानी गेलो. मी तिकडे साईबाबांचे दर्शन घेत होतो त्याचवेळी इकडे वडिलांनी शेवटचा श्वास सोडला. या घटनेला 'केवळ योगायोग' असे मानताना मी फार कठोर विज्ञानवादी होऊ शकत नाही.

अमितच्या बाबतीत त्याचा पुनर्जन्म वाटेल, अशा प्रकारच्या अडचणी का आल्या त्याचे कारण काही सांगता येत नाही. त्यास 'केवळ नशीब' एवढे म्हणून त्याच्यासाठीचे मी माझे प्रयत्न जास्तच वाढवले. त्यापुढची जवळजवळ दोन वर्षे त्याला परदेशांतून आयात होणाऱ्या प्रोसोबीन पावडरचे महागडे दूध बाटलीतून सुरू होते. परंतु त्याची जी तब्येत खालावली होती, ती लवकर सुधारलीच नाही. डॉक्टरांचा सल्ला घेत राहिलो, आमचेही प्रयत्न होते; पण पुढची पंधरा वर्षे त्याची प्रकृती तशी नरम राहिली. त्या कालावधीत तो त्याच्या बरोबरीच्या मुलांच्या मानाने मागे पडायचा. त्याची प्रगती योग्य होत नव्हती. आम्हाला माहीत होणारे जगातील सारे उपचार आणि औषधे-डॉक्टर आम्ही आमच्या परीने उपलब्ध केले. त्याला त्याच्या वयाचा अभ्यास खेळ जमत नाही, म्हणून शिक्षकांच्या सल्ल्याने मुद्दाम नापास करून एक वर्ष वाया घालवून मागे ठेवले.खाजगी शिकवण्या लावल्या. तो १०वीच्या शालान्त वर्षाला असताना अभ्यास त्याला झेपणार नाही हे लक्षात घेऊन, सांगली हायस्कूलच्या एन सी व्ही सी या कोर्सला प्रवेश घेतला. तिथे तो उत्तीर्णही झाला. हा त्याच्याही दृष्टीने फार आनंदाचा आणि आत्मविश्वास देणारा प्रसंग ठरला. मलाही माझ्या निर्णयाचे त्या यशामुळे समाधान झाले. गंमतीचा भाग असा की, त्यानंतर त्याच्यात खूपच

बदल होताना दिसू लागले. त्याला आपल्या आयुष्याबद्दल विश्वास वाटू लागला. त्याला चारजणांत वावरता येऊ लागले. तो मनापासून अभ्यासही करू लागला. जो मुलगा शालान्त परीक्षा पास होण्याचीही शक्यता वाटत नव्हती, तिथे तो कॉमर्सचा पदवीधर झाला आणि त्याने त्यापुढे करविषयक पदविका (डिप्लोमा इन टॅक्सेशन)घेतली. ही त्याची पाच दहा वर्षांतील धाव एवढ्या झपाट्यात झाली की तो या पायरीवर कधी येऊन पोचला हे आम्हाला कळलेही नाही. आई-बापाने मुलाला घडविणे म्हणजे काय असते हे मी नेमके सांगू शकणार नाही, पण आम्ही आमच्या मुलाच्या बाबतीत त्याचा अनुभव घेऊन तो प्रयोग यशस्वी केला आहे, असे मी म्हणू शकतो. आमच्या ऑफीसमध्ये अमित आता पूर्ण जबाबदारीने काम पाहातो आहे.

अमितच्या बरोबर उलट अमृताची कथा आहे. मी पहिल्यापासून तसा सामाजिक दृष्ट्या जागरूक आहे. एकच अपत्य झाल्यानतर थांबायचे आम्ही ठरविलेच होते. त्यात अमित हा पहिला मुलगाच  झाल्यानंतर त्या कारणाने घरातून होणारा विरोधही संभवत नव्हता. त्यामुळे अमितनंतर आता दुसरे अपत्य लवकर तर नकोच, असे आमचे नियोजन होते. आमचा तो बेत फिस्कटून देत  पुढची कन्या मांडीवर आली. इतर समाजात अशा मुलीला 'नकुशी' म्हणतात म्हणे! आमच्या घरात ही पोरगी जन्मापासूनच सर्वांना हवीहवीशी झाली होती. अतिशय चलाख, चुणचुणीत, वस्ताद आणि तरीही मनमिळाऊ हळवी अशी ही कमालीची लाघवी पोरगी आहे. शाळेत ती पहिल्या नंबरावर कधी नव्हती, पण हुशारमध्ये जमा असायची. खेळात प्रवीण होती. शाळेत असताना ती इतर खेळांबरोबरच व्हॉलीबॉल उत्तम खेळायची. त्या स्पर्धांतून तिला राष्ट्रीय पातळीवर भारतभर खेळायला मिळाले. त्या निमित्ताने तिने रेल्वे-बसने सगळ्या मैत्रिणींबरोबर हसत खेळत प्रवास केला. त्यामुळे तिचे आकलन आणि जाण वाढली. आमच्या घरापासून जवळच्या मालू हायस्कूलला ती होती, मधल्या सुटीत खाण्यासाठी ती आपल्या मैत्रिणींचा घोळका घेऊन घरी यायची. त्यामुळे आमच्या घरी दररोज चार जणांचा जास्तीचा स्वैपाक केलेला असायचा. तिनेही बीकॉम केले, त्यानंतर एलएलबी केले आणि सीएस (कंपनी सेक्रेटरी)कोर्सपर्यंत तिने पाहता पाहता धडक मारली. त्या शेवटच्या परीक्षेचे दोन विषय मात्र तिचे लग्न, मग बाळंतपण यात राहून गेले ते राहिलेच.

प्रत्येक सुटीला सोनू मुलांना घेऊन माहेरी मुंबईला जाण्याचा परिपाठच होता. तिथे आमच्या दोन्ही बाजूंचे सारे नातलग होते, त्यामुळे ते सोयीचे होते. उरलेल्या काळात एखादा महिनाभर माझ्या आईला मुंबईला राहावेसे वाटायचे. आईचेही माहेर

मुंबईतच असल्यामुळे तिलाही ते जमून जात असे. या सुमारास आमच्या घरी भांड्याला भांडे लागत होते. पण मला माझी व्यवसायाची कामे होती, सामाजिक कामांच्या व्यापात मला रस होता, मित्रपरिवाराचा गोतावळा आणि त्यांच्यासोबतचे कार्यक्रम होते. त्या सगळ्या व्यापांतून सासू सून प्रकरणात किती लक्ष द्यायचे याला मर्यादा होत्या, आणि त्याचा तसा उपयोग होण्याची शक्यता सुतराम नव्हती.

एका म्यानात दोन तलवारी राहात नाहीत हे खूप उशीरा स्पष्ट झाल्यावर, माझ्या निर्णयपध्दतीनुसार आणखी एक म्यान तयार करायची असे ठरविले. आई-वडिलांपासून वेगळे राहण्याचा विचार कोणत्याही कारणाने ज्या तरुणांना करावा लागला असेल, त्यांची विव्हल मानसिकता मला कळून आली. गावात वेगळ्या एका घरात मी भाडोत्री जागाही पाहिली. पण त्यापेक्षा अधिक व्यवहार्य तोडगा मला माझ्या हितचिंतक सन्मित्रांनी सुचविला. कारण कितीही काही म्हटले तरी आई-वडिलांच्यात माझा जीव गुंतला होता, आणि त्यांची दररोजची विचारपूस करणे त्यांच्या अन्य गरजांकडे लक्ष देणे ही शेवटी माझीच जबाबदारी होती. हा विचार करून आम्ही आमच्या बंगल्यातच वेगळे राहावे असे ठरविले. त्याप्रमाणे तळमजल्यावर आमचे मम्मी-डॅडी आणि वरच्या मजल्यावर आमचे कुटुंब राहू लागले. स्वैपाकघर वगैरे आवश्यक सोयी वरती करून घेतल्या.

डॅडींशी ऑफीसात मनसोक्त दिलखुलास गप्पा व्हायच्या, पण घरी आलो की आमची तोंडे बंद! मग डॅडी आईच्या गटात, आणि मी बायकोच्या गटात!! डॅडी गप्प होऊन शांतपणे वाचत किंवा लोळत पडायचे, आणि आईचा त्रागा सुरू राहायचा. दुसऱ्या दिवशी ते विसरून दोघेही प्रेमाने वागत, एकमेकांची खूप काळजी घेत. कोणी त्या दोघांना पाहिले तर त्याला पटणारही नाही की हे दोघे कालच रात्री भांडत होते. या सगळ्यांतून मी खूप मौज अनुभवली आणि खूप मानसिक त्रासही सोसला. नाही तरी आयुष्यात असे काहीतरी थ्रिल हवेच ना ! उगीच मिळमिळीत आयुष्य जगण्यात काय मजा!! एक कीर्तनकार सांगायचे की, देवदेवता यांनाही हा आयुष्यक्रम चुकलेला नाही. हे नातेच फार मजेशीर आहे. क्वचित अपवाद वगळला तर हे नाते म्हणजे सगळ्या सृष्टीत चालणारी अजब रासायनिक क्रिया आहे. ती दोन रसायने एका घरात आल्यावर त्यातून काय निर्माण होईल ते सांगवत नाही.

□□□

□

# विक्रीकर संघटनांमधून भरारी

एकूणात विक्रीकर विषयात माझे यश प्रचंड म्हणावे असे होते. त्यातही माझ्याकडे उत्तम संघटन-कौशल्य होते, त्यामुळे विक्रीकर व्यवसायिक क्षेत्रातील संघटनेत प्रमुख पदे माझ्याकडे आली; ती पदे मी सतत क्रियाशील ठेवू शकलो. सांगलीत टॅक्सेशन कन्सल्टंट्स असोसिएशन ही संस्था फार पूर्वीच स्थापन झालेली होती. संस्थापक सदस्यांमध्ये माझे डॅडी होते, ते तिथे कार्यकारी मंडळात सक्रीय होते आणि काही काळ ते त्या संस्थेचे अध्यक्षही होते. त्या संस्थेच्या कामासाठी त्या मंडळींनी एक प्रशस्त फ्लॅट खरेदी केलेला होता, तिथे ऑफीस थाटले होते, संस्थेचा दबदबा निर्माण केला होता, संस्था नावारूपाला आणली होती. अर्थात प्रारंभकाळापासून बरीच मंडळी त्यासाठी झटली होती. मी त्या संस्थेचा सभासद झालो, आणि तिच्या कामकाजात भाग घेऊ लागलो; त्यावेळेस त्या संस्थेच्या कामात थोडी मरगळ आलेली होती. आधीच्या पिढीतील आघाडीची मंडळी आता उतरतीकडे झुकली होती. मी त्या संस्थेचे अध्यक्षपद घेण्यात काहीच अडचण आली नाही. एकतर माझ्या वडिलांना तिथे महत्व होते, आणि अध्यक्षपद घेण्यातही कोणाला फारसा रस नव्हता. यांमुळे माझ्यासाठी वडिलांना शब्द खर्च करावा लागला नाही... वास्तविक त्यांनी तसा शब्द टाकलाही नसता.

मी अध्यक्ष झाल्यावर मन लावून काम केले आणि संस्थेत पूर्वीची जान आणली. त्या संघटनेच्या वतीने भरपूर सेमीनार, अभ्यासवर्ग, नवीन वकीलांना प्रोत्साहन व प्रशिक्षण यांसाठी मी जोरात सुरुवात केली. खूप कार्यक्रम घेतले. संस्थेची सदस्यसंख्या वाढवली. माझ्या या कारकीर्दीत संस्थेचा दबदबा एवढा वाढला की, विक्रीकर कार्यालयावरच त्याचा प्रभाव पडू लागला. सांगलीस बदली होऊन येणारा कोणताही विक्रीकर अधिकारी दहा वेळा विचार करत असेल, असे आम्ही गंमतीने म्हणायचो.

टॅक्स-वकीलांचा मोठेपणा मी सांगत नाही, पण शासनाची यंत्रणा व करदाते व्यवसायिक यांचे शत्रुत्व न होता त्यांचा समन्वय असला पाहिजे ही आमची भूमिका मला महत्त्वाची वाटत असे. व्यवसायिकांनी निर्भय व्हावे आणि शासकीय अधिकाऱ्यांनी करनिर्धारणास साहाय्य करावे ही आदर्श व्यवहारपद्धत यावी यासाठी वकील हा दुवा असला पाहिजे. त्याकरिता अभ्यास-परिश्रम-तत्परता यांइतकेच त्यांनी संघटनशास्त्रही बाणवले पाहिजे, असे मला त्याहीवेळी वाटत असे. ठरवलेच असते तर अध्यक्षपदावर मीच दीर्घकाळ राहू शकलो असतो. पण नवीन लोकांना जागा करून देऊन आपण वेळेवर दूर व्हायचे हे कोणत्याही संस्थेच्या फार हिताचे असते, ते मी केले . केवळ एकाच वर्षात मी अध्यक्षपद सोडले, पण त्यापुढच्या काळात आलेल्या प्रत्येक कार्यकारिणीला पूर्ण सहकार्य व साहाय्य करीत आलेलो आहे, .. आजही करीत असतो. पुढच्या पिढीत अत्यंत तळमळीने काम करणारे कार्यकर्ते येत राहिले, त्यामुळे सांगलीच्या टॅक्सेशन कन्सल्टंट्स चे नाव आज महाराष्ट्रभरात गाजत आहे.

एकदा या क्षेत्रातील संघटनेचा अंदाज आल्यावर मला राज्यव्यापी पदावर जाणे फारसे कठीण वाटले नाही. सांगलीतील टॅक्सेशन संघटनेतील अनुभव आल्यावर मी राज्यस्तरीय 'सेल्सटॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' या संघटनेत सदस्यत्व घेऊन सक्रीय झालो होतो. ती संघटना तुलनेने फार मोठी, मजबूत आणि सरकार दरबारीसुध्दा दबदबा असणारी! महाराष्ट्रात तिचे साधारण ३ हजार सभासद असतात. संस्थेचे नाव, म्हणताना 'महाराष्ट्र' म्हटले तरी मोठ्या व्यवसायधंद्याचे केंद्र मुंबईतच असते. तिथले वकील लोकही अर्थात मोठे आणि संख्येने जास्त. शिवाय राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी त्यांच्या रोजच्या संपर्कात असणार. अशा सगळ्या कारणांनी त्या 'राज्यस्तरीय' संघटनेत सारा कारभार मुंबईकरांकडेच असायचा. त्या कार्यकारिणीत गेल्या पन्नास वर्षांत मुंबईबाहेरचा कोणी सदस्य नव्हता...किंबहुना तशी प्रथाच पडली होती. मी प्रयत्नपूर्वक त्या कार्यकारिणीत स्थान मिळविले. कारण राज्यभरातील व्यापार-व्यवसायिकांच्या दृष्टीने विक्रीकर हा संवेदनशील विषय असतो. त्यांचे प्रतिनिधित्व केवळ मुंबईपुरते राहून कसे चालेल? म्हणून राज्यभरच्या वकील मंडळींत या संघटनात्मक कार्याचे महत्त्व लक्षात यावे म्हणून काहीतरी भरीव असे करण्यासाठी राज्यस्तरावरूनच प्रयत्न केले पाहिजेत अशी माझी धारणा होती. कार्यकारिणी सदस्य म्हणून मला राज्यभरातील सदस्यांनी सहा वर्षे बिनविरोध निवडून दिले हेही विशेष.

मी पहिल्यापासून असा सूर लावला होता की, ही संस्था केवळ मुंबईची नव्हे तर

साऱ्या राज्याची आहे. त्यामुळे मुंबईबाहेरचे प्रतिनिधित्व तिथे असलेच पाहिजे. मी तसे प्रतिनिधित्व मिळवले, कार्यकारिणीत सचिव झालो. त्या पदावर दोन वर्षे काम केल्यावर एक वर्ष उपाध्यक्ष झालो, आणि त्यानंतर त्या तालेवार संघटनेचा थेट बिनविरोध अध्यक्ष झालो. त्या बलाढ्य संघटनेच्या आजवरच्या पन्नास वर्षांच्या काळात ही तीनही पदे प्रथमच मुंबईबाहेरच्या व्यक्तीकडे माझ्या रूपाने आली. मुंबईचे आर्थिक बाबतीतले प्राबल्य निर्विवाद असल्यामुळे अशा संघटनेची पदेही मुंबईत राहणार हे आजवर स्वाभाविकही होते, पण तितकाच प्रभाव मुंबईबाहेरच्या क्षेत्रातील कामांतून एव्हाना निर्माण झाला होता हेही तितकेच खरे आहे. त्यावेळपर्यंतची संमेलने, चर्चासत्र, अभ्यासवर्ग हे मुंबईतच होत असत. माझ्या कारकीर्दीत एका वर्षांतच कितीतरी संमेलने मुंबईबाहेर घेण्यात आली. तशी आता प्रथाच पडली आहे. राज्यस्तराच्या या संघटनेला मुंबईबाहेर महाराष्ट्र आहे हे नव्याने माहीत झाले असावे.

माझ्या अध्यक्षीय कारकीर्दीच्या वर्षभरातच मी ५०-६० प्रवासदौरे केले. त्या महाकाय संस्थेसाठीची साहित्यखरेदी, संस्थेला मिळणाऱ्या देणग्या, कार्यालयीन कर्मचारी इत्यादि बाबतींत मी बरेच बदल घडवून आणले. मुख्यत: सगळ्या सदस्यांची मानसिकता आमूलाग्र बदलण्यात मला बरेचसे यश मिळाले. अशा संस्था-संघटनांत ठराविक कालावधीनंतर एक प्रकारची सुस्ती येते, त्यामुळे मग तिच्या कार्यक्षेत्रात औदासिन्य व दुरावा पसरत जातो असा सार्वत्रिक अनुभव आहे. सेल्सटॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनमध्ये त्या दृष्टीने मी प्रयत्न केले. आपल्या क्षमतेने काहीतरी भरीव कामगिरी करून दाखवायची असे आव्हान स्वीकारून मी या मोठ्या पदापर्यंत जिद्दीच्या प्रयत्नान्ती पोचलो होतो. आवश्यक तितकी यशस्वी कारकीर्द पूर्ण करूनच मी मागे आलो. या माझ्या कालावधीत अनेक प्रसंग, आव्हाने, हार-प्रहार यांचे अनुभव आले आणि ते अनुभव खूप काही शिकवूनही गेले.

अगदी अलीकडे म्हणजे २०१६-१७ सालाकरिता या राज्यसंघटनेची कार्यकारिणी निवडायची होती. माझा साथीदार अमोल माने त्या निवडणुकीत उतरविला होता. मुंबईबाहेरचा सदस्य कार्यकारिणीत यायला नको म्हणून मुंबईतले सारे दिग्गज शड्डू ठोकून विरोधात होते. पण गेल्या पाच वर्षांतले अमोलचे काम आणि माझा पूर्वीचा संपर्क, अमोलच्या बाजूने पणाला लावला. शेवटच्या दोन दिवसांत मी राज्यभरातील जवळजवळ दोन हजार सदस्य वकीलांना फोन केले. परिणामी अमोल माने निवडून आले. त्याचा तर आनंद होताच; पण त्याहीपेक्षा जास्त आनंद या अन्याय्य गटबाजीविरुद्ध लढून जिंकायचा होता. या लढ्याचा परिणाम इतका चांगला झाला की

मुंबईतील कार्यकारिणी सदस्यांनी राज्यातील अनेकांना स्वीकृत सदस्य म्हणून घेतले आणि त्यांच्या प्रतिनीधि त्वासाठी विभागीय समित्या नेमल्या. कुठल्याही सामाजिक कार्याच्या यशाला 'देर है पर अंधेर नहीं' यासाठी झगडावे लागते.

राज्य संघटनेचे काम मी करणे कालमानानुसार थांबवले. या संस्थेमुळे माझा खूप फायदा झाला. मला ज्याची मनापासून ओढ आहे, त्या जनसंपर्काची मोठीच संधी त्या कामाने मिळवून दिली. महाराष्ट्रातील शब्दशः शेकडो वकीलांशी माझे उत्तम संबंध प्रस्थापित झाले. त्या निमित्ताने राज्यभर प्रवास घडला. मुंबई-पुणे-नागपूर-औरंगाबाद अशा ठिकाणच्या दिग्गज मंडळींशी घनिष्ठ संबंध तयार झाले. या संस्थेतही अनेकांनी घराणेशाही राबवली. परंतु शक्य असूनदेखील माझ्या मुलाला या मोहापासून मी लांब ठेवले. त्यानेही ते मान्य केले. प्रथम करिअर, नंतर सेवाकार्य हाच क्रम असावा.

मी या संघटनेचा पदाधिकारी असताना सर्वांचे परस्पर संबंध, मैत्री आणि जिव्हाळ्याचे राहावेत यासाठी खास प्रयत्न करत असे. त्यात वकील मंडळींसह मैत्रीचे खेळ, संमेलने, सहल इत्यादींचा समावेश होता. सांगलीच्या करसल्लागार संघटनेचे सदस्य आणि विक्रीकर खात्यातील कर्मचारी यांच्यात क्रिकेटचा सामना २०१२-१३ या वर्षी घेतला होता. मी त्यात फिल्डिंगला असताना कॅच पकडण्याच्या नादात एका अंगावर पडलो. डावा हात फ्रॅक्चर झाला. पण अशा दुखापतींना कुरवाळत न बसता काम पुढे चालू ठेवायचे, अशी माझी पहिल्यापासून जिद्द होती. अपघात आणि दुखापती याची मला जणू सवयच लागून गेली होती. ही मॅच संपल्यानंतर लगेचच आमच्या संघटनेतील ३९० वकील मंडळींची केरळची सहल माझ्याच पुढाकाराने आयोजित केलेली होती. प्लॅस्टरमधे बांधलेला तो हात घेऊन मी त्यात सहभागी झालो, आणि सहलीचा यथेच्छ आनंद घेतला. परत घरी आल्यावर दोनतीन दिवसांतच मी आंघोळीला गेलेलो असताना पाय घसरून न्हाणीघरात पडलो, त्यात दुसराही हात फ्रॅक्चर झाला. माझा त्यावेळी दक्षिण आफ्रीकेचा प्रवास नक्की झालेला होता. तो रद्द न करता मी प्लॅस्टरमधले दोन हात घेऊन तो परदेश प्रवास पूर्ण केला. एकदा कोणतीही गोष्ट ठरवली की ती त्याचप्रमाणे पूर्ण करणे, यात मला आनंद आणि समाधान मिळते, आणि ते मी मिळवतो. ही धडपड कडमड म्हणजे 'रूटीन'चाच भाग असतो अशी माझी धारणा आहे.

□□□

□
# आमचे ऑफीस

आमच्या ऑफीसच्या कामांइतकाच आमच्या सहकारी कर्मचाऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. शर्मिला खोत ही मुलगी खूप काम अक्षरशः ओढायची. २० वर्षे तिने आमच्याकडे निष्ठेने काम केले. ऑफीसमधील सगळी कामे ती स्वत: होऊन करत असे. आमच्या घरच्यांइतका जिव्हाळा तिच्या ठायी होता. दिवाळीचे लक्ष्मीपूजन ऑफीसात झाले की आमचे सर्व कुटुंब तिच्या घरी फराळाला जायचे असा रिवाज पडला होता. माझ्याकडे ती मे १९९६मध्ये फोन ऑपरेटर म्हणून आली. हळूहळू तिने सेल्सटॅक्सचे काम आत्मसात केले. माझे अनेक पक्षकार किंवा त्यांचे दिवाणजी तिच्या टेबलाशी येत, काम करून घेत. तिला त्या सर्वांचे स्वभाव तपशीलवार माहीत झालेले होते, त्यांना ती बरोबर चालवायची. २०१५ मध्ये तिचे लग्न झाले, आणि तिने जड अंतःकरणाने इथला निरोप घेतला.

तसाच अशोक कांबळे. हा १९८७ च्या ऑगस्टमध्ये माझ्याकडे शिपाई म्हणून कामाला आला. नंतर तो ड्रायव्हर म्हणून माझ्या लांबच्या प्रवासात सोबत करायचा. जेमतेम १२वी झालेल्या अशोकने पाचशे रुपये पगारावर नोकरीला सुरुवात केली असेल, तो आमचा ऑफीस सुपरिटेंडंट असल्यासारखा होता. डॅडींपासून सर्वांचा त्याच्यावर जीव होता. तीस-पस्तीस वर्षे तो आमच्याकडे आहे. ऑफीसची सगळी कामे तो पाहतोच पण तो आमच्या कुटुंबातलाच होऊन गेला. आमच्या घराच्या आऊटहाऊसमध्ये तो राहिला, त्याचे लग्नकार्य झाले, दोन पोरं झाली, त्यांची शिक्षणे झाली, त्या दोघांस नोकरी पाहून दिली, हा सगळा संसार इथे बहरला. अशोक माझे घरही सांभाळतो. माझे व्यवहार तो बिनचूक आणि बिनधोक पार पाडतो. आमच्या

घरातले एकही काम असे नाही की जे अशोकला माहीत नाही, किंवा तो करू शकत नाही! अतिशयोक्ती म्हणून सांगत नाही, पण आमच्या घरातील ताणतणावाच्या वेळी अधिकारवाणीने हस्तक्षेप करायचा. मी परगावी किंवा परदेशी गेलो तरी, 'अशोक आहे' या भरोशावर सारे घर आणि घरचे सारे निश्चिंत असतात. पण मधल्या काळात अशोक जरा आडवाटेने जाऊ लागला. एखाद्या जवळच्या माणसाला व्यसन लागले की त्याच्यापेक्षा आपल्यालाच जास्त टोचणी लागते तसे इथे झाले. त्याचे काय ऋणानुबंध आमच्याशी असतील कुणास ठाऊक!

त्याशिवाय माझ्या ऑफीसात कर्मचाऱ्यांची संख्या बरीच असते. त्या सगळ्यांशी माझे फार चांगले संबंध आहेत. आमच्या कोणत्याही घरगुती समारंभात त्यांचा पूर्ण सहभाग असतो. दिवाळीपासून कुठल्याही आनंदाच्या प्रसंगात माझ्याबरोबर हे सगळेजण असत. वर्षातून दोनतीनदा तरी आम्हा सर्वांचे सहभोजन होत होते. एक वार्षिक सहल निघते. प्रत्येकाचा वाढदिवस ऑफीसात साजरा करायचा ही माझी कल्पना प्रत्यक्षात आणली, त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे नाते तयार होते. एखाद्या दिवशी कामाच्या बाबतीत बोलणी खाल्ली तर कोणीतरी मुसमुसून रडायचे, पण दुसऱ्या दिवशी त्याच्या किंवा तिच्या पाठीवरून हात फिरवत प्रेमाने समजूत काढण्याची पध्दत आमच्याकडे होती. या वर्तणुकीतून माझ्याबद्दलचे मत 'साहेबांच्या मनात काही नसते' अशा प्रकारचे झालेले होते हे नक्की! मी स्टाफला कायम असे सांगत असतो की, ''माझ्या ऑफीसची जबाबदारी तुम्ही घ्या, तुमच्या घरची सगळी दुखणी माझ्यावर सोपवा.''

अमोल माने हा तर मला लाभलेला उत्तम सहकारी होता. त्याचे गुण आणि त्याच्या वकिली शिक्षणातील प्रगती पाहून आम्हा मित्रांचे त्याच्याबद्दल बोलणे झाले, आणि तो आमच्याकडे कामावर येऊ लागला. अभ्यासू वृत्ती आणि परिश्रम यांमुळे त्याने आमच्याकडचे काम फारच लवकर आत्मसात केले. दीर्घकालाचा विचार करून प्रत्येकासाठी योग्य ते नियोजन करणे हे तर मला महत्वाचे वाटायचे. त्याच विचारातून मी अमोलकडे प्रस्ताव मांडला, आणि त्याच्या संमतीने त्याला माझा भागीदार करून घेण्याचे ठरले. माझा मुलगा अमित हा त्याच्या बरोबरीने विक्रीकर वकिलीची बाजू पूर्ण क्षमतेने व कौशल्याने चालवीत असे. त्याने एलएलएम

पदवी जाताजाता घेतली, शिवाय सायबर लॉ या विषयाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रमही पूर्ण केला. त्याने ज्यांना गुरू मानले आहे, त्या पटवर्धन गुरुजींशी माझेही उत्तम स्नेहसंबंध आहेत. त्यांच्यामुळे अमोलच्या जीवनाला एक आध्यात्मिक शिस्त आहे. वास्तविक आमचे व्यावसायिक गूळपीठ वगळले तर अमोलशी माझे काहीही जमण्यासारखे नव्हते. देवधर्म, वागणे-बोलणे, खाणे-पिणे, व्यक्तिगत खर्चाची वृत्ती या सगळ्यांत आमच्यात खूप फरक आहे. तसा फरक शर्मिला अथवा अशोक आणि मी यांच्यातही आहे; तो असूनही आमचे सख्य चांगले होते.

परंतु अमोल माने हा काही व्यक्तिगत अडचणींमुळे, -आणि त्याच्या काही श्रद्धास्थानांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे- स्वतंत्र व्यवसाय करू लागला. त्याने मला सुस्पष्ट कल्पना दिली आणि हा सर्व व्यवहार गोडीतून झाला. मीही त्याला शुभचिंतन करून वेगळे केले.

तसेच आणखी एका व्यक्तीबद्दल मनापासून सांगायलाच हवे, ती व्यक्ती म्हणजे सी.ए.शिरीष पालकर. ते चार्टर्ड अकाउंटंट आहेत. आमच्या माहितीत असणारे शिरीष पालकर हे आमच्या ऑफीसला डॅडींच्या सोबत आयकराचे काम करण्यास येऊ लागले. त्यांचे टेबल डॅडींच्याच शेजारी असायचे. त्यांनी प्रामाणिकपणे परिश्रम, चिकाटी आणि अभ्यास यांतून काम वाढवीत नेले. ते स्वतः चार्टर्ड अकाउंटंट झाल्यामुळे ऑडीटची कामेही त्यांच्याकडे सुरू झाली. नंतरच्या काळात त्यांना आम्ही भागीदारच करून घेतले. त्यांनी आमच्या डॅडींचा परिपूर्ण विश्वास मिळवला. नंतरच्या काळात डॅडींच्या कामाला वयाच्या मर्यादा येऊ लागल्यावर त्यांच्या जागी इन्कमटॅक्समध्ये काम करू शकणारा हा चेला आपोआपच त्यांच्या खुर्चीत बसला. त्यांच्या कामाचा, डी.एस.पालकर ॲण्ड कं.असा स्वतंत्र विभाग करण्यात आला. हा स्वतंत्र विभाग आधीपासून उत्तम चालू होता. त्यामुळे आता आमचे 'टी बी लुल्ला अँड कं.' आणि त्यांचे 'डी एस पालकर अँड कं.' ही जुळी भावंडे सुखाने नांदू लागली. पण हे समाधान फार काळ टिकले नाही. जसे अमोल माने हे आमच्यातून बाजूला झाले तसे पालकरांशीही व्यवहार जमला नाही. थोडी वादावादी होण्यापर्यंत मजल गेली आणि मग पालकरही बाजूला झाले.

त्यापूर्वी महेश कुलकर्णी हेसुद्धा आमच्या ऑफिसात होते. आमच्याकडे येणाऱ्या

व्यवसायिकांतील काहींच्या हिशोबवह्या व्यवस्थित लिहून देण्याचे काम त्यांनी स्वतंत्रपणे सुरू केले. थोडक्यात असे की, आमच्याकडे टॅक्सेशन व अकाउंटिंग यातील पुरेपूर माहिती करून घेतल्यावर या सगळ्यांनी स्वतंत्र प्रॅक्टिस सुरू केली. हे माझे खंदे सहकारी सोडून गेले आणि थोड्या दिवसांनी माझेच स्पर्धक बनले. मी त्याचा आतल्या आत खूप सल सहन केला; पण शेवटी हा व्यवहार असतो तो कुणाच्या भावनेवर चालत नाही. एकाच आई वडिलांची अपत्ये असली तरी कालांतराने ती वेगळी होणार हे ठरलेलेच असते; मग हा तर केवळ आर्थिक मामला असतो. तिथे व्यक्तिगत फायद्यातोट्याचा विचार प्राधान्याने होणार. मी मनाची समजूत घालून पुढची वाटचाल करू लागलो.

आमच्या ऑफीसला काम करायला लागल्यानंतर प्रत्येकाची चांगली प्रगती झालेली आहे, किमान कुणाचे अहित झालेले नाही, हे मी आज अभिमानाने सांगू शकतो. कुणी कर्मचारी आमचे काम सोडून जाताना कधी वादावादी झाली नाही, उलट त्याच्याशी नंतरच्या काळात चांगले संबंध राहिले. अच्युत जोशी, चंद्रकांत आपटे, मेधा भोकरे, महेश कुलकर्णी, संभाजी पाटील, सतीश आवटी, राजू गनवाणी यांची उदाहरणे मी सांगतो. नितीन खत्री गेली काही वर्षे माझ्याकडे प्रामाणिकपणे, तळमळीने काम करीत आहे. काहीजण आमच्याकडे आले, आमच्याकडे काम शिकले, आणि नंतर बाजूला जाऊन त्यांनी आपापला स्वतंत्र व्यवसाय उत्तम प्रकारे चालविला आहे. त्यांच्याशी स्पर्धा तर नाहीच, पण घरोब्याचे संबंध कायम राहिले आहेत.

माझ्या ऑफिसला तसे अनेकजण कामासाठी येत जात असतात. क्वचित अपवाद वगळला तर सर्वांशी माझे व्यक्तिगत घरगुती संबंध राहिले आहेत. आमच्या ऑफीसशी गैरवर्तणूक केली म्हणून एखाद्याला काढून टाकले, असे उदाहरण शोधून खोदून काढल्यास एखादेच सापडू शकेल. याचे मुख्य कारण म्हणजे आमच्या डॅडींची पुण्याई आहे. त्यांचे साऱ्या जगाशी जुळायचे. माझ्या स्वभावात ते थोडे उतरले असावे.

माझ्या ऑफिसमधील काम अलीकडे नितीन खत्री याने अंगावर घेतले. माझे ऑफिस पुढे चालवण्यास त्याने उत्तम साथ दिलेली आहे. स्वतः अभ्यास करून त्याने प्रगतीही केलेली आहे. माझ्या ऑफिसचा बराचसा भार अमितच्या जोडीने तो अत्यंत प्रामाणिकपणे सांभाळतो. आमच्या ऑफिसची टीम खूपच चांगली आहे.

अजित, रोहन, शुभम, गीता, गजला, राजश्री, अशोक आणि लखन यांची अतिशय चांगली घडी बसलेली आहे. जमाखर्चाची आणि प्रॉपर्टीची संपूर्ण जबाबदारी चैत्राली देशिंगकर सांभाळत आहे. मुग्धा अभ्यंकर हिची साथ ट्रस्टच्या कामात खूप मिळते.

०१ जुलै २०१७ ला भारतात जीएसटी कायदा लागू झाला आणि त्यानंतर व्यवसायाचे स्वरूप बदलले. अलीकडे सर्व व्यापारक्षेत्रात कॉम्प्यूटरचे युग आलेले आहे; पुष्कळसे रेकॉर्ड कॉम्प्यूटरवर ठेवले जाते. तसेच टॅक्स भरणे, चलने भरणे वगैरे काम ऑनलाईन पद्धतीने होऊ लागले. अकाउंटंट वर्ग हा आयकर विक्रीकरासंबंधी वकिली करू लागला. सरकार 'डीलर फ्रेंडली' होऊ लागले आहे. त्यांना मध्यस्थ नको आहेत असे दिसते. आपल्याकडे आर्टीफिशियल इंटेलिजन्सकडे वाटचाल होत आहे. या सगळ्या आधुनिकीकरणामुळे आमच्याही व्यवसायात खूप स्पर्धा वाढत चालली आहे. नव्या केसेस येणे कमी झाले आहे. केसेसची एकूण संख्या कमी कमी होत चालली. शिवाय पूर्वीप्रमाणे लोकांचा परस्पर विश्वास टिकून राहिलेला नाही, त्यामुळे आमचा सल्ला डावलण्याचे किंवा काम पूर्ण झाल्यानंतर फी बुडविण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच फी देताना घासाघीस होऊ लागली आहे. या सगळ्याचा परिणाम ऑफिसच्या कामावर होत आहे. थोडक्यात म्हणजे अत्याधुनिक तंत्रे व पध्दती यांचा परिणाम दिसू लागला आहे.

माझ्या ऑफीसचे एकंदर व्यवस्थापन उत्तम म्हणावे असे होते. दररोजचे काम अगदी वेळेत सुरू, आणि वेळेतच बंदही होते. सगळ्यांनी वेळेतच यायचे, आणि वेळ होताच बाहेर पडायचे अशी रीत आहे. अगदी क्वचित अपवाद वगळता, सुटीच्या दिवशी कुणी कामावर यायचेच नाही. माझ्या टेबलवर कधीही फाईल-कागदांचा गठ्ठा दिसणार नाही. कामांचा निपटारा अतिशय जलद होत असल्यामुळे कोणतेही काम आमच्याकडून लोंबकळत राहात नाही. ते कौशल्य मी आत्मसात केले आहे. कित्येक वकील मंडळीसुध्दा माझ्याकडे आमच्या ऑफीसची पध्दत पाहायला म्हणून येऊन गेली आहेत. माझे मित्रमंडळ, समवयीन वकील, अधिकारीही मला पुष्कळदा म्हणतात की, एवढी कामे, व्याप, उपद्व्याप करूनही तुला मोकळा वेळ असतो, हे कसे काय? 'बिझिएस्ट मॅन हॅज अ टाईम फॉर एव्हरीथिंग' असे त्यावेळी माझे साभिमान उत्तर असते. मी जवळच्या कुणाशी बोलताना अधिकारवाणीने सांगतो, ''आय स्टार्ट वर्कींग

व्हेन यू स्टार्ट डिस्कसिंग!''

खाजगी व्यवसायांमध्ये सहकारी कर्मचाऱ्यांचा प्रश्न मोठा असतो असे बरेचजण म्हणतात. मनासारखा स्टाफ मिळत नाही, मिळाला तर टिकत नाही, टिकला तर त्यांच्या पगारवाढीच्या मागण्या सुरू असतात ही तक्रार सर्वत्र ऐकू येते. आपल्याकडे काही दिवस काम करून शिकल्यानंतर तो प्रशिक्षित कर्मचारी आपल्याकडचे काम सोडून जातो हे तर फार मोठे नुकसान असते. माझा अनुभव त्या बाबतीत एकदम उलट आहे. माझ्याकडचे कोणी सोडून गेलेच नाही असे नाही, पण जे गेले त्यांनी माझी कामे स्वतंत्रपणे करण्याचे सुरू ठेवले, मला त्यांचा पुरेपूर उपयोग होतो. प्रदीर्घ काळ काम करत राहून आमच्या घरचेच झाल्यासारखे, मला काही सहकारी म्हणून लाभले.

कामाला योग्य माणूस हवा आणि माणसाला योग्य ते काम हवे. हे साधले तरच कुठलाही उद्योग व्यवस्थित चालतो. माझ्या बाबतीत हे आयुष्यभर साधत गेले, यासाठी मला संघटनकामाचा बाहेरचा अनुभव उपयोगी पडला. अनेक उद्योगपती प्रचंड संख्येने माणसे आणि कर्मचारी हाताळू शकतात, तसा मी काही मोठा व्यवसायिक नाही. साधारण पाच-पंचवीस लोकांचा एक गट मी पद्धतशीर हाताळू शकतो, असे मला वाटते. सर्वसाधारण कोणत्याही ऑफिसमध्ये तशी पद्धत असते. माझ्या मते मी या लोकांचे बऱ्यापैकी समाधान करू शकतो आणि तीही सर्व माणसे माझे समाधान करू शकतात इतपत खात्री आम्हा एकमेकांना आहे, एवढे तरी माझ्या ऑफिसचे यश म्हणून सांगता येईल!

□□□

□

# केल्याने देशाटन

माझ्या डोक्यातले फॉरेनचे वेड पूर्णतः गेले, असे मी आजही म्हणू शकत नाही. परदेशी राहता आले नाही तरी मी ती दुधाची तहान अनेक देशांतील प्रवासाच्या ताकावर भागवली. युरोप, सिंगापूर, बँकॉक, हाँगकाँग, श्रीलंका, नेपाळ, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण ऑफ्रिका, केनीया, दुबई, चीन, मॉरिशस, स्पेन, बाली, इंडोनेशीया असे अनेक देश आणि त्यांतली विविध शहरे मी फिरलो. एक विदेशी यात्रा संपवून परत आपल्या कामात रुजलो की, मला पुढचा कुठला तरी विदेश खुणावू लागतो. माझ्या डोक्यात बसलेले फॉरेनचे भूत मला दूर ढकलता येत नाही. मला तशी संधी काही वेळेला आमच्या विक्रीकर वकील संघटनेच्या सेमिनारमुळेही मिळाली, तो तर कामाचा एक भाग म्हणता येईल. पण बाकीचा प्रवास मी कधी पत्नी आणि मुलांसह, पण अधिकांशी मित्रांसमवेत केला.

केवळ परदेशच नव्हे तर बहुतांशी भारताचे भ्रमण मला करता आले. ग्राहक पंचायतीच्या संघटनकामासाठी मी उभा-आडवा महाराष्ट्र पालथा घातला, शिवाय त्या निमित्ताने इतर राज्यांतून फिरलो. सांगलीत मेघालयातील मुलांसाठी भैयाजी काणे वसतिगृह सुरू झाले, त्यात मी ओढला गेल्यानंतर तो प्रश्न समजून घ्यावा म्हणून मी मेघालयात जाऊन तिथल्या कुटुंबात राहून आलो. जनकल्याण समितीच्या 'भारत मेरा घर' या योजनेअंतर्गत मी तो प्रवास केला. निसर्गाची देणगी असलेल्या गारो आणि जयंतिया या डोंगर प्रदेशात असलेल्या मुलखातील समाजाचा फार जवळून अभ्यास केला. ईशान्येची सात राज्ये 'सेव्हन सिस्टर्स' म्हणून ओळखली जातात. हा सर्व प्रदेश भारताचा असला तरी तिथे ख्रिश्चनांनी घडवून आणलेले धर्मांतर खूप आहे. त्यामुळे मुद्दाम

पसरविला गेलेला दुरावा इतका आहे की, तेथील नागरिकांना आपण भारतीय आहोत असे वाटतच नाही. प्रचंड प्रशासकीय भ्रष्टाचार, केंद्र सरकारी अनास्था यांमुळे हा भाग मुख्य भूमीपासून तुटल्यासारखा झाला आहे. भारतीय लोकांना या भागात फिरण्यासाठी तिथल्या काही जहाल संघटनांची परवानगी घ्यावी लागते. स्त्रिया आणि लहान मुलांमध्येसुद्धा व्यसनाधीनता आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते तिथे जाऊन अक्षरशः 'गन पॉईंट'वर काम करीत आहेत. हे सर्व पाहिल्यामुळे पूर्वांचलासाठी काम करणाऱ्या संस्थांना आणि कार्यांना भरीव मदत करण्यासाठी मी प्रयत्न करतो.

'केल्याने देशाटन, पंडितमैत्री, सभेत संचार...
शास्त्रग्रंथ निवेदने मनुजा चातुर्य येतसे फार'

हे माझ्या बाबतीत खरे ठरले आहे असे मला तरी वाटते. परदेशांचे आकर्षण असणे म्हणजे त्याबद्दल प्रेम वाटणे असे मात्र मी मान्य करणे शक्यच नाही. बालपणी मला त्यांच्या वस्तूंचे चांगलेपण आवडायचे, तसे ते आजही आवडते. त्या देशांमध्ये फिरल्यानंतर आपल्या त्रुटी आणि दोष प्रकर्षाने लक्षात येतात आणि मन खायला उठते. आपल्या स्वतःला उत्तम नागरिक व्हायचेच असेल तर तिकडे खूप शिकायला मिळते. कुठेही बाहेर जाऊन आलो की माझे ठरलेले वाक्य असते, 'त्यांच्यापेक्षा आपण शंभर वर्षांनी मागे आहोत'. त्यांच्याकडे भौतिक सुविधा तर आहेतच, पण आपापसातील वागणे, इतरांचा मान ठेवणे, परस्पर विश्वास, आणि मुख्य म्हणजे त्यांचे त्यांच्या भूमीवरचे प्रेम यांनाही मानले पाहिजे. त्यांचे आचार-आचरण, वागणे-बोलणे, शिस्त, स्वच्छता हे आपण का घेऊ शकत नाही या प्रश्नाने माझे मन आक्रंदन करीत आकाशातून परत जमिनीवर येते.

कोणतीही वस्तू घ्यायला बाजारात जावे तर ग्राहकावर तिकडच्या दुकानदारांचा केवढा विश्वास असतो. तुम्हाला एखादी वस्तू नंतर नकोशी वाटली, पसंत नसली, समाधानकारक वाटली नाही तर केव्हाही ती परत करू शकता. हे तिथे कसे काय घडू शकते याचा मी अचंबा करत असतो. ग्राहकाशी गोड बोलणे, त्याचा आदर ठेवणे, त्याची काळजी घेणे याची दक्षता घेण्याचे त्यांना कोण शिकवते याचे मला तरी कुतुहल वाटत आलेले आहे. शिवाय जागोजागी स्वच्छ प्रसाधनगृहे ही माणसांची साधी प्राथमिक गरज असते, ती तिथे सहजावारी लक्षात घेऊन अंमलात येते.... आपल्याकडे तसे का होत

नाही याला काही उत्तरच नाही! थुंकून रस्ते घाण करण्याचे आपण थांबवू शकत नाही. प्रचंड रहदारीने रस्ता भरून वाहात असला तरीही तो ओलांडतांना त्यांच्याकडच्या सिग्नल्सची शिस्त असते, पादचाऱ्यांची काळजी असते. बहुतांशी सगळेच जण चारचाकी वापरतात, पण सीटबेल्ट लावण्याचे टाळत नाहीत. सार्वजनिक ठिकाणी मोठ्याने न बोलणे, रांगेत उभारणे हे अगदी सहज न कळत सांभाळले जाते, इतकी त्यांना सवय लागली आहे. पु लंनी तर म्हटलंय की, दोन इंग्रज कधी एकाशेजारी एक असे उभे राहातच नाहीत ते लगेच एकामागे एक उभे राहून रांगच लावतात!

□

वेगवेगळ्या क्षेत्रांतील विद्वान मोठ्या लोकांत मला जायला मिळाले, मी तशी संधी सोडतच नाही. अनेकांचे विचार, वक्तृत्व, चर्चाभेटी यांमुळे माझेही खूप प्रशिक्षण होऊ शकले. एकदा तर अगदी संस्मरणीय प्रसंग अनुभवला. वसंत आपटे यानी, त्यांचे पत्रकार गुरू दिल्लीचे बापूराव लेले यांचे एक पुस्तक संपादित केले. बापूकाका लेले हे दिल्लीतले पत्रमहर्षी, 'संपर्कसेतू' म्हणून सर्वपरिचित होते. माझ्या दृष्टीने आणखी एक पैलू म्हणजे, स्वातंत्र्यकाळातील फाळणीच्या वेळी 'शंकर मार्केट' ही सिंधी वसाहत वसविण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. लेले यांच्या वाढदिवस-सत्काराच्या निमित्ताने त्या पुस्तकाचे प्रकाशन दिल्लीत प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या निवासस्थानी त्यांच्याच हस्ते आयोजित करण्यात आले. त्याचे सन्मान्य आमंत्रण स्वाभाविकच आपटेना आले, त्यांना दोन प्रवेशपत्रिका होत्या. आम्ही दिल्लीला जाण्याचे ठरवून रेल्वेची शयनयान तिकिटे काढली, पण कुठल्या तरी महासंमेलनासाठी जाणाऱ्या झुंडगिरीने रेल्वेगाडी इतकी ठेचाठेच भरली होती की, आम्हाला आत पाय ठेवता येईना. मग टू टायर वातानुकूल डब्यात शिरलो. जास्तीचे दीड दीड हजार भरून एकत्र गेलो. असला निर्णय मी सहज घेतला, पण आपटेंच्या हृदयाचे ठोके वाढलेले मला स्पष्ट ऐकू येत होते. आम्ही दोघे त्या कार्यक्रमात उपस्थित होतो. सभागृहात अनेक दिग्गज उपस्थित होते. त्यात लालकृष्ण आडवाणी, प्रमोद महाजन, राम नाईक, दत्तोपंत ठेंगडी, सुमित्रा महाजन, श्रीकांतजी जोशी, इत्यादी मान्यवरांचा समावेश होता. व्यासपीठावर जाऊन मला मा. आडवाणीजींशी बोलता आले, मी पुढे केलेल्या कार्डावर त्यानी स्वाक्षरी केली. नंतरच्या भोजनपंगतीत दस्तुरखुद्द

वाजपेयीजी आग्रह करत आमच्यापर्यंत आले. असा दुर्मीळ योग एरवी माझ्यासारख्याच्या आयुष्यात कशाला येतो!

अशा पंडितांशी मैत्री करण्याइतकी पात्रता माझ्याकडे नाही, पण त्यांच्या जवळ जाऊन पोचणे मला साधते. सभेत संचार करून कित्येक ठिकाणी भाषणे देण्याइतके कौशल्य आता अंगी आले आहे. आकाशवाणीवरून कित्येकदा मुलाखती व भाषणे, वृत्तपत्रांतून लेख, काही पुस्तिकांचे संकलन, अर्थशास्त्र आणि कर यांविषयी नियतकालिकांतून मनोरंजक सदर, पूर्वांचलाविषयी पुस्तके इत्यादि कामे मी प्रयत्नपूर्वक साध्य केली. 'स्वदेशी'च्या प्रचारासाठी राजीव दीक्षित यांच्या हजारो ध्वनिफितींचे वितरण केले. टॅक्सेशन कॉन्फरन्समध्ये महत्त्वाचे कितीतरी निबंध (पेपर्स) वाचले. महाराष्ट्र जर्नालिस्ट फाऊंडेशनचा 'दि प्राईड ऑफ इंडिया -भास्कर ॲवॉर्ड २०१६' हा पुरस्कार मला गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांच्या हस्ते देण्यात आला. मोठे शास्त्र, ग्रंथ माझ्या आटोक्यात नसले तरी अनेक पुस्तकांच्या प्रकाशनांत माझा प्रत्यक्ष सहभाग आहे. सामाजिक संस्थांना या प्रकारे केलेल्या भरीव आर्थिक मदतीबद्दल महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह मला मिळाले. अशा रितीने त्या सुभाषितात उल्लेख केलेल्या चौफेरी बाबतीत सर्व संधी मिळण्याने बरेच चातुर्य माझ्या अंगी आले, हे तुम्हीसुद्धा मान्य कराल.

□□□

□

## ग्राहक पंचायत

१९८६पावेतो मी माझ्या ऑफीसच्या कामात चांगले बस्तान बसवले होते, आणि डॅडीही अजून पूर्ण वेळ काम करत होते. त्यामुळे मी थोडा वेळ काढून ऑफीसबाहेरच्या काही तरी कामांसाठी सटकत असे. हे लक्षात आल्यामुळे सांगलीतले एक व्यवसायिक व कार्यकर्ता श्री.अशोकराव तेलंग यांनी मला एके दिवशी जरा घोळात घेतले. ते तसे अपरिचितच होते. त्यांचे विक्रीकराचे कामही आमच्याकडे नव्हते, तर ते श्री.धों.फडके वकीलांकडे होते. पण आधीच्या भारतीय आणीबाणी काळात संघस्वयंसेवक फडके तुरुंगात अडकले; तेव्हा हे काम तेलंगानी आमच्याकडे आणले. तेव्हा आमच्या डॅडींनी ते विनाशुल्क केले होते. त्या पार्श्वभूमीचा संदर्भ घेऊन तेलंग माझ्याकडे आले होते. त्यांच्याकडे श्री.बिंदुमाधव जोशी हे येऊन गेल्याचे कळले. ग्राहक पंचायत नावाच्या संघटनेचे काम इथे सांगलीत सुरू करण्यास त्यांनी सुचवल्यामुळे तेलंगानी तशी तयारी चालविली होती. मला त्यांनी त्या कामात येण्याबद्दल सांगितले. त्यानंतर लवकरच एकदा बिंदुमाधव जोशींचे भाषण मी ऐकले, आणि माझा सारा नूरच पालटला. 'ग्राहक पंचायत' ही देशाला प्राधान्य देणारी, व्यवस्था सुधारू पाहणारी, कुणाशी वैर न करणारी, तोडफोडीची आंदोलने न करणारी चळवळ; हे मला समजून आल्यावर मी त्या चळवळीकडे आकर्षितच झालो.

त्यावेळी सांगली भागात तरी या चळवळीबद्दल कुणाला काही माहिती असण्याचे कारणच नव्हते, मग कार्यकर्ते कोण असणार? आम्ही काम सुरू केल्यावर एकेकजण जोडत गेलो. मी जिल्हा संघटनमंत्री झालो. साऱ्या जिल्ह्यात प्रवास सुरू झाला. आमच्या चळवळीत काम करू शकणारी माणसे नव्या नव्या ओळखीतून कार्यकर्ते म्हणून मिळत गेली. मी तरी त्या कामाला वाहूनच घेतले असे म्हणायला हरकत नाही. ग्राहक मार्गदर्शन केंद्र आमच्या ऑफीसच्या जागेतच सुरू करण्यात आले. जवळजवळ

३० वर्षे या संस्थेचे काम माझ्या कार्यालयातून चालले. त्यामुळे लोकांच्या अनेक प्रकारच्या तक्रारी आणि अन्याय मला समजू लागले. आजवर मला कोणत्याच गोष्टीची कधी कमतरता भासलेली नव्हती, पण लोकांना साधे रॉकेल, रेशन मिळवायला किती अडचणी येत असतात हे पाहून मी बेचैन होत असे.त्या बेचैनीवर चर्चा करून एकेका सार्वजनिक प्रश्नाला हात घालण्यास ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून आम्ही सुरुवात केली. रॉकेल विकणारे फेरीवाले ही तर वास्तविक सामान्य माणसे; पण ग्राहकांना ठकविण्यात ती कमी पडायची नाहीत. त्यांच्या हातगाडीवर तेलाच्या पिपाला तोटी असायची ती भस्सकन् सोडली की मापाच्या निमूळत्या तोंडाशी भरपूर फेस येऊन माप भरल्यासारखे वाटायचे. प्रत्यक्षात रॉकेल बोटभर कमी असे. प्रत्येक मापागणिक तेवढे रॉकेल कमी देणे ही शुद्ध फसवणूक होती. तोटीला फडके बांधले तर फेस येत नाही, म्हणून ते बांधण्याची सक्त सूचना शासकीय पुरवठा विभागाने फेरीवाल्यांना दिली होती, पण ती कोण जुमानणार? ग्राहकांना तर ही गोची ठाऊकही नव्हती. मोठ्या डीलरकडून किंवा शासकीय कोट्यातून हे फेरीवाले व रेशनदुकानदार रॉकेल आणत व ते घेण्यासाठी त्यांच्या दारात पहाटेपासून लोकांच्या रांगा लागत. मी रेशनवाल्यांवर नजर ठेवण्यासाठी भल्या पहाटेसुद्धा जाऊन उभा राहात असे.

अशा गैरव्यवहारी प्रथांच्या विरोधात जागृती करणे हे ग्राहक पंचायतीचे कामच होते. ग्राहकमेळे भरवून आम्ही कार्यकर्ते ते काम गल्लोगल्ली गावोगावी करत असू. वजनमापांतून, अन्नभेसळीमधून, गॅरंटी वॉरंटीमधून ग्राहकांची कशी फसवणूक होते याबद्दल जागृती करणे, हे ग्राहक पंचायतीच्या कामाचे एक अंग होते. आम्ही पदरमोड करून त्या संदर्भातील काही चित्रमय फलक(पोस्टर्स)केले होते. याशिवाय अन्नधान्यातील भेसळ कशी ओळखायची, बाजारातील दीडदांडी तराजू कसे रोखायचे, त्याबद्दल लेखी तक्रार कशी नोंदवायची, विद्यार्थी ग्राहक म्हणून कोणते हक्क बजावू शकतो, बाजार खरेदीत महिलांची भूमिका कशी... असे अनंत विषय होते. त्याविषयीचे दणकेबाज प्रबोधन सुरू होते. रेल्वे स्टेशन, एसटी बसस्टँड अशा ठिकाणी परगावहून येणाऱ्या प्रवाशांना नडवून वाटेल तसे भाडे सांगणारे रिक्षावाले असतात. त्यांची ती मनमानी रोखण्यासाठी, त्या त्या ठिकाणी आम्ही कार्यकर्त्यांसह अपरात्री वा पहाटे धडक मारत असू.

असल्या विरोधाची प्रतिक्रिया उलट बाजूने उमटणे सहज-स्वाभाविक होते. त्या व्यवसायिकांच्या संघटना तर जहालपणाबद्दल प्रसिद्ध असतात. या चळवळींतून त्यांनाच अंगावर घेण्यामुळे त्यांच्याकडून दमदाटी, धमक्या येऊ लागल्या. त्यांना न घाबरता

अशी चळवळ राबविणे म्हणजे जीव टांगणीला लावण्याचाच प्रकार असतो. पण तो मी करीत राहिलो; कारण त्या मूल्यनिष्ठ नवखेपणाची एक नशा होती, तीही औरच!

सांगलीतील त्यावेळचा धुमसता विषय म्हणजे स्वयंपाकाच्या गॅस वाटपातील गैरव्यवहार. ग्राहक पंचायतीकडे गॅस डीलरविरुद्ध भरपूर तक्रारी येऊ लागल्या. ग्राहकांचे हक्क आणि अधिकार आम्हाला आता कळू लागले होते. म्हणून आम्ही कार्यकर्त्यांनी ठरविले की, गॅस डीलरच्या ऑफीसमध्ये धडक मारून त्याच्याकडील सर्व नोंदींची(रेकॉर्ड) तपासणी करायची. सांगलीतील एका कुप्रसिद्ध गॅस एजन्सीच्या दारात आम्ही दहा-बारा कार्यकर्ते एकत्रित झालो. ग्राहक पंचायतीच्या वतीने इथल्या एजंटची तपासणी करायला आम्ही आलो आहोत हे समजल्यावर, त्या गर्दीतून आम्हाला तक्रारीच तक्रारी मिळू लागल्या. त्यांपैकी नव्वद टक्के तक्रारी गॅस सिलेंडर वेळेवर न मिळण्याबद्दल होत्या. आम्ही तपासलेल्या बहुतेक सर्व कार्डांवर सिलेंडर देण्यात आल्याच्या (डिलीव्हरी दिल्याच्या) खोट्या नोंदी केलेल्या दिसल्या. या सर्वांची पाहणी करून व्यवस्थित अहवाल आम्ही तयार केला आणि तो जिल्हाधिकाऱ्याकडे सादर केला. गॅस कंपनीच्या विभागीय व्यवस्थापकास जिल्हाधिकाऱ्यानी बोलावून घेतले आणि हा सर्व प्रकार त्याच्या कानावर घालून, संबंधित डीलरची एजन्सी रद्द करण्यास सांगितले. राजकीय संबंधातून त्याला एजन्सी मिळाली होती, त्यामुळे त्याच्याबद्दल कंपनीचा विभागीय व्यवस्थापक उडवाउडवी करू लागला. पण जिल्हाधिकाऱ्यानी मनावर घेऊन या गॅस डीलरकडील सोळाशे जोडण्या (कनेक्शन्स) ग्राहक पंचायतीच्या सूचनेनुसार दुसऱ्या सक्षम डीलरकडे वर्ग केल्या. गॅस डीलरला हा मोठाच झटका होता. आमच्या सामाजिक कार्यालाही हा विजय फारच मोठा वाटला.तथापि त्याचा 'साईड इफेक्ट' म्हणून मला स्वत:ला आणि इतर कार्यकर्त्यांनाही बराच त्रास सोसावा लागला.

अन्याय आणि समस्यांच्या विरोधात आपल्या ताकतीनिशी उतरणे हे सच्च्या नागरिकाचे कर्तव्य आहे, हे ग्राहक पंचायतीच्या कामातून मला समजून आले होते, त्यानुसार मी असे काही लढे दिले. काही वेळा ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून कार्यकर्त्यांच्या बरोबरीने प्रश्न मांडले, तर काही वेळा एकट्याच्या अंगावर घेऊन धोकाही पत्करला. त्यात पुष्कळ वेळा मनस्ताप वाटणीला आला, पण त्या सर्व अडचणींतून मी बाहेरही आलो. त्या त्या प्रसंगात माझा जीव घाबरा झालेला होता हे नाकारण्यात अर्थ नाही. पण आज दूरवरून पाहिल्यानंतर हे अनुभव पुष्कळ काही शिकवूनही गेले असे म्हणावे लागेल. आपल्याकडे विधायक चळवळींस प्रशासकीय दंडशक्तीचा काहीच आधार नसतो. या ठिकाणी एक गोष्ट नोंदविली पाहिजे की,

अर्थव्यवस्थेत ग्राहकाचे स्थान फार महत्त्वाचे असले तरी समस्त ग्राहकविश्व त्याबद्दल कमालीचे उदासीन असते. कोणत्याही वस्तूच्या खरेदीची पावती घेणे, पॅकिंगवरची मुदत पाहून घेणे, अधिकतम किंमत तपासणे इत्यादी साध्यासाध्या गोष्टी प्रत्येकाला सहज करता येण्यासारख्या असतात. ग्राहकांचे शोषण होते हे खरेच आहे, पण ग्राहकही त्या शोषणास स्वत:च्या तात्कालिक स्वार्थाच्या नादात मदतच करतो.

एका सकाळी मी वृत्तपत्रात जाहिरात पाहिली. नोकरी मिळवून देतो म्हणणारा एक कोणीतरी एजंट सांगलीतल्या लॉजवर उतरला होता. आपापली प्रमाणपत्रे आणि नावनोंदणी फी म्हणून एकेक हजार रुपये घेऊन त्याने मुलाखतीसाठी उमेदवारांना जाहिरात देऊन बोलावले होते. त्यातला फोलपणा लक्षात येण्याजोगा होता. त्याच्या जाळ्यात कुणी अडकू नये म्हणून मी आमच्या तीनचार कार्यकर्त्यांसह एका पोलीस इन्स्पेक्टरला गाठले व त्याच्यासह त्या लॉजवर जाऊन धडकलो. तिथे आशाळभूत तरुणांची रांग लागलेली पाहून आम्हाला आश्चर्यच वाटले. आम्ही त्या माणसाकडे जाऊन जरा आडवेतिडवे विचारल्यावर तो सटपटला आणि त्याने गाशा गुंडाळण्याचे कबूल केले. आम्ही तिथल्या सगळ्या उमेदवारांना ते सांगून पांगवले आणि विजयाच्या कैफात घरी परतलो. दुसऱ्या दिवशी पुन्हा त्या लॉजवर चक्कर टाकली तेव्हा आश्चर्य दुप्पट झाले. तिथे पुन्हा उमेदवारांची रांग होती आणि त्याचे 'दुकान' चालूच होते. आता मी काय करणार कपाळ! 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये।' हे ग्राहकांच्या बाबतीत शब्दश: खरे आहे.

मला वाटते अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्रीमुक्ती, बालकल्याण अशा सर्वच क्षेत्रांत काम करणाऱ्यांचा तोच अनुभव असतो. आपल्याकडे शोषितांना हे माहीत नसते की आपले शोषण होत आहे. त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आपली ताकत फार अपुरी पडते. मुळात ज्यांच्यावर अन्याय होत असतो, तेच मान्य करत नाहीत की तो अन्याय आहे, शोषण आहे. त्यामुळे आधी शोषितांचाच विरोध होतो; मग शोषक तर महामत्त असतातच. 'रिक्षाचे भाडे मीटरप्रमाणे द्या, जास्त देऊ नका' म्हणून सांगायला गेलो तर प्रवासी आपल्याशी वाद घालून म्हणतात, ''आम्हाला जायची घाई आहे, आमचे पैसे जाऊदेत ना!..... तुमचं काय जातंय?''

यासाठी अव्यवस्थांच्या विरोधात सतत लढायचे तर असंघटित ताकत पुरत नाही. जे शोषण करतात ते संघटित असतात. रिक्षावाल्याने ज्यादा पैसे मागितले म्हणून आपण हुज्जत घालू लागलो तर आणखी पाचदहा रिक्षावाले त्याच्या बाजूने आवाज सुरू करतात; जवळून जाणारा कोणीही प्रवासी आपल्या मदतीला येत नाही.

हा प्रत्येकाचाच अनुभव असेल. त्यामुळे संघटनात्मक लढाई मांडण्याऐवजी प्रबोधनात्मक कार्यासाठी संघटन राबविणे आवश्यक आहे असे मला जाणवत राहिले. ग्राहक पंचायतीचे कार्य सामुदायिक वितरण पद्धतीमधून सुरू झाले, पण ती पद्धत मुंबई ग्राहक पंचायतीने अधिक यशस्वी केली. देशाच्या व जगाच्या व्यासपीठांवर मुंबई ग्राहक पंचायतीने स्थान मिळविले. ललिता कुलकर्णी, शिरीष देशपांडे यांच्याशी आमचा संवाद होत असे.

या काळात मी इतरही काही सामाजिक संघटनांच्या कामांत ओढला गेलो होतो. त्यात पदाधिकारीही झालो होतो. तिथे मी स्वच्छ अर्थव्यवहारांबद्दल साऱ्या जगाला ओरडून सांगत होतो, परंतु माझ्या व्यवसाय विश्वात दैनंदिन गैरव्यवहार पाहात होतो. तत्व आणि व्यवहार यांच्यात अशी एवढी फारकत पाहायला मिळण्याने माझे मन आक्रंदून उठत असे. सोबतीच्या काही कार्यकर्त्यांशी याबाबतीत खूप चर्चा विचारविनिमय होत असे. त्यांच्याकडून खूप नवनव्या गोष्टी कळत. मोठ्या लोकांच्या विचारवंतांच्या भेटीगाठी होत, त्यामुळे तर मनातले हे द्वंद्व आणखी वाढायचे. आर्थिक परिस्थिती बेताची असूनही त्यात आनंदाने समाधानाने राहून खूप काम करणारे, वाचन विचार करणारे, उच्च प्रतिष्ठेचे कित्येक लोक मला अवतीभोवती दिसत होते. त्यातले काहीजण प्रसंगपरत्वे माझ्यासोबत प्रवासाला असत. परत आल्यावर माझ्या 'त्या' कामाला लागताना मला उगीच खजील वाटू लागत असे. माणसाच्या मनातला पैशाचा हपापा वाढवत नेता येतो आणि कमीही करता येतो, हे इतक्या वर्षानंतर मला आता कळू लागले आहे. त्या दोन्ही विचारांतील मानसिक ताणतणाव मी बराच काळ अनुभवला हे मात्र खरे! नैतिक मूल्य जपणे आणि दैनंदिन व्यवहार सांभाळणे यांचा मेळ घालताना माझ्या मनात द्वंद्व चालू असे, ते आजही थांबलेले नाही. सत्याला नैतिक मूल्य असले तरी व्यवहारात परिपूर्ण सत्य राबवता येत नाही. 'व्यावहारिक सत्य' असा एक मध्यममार्ग शोधून समतोल राखावा लागतो, हे मला जाणवू लागले.

संघटनात्मक पातळीवर ग्राहक पंचायतीतून खूप चांगले आणि आनंददायी अनुभव मिळाले. मुख्य म्हणजे ग्राहक चळवळीचे अध्वर्यु बिंदुमाधव जोशी यांच्याशी खूप निकट संपर्क आला. त्यांच्यासोबत महाराष्ट्राची आणि देशाची 'ग्राहक परिक्रमा' करण्याचे ठरविले आणि त्यासाठी खूप मेहनत घेतली. त्या दशकात कार्यकर्त्यांच्या समवेत केलेल्या संपूर्ण प्रवास व मुक्कामांत सारखी गप्पाष्टके, -अनंत विषय, खुली चर्चा, तत्वांचा कीस, आणि अर्थातच हास्याचे फवारे यांतून आम्ही सारे एकमेकांच्या खूप जवळ आलो. भारत परिक्रमेच्या पूर्वतयारीसाठी सांगलीतील कार्यकर्त्यांनी उत्तर

भारतात प्रवास केला होता.अशोकराव तेलंग त्यावेळी बनारसला गेले होते. उदय परांजपेकडे कानपूर, वसंत आपटेला मुजफ्फरनगर दिले होते. मी बरेलीला गेलो होतो. त्याचप्रमाणे मदनदास देवी, बजरंगलाल गुप्त, श्रीकांतजी जोशी, लक्ष्मणराव भिडे, दामूअण्णा दाते अशा ज्येष्ठश्रेष्ठांशी विचारविनिमय करण्याची संधी मिळाली. प्रांत स्तरावर  सूर्यकांत पाठक, नाशिकचे फडके, सुनील कुलकर्णी, रवींद्र साळुंखे हे आमच्यासोबत असायचे. बाळासाहेब कुलकर्णी, स्वातीताई शहाणे, राजाभाऊ पोफळी, श्रीकांतजी जोशी या ज्येष्ठ मंडळींशी स्नेहसंबंधच जुळले.

ज्या ज्या चळवळी किंवा संघटना महाराष्ट्रात नावारूपाला आल्या त्यात सांगलीतील कार्याचा भाग महत्त्वाचा होता असे मला वाटते. राजकीय पक्ष, संघ, सहकार अशा कुठल्याही क्षेत्रात सांगलीने आपला प्रभाव महाराष्ट्रात दाखविला आहे. ग्राहक पंचायतीचे काम तसेच झपाट्याने सर्वत्र वाढत गेले. कार्यकर्त्यांची आणि कार्याची व्याप्ती वाढत चालल्यावर सांगलीत त्या संस्थेची रीतसर नोंदणी करून घेण्यात आली व त्या कार्यास संस्थारूप दिले गेले. सांगलीतील ग्राहक पंचायतीचे काम खूपच जोमात आणि जोशात चालत असे. नंतरच्या काळात सांगली शाखेला केंद्र शासनाकडून रु.चाळीस हजाराचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

केंद्र शासनाचा ग्राहक संरक्षण कायदा आला होता, २४ डिसेंबर १९८६पासून त्या कायद्याची अंमलबजावणी देशभरात सुरू झाली होती त्यामुळे आम्हा कार्यकर्त्यांना खूप आधार मिळाला. देशाचा विचार केला तर या कायद्याच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र खूपच आघाडीवर होता, आणि महाराष्ट्रात आमचा सांगली जिल्हा आघाडीवर होता.जिल्हाधिकारी कार्यालयातील ग्राहक संरक्षण कक्ष क्रियाशील होता. ग्राहक तक्रार निवारण मंच -म्हणजेच ग्राहक न्यायालय चांगले चालू होते, आमच्या ग्राहक मार्गदर्शन केंद्राने तर चांगला दबदबा निर्माण केला होता. श्रीकांत मंत्री, अनिल ताडे, अविनाश कुडाळकर, ज्ञानचंद्र पाटील, सुभाष सदलगे, अनिल दबडे वगैरे वगैरे बरेच कार्यकर्ते तडफदार काम करत. तथापि प्रारंभकाळात तशी तडफ ठीक असली तरी अनुभव आणि विचारमंथन यातून आपल्या कार्यशैलीत बदल झाला पाहिजे. तसा बदल प्रत्येकात होतो असे नाही. मग असे कार्यकर्ते सोबत राहिले नाहीत.

दुसऱ्या बाजूला संघटनात्मक पातळीवर आम्ही फॉर्मातच होतो. काही काळ मराठवाडा विभागाचा संघटनमंत्री मी होतो, आणि कोकण विभाग वसंत आपटे यांच्याकडे होता.आम्ही दोघेजण मिळून दोन्ही विभागात एकत्र प्रवास करीत असू.

त्याचा परिणाम म्हणून या दोनही विभागात चांगले काम उभे राहिले, आमचा लोकसंपर्क खूप झाला, आणि मुख्यतः आम्ही दोघे एकमेकांच्या खूप जवळ आलो. दर आठवड्या-पंधरवड्यातून आमचा कुठे ना कुठे प्रवास व्हायचा. खूप गप्पा चर्चा व्हायच्या. नवनवीन मुद्दे निघत, भावी योजना ठरत, संघटन-बांधणीची धोरणे ठरत. हे प्रवास आम्हाला खूप फायदेशीर ठरले. आजच्या काळात 'आनंददायी रचनात्मक शिक्षण' हा शब्द ऐकतो, त्याचाच प्रत्यय आम्ही त्या प्रवासात घेतला. अनेक क्षेत्रांतील थोरामोठ्यांच्या भेटी घेतल्या. महाराष्ट्र प्रांत कार्यकारिणीत इतर जिल्ह्यांच्या रोषाला पात्र होऊ शकेल इतका आमचा वरचष्मा होता. आमचे काम स्पष्ट आणि चोख असल्यामुळे कुणाचे काही ऐकून घेण्याचे आम्हाला जमायचेच नाही. मनांत काही शंका गैरसमज आले तर आम्ही मुंबई-दिल्लीपर्यंत जाऊन अत्युच्च पदांवरील व्यक्तींना थेट भेटत असू. त्याचाही इकडे काही वेळी रागाने उल्लेख होत असे.

त्या दरम्यान महाराष्ट्रात भाजप - सेना युतीचे सरकार आले. त्यात 'ग्राहक कल्याण उच्चाधिकार समिती' स्थापन करण्यात आली व त्याचे अध्यक्षपद बिंदुमाधवजींकडे देण्यात आले. हे पद मंत्रीस्तरीय कॅबिनेट दर्जाचे होते. त्यांच्या उजव्या डाव्या हाती आम्ही चारसहा जण असल्यामुळे साहजिकच आमचाही भाव वधारला. त्यांच्या लाल दिव्याच्या गाडीतून पुऱ्या महाराष्ट्रात भ्रमंती होऊ लागली. मुंबईच्या मंत्रालयात ये-जा वाढली. तिथे बैठका परिषदा यांत भाग घेता आला. तिथल्या कामांची पध्दतही 'आतून' समजली. शिवाय सगळ्या जिल्ह्यांतून शिबिरे, बैठका, अभ्यासवर्ग, मेळावे यांचाही एक माहोल तयार झाला होता. त्यांचे नियोजन, अंमलबजावणी, त्यात भाषण वगैरे सहभाग, असा सिलसिला सुरू राहिला. तथापि त्या नव्याची उच्चाधिकारी नवलाई दोन तीन वर्षांनी ओसरू लागली, त्यातल्या खाचाखोचा कळू लागल्या, त्रुटी जाणवू लागल्या, व्यक्तिगत दोषही कळू लागले. त्या वातावरणाशी जमवून घेताना मानसिक कसरत सुरू झाली. ग्राहक चळवळीत इतका गुंतलो होतो की तब्येत, कुटुंब आणि व्यवसायाकडे दुर्लक्ष होत आहे हे देखील लक्षात आले नाही.

ग्राहक पंचायतीच्या कामासाठी मी जिवापाड मेहनत घेतली. त्यातून अर्थव्यवस्था किंवा ग्राहकविश्व यांच्यात काही फरक पडला असे म्हणण्यात तर काही अर्थ नाही, पण माझ्यात खूप बदल झाला हे मी नक्की म्हणू शकतो. बिंदुमाधव जोशी यांच्या अनेक भाषणांतून ऐकलेल्या विचारांचा प्रभाव माझ्यावर पडत असे व मी जीवतोड परिश्रम करत असे. सांगलीहून मराठवाड्यात जाण्यासाठी चांगल्या बसेस नव्हत्या.

बीड-परभणी या भागात जाण्यासाठी राज्य परिवहनच्या लाल डब्बा गाड्या असत. त्यात बहुतांशी ऊसतोडणीचे मजूर व त्यांची बायकापोरे यांची गर्दी असे. त्यांच्या गाशा-गाठोड्यांतून मी रात्रभर प्रवास करीत असे. तोपर्यंतच्या आयुष्यात मी तसल्या प्रवासाची कल्पनाही करू शकत नव्हतो. त्या कार्याची नशा मन बुद्धी यांवर होती, पण शरीराची मर्यादा असतेच की! ॲसिडिटी, ब्लडप्रेशर, पाठदुखी यांनी माझी पाठ धरली. परंतु मी डॉक्टरकडे हेलपाटे घालून त्यांच्या उपायांनी व्याधींना गप्प करीत असे.

साधारण २००४ पासून ग्राहक पंचायतीशी आम्हां लोकांचे सूत्र जुळेनासे होऊ लागले. अभ्यास व अनुभव यांतून आमची जाण वाढल्याचे मला जाणवत होते. त्या आधारे आमच्या काही भव्यदिव्य योजना, विचार, चर्चा, भेटीगाठी होऊ लागल्या होत्या, त्यांबद्दल कुणाची तरी दुखरी नस लक्षात येत असे. वास्तविक हे स्वयंस्फूर्त काम असल्यामुळे त्यात कुणी कुणाला डावलण्याचा प्रश्णच नव्हता. पण व्यक्तिनिष्ठेचा दोष अनेक संघटनांत व कार्यकर्त्यांत शिरतो. त्यामुळे कार्यापेक्षा नेत्याला महत्व येत जाते. ते मोठेपण नेत्याला पेलले नाही तर ती संघटना ढेपाळते, कार्यकर्ते विचलित होतात, आणि कार्यही रोडावते. ग्राहक पंचायतीतील या माझ्या अनुभवांची मी इतरांशी चर्चा करत असे. काही वाचनही करत होतो, त्यांतून मला असे काही चिंतन करण्याचा सराव होत होता. माझ्यात होत चाललेला बदल मला जाणवत असला तरी माझ्या मित्रमंडळात आणि गोतावळ्यात 'माझे चिंतन' हा शब्दप्रयोग जरा टवाळीचाच विषय होता..

तारुण्यातील या चळवळींच्या माध्यमांतून मला तसा व्यक्तिगत फायदा खूपच झाला. माझे सामाजिक आकलन वाढले. वाढत्या वयाबरोबर वाढत्या जबाबदाऱ्याही उमगत गेल्या. मला सामाजिक कामांची प्रथमपासून आवड होतीच, पण त्यातही आता वैचारिक सुसूत्रता आली होती. आता अनेक कार्यांचा व संघटनांचा जवळून परिचय झाल्यामुळे आपल्या कामांची दिशा आणि पध्दतही ठरवून घेण्याइतकी समज मला आली होती. सामाजिक कामांची गरज चिरंतन असते, ते काम कधी संपत नाही. आजवर इतक्या थोरामोठ्यांनी इतके काम केले तरी समाज फार बदलला, सुधारला... असे होत नसते. म्हणून आपल्या बौध्दिक, शारीरिक, कौटुंबिक, व मुख्यतः आर्थिक क्षमतेचा विचार करून आपल्या यापुढील कार्याची दिशा आणि मर्यादा नक्की करावी या निर्णयाशी मी आलो. आजवरच्या माझ्या सामाजिक कामांतून समाज किती बदलला हा प्रश्नच येत नाही, पण माझ्यात बदल झाला हे खरे !

बिंदुमाधव जोशी याला एक चपखल दृष्टांत देत असत. खेडेगावात म्हशी भादरण्यासाठी लोक येतात, त्यांचा उल्लेख करून ते म्हणायचे, 'म्हैस भादरून नाही झाली तरी हरकत नाही पण वस्तऱ्याला तरी धार लागेल!' - माझ्या विचारांनाही आता बरी धार चढली होती.

ग्राहक पंचायतीची चळवळ पाहता पाहता चांगली फोफावली होती. पण कधीतरी मनात शंकेची पाल चुकचुकत असे आणि तसेच हळूहळू अनुभवास येऊ लागले. श्री.बिंदुमाधव जोशी यांच्याकडे उच्चाधिकार समिती आणि कॅबिनेट दर्जा असल्यामुळे लाल दिव्याची गाडी मिळाली होती. तो लाल दिवा गाडीच्या डोक्यावर असला तरी, वरपासून अनेक कार्यकर्त्यांच्या तो डोक्यात गेला. संघटनेचा आत्मा हरवला, त्याकडे दुर्लक्ष होऊन सगळे कामकाज व्यक्तीच्या खुंट्याला बांधायचे असा प्रकार सुरू झाला. त्याला आम्ही विरोध केला तर तो कोणालाच सहन होत नसे, उलट आमचीच समजूत काढू पाहाणारी गुळमुळीत वाक्ये ऐकवली जात.

चळवळ बळकट करण्यासाठी संस्थेची स्थावर करण्याकडे कल वाढू लागला. प्लॉट खरेदी करावा, 'ग्राहक भवन' बांधावे अशा वल्गना सुरू झाल्या आणि प्रथमपासून आम्हाला जे संघटनशास्त्र म्हणून शिकवले होते ते मागे राहिले. त्यामुळे आम्हा काही कार्यकर्त्यांच्या मनात अस्वस्थता वाढली. ती बोलून दाखवू लागलो, तसे आम्ही बाजूला पडत गेलो. दुःख त्याचे नव्हते तर एक तत्त्वनिष्ठ आणि कृतिशील संघटना प्रभावहीन होणार हे भविष्य उघड दिसू लागले. आपोआपच त्यातून लक्ष विचलित होऊ लागले. श्री. बिंदुमाधव जोशी यांच्याही प्रकृतीच्या आणि वयाच्या मर्यादा पडू लागल्या. संघ परिवाराशी त्यांच्या अहंभावाचे जमेनासे झाले. अंदर की बात आम्हाला कळण्यास मार्ग नाही, परंतु एकूणच ही सर्व परिस्थिती उत्साहाची वाटेना. त्यामुळे या चळवळीलाच दुरावलो गेलो. ग्राहक चळवळही ठप्प झाल्याचा अनुभव येऊ लागला.

बिंदुमाधव जोशी यांना संघ परिवाराने अलग केले नाही, तरीही सोमनाथ खेडकर हे महामंत्री झाले. बिंदुमाधव जोशी यांच्या तुलनेने त्यांचा आवाका कमी भासत होता. त्यांनी प्रयत्न चिकाटीने केला पण या तिढ्यातून पुढचे पाऊल पडेना. हळूहळू ग्राहक पंचायत ही चळवळच मंदावत गेली. श्री. बिंदुमाधव जोशी हेही काळाच्या पडद्याआड गेले. अलीकडच्या काळात तर हळूहळू एक एक करत पहिल्या फळीतील पिकली पाने गळून गेली. सर्व कार्यकर्ते आणि चळवळ दिशाहीन झाली, थांबत गेली.

अलीकडच्या काळात रा. स्व. संघाने पुन्हा लक्ष घालून ही आर्थिक महत्त्वाची चळवळ हाती घेतल्याचे दिसते. दिल्ली येथे नुकतेच एक भव्य अधिवेशन झाले, ते

अगोदर आम्हाला  कळालेही नाही; पण ती चळवळ सुरू आहे आणि पुन्हा उभारी घेत आहे याचा मनातून आनंद होत होता. सुवर्णमहोत्सवी अधिवेशन पार पडल्यानंतर जिल्ह्यातील काही कार्यकर्त्यांनी एकत्र येण्याचे ठरविले. त्याच सुमारास ग्राहक चळवळीतला आमचा एक खंदा कार्यकर्ता भास्कर मोहिते याचे निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्याच्या निमित्ताने जमल्यावर, पुन्हा एक होऊन काम वाढवूया अशी सगळ्यांनी इच्छा प्रगट केली. आम्हा जुन्या कार्यकर्त्यांना त्याचा आनंद झाला. पूर्वी माझ्या जागेत ग्राहक  पंचायतीच्या साप्ताहिक व अन्य बैठका होत असत. ती प्रथा पुन्हा सुरू करायची  ठरल्यावर माझी जागा मी आनंदाने देऊ केली.

सुवर्ण महोत्सवाचे वर्ष साजरे करायचे हे वरून ठरले असावे, त्यानुसार महाराष्ट्र प्रांतात काही ठिकाणी त्या महोत्सवाचा प्रारंभ म्हणून समारंभ आयोजित केला, तोही कानावर आला. ज्या गोष्टी ग्राहक पंचायतीने पूर्वीपासून दूर ठेवल्या होत्या, त्याच गोष्टी या महोत्सवात आल्याचे दिसले. झांजपथक बँडबाजा वगैरे लावून गावातून मिरवणूक काढणे, हे आपल्याच नागरिकांना त्रासदायक होते ही स्वच्छ गोष्ट दिसत असताना तशाच महोत्सवी कृतींचा अवलंब करण्याने या नव्या स्वरूपाबद्दल अजूनही मनात शंका व खंत वाटते. परंतु नव्या काळाचे नवे वळण या चळवळीला कसे मिळते हे पाहणे, इतकेच तूर्त आमच्या हाती आहे. खरे संघटनात्मक काम बाजूला राहता कामा नये असा आपल्या परीने प्रयत्न करायला हवा!.

□□□

□

# इस्टेट डेव्हलपर्स

सांगलीतील प्रसिध्द साखर–व्यापारी पोपटलाल शिवराम शहा हे आमचे ग्राहक होते, म्हणजे त्यांचे टॅक्सचे काम आमच्याकडे असे. त्यांचा मुलगा अरुण शहा एके दिवशी काही कामासाठी आमच्या ऑफीसला आलेला असताना त्यांच्याशी सहज बोलत बसलो होतो. त्यांनी स्वतंत्रपणे जमीन खरेदी–विक्रीचा व्यवसाय सुरू केला होता. त्याबद्दल गप्पा मारताना त्यांनी आपल्या व्यवसायात येण्याचा प्रस्ताव माझ्यापुढे मांडला. नंतर त्यावर बरीच चर्चा झाली आणि मी त्यांच्याकडे कुपवाड भागात एक प्लॉट पहिल्यांदाच विकत घेतला. लवकरच आाम्हा दोघांच्या भागीदारीत 'शहा लुल्ला इस्टेट डेव्हलपर्स' अशी फर्म आम्ही १९८६ साली स्थापन केली. सांगलीजवळ तानंग येथे सामाणीनगर हा आमचा पहिला प्रकल्प होता. माझे एक सन्मित्र श्री.उदय परांजपे यांची सांगलीनजिक सावळी हद्दीत पडीक माळरान जमीन होती, ती आम्ही नंतर विकसित करायला घेतली. त्यास 'अमेयनगर' असे नाव दिले. एवढी मोठी स्कीम सांगली भागात तरी नवीन होती. त्याशिवाय सामान्य प्लॉट–खरेदीदारास त्रासाची वाटणारी कटकट म्हणजे शासकीय कागदपत्रे. खरेदीपत्रापासून त्या जमिनीच्या परवानग्या, त्याचे उतारे– दाखले, नक्कला, नावांच्या नोंदी असे सगळे कागद एका छान फाईलमध्ये घालून तयार देण्यात आले. त्यामुळे प्लॉटधारक एकदम खूश होऊन गेले. त्यापुढे आम्ही ती पध्दतच रूढ केली. त्यासाठी खरेदीदार चार पैसे जास्तीचे देण्याला आनंदाने तयार असत हा अनुभव आम्हाला बरेच शिकवून गेला. या सर्व कामात श्री.अरूण शहा हे फार तरबेज आणि तत्पर! माझ्या दृष्टीने ते एक सच्चा भागीदार होते.

'शहा लुल्ला इस्टेट डेव्हलपर्स' ही फर्म स्थापन झाल्यावर आमचा तिसरा

प्रकल्प महत्वाकांक्षी ठरला. कुपवाड गावाकडे जाण्याच्या मार्गावर डाव्या हाताला लड्डा कुटुंबियांची ३२ एकर ओसाड जमीन होती. झुडुपांनी भरलेले हे रान आम्ही घेतले आणि तिथे उत्तम अशी नागरी वसाहत (टाऊनशिप) उभी करण्यासाठी काम सुरू केले. त्या काळात प्लॉट विकणे म्हणजे जमीन बिगरशेती करायची आणि हद्दीचे दगड मांडून प्लॉट्स विकायचे अशीच पद्धत होती. सातारा सांगली कोल्हापूर या भागात वस्ती वाढत होती, पण असे प्लॉट देता-घेतांना शासन दरबारात खूप कटकटी व्हायच्या, लोकांना हेलपाटे घालावे लागायचे. नंतर त्या जागेला पाणी वीज मिळण्यासाठी तसाच त्रास व्हायचा. आजच्या धावपळीच्या जगात प्लॉट घेणाऱ्यांना हे सगळे करण्याला वेळ नसतो, त्या झगझगींचा अनुभव नसतो. हे लक्षात घेऊन आम्ही आमची परिपूर्ण विकसनाची पध्दत राबवली. त्या संपूर्ण जागेचा ३७५ प्लॉटस्‌सह आराखडा तयार करून घेतला. त्यासाठी खूप भांडवल घातले. त्या कामांत अर्बन लॅन्ड सिलींग, पुढाऱ्यांच्या संस्थांचे रिझर्वेशन यांचा बराच त्रास झाला. मंत्रालयाच्या अनेक वाऱ्या केल्या आणि शेवटी यश मिळालेच. श्रम आणि चिकाटीला पर्याय नाही याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्या प्रकल्पास बालाजीनगर नाव दिले.त्यात खेळाचे मैदान, बगीचा, गणपतीचे देऊळ, प्रवेशद्वार हे तयार केले. शिवाय डांबरी रस्ते, विजेचे खांब, पाणीपुरवठ्याच्या जोडण्या अशा सगळ्या सोयी आधी तयार केल्या. विकसित केलेल्या जागेकडे पाहिल्यावर कुणीही मोहात पडावे अशी सारी ऐश करून टाकली, आणि मग आमच्या 'बालाजीनगर'च्या उद्‌घाटनाचा बेत आखला. त्याच दिवशी प्लॉट विक्रीचा शुभारंभ करायचा होता. या सुंदर वसाहतीत केवळ ७० रुपये चौ.फूट या दराने प्लॉट देण्याचे ठरविले होते. खरेदीपत्र झाले की त्या ग्राहकाच्या हातात त्याच्या मालकीचे सगळे उतारे आणि कागदपत्र द्यायचे, की जेणे करून त्याला पुन्हा सरकारी ऑफीसांची पायरी चढायला लागू नये.

आम्ही बऱ्यापैकी जाहिरात केली त्यासाठी जी बहुरंगी माहितीपत्रके(ब्राऊचर्स) छापली त्यात प्रारंभी एक वाक्य होते, 'ईश्वराने जमिनीची नवनिर्मिती बंद केली आहे. उशीर होण्याआधी प्लॉट खरेदी करा-' प्रकल्प उद्‌घाटनाचा डौलदार कार्यक्रमही ठरविला. पहिल्याच दिवशी सव्वा कोट रुपयांची विक्रमी विक्री आम्ही केली. मला आनंदाश्रू आले, ते आमच्या साऱ्या परिवाराने पाहिले. ही योजना केवळ पैशाच्या दृष्टीने यशस्वी झाली असे नाही तर त्या

भागातील एक आदर्श योजना म्हणून तिच्याकडे पाहिले जाऊ लागले. वालचंद कॉलेजच्या सिव्हील इंजिनियरिंग विद्यार्थ्यांसाठी 'आदर्श टाऊनशिपचा प्रकल्प कसा असावा' हा विषय देऊन आमची योजना अभ्यासाला दिली होती. पर्यावरणाच्या दृष्टीने आम्ही तिथे हजारो झाडे लावली. त्या हद्दीत आता सुमारे २०० घरांची वस्ती असून, त्यावेळी ७०रुपये दराने दिलेल्या प्लॉट्सचा दर आज ३००० रुपयांवर गेला आहे. आजही मी कधी त्या रस्त्याने निघालो तर माझी मान आपोआप बालाजीनगरकडे वळते, आणि माझी पाठ मीच थोपटून घेत ती मान आणखी ताठ करतो.

त्यानंतर अरुण आणि मी, आजच्या भाषेत 'मागे वळून पाहिलेच नाही'. पाठोपाठ आम्ही अनेक लोकांशी करारमदार करून अनेक प्रकल्प उभारत गेलो. आरवाडे पार्क, सिध्दीविनायकनगर, श्रीनगर, इंद्रप्रस्थ, श्रीनाथनगर, परांजपे पार्क, महादेवबाग, टी के एन्व्हेरॉन, शहा लुल्ला प्लाझा, शहा लुल्ला महानगरचे चार टप्पे, एस. ए. मगदूम इंडस्ट्रीयल पार्क, व्हिस्परिंग वुड्स अशा नावांचे प्रकल्प साऱ्या सांगली परिसराचे लक्ष वेधून घेऊ लागले. आम्हाला चांगला लौकिक मिळाला आणि चांगले पैसेही मिळाले. निर्वेध, निर्जोखमी, क्लीअर टायटल असणारे हजारो प्लॉट्स आम्ही लोकांना उपलब्ध करून दिले. तीसएक वर्षांत कोट्यवधींचा व्यवहार केला पण कोणाही ग्राहकाशी कधी तंटा झाला नाही. याचे बरेच श्रेय मी माझा भागीदार आणि सन्मित्र अरुण यास देईन.या व्यवसायाला सांगलीच्या परिसरात उत्तम नावलौकिक मिळाला. आम्ही विकसित केलेल्या त्या अनेक वस्त्या-वसाहतींमध्ये लोकांनी आपापली घरे बंगले उभारले आहेत. तिथून जाताना माझ्या मनात कुठेतरी सुखानंदाचे तरंग उठतात. त्या लोकांपैकी काहीजण मला व्यक्तिश: ओळखत नसतील, पण मला त्यांच्यात उगीचच आपुलकीचा भास होतो. इतक्या साऱ्यांना आपण पाऊलभर जमिनीचा निर्वेध तुकडा उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांनी त्यावर निवारा केला, अशी एक जाणीव होऊन अंत:करणात शीत लहर झुळुकते. या व्यवसायाचे लाभ मला मिळालेच, पण त्यासाठी धडपडी-खटपटी कमी नव्हत्या. कितीतरी अडीअडचणी आल्या. एखाद्या मोकळ्या जमिनीवर शासनाचे आरक्षण अचानक उगवते; अशा जमिनींत भ्रष्टाचाराचे कुरण खूप फोफावते, त्यातून वाट काढत जावे लागते. काही हितसंबंधी गट किंवा 'नेत्यां'ची दखल न घेतल्याचा राग म्हणून त्या संबंधात विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करण्यापर्यंत

मजल गेली. अशा अडचणींचा विचार आम्ही अगोदर कसा करणार? पण न डगमगता पाऊल टाकत गेलो, तर पुढची वाट गवसत जाते. हे खूप मेहनतीचे, अभ्यासाचे, जिकिरीचे काम समर्थपणे पार पाडले. आपल्याकडे जमिनींचे व्यवहार महाकिचकट बनले आहेत. त्यातून जात असताना खूप अनुभव गोळा झाले, माणसे पाहायला मिळाली, माहिती झाली. त्या साऱ्याचा उपयोग.....- आता निवृत्तीनंतरच्या चिंतनासाठी नक्कीच होईल!

या धंद्याने मला जे काही मिळाले त्यात अरुण शहा यांच्यासारखा माणूस, ही मोठीच प्राप्ती आहे. त्यांच्याकडून मी बऱ्याच गोष्टी नकळत शिकलो. अचूक माणूस म्हणून बिनधास्त कुणावर विश्वास ठेवायचा तर ते म्हणजे अरुणभाई! पैशाचा व्यवहार तर इतका इतका काटेकोर की मला काही वेळी हसू यायचे. उदाहरणार्थ मी त्यांस ५७९९६ रुपये द्यायचे असतील तर सहजावारी ५८००० पाठवले जायचे; अरुणभाईंकडून नंतर तासाभरात एका कागदाच्या पुरचुंडीतून ४रुपयांची नाणी परत यायची. गेली कित्येक वर्षे आम्ही दर सोमवारी दुपारी एकत्र बसतो. त्यात कोणत्याही कारणाने व्यत्यय आला असे अगदी क्वचितच घडले असेल, नियम कधी चुकलेला नाही. जेव्हा कधी अडचण असेल तेव्हा पुरेशी पूर्वकल्पना दिली जातेच. कोणत्याही बाबतीत कठोर आणि काटेकोर नियोजन करावे तर ते अरुणनीच. इतकी नियोजनी आणि दिला शब्द पाळणारी व्यक्ती मला तरी ती एकच भेटली.इतर कित्येक मित्र जिवाला जीव देतील, वेळेला धावून येतील, वेळ पाळतील, पण व्यवहारातील इतका चोखपणा सहसा दिसत नाही. आज 'शहा-लुल्ला' या नावाला जमीन विकसनाच्या क्षेत्रात महाराष्ट्रात एक वजन प्राप्त झाले आहे.

पन्नाशी उलटून गेली, पण माझी बुद्धी अजून किंचितमात्र क्षीण झालेली नाही. हे वय वास्तविक आयुष्यातील चढाचे असते. मुलामुलींची लग्ने, घराची उभारणी, आईवडिलांची जबाबदारी , आपल्याला एखादी व्याधी, आणि आपल्या उतरत्या वयाची चिंता... अशा कारणांनी ताणतणाव वाढत असतो. पैशाची फिकीर असते. पण त्या सर्व बाबतीत माझे वेगळेपण होते. यांतल्या कुठल्याच गोष्टीची मला चिंता करण्याजोगे त्यावेळी काहीच नव्हते. जमीन विकासाच्या धंद्यात चांगले पैसे मिळाले होते, मुलं त्यांच्या त्यांच्या संसारात दंग होती. मला आणखी पैसे मिळविण्याची आस नव्हती, कारण गरजेइतकी बेजमी झाली होती. माझा एक ज्येष्ठ मित्र म्हणायचा की, पैसा जरी गरजेपेक्षा जास्त झाला तर त्याचे प्रदूषणच होते. म्हणून मी 'आता

पुरे' या निर्णयाशी आलो होतो. कोणाही व्यवसायिकाच्या दृष्टीने हा निर्णय अजबच होता. कारण एव्हाना सर्व अंगांनी आमचा व्यवसाय भरात होता. आमचा भागीदार अरुण शहा मला तसे मोकळे सोडण्यास तयार नव्हता. ''आजपर्यंत आपण मेहनतीने आणि पैशाची गुंतवणूक करून धंदा यशस्वी केलाच आहे, पण आता फारसे श्रम न करता याची फळे मिळणार आहेत'' असे त्याचे म्हणणे होते. याला धंद्याच्या भाषेत 'गुडविल एन्कॅश करणे' असे म्हणतात.

मी मात्र त्या व्यवसायातून थांबण्याच्या माझ्या निर्णयाशी ठाम होतो. म्हणून प्लॉट्‌सचा हा व्यवसाय थांबविण्याचे मी नक्की केले. इतकेच नव्हे तर दुसरा कोणताही पर्यायी व्यवसाय करण्याचे माझ्या मनातही येत नव्हते. त्यावेळी गावातील उदय परांजपे यांच्या जागेतील 'रॉयल ग्रीन्स' या भल्या मोठ्या स्कीमचे काम सुरू झालेले होते. कोटीभर नफा मिळण्यासारखा होता, परंतु त्याचाही मोह न ठेवता, झालेले करारपत्र माझ्या खर्चाने मोडून मी बाहेर पडलो. नंतरच्या काळात माझे मित्र दिलीप पाटील यांच्या सहकार्याने सांगली परिसरात बऱ्याच ठिकाणी शेतजमिनींमध्ये मी गुंतवणूक करून ठेवली. तसेच गगनबावडा येथे अरुण शहा, प्रमोद चौगुले, आराध्ये, आर.टी. चौगुले, संबर्गी यांच्यासोबत सुमारे दीडशे एकर डोंगराळ जमीन विकत घेतली; नंतरच्या काळात ती विकूनही टाकली. काही दिवसांनी सागर फडके, दिलीप जोगळेकर आणि मल्हारपेठचे प्रकाश पाटील यांच्या सहकार्यातून पाटण तालुक्यात काठी येथे शंभर एकर जमीन घेतली. ती पद्धतशीर विकसित करून ठेवली, त्याला 'कोयना ग्रीन काऊंटी' असे नाव दिले आहे. त्याच्याच बाजूला बरीच जमीन मी घेऊन ठेवली.

माझ्या आधीची पिढी सिंधू काठावरून परागंदा झाली आणि पाऊणशे वर्षांपूर्वी निर्वासित म्हणवून घेत कृष्णाकाठी आली. याच प्रदेशात मला जमीनजुमले घेऊन ठेवण्याचा एक नादच लागला. त्याचा परिणाम असा की काळपालट झाल्यावर मी निर्वासिताचा जमीनदार झालो.

□□□

□

# चळवळींचा विचार

ग्राहक पंचायतीच्या कामांतून अर्थव्यवहार, प्रशासन, संघटन, कार्यकर्ते, मानवी स्वभाव, विचारप्रणाली वगैरे बऱ्याच गोष्टी कळल्या. त्या अनुषंगाने ग्राहक चळवळीशी संलग्न म्हणावे, अशा काही कामांत मी लक्ष घालू लागलो. तसे पाहता ग्राहक चळवळ ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करतच असते. त्यामुळे स्वदेशी चळवळ असो किंवा माहितीचा अधिकार असो; रोटरी असो किंवा शिक्षणक्षेत्र असो; मला त्या त्या कामात भाग घेताना, नव्याने बरेच समजून घ्यायला हवे असे काही नव्हते.

वास्तविक मला माझ्या तरुण वयापासून विदेशी वस्तूंचे खूपच आकर्षण होते. इतकेच नव्हे तर कॉलेजच्या वर्षांत असताना, आपण परदेशी जाऊन स्थायिक होण्याचे मला डोहाळे लागले होते. आमचा मुंबईशी घरोबा असल्यामुळे, गोतावळ्यातील सगळे वातावरण फॉरेनच्या प्रेमातलेच होते. भारताविषयी मनातून परमादर व भक्ती होती, पण त्याचा स्वदेशी वा स्वदेशातील प्रश्नांशी काही संबंध असतो हे आमच्या मंडळींना कळतच नसावे. आपण भारीपैकी जगावे, त्यासाठी भारीपैकी पैसे मिळवावेत असा सरळ मामला होता. त्यामुळे स्वदेशीची चळवळ आमच्या घरात पोचण्याचा आजवर फारसा प्रश्न नव्हता; पण माझ्यासोबत सामाजिक कार्यात असणारे काहीजण साधेपणा, सोज्वळपणा यांमुळे स्वदेशीचे 'स्पिरीट' नेमके जाणून असत.

राजीव दीक्षित या नावाचे एक वादळ त्या काळात आम्ही अनुभवले. हा तरुण व अत्यंत सीधा साधा गडी आय आय टी चा पदवीधर होता, आणि सॅटेलाईट इंजिनियर म्हणून अमेरिकेत काम करीत होता. तिथली लठ्ठ पगाराची नोकरी सोडून ते भारतात परत आले होते, आणि विदेशीचे अर्थशास्त्रीय मायाजाल समजावून सांगत जनजागरणाची चळवळ करीत होते. त्यांचे वक्तृत्व अमोघ होते, गाढा अभ्यास होता, अफाट क्षमता होती. एकेका दिवसात तीनतीन तासांच्या तीन सभा ते तितक्याच

तडफेने घेत असत. अक्षरशः हजारो श्रोते त्यांचे हिंदी भाषण जिवाचा कान करून ऐकत असत. विदेशी कंपन्यांचे मायाजाल आणि स्वदेशी वस्तूंची अफाट गुणवत्ता ते पटवून देत असत. भारतीय जीवनपद्धतीवर त्यांची आत्यंतिक निष्ठा होती.

मला त्यांच्या साऱ्या वागण्याची, सांगण्याची मोहिनी पडली. एकएक करत आमच्या घरी सारे वातावरण बदलून गेले. कोलगेट- बाटा - हिंदुस्थान लीव्हर या कंपन्यांबद्दल घरात तिरस्कार व्यक्त होऊ लागला. मला त्या सर्व विचारांचे भारलेपण जाणवत होते. माझ्या सहकारी कार्यकर्त्यांशी बोलताना मात्र असे कळून यायचे की, त्यांच्यापैकी कित्येक घरांमध्ये त्या प्रकारच्या उत्पादनांचा वापर कधी होतच नव्हता. त्यांना स्वदेशीचे हे आंदोलन वेगळे काही वाटतच नव्हते. माझा व माझ्या घरच्यांचा त्या घरांशी संपर्क वाढत गेला, तसतसे मला त्या मित्रांच्या घरांतील आत्यंतिक साधेपण लक्षात येऊ लागले. स्वदेशीबद्दलची पत्रके, गाणी, कॅसेट्स, चर्चा, प्रश्नोत्तरे यांनी आमचे घर भरून गेले. कुणाच्या घरी गेलो की पेस्ट कुठली आहे, असे आमची मुले उघड विचारू लागली. घरी कुणी आले की त्याच्या चपला पाहून ''पपा, बाटा म्हणजे विदेशी ना?'' असे निरागसपणे मोठ्याने विचारत. त्या वातावरणाशी माझा त्या वेळपर्यंत फार जवळून संबंध आलेला नव्हता. त्यामुळे आमच्या घराला स्वदेशीचे वळण लागले हे माझ्या दृष्टीने फारच मोठ्या बदलाचे लक्षण होते. 'स्वदेशीची चळवळ' म्हणजे 'स्वदेशाची चळवळ' असे म्हणतात ते माझ्या बाबतीत अगदी खरे आहे.

ग्राहक चळवळीच्या प्रवाहात वाहात असतानाच आणखी एक समांतर विषय अभ्यासात आला. तो म्हणजे 'माहितीचा अधिकार'. ऑक्टोबर २००५ मध्ये माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आला. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना गोपनीय शासकीय कारभाराची द्वारे खुली झाली. विक्रीकर खाते, नगरपालिका, बँका, सब रजिस्ट्रार, पतसंस्था, विद्यापीठे, राज्य व केंद्र सरकार अशा ठिकाणी त्या कायद्याचा वापर करून मिळणारी माहिती लोकांसाठी उघड करण्यास आम्ही सुरुवात केली. साऱ्या जनतेत जागृती होऊन त्या कायद्याचा वापर करण्याची पध्दत लोकांना समजावी यासाठी आम्ही अनेक अभ्यासवर्ग घेतले. 'इंडियन एक्स्प्रेस'चे प्रकाश कर्दळे यांनी त्या वृत्तपत्रातून खास स्तंभ या विषयावर चालविला होता, त्यात सांगलीतील आमच्या कामाचा वृत्तांत सविस्तर प्रसिध्द झाला. त्यांच्याच उपस्थितीत सांगलीच्या रोटरी हॉलमध्ये आम्ही कार्यशाळा घेतली, त्यात जिल्हाधिकारी नितिन करीर सहभागी झाले होते. अशा अनेक कार्यशाळा व त्याविषयी मार्गदर्शन केंद्र चालवून हा विषय आम्ही

जागता ठेवला होता.भास्कर मोहिते, प्रकाश फडके हे त्यासाठी खूप काम करीत.

लोकांत अशा चळवळींचा प्रसार प्रचार करण्यासाठी पुस्तिका व इतर साहित्य छापून प्रसिध्द करण्याचा खूप उपयोग होतो. ग्राहक चळवळ, स्वदेशी, माहितीचा अधिकार इत्यादी विषयांवर कित्येक पुस्तिका - हस्तपत्रे - विशेषांक आम्ही काढले. त्यासाठी जाहिराती मिळवणे, प्रायोजक गाठणे, आणि त्यातले काही जमले नाही तर स्वतः पैसे घालणे हे काम मला कठीण वाटत नसे. व्यापारी व व्यवसायिकांशी संबंध असल्याने मला सहसा नकार मिळत नसे, आणि अशा सार्वजनिक कामासाठी धडधडीत पैसे मागण्यास मला लाजबीज काही वाटत नसे. त्या साहित्यासाठी लेखन व माहितीचे संकलन करण्याच्या निमित्ताने माझा बराच गृहपाठ होत असे. पण प्रत्यक्ष ओघवते लेखन करणे माझ्या आटोक्याबाहेरच होते. तिथे वसंत आपटे यांचे कौशल्य असे. कोणत्याही कार्यासाठी एकत्रित येणारा असा मित्रगट, ही माझ्या आयुष्याला फार मोठी देणगीच आहे. मधल्या काळात सांगली रोटरी क्लबचा मी सदस्य झालो, काही काळ पदाधिकारी होतो. आमच्या क्लबला वेगळीच शिस्त आणि क्रियाशीलता होती. रोटरीने एका वर्षी ग्राहक जागरणाचा विषय आपल्या कार्यपटलावर घेतला, त्या विषयात मी तर अनुभवी रोटेरियन असल्यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा येथील अनेक क्लबमधून जायला मिळाले. इचलकरंजी रोटरीने त्या विषयावर मोठा कार्यक्रम घेतला. हुबळी येथे मी आणि आपटे एका कार्यशाळेसाठी गेलो.

□

सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी समुदाय एकत्र करावा लागतो. 'कार्य' म्हणजे करायला हव्यात अशा गोष्टी; त्या करणारा 'कर्ता' शोधावा लागतो. असे कार्यकर्ते जोडून ठेवावे लागतात. त्या 'माणसां'चे अनेक स्वभाव, हितसंबंध असतात. तरीही कार्याच्या ओढीने माणूस कार्यकर्ता होतो. कार्यकर्त्यांचा कामाचा वेग आणि क्षमता कमीजास्त असणारच. सुरुवातीला माझी इतरांशी बरोबरी करून कुणाला तरी बोल लावण्याचा एक छंद मला लागला होता. त्यावरून कधीतरी बोललो तर कार्यकर्ते दुखावले जात. पण आमच्या आपसातील गप्पा-चर्चा-सहवास, आणि सभ्य शुद्ध आचरण यांतून ही चूक लक्षात येत गेली. सर्वात शेवटच्या कार्यकर्त्याचा जो वेग असतो, तोच संघटनेच्या वाटचालीचा वेग ठरतो. कारण संघटकाने सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जायचे असते हे सूत्र मी लवकरच आत्मसात केले.

या कार्यातून माझे आचार-विचार प्रगल्भ होत गेले असावेत. ज्या देशात आपण

जन्मलो-जगलो-वाढलो, त्या देशाचे -या समाजाचे काही ऋण असतेच. ते फेडल्याशिवाय आपल्याला स्वर्गाची दारे उघडणार नाहीत याची जाण मला ग्राहक चळवळीने दिली. सामाजिक कार्यासाठी पैसा तर लागतोच, पण नुसता पैसा देऊन चालत नाही तर वेळ द्यावा लागतो. -किंबहुना पैशापेक्षाही वेळ देणे जास्त महत्त्वाचे असते, याचा मला अनेक प्रसंगांतून अनुभव आला. 'सामाजिक कार्य म्हणजे लष्कराच्या भाकऱ्या भाजणे' -असे म्हणण्यात थोडी टवाळी असते. परंतु ते चांगल्या अर्थाचे वास्तव आहे. स्वराज्याच्या लष्करातील सैनिकांसाठी घराघरांतील आयाबायांनी भाकरी करून पुरविण्याचे कामही स्वराज्याच्या ऊर्मीला चेतना देत असते. पण त्याचीही हेटाळणी करणारे महाभाग असतातच की!

मनातून मला संघटनात्मक प्रश्न सतावत असल्याने कित्येकदा रात्री अपरात्री माझी झोप उडते. माझ्यापेक्षा कितीतरी मोठे काम करणारी माणसे मला ठाऊक आहेत. त्यांची प्रकृती आणि प्रवृत्ती शांत असते, माझी मात्र चिडचिड होते. बाहेरच्या जगातही माझ्या 'इतक्या' कार्याचा परिणाम दिसत नसे. काही बदल जाणवत नसे. दिलेला शब्द, वेळ, कामातील चोखपणा, नियमितता यांबद्दल माझा आग्रह किंवा हट्टच असतो. इतरांकडून तसे झाले नाही की माझा पारा चढतो.आपल्या मनाजोगे काहीच घडत नाही, प्रामाणिक तळमळ ही गोष्टच नाहीशी झाली आहे, आणि जगात इतके अन्याय घडत असताना सगळे आनंदाने जगत आहेत. त्यांना सगळ्या गोष्टी सहज सोप्या वाटतात, 'पुढचे पुढे पाहता येईल' अशी बेफिकिरी माजली आहे... अशी काहीतरी विचारशृंखला माझ्या आतल्या मनात सतत सुरू झाली होती. शेवटी हे काम सामाजिक आहे हे समजत असल्यामुळे उघडपणे काही बोलता करता येत नाही. माझी आतल्या आत गुदमर होते. प्रत्येक काम माझ्या वेगाने व्हावे असे वाटत असते, ते तसे होत नाही. या चडफडीमुळे खूपदा तब्येत बिघडते. पत्नीलाही बोलणी खावी लागतात, मग तिचीही साखर वाढते. अलीकडे या घायकुतीवर मी खूप नियंत्रण आणले आहे. सारे जग बदलून जाईल अशी अपेक्षा ठेवता येत नाही; आपल्याकडून करायचे ते इमाने इतबारे चांगलेच करायचे. सृष्टी बदलता येत नाही त्यावेळी दृष्टी बदलावी असे म्हणतात ते खरे आहे. पण हे सर्व लक्षात येण्याला बराच उशीर झाला, एव्हाना प्रकृतीच्या तक्रारी सुरू झाल्या, त्या पुढेही चालूच राहिल्या. सामाजिक कार्यांचाही ताण इतका वाढू लागला की त्या सगळ्या दाबदबावाचे रूपान्तर रक्तदाबात झाले आणि रोजची एक औषधगोळी बोकांडी बसली.

□□□

□

# व्यक्तीकडून समष्टी

सप्टेंबर २०१०मध्ये डॅडींचे निधन झाले, त्याआधी काही दिवस आमच्या लग्नाच्या नोव्हेंबरमध्ये येणाऱ्या रौप्यवर्षाचे बेत चालू होते. डॅडी गेल्यानंतर ते सगळे बेत फिसकटले. ते बेत फिसकटण्याचे मला एका परीने समाधानच होते, कारण लग्नाच्या वाढदिवसाला या प्रकारची मौजमजा करणे आता बदललेल्या किशोरच्या विचारांत मनापासून नव्हते. त्या मन:स्थितीत असताना एके दिवशी सकाळी आम्ही आमच्या घरी गॅलरीत चहा घेत बसलो होतो. माझ्या मनात चमकून गेलेली एक कल्पना मी पत्नीजवळ बोलून दाखविली. ती अशी की, ''आपल्या लग्नाच्या वाढदिवसाचा बडेजाव म्हणून आपण मोठाच खर्च करणार होतो, तसे करणे डॅडीना तरी आवडले असते का याची शंकाच आहे. त्यांचे पुण्यस्मरण म्हणून आपण सामाजिक कार्याला मोठीशी देणगी देऊया का?'' सोनू नाही म्हणणार नाही असे मला वाटतच होते, पण तिने दिलेला प्रस्ताव ऐकून मीही पाच मिनिटे स्तब्ध झालो. ती म्हणाली की, ''लग्नाला पंचवीस वर्षे होतात तर त्या निमित्ताने पंचवीस लाख रुपयेच देऊया की!'' मला दोन मिनिटे काही सुचेना. तोवर अमित अमृता आले, त्यांच्याशी हा विषय बोलल्यावर त्यांनी पट्कन आईचे म्हणणे उचलून धरले. त्यांच्या मताने तर अपेक्षेहून जास्त मी त्यांना दिले आहे; आणि यापेक्षा जास्त काही ठेवण्याची गरज नाही. त्यामुळे मुक्तपणे आपण सामाजिक ऋण फेडण्यासाठी हात सढळ करूया. असे म्हणणारी बायको-मुले समोर पाहून कोणत्या बापाचे डोळे ओलावणार नाहीत? बस्स! संस्कारांचे मोजमाप करणारी मोजपट्टी असत नाही, पण ते यापेक्षा काही वेगळे असतात का? मी तरी त्यांच्यासाठी संस्कार संस्कार म्हणून वेगळे काय केले होते?

विचारांच्या गुंत्यात फारसे न अडकता मी २५ लाख रुपये दान करण्याचे

ठरविले. माझे सारे नियोजन पक्के असले तरीही वास्तविक माझ्याजवळ अशा कारणासाठी वेगळी काही तरतूद केलेली नव्हती, त्यामुळे त्यावेळी तरी तो घास जरा मोठाच होता. शिल्लक किंवा इतर रक्कम कुठे ना कुठे गुंतविलेलीच असते ना! पण मला आजवर अनुभव असाच आहे की, 'सत्य संकल्प' असल्यामुळे मी जेव्हा अशी मोठी रक्कम सत्कार्याला द्यायची ठरवतो, तेव्हा जरा पुढेमागे करून ती जुळणी होते, संकल्पसिद्धी होते.

सामाजिक स्वयंसेवी संस्था हा माझ्या मनांतला हळवा कोपरा आहे. अशा सेवाभावी संस्था आणि व्यक्ती निवडून त्यांना अर्थसाहाय्य करावे असे योजिले. पुढच्या दहाबारा दिवसांतच सारी तयारी केली. आपटे, तेलंग यांच्याशी विचाराने खऱ्याखुऱ्या चांगल्या संस्थांची यादी केली, त्यांच्यातून निवड करून त्यांना निमंत्रणे दिली, वसंत आपटेकडून या प्रकल्पास 'अर्घ्यदान' असे समर्पक नाव सुचविण्यात आले, ते सर्वांना खूप आवडले. त्यात विनिता तेलंगची मदत झाली. समाजाच्या प्रवाहातून आपल्या हाती आलेल्या पैशाची ओंजळ, त्या प्रवाहात उभे राहून पुन्हा समाजालाच अर्पण करण्याचा आशय व्यक्त करणारे बोधचिन्ह व ही संकल्पना लोकांना एकदम भिडली. माझ्या पध्दतीनुसार अर्घ्यदान समर्पणासाठी एक खास समारंभ आयोजित करण्यात आला. आम्हीच उभारलेल्या 'व्हिस्परिंग वुड्स' या वसाहतीच्या रम्य परिसरात रा.स्व.संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य आणि ग्राहक पंचायतीचे पालक मा.श्रीकान्तजी जोशी हे त्या कार्यक्रमास उपस्थित होते. सांगलीत असलेले मेघालयातील मुलांचे वसतिगृह नव्या जागेत उभारले जात होते, त्यासाठी काही लाख रुपये, आणि अन्य संस्थांना योग्य तितक्या रकमा ठरविण्यात आल्या, आमच्या मित्रांच्या म्हणण्यानुसार केवळ दोनतीन प्रातिनिधिक देणग्या या कार्यक्रमात द्यायच्या, आणि बाकीच्यांना नंतरच्या चार आठ दिवसांत आपण त्यांच्याकडे जाऊन चेक अर्पण करायचे असे ठरले. त्याप्रमाणे योजना केली. नव्वद संस्थांना प्रत्यक्ष भेटून देणगी रक्कमेचे पाकीट, व एक फूल त्यांच्याकडे देऊन नमस्कार करायचा. हा सगळा अनुभव खूप काही सांगून गेला. 'देणाऱ्याला मोठेपण नाही आणि घेणाऱ्याला लीनता नाही' या भावनेला फार मोठा अर्थ असल्याचे आम्हा कुटुंबियांना समजून आले.

नंतरच्या काळात आमच्या एकूण आर्थिक स्थितीचा आढावा मी घेतला. लक्षात असे आले की, जमिनींचे व्यवहार करताना मी प्रत्येक प्रकल्पात स्वत:साठी प्लॉटस्

ठेवले होते. त्यांच्या विक्रीतून दरवर्षी एवढी रक्कम आपल्याला देता येईलच, उलट त्यात एकएक लाखाची भर घालता येईल. जेवढा लग्नाचा वाढदिवस तेवढ्या लाखाची देणगी. पुढच्या तीन-चार वर्षांत तसा धडाकेबाज उपक्रम मी सुरू केला, आणि सुरू ठेवला. लग्नाचा वाढदिवस अथवा तत्सम डौलदारीला आता वेगळा पैलू मिळाला. हे अर्घ्यदान माझ्या आयुष्यातील शेवटच्या सूर्यास्तापर्यंत चालू राहील असे वाटते.

ज्यांच्याकडे माझ्यापेक्षाही जास्त आर्थिक ताकत आहे अशा कित्येक व्यक्ती मला ठाऊक आहेत. त्यांनीही 'तुला मोठीच दानत आहे बाबा-' असे कौतुक केले; तर त्यांपैकी काहींनी '-हे फक्त तूच करू शकतोस..' असे म्हणून स्वतःची जबाबदारीतून सोडवणूक करून घेतली. अर्थात हा ज्याचा त्याचा विचार आहे, त्याबद्दल मी माझीच पाठ थोपटून घेण्यात अर्थ नाही.

कित्येकजण आपापल्या शक्तीबुध्दीनुसार दान-देणग्या देत असतात. काहीजण त्याचा उच्चारही करत नाहीत. भरपूर कमाई करून मग त्यातून देणग्या देणे हा एक प्रकार आहेच, परंतु काहीजण त्यांना शक्य असूनही समाजाकडून हेतुतः फारसे काही कमवत नाहीत पण त्यांच्या ताकतीने देणग्या देतात, त्यांची दानत कमी का मानावी? कित्येकांनी तर सारे आयुष्यच समाजासाठी दिलेले असते, त्यांची दानत कशी मोजावी? संतमहात्मे विरक्त जगतात, त्यांनी या समाजाला जे दिले ते रुपयांच्या मोलाने कसे मोजायचे! माझ्या मते दानत अशी जन्मजात असत नाही, ती संस्कार आणि अनुभव यांतून येते. पैसे मिळवत आणि साठवत जाण्याच्या मोहापायी माणसाच्या अंगात दानत प्रवेशच करू शकत नाही. माझी जी काही गरज माझ्या हिशेबाने ठरविली असेल तितका पैसा कमावून, ती गरज भागल्यावर त्यापेक्षा जादा पैसा माझ्या काय कामाचा? -असा काही विचारही करण्याचे धाडस माझ्या परीघातील कोणी करत नाही हे तितकेच खरे ! सुदैवाने मी ते धाडस करू शकलो. हे विचार जेव्हा आम्हा मित्रांच्यात व्यक्त होत तेव्हा मलाही वेगळी दिशा गवसल्याचा आनंद होत असे.

□

दुसऱ्या वर्षी समर्पणासाठी जरा वेगळा विचार पुढे आला. आतापर्यंत मी ज्या ज्या कामांत भाग घेतला, त्यावरून जाणवत होते की, सामाजिक काम करणाऱ्या

संस्था व त्यांचे कार्यकर्ते आपापल्या परीने झगडत असतात, त्यांना समाजासमोर येण्याची पुरेशी संधी मिळत नाही. त्यांच्याबद्दल लोकांनाही माहिती नसते. उलट पुष्कळांना सामाजिक कामासाठी काहीतरी दान देण्याची मनातून इच्छा असते, परंतु त्यांना आपले दान सत्पात्री होईल अशा संस्था सापडत नाहीत. म्हणून त्या दोन्हींचा मेळ घालण्याचा प्रयोग आमच्या अर्घ्यदान कार्यक्रमात केला, तोही छान जमला. त्या 'सेवा २०११' या नावाच्या कार्यक्रमात त्या वर्षी २६ लाख रुपये मी दिले. सांगलीच्या माजी जिल्हाधिकारी लीना मेहेंदळे, आणि राज्याचे पोलीस महासंचालक अनामी रॉय त्यावेळी उपस्थित होते. नंतरच्या वर्षी कलाविष्कार २०१२ असा कार्यक्रम घेतला. आडबाजूला राहून धडपड करणाऱ्या कलावंतांना म्हणजे एकांड्या शिलेदारांना, छोट्या उत्पादकांना त्यांची कला उपक्रम व वस्तू सादर करण्यासाठी स्टॉल्स मांडून देण्यात आले. त्यांच्या छोट्या उत्पादनांची खूप मोठी विक्री झाली. शिवाय बरेच स्वयंस्फूर्त कार्यकर्ते सापडले. अनेकांना परस्पर देणग्या प्राप्त झाल्या. त्या प्रदर्शनाचे उद्घाटन श्रेष्ठ कलाकार बाबासाहेब पुरंदरे यांनी केले. शिवाय त्यात भीमराव गस्ती, अपर्णा रामतीर्थकर, नसीमा हुरजूक इत्यादींचा सत्कार करून त्यांना अर्घ्य अर्पण करण्यात आले.

सेवा २०१३ हा त्याच धर्तीवर आयोजित केलेला दोन दिवसांचा भरगच्च मेळावा होता. त्यात तर राज्यभरांतून दीडशे सेवाभावी स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या. त्यात आमदार बच्चू कडू, विवेक घळसासी, अनिकेत(विकास) आमटे, विनय सहस्त्रबुद्धे यांनी खास सत्रे घेऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण आवश्यक असते, ते उपलब्ध झाले. राज्यभरातील असंख्य कार्यकर्त्यांपर्यंत 'सेवा' आणि 'अर्घ्यदान' यांमागील संकल्पना आम्ही पोचवू शकलो; यापेक्षा मोठा आनंद तो कोणता? अशा अनेक संस्थांचे कार्य आमच्या प्रयत्नांमुळे प्रसिद्धी माध्यमांतून समाजापुढे आले. या सर्व खटाटोपातून कित्येकांना प्रेरणा मिळेल हे आम्हाला अपेक्षित होते. माझ्या क्षमतेनुसार दरवर्षी काहीतरी रक्कम देत राहणे, एवढे मला सहज करता आले असते. पण आपल्या दानधर्मापेक्षा अशा संस्था-संघटना-कार्यकर्ते आणि एकंदर समाज या सर्वच घटकांना दिशा मिळावी, प्रोत्साहन मिळावे, त्यांच्या समस्यांची चर्चा व्हावी, अनेकजणांचे अनेक हात पुढे यावेत, सामजिक कार्याबद्दलची मानसिकताच

बदलावी अशा उद्देशांनी साऱ्या कार्यक्रमाची आखणी करण्याचे माझे प्रयत्न होते. त्यास बऱ्यापैकी यशही मिळत होते. अनेकांनी मला स्वत:ची एखादी मोठी शिक्षणसंस्था वगैरे उभारण्याचा सल्ला दिला. अर्थातच मी त्याला स्पष्टपणे नकार दिला. स्वत:ची संस्था उभारून चेअरमन म्हणून घेण्यापेक्षा शेकडो सेवाभावी संस्थांना मदत करून सेवक म्हणून घेणे अधिक योग्य.

□□□

□

# सासऱ्याच्या भूमिकेत

अमितचा जन्म १९८६चा, म्हणजे तो आता पंचविशीत आला. गेली आठ दहा वर्षे तो ऑफीसात येतो, चांगला सरावला. आता व्यवसायात छान रमू लागला, आणि तो स्वतंत्र निर्णय घेऊ लागला आहे. टॅक्सेशनच्या कामाची त्याने हळूहळू माहिती करून घेतली होती... एकंदरीत त्याचे स्थिरस्थावर झाल्यासारखे वाटत होते, त्याच्याबद्दल आम्हाला वाटणारी काळजीही पार दूर मागे पडली. तरीसुध्दा अजून त्याच्या लग्नाचा विचार कुणाच्या तोंडून बाहेर पडलेला नव्हता. तोही योग सहजावारी जुळून आला.

सांगलीतील सिंधी समाजातील आमचे एक निकटवर्ती तेजूभाई लालवाणी यांनी स्थळ आणले. त्यांची सून उत्तर भारतातील मथुरेची. तिची सख्खी बहीण लग्नाची होती. तिच्याबद्दल अमितसाठी त्यांनी पहिला प्रस्ताव ठेवला, त्यावर आम्ही जरा सटपटलोच. कारण आम्ही अजून तो विचारच केलेला नव्हता. 'पाहूया कसा योग येतो...., बघूया..., सांगतो...' असे काहीतरी ऐकून घेत तेजूभाई गेले. पण ते सच्चे कार्यकर्तेच! त्यांनी दोन्ही बाजूंकडे असा काही पिच्छा पुरविला की मी, सोनू आणि अमित असे आम्ही तिघेजण ७०हजार रुपये खर्च करून चक्क विमानाने मथुरेला गेलो. तेजूभाईंनी कितीही काही म्हटले असले तरी, जाताना माझ्या डोक्यात सिंधी किडा वळवळत होताच, 'हे स्थळ पसंत झाले नाही तर ७०हजार पाण्यात'... विमानाने गेल्यामुळे 'हवेत' म्हणायचे! परंतु या पहिल्याच भेटीत सगळे जमले. अमित आणि मुलगी गुंजन या दोघांची प्रथमदर्शनीच आँखमिचौली झाली असावी. सर्वांची संमती झाल्यावर लग्न ठरले; आता आमची वरपित्याची आणि वरमायची भूमिका पुढे आली.

गुंजनचे वडील आणि तिचे दोन्ही काका यांनी मला एकट्याला मथुरेतील हॉटेलच्या वेगळ्या एका खोलीत बोलावून घेतले, आणि लग्नासंबंधाने मुख्य प्रश्न पुढे

टाकला, ''देण्याघेण्याचे कसे काय?'' त्यांच्या दृष्टीने पाहिल्यास हा फार महत्वाचा आणि नाजूक विषय, पण माझ्या बाबतीत तो चुटकीसरशी संपणारा होता. त्यात चर्चेचेही खरे तर कारण नव्हते. पण वधूपक्ष म्हणून त्यांनी नीट विचारून घेणे ओघानेच होणार. मी एका वाक्यात सांगून टाकले, ''आमचा निर्णय पक्का आहे, हे लग्न ठरलेच आहे, तुमची मुलगी आमच्या घरात द्यायची आहे, बस्स!'' त्यांच्या मनांत काही शंका राहू नये म्हणून मी खुलासा केला की, ''आपल्या सिंधी समाजात काय आणि कशा प्रथा आहेत त्या मला आणि तुम्हाला सगळ्या माहीत आहेत, त्या सगळ्या बाजूला ठेवा. या लग्नाचा संपूर्ण खर्च आम्ही मुलाच्या बाजूने करणार आहोत. त्यात तडजोड होणार नाही. त्यावर चर्चाही नको''. बैठक दहा मिनिटांत संपली, आम्ही उठलो. बाहेर पडताना त्या तिघांच्या डोळ्यांत पाणी तरळत असलेले माझ्या नजरेतून सुटले नाही.

लग्नाची तयारी सुरू झाली. सारा थाटमाट करण्यात आला. त्यात कुठे साधेपणा वगैरे नव्हता. पण काही पथ्ये मात्र पाळण्याबद्दल आम्ही पूर्णतः दक्षता घेतली होती. साऱ्या सोहळ्यात प्लॅस्टिकचा वापर कटाक्षाने टाळला. शक्य तितके वातावरण पर्यावरणाशी सुसंगत ठेवले. कुठे नासाडी वगैरे होऊ नये याची काळजी घेतली. लग्नाच्या निमित्ताने आहेर अथवा बाकीचे देणेघेणे यात न अडकता एकच देणगी दिली. बामनोली गावच्या डॉ.राम लाडे यांच्या विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान या सेवा संस्थेसाठी, खेड्यापाड्यांत त्यांना फिरता दवाखाना सुरू करता यावा म्हणून एक अँब्यूलन्स त्या संस्थेला लग्नाची भेट म्हणून देण्यात आली. आमच्या घराने जपलेली सामाजिक बांधिलकी सूनबाईला कळावी म्हणून हे आगळे अर्घ्यदान तिच्या ओंजळीने केले. मला इथे हे नमूद केले पाहिजे की, या साऱ्या योजनेला माझी पत्नी सोनू हिचा स्पष्ट आणि निर्विवाद पाठिंबा होता. वास्तविक आपल्या पोराच्या लग्नात बायकांची किती कशी हौस असते, आणि त्या निमित्ताने वधूपक्षाची कशी तारांबळ होते हे आपल्या कानावर आहे, पाहण्यातही असेल. पण सोनूला तसल्या मानपानाच्या कल्पना शिवतही नसत. एकूणात हे लग्न मजेमौजेत आणि दणक्यात पार पडले, आणि गुंजन आमची गृहलक्ष्मी होऊन आली. पर्यावरण जपणारा, प्रदूषणमुक्त लग्नसोहळा म्हणून त्याची खूप चर्चा झाली. 'व्यापारी मित्र' मासिकातून त्याबद्दल कौतुक झाले. □

अमृता ही तर आमच्या सगळ्या परिवारातील लाडकी पोरगी. तीही बीकॉम

एलएलबी झाली, कॉलेजच्या वतीने व्हॉलीबॉल खेळण्यासाठी पाचसहा वर्षांत भारतभर फिरून आली होती. मनस्वी लाघवी अशी ती मुलगी आहे. घरात नवी सून गुंजन हिच्याशी तिने मैत्रिणीचे नाते जोडले. आमच्या घरात उत्तम वातावरण तयार झाले होते. तरी 'अर्थोहि कन्या परकीय एव' असल्यामुळे तिच्याही लग्नाचे पाहायला हवे होते. तिला मोठेपणा, डामडौल यांची मनापासून नावड होती. खेळ आणि शिक्षण यांच्या निमित्ताने तिने बाहेरचे जग पुष्कळ पाहिले होते. तिचा जनसंपर्कही बराच होता. त्यामुळे श्रीमंती थाटमाटापेक्षा साधेसुधे संस्कारित घर हवे, अशी तिची मागणी होती. आमच्या घरी अमृताची मैत्रीण गौरी नेहमी यायची. तिचा भाऊ लग्नाचा होता. दोघे एकमेकास ओळखत होते. पुढच्या गोष्टी फारशा कठीण नव्हत्याच, कारण त्याही दोघांनी यापूर्वी एकमेकांत बोलून ठरवूनच ठेवले होते. सगळ्या पोरांच्या या मसलतीला आम्ही फक्त हो म्हणायचे होते. अमेय जोशी याचे मूळ गाव तासगाव, आई-वडिलांचे अलीकडचे वास्तव्य मिरजेला असायचे. मुलगा पुण्याला नोकरी करत असल्यामुळे आता आईवडिलांसह तिथेच एका सोसायटीत फ्लॅट घेऊन राहायला होता. मध्यमवर्गी ब्राह्मण कुटुंब, अमृताच्या पसंतीप्रमाणे होते. मी तिच्या मनाची थोडी परीक्षा पाहण्यासाठी लटका विरोध करून पाहिला, अमृताने शांतपणे सहजतेने तो स्वीकारत आपली स्पष्ट मते ठामपणे सांगितल्यावर, आमचा तो वरवरचा विरोधही गळून पडला. आमच्या सिंधू समाजातील अमृता आता कृष्णाकाठच्या ब्राह्मण घरात जाणार म्हणजे खऱ्या अर्थाने सिंधू ते कृष्णा हा प्रवास पूर्ण झाला. हा संस्कृतीसंगम सर्वार्थाने आनंददायी झाला.

त्यानंतर एके दिवशी सोनूला अचानक त्रास सुरू झाला. तिच्या डोकेदुखीचे साधे वाटणारे दुखणे पुढेपुढे चालले, मेंदूपर्यंत पोचले. ती एक दिवस जी झोपली, ती सलग ४८ तास झोपेतच होती -कोमात गेल्यासारखी! दवाखान्यात तिला दाखल करून दोन दिवस राहिल्यावर डॉक्टरांनी तिसऱ्या दिवशी रात्री आमची झोपच उडवली. 'आता तरी काही खात्री देऊ शकत नाही, तातडीने पुण्याला हलवावे' असा सल्ला त्यांनी दिला. माझ्या आक्ख्या आयुष्यातला हा फार मोठा धक्कादायक प्रसंग होता. मला काही सुचेनासे झाले. एरवी कोणत्याही वेळी समतोल आणि निर्णायक राहू शकणारा मी यावेळी मात्र चक्क उन्मळून पडलो. मला कधी नव्हे ते रडू कोसळले,आणि घळाळा अश्रू लोटले. मी हतबल होऊन अक्षरशः कासावीस झालो होतो.

मी स्वतः खरे तर सगळ्यांना सांभाळून घ्यायला हवे होते, पण माझ्यासह आमचे शिरीष पालकर, अमोल माने, अमित-अमृता, मम्मी, गुंजन असे सारेजण

एकमेकांना सांभाळण्यात गुंतलो होतो. पुण्याचे डॉ.ऋषिकेश कुलकर्णी आणि त्याच्या आईवडिलांनी त्यावेळी खूप मदत केली, धीर दिला. इकडे डॉ.राम लाडे आणि डॉ.मनोज पाटील यांनीही आवश्यक त्या सूचना केल्या. आमची ॲम्ब्यूलन्स घरातून बाहेर पडली, वाटेतच अमोल दुसरी गाडी घेऊन येऊन मिळाला. रातोरात पुण्याच्या दिशेने आमची ॲब्यूलन्स धावू लागली. अँब्यूलन्समध्ये मी, अमृता आणि सोनू होतो. शहराबाहेर पडलो, आणि आश्चर्याचा एक सुखद धक्का बसला. गेले दोन दिवस सोनूने डोळे उघडले नव्हते ते आता चांगले उघडले. आम्हाला एकमेकांशी न बोलता खूपच आधार वाटला. माझा तर हा जीवघेणा प्रवास; आयुष्यात मी कधी विसरू शकणार नाही. आधीचीच काळजी, भीती, गांभीर्य, आणि त्यात अँब्यूलन्समधले ते वातावरण. माझी पत्नी आडवी, आणि समोर सचिंत झालेली लग्नाची मुलगी! पुण्याला दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला ॲडमिट् केले. पुढचे सहा दिवस तिथे राहावे लागले. सोनूला खूप बरे वाटू लागले. लग्नासाठी सांगलीला येणारे सगळे वऱ्हाडी पुण्याच्या हॉस्पिटलमध्ये हजर झाले. त्यांनी खूप आधार व धीर दिला. नियतीने साथ दिली, आणि सोनूला सुखरूप घेऊन आम्ही सांगलीला परत आलो.

□

अमितचे लग्न जितके सहज सुसूत्र आणि मजेत पार पडले, त्याच्या उलट अमृताच्या लग्नाच्या वेळच्या गंभीर प्रसंगाने वचपा काढला. तिचे लग्न ठरले, ०२ जुलै २०१४ ही तारीख ठरली. आमचा उत्साह तर ओसंडून वाहात होता. आजच्या साधारण मराठी कुटुंबांप्रमाणे या जोशी मंडळींनी आमच्या वधूपक्षाकडून काही मागणी केलेलीच नव्हती. त्यामुळे आमच्या हौसेने सगळ्या गोष्टी करायच्या असे आमचे बेत चालले होते. चार दिवसांचे भरगच्च कार्यक्रम आखत होतो. लग्नाच्या त्याच त्या विधींना आणि त्या कार्यक्रमांना फारसा अर्थ नसतोच, म्हणून काहीतरी सामाजिक संदेश आपण साऱ्या उपस्थितांस देऊ शकू, अशी काहीतरी शक्कल मी काढू पाहात होतो.

सासरा-सून संमेलन असा एक आगळावेगळा कार्यक्रम ठरविण्यात आला. त्यामागे कल्पना अशी होती की, आजकालच्या कुटुंबांत जो बेबनाव होतो, त्यात सासू सून यांचा भाग असतोच, पण कुटुंबात त्यात सासऱ्यांची जी भूमिका असली पाहिजे तिच्याशी नव्या सुनेचा खरा संबंध असतो. त्या दोघांचे नाते तसे बाप आणि मुलीचे असते. पण कुटुंबात त्यांचे फारसे ऐकून घेतले जात नाही. त्याचा परिणाम

म्हणजे कुटुंब तुटते, विस्कळीत होते. त्या विषयासंबंधाने सासरा आणि सून अशा काही जोड्यांशी चर्चा घडवून आणावी, त्याचे निमंत्रण अर्थातच सर्वत्र द्यावे, हा विषय लोकांपुढे मनोरंजक पध्दतीने मांडावा, म्हटले तर करमणूक, -म्हटले तर एका सामाजिक प्रश्नाचा ऊहापोह! त्याची तयारी आणि रंगीत तालीम-सराव हे सुरू झाले. याशिवाय लग्नातील मेहंदी, बांगड्या भरणी, हळदी हे सगळे होणार होतेच. हे सगळे पुरवणारे लोक, त्यांचे स्टॉल, रंगनिवड, सजावट, पुण्याचे सुधीर गाडगीळ यांचे सूत्रसंचालन इत्यादी नक्की करून वीसपंचवीस मित्रांचा गट कामाला लागला होता.आधीच आमच्या घरी सारा सिंधी रमणा असतो, त्यातही पुन्हा आमची ही लाडकी लेक. कशाला काही कमी नाही.

□

लग्नाची सगळी तयारी चालू असताना दुसराच खेळ सुरू झाला. लग्नाला एकच आठवडा उरला होता. २५ जूनच्या संध्याकाळी मुंबईहून माझा भाऊ दीपक याचा फोन आला, आणि मी कसातरी एकवटलेला सारा धीर खचला. सोनूची आई - आमच्या सासूबाई हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने संपल्या. त्या मुंबईत कुठे सत्संग-प्रवचनाला गेलेल्या होत्या, ते उरकून परत निघताना त्या हॉलमध्येच कोसळल्या. त्या गेल्या. सोनूला सांगायचे कसे? लग्नाचे कसे करायचे? दोन हजार पत्रिका वाटून झालेल्या होत्या, आता वरपक्षाकडील मंडळींना भेटायचे कधी? काय ठरवायचे? मुंबईला तर जायला हवे, सोनूला न्यायचे कसे? तिथली परिस्थिती तिला सहन कशी होणार? एक आठवड्यावर लग्न आहे. माझ्या भावाची बायको अनिता ही सोनूची सख्खी बहीणच, म्हणजे दीपकचे कुटुंब तरी लग्नाला कसे येणार? सगळ्या नातलगांत, पै-पावण्यांमध्ये चर्चा होणार. निमंत्रितांना कसे आणि कधी कळविणार? प्रश्न-प्रश्न-प्रश्न! माझ्या डोक्याच्या चिंध्या होणार असे वाटत होते.

प्रश्नांचे काहूर डोक्यात घेऊन घरी आलो. आजपर्यंत एक खंबीर संयोजक, व्यवस्थापक, शिस्तीचा आणि काटेकोर आचरणाचा हौशी माणूस अशा माझ्याबद्दलच्या वल्गना मीही सगळीकडे पसरविलेल्या होत्या. त्या सर्वांतील हवा निघून गेली. गेल्या पंधरा दिवसांत मलाच खचल्यासारखा अनुभव येऊ लागला होता. पण एवढ्याने जर मी हरलो तर मग तो किशोर लुल्ला कसला; -अशी माझ्याच मनाची मी समजूत घातली आणि स्वत:ला सावरले. घराशी आल्यावर बाहेरच्या बाजूला पोर्चमध्ये जरा टेकलो. अमोल मानेला बोलावले. त्याच्याशी बोलून निर्णय घेतला की हे वृत्त सोनूला

तूर्त सांगायचे नाही. मुंबईला जाण्याची तर बातच नको. शांतपणाने धीराने स्थिती हाताळली पाहिजे. माझ्या वागण्यावर आणि निर्णयांवर इतरांच्याही बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. काहीजण मतभेद मांडतील, कदाचित रागावतील  पण त्याला इलाज नाही. विचारपूर्वक योग्य तो निर्णय ठामपणे घेतला पाहिजे. तिथे पोर्चमध्ये बसूनच मुंबईला फोन केले. भाऊ-वहिनी-सासरे यांना समजून सांगितले. त्यांना आवडले की नाही हे पाहात बसण्याची ती वेळच नव्हती.

तेवढ्यात आमची मम्मी सत्संग-प्रवचनाहून घरी आली. तिला तिथे दाराशीच सगळी हकीगत सांगितली. ती तशी जुन्या पठडीतील असली तरी आत्ता मुंबईला न जाण्याचा माझा निर्णय तिला मान्य करायला लावला. एव्हाना आठ साडेआठ वाजायला आले होते. सोनू आजारपणामुळे आणि औषधांमुळे यावेळी झोपून जायची. तशी ती झोपल्याचे कळल्यावरच मी वरती घरात गेलो. नंतर अमित अमृता गुंजन यांनाही सांगितले. माझे जवळचे मित्र अरुण शहा आणि सुनील कोकितकर यांना बोलावून घेतले. डॉ राम लाडे अशा वेळी मदतीला असावा म्हणून त्यांसही बोलावले. सर्वांशी नीट विचार विनिमय केला. योजना पक्की केली. त्यानंतर रात्री सगळे आपापल्या घरी गेले. ती एक रात्र अशी असेल की, सोनू एकटी गाढ झोपली होती; आणि तिच्या काळजीने माझा सारा गोतावळा टक्क जागत होता.

मीही रात्रभर जागाच होतो. मुंबईचे फोनही बऱ्याच वेळपर्यंत सुरू होते. सोनू पलीकडे शांत झोपली होती. अज्ञानात सुख असते म्हणतात! सकाळी ती नेहमीप्रमाणे उठली. चहा घेतला, पेपर वाचत बसली. तोपर्यंत तिला काही समजण्यासारखे नव्हतेच. आधल्या रात्री ठरल्याप्रमाणे सकाळी साडेसातला अरुण शहा, सुनील कोकितकर, अमोल हे सारे त्यांच्या पत्नींसह आले, आणि खालच्या हॉलमध्ये मम्मीशी बोलत बसले.  त्यानंतर एकटे राम लाडे वरती आमच्याकडे आले. सहज म्हटल्यासारखा त्यांनी विषय काढला आणि म्हणाले, ''वहिनी, लग्न अगदी तोंडावर आलेय, तुमची प्रकृती ठीक दिसते आहे तरीपण एकदा शुगर- ब्लडप्रेशर एवढं बघून टाकूया...''  त्यांनी तपासणी केली आणि स्वस्थता वाटावी यासाठी म्हणून एक गोळी दिली.  सोनू स्वयंपाकखोलीत गेली. मी आणि अमृता तिच्या जवळ गेलो, आणि तिची आई गेल्याची बातमी तिला सांगितली. तिला स्वाभाविकच रडू कोसळले. खालच्या मजल्यावर थांबलेले सारे मित्रमंडळ खोलीत आले. आपापल्या शब्दांत त्यांनी तिचे सांत्वन केले, विश्वासात घेऊन  समजून सांगितले. ती बरीच शांत झाली असावी.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिने स्वत: मुंबईला फोन केला, आणि या प्रसंगी आम्ही येणार नसल्याचे स्वत:च  सांगितले. ही समज तिने याही स्थितीत दाखविली, याचे आम्हा सर्वांना त्यातल्या त्यात बरे वाटले. हे लग्न उरकून मुलीची पाठवणी  झाल्यावर तीनचार दिवसांनी आपण मुंबईला जाऊ असे आम्ही ठरविले. माझाही डळमळलेला तोल आता बराच सावरला होता. आमच्या अपेक्षेपेक्षाही समजूतदारपणे सोनूने हा प्रसंग सावरून घेतला.

या परिस्थितीत अमृताच्या लग्नाची तयारी तर फिसकटून गेली. ठरलेले कार्यक्रम रद्द करावे लागले. साज-सजावट, मेजवान्या, नृत्यगाणी, सगळे जिथल्या तिथे थांबले. वराकडच्या मंडळींना भेटून बोलल्यावर त्या जोशी मंडळींनी खूप आधार दिला, ''तुम्ही अजिबात मनावर घेऊ नका. वहिनींना बरे वाटले म्हणजे त्यात सारे आले!'' असे त्यांनी वारंवार म्हणून दाखविले. अमृताचे सासर कसे असणार हे आम्हाला एवढ्यावरून आधीच कळून आले. आमचे पै-पाहुणे बरेचसे मुंबईतच होते, त्यांची सारी धुरा दीपकने सांभाळली. लग्नासाठी कुणी यावे,  कोणी येऊ नये हे मोठ्या कौशल्याने त्याने साऱ्यांना समजावून सांगितले. ''आपण सारे जवळचेच आहोत, त्यामुळे लग्नाला तर गेलेच पाहिजे; पण सोनूच्या प्रकृतीसाठी न जाणे हिताचे आहे.'' अशी मखलाशी करून त्या पति-पत्नीनी बहुतांशी पाहुण्यांना थोपविले. हे काम तसे आमच्या समाजात अवघड असते, पण दीपक व त्याची पत्नी अनिता यांनी ते खुबीने केले.

□

पाच सहा दिवसांनी अमृताचे लग्न पार पडले. अगदी निकटचे जे लोक यायचे ते आले होते. सोनू थोडा वेळ मंडपात थांबली, पण नंतर तिला आतल्या खोलीत नेऊन झोपवावे लागले. 'संडे क्लब' नावाचा माझा मित्रपरिवार आहे, त्यांनी सुरुवातीपासून सगळी धुरा खांद्यावर घेतली होती. मीही माझ्या परीने किल्ला लढवीत होतो. त्यात वरपक्षाने तर कुठेच काही जाणवू न देता, उलट ते लोक आम्हालाच धीर देत राहिले. 'कभी कभी' या माझ्या लाडक्या सिनेमातले वाक्य मला सारखे आठवत राहिले, 'बडी हिम्मत चाहिये। बडा हौसला चाहिये। दाग दामन पे नही, दिल पे लिया था मैं ने।।' माझी एवढी मोठी परीक्षा आजवर कधी झाली नव्हती, पण झालेल्या परीक्षेत मी पास झालो हे नक्की. अर्थात हा सारा प्रसंग केवळ माझ्या किंवा माझ्या कुटुंबापुरता होता. माझ्या डॅडींनी त्यांच्या तरुणपणात फाळणीचा सार्वत्रिक भीषणतेचा जो प्रसंग भोगला

होता, त्याच्याशी तर याची तुलनाच होऊ शकत नाही. लग्नाच्या निमित्ताने ठरविलेले सामाजिक उपक्रम विस्कळीत झाले, तरीही ती समर्पणाची भावना ढळू दिली नाही. डॉ.लाडे यांच्या मदतीने 'अमृतामेय ॲनिमिया कँप' घेऊन ५०० गरीब महिलांची तपासणी केली. ज्यांच्यात रक्ताची कमतरता होती त्यांना टॉनिक दिले. जावई अमेयच्या हस्ते हा कार्यक्रम घेतला.

आमच्या दोन्ही मुलांत पूर्वी बराच फरक असला तरी त्या दोघांचे कुटुंबातील स्थान समसमान आणि अबाधित होते. योगायोगाने त्यांची लग्नेही पाठोपाठच झाली, त्यानां मुलेही पाठोपाठ झाली, त्यांचे संसारही बहुतांशी समसमान फुलत आहेत. हा आमच्या भाग्यातील 'अमित अशा अमृता'चा ठेवा आहे. मला आणखी एक आश्चर्य आणि आनंद सांगावासा वाटतो, तो असा की आता माझी सांपत्तिक स्थिती संपन्न म्हणता येण्यासारखी असली तरी माझी पत्नी, मुले, जावई, सून किंवा जवळचे कोणीही नातलग यांना लोभीपणा नाही, त्यात फार गुंतलेपण नाही, चैनखोर वृत्तीही नाही. होता होईतो काटकसर केलीच पाहिजे अशी आमच्या घराला एक सवय लागून गेली आहे. हल्ली कौटुंबिक सोहळे मात्र जरा सैल हाताने होऊ लागलेत असे माझे मित्र म्हणतात, ते खरे आहे.

आजपर्यंतच्या प्रकल्पांतून शिल्लक ठेवलेले व इतरत्र खरेदी केलेले बरेच प्लॉट्स व स्थावर मालमत्ता आहे. पुढच्या वारसदार पिढ्यांना त्यासंबंधी कुठे जोखीम वाटू नये अशी व्यवस्था मी काळजीपूर्वक केली. सर्व कागदपत्र त्या दृष्टीने तयार करणे -तोही एक मोठा व्याप असतो. एकदा आमचा जावई अमेय जोशी याच्याकडे मी प्रस्ताव ठेवला. पुणे येथे तो ज्या कंपनीत होता तिथल्या कामापेक्षा भौतिकशास्त्राचे शिकवणीवर्ग घ्यावेत अशी त्याची इच्छा होती. त्याचबरोबर माझा हा स्थावर प्रॉपर्टीचा व्यवसाय त्याने सांगलीत येऊन सांभाळावा आणि त्याच्या इच्छेप्रमाणे वाढवावा असे मी सुचविले. सुदैवाने त्याने सांगलीला येण्यास संमती दिली. त्यांचे सर्व कुटुंब जून २०१६मध्ये सांगलीला स्थलांतरित झाले. आम्हाला हे डबल लॉटरीचे तिकीट लागले; कारण आमची अमृता आणि नातू आयुष हे देखील हाकेच्या अंतरावर येऊन राहिले!

तथापि जावई अमेय जोशी यांनी माझा प्रॉपर्टीचा व्यवसाय करावा, हा प्रस्ताव आम्ही बदलला. त्यांना पुढची पिढी घडविण्यात, मुलांना विज्ञान शिकविण्यात अधिक स्वारस्य होतच. त्यामुळे त्या स्वरूपाच्या क्लासेसमध्ये त्यांनी काम सुरू केले; त्यात चांगल्यापैकी नावही मिळविले. सांगलीत आल्यावर ते कुटुंब काही काळ एका फ्लॅटमध्ये राहिले. नंतर स्वतंत्र बंगल्यात त्यांनी त्यांचा सुखी संसार थाटला आहे. अमेयचे

आईवडील त्यांच्यासोबत असतात. माझ्या मुलीसह ते सारे मराठी ब्राह्मण कुटुंब समाधानात राहाते. अमृता त्या कुटुंबात सरमिसळून गेली आहे. मुलगा-मुलगी असा फरक आमच्या कुटुंबात कधी केला जात नाही. आता तर ती पिढी प्रौढ झाली. माझ्या मिळकतीतून काही देताना माझ्या मनांत तितकी आणि तशीच भावना असते आणि कुणाच्या मनात किंतु-किल्मिष राहू नये असा माझ्याकडून मी प्रयत्न करीत राहातो.

अमृताचे लग्न झाल्यानंतरची सात-आठ वर्षे ती संसारात रमून गेली. सासर-माहेरच कौतुक होतं. तिला बाळ झाल्यावर तर ती पूर्ण वेळ मातृत्वात रमली होती. मुलगा नियमित शाळेत जायला लागेपर्यंत ती भरपूर वेळ द्यायची. तिला आईपण हवं होतं, त्याचा आनंद घेत ते निभवायचं होतं. जावई अमेयही त्यात मनापासून सहभागी होता. अमृता ही एल.एल.बी. झालेलीच होती. मधल्या काळात श्री. अभय गुळवणी यांच्याकडे तिने सीएस आर्टिकलशिप केली. ती पूर्णतः सी एस (कंपनी सेक्रेटरी)चे काम करू शकेल. अमृताचा मुलगा आयुष हा महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशनच्या सेमीइंग्लिश शाळेत तिसऱ्या इयत्तेत शिकतो. आयुषची मुंज झाली ती मात्र ब्राह्मणी पद्धतीच्या साधेपणाने. सुमारे शंभर लोक उपस्थित होते. धार्मिक मंत्रवचनांचा अर्थ सर्वांना समजावून देणारे, पुण्याच्या ज्ञानप्रबोधनिच्या वतीने होणारे शास्त्रविधी करण्यात आले.

३१ जानेवारी २०१६ रोजी आमच्या अमितला मुलगी झाली. आमची सून मथुरेची असल्याने तिकडून कृष्णभक्ती आली. नवजात कन्येचे बारसे झाले, 'मीरा' नाव ठेवले. त्यानिमित्त स्वागतसोहळा केला त्यास मी मीराभक्तीचे मध्यवर्ती सूत्र जोडले. मीरेचा जन्म, तिची कृष्णभक्ती आणि शेवटी कृष्णरूपात विलय या प्रसंगांची चित्रे व कटआऊट तयार करवून घेतले. कन्येचे महत्त्व सांगून, स्त्रीभ्रूणहत्येच्या पातकाविषयी जनजागृती करणारी 'बहरली कल्पलता दारी' ही पुस्तिका, कृतिशील भगिनी विनीता तेलंग यांच्याकडून तयार करवून घेतली व ती सर्वत्र वाटली. आता एक विषय घोळतोय की, मुलीची मुंज पूर्वकाळी करीत असत तशी आपण नातीची करावी. तो अनोखा संस्कार होईल व समाजाला एक चांगला संदेश आपण देऊ शकू. माझ्या डोक्यात तसे येऊ लागले आहे, अमितची संमती घेऊन यथावकाश जमविता येईल! आता मीरा, दुसरीत -म्हणजे आठ वर्षांची आहे.

आमची सून गुंजन ही आमच्या घरात चांगली रुळली आहे. माझ्यासह घरातल्या साऱ्यांचे स्वभाव आणि ऐपत तिने जाणून घेतली आहे. घर सांभाळत बाहेरचे जगही तिला माहीत झाले आहे. तिला कुत्रे पाळायची मोठी हौस आहे. आमच्यात इतर

कोणाला यत्किंचितही श्वानप्रेम नाही. पण कुणाला संगीताची रुची असेल तर घरात सतार-तंबोरा येतोच. तसे गुंजनमुळे 'सिंबा' नावाचा गोल्डन रिट्रीवर जातीचा कुत्रा दाराशी आला आहे. गुंजन त्याची सारी उस्तवारी करते; आम्ही आपले त्याला येता-जाता 'काय रे बाबा, बरा आहेस ना?' एवढे म्हणतो!

□□□

□

# प्रतिष्ठानचे शिक्षण

माझ्या पैशाचा विनियोग सामाजिक कार्यार्थ 'अर्घ्यदान' म्हणून करायचे ठरल्यावर त्यासाठी वेगळी संस्था मी स्थापन केली. स्वाभाविकच त्यास 'टी बी लुल्ला चॅरिटेबल फाऊंडेशन' असे नाव दिले. पूर्वीपासून आम्हाला जाणवत असे की, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना कुठून तरी काहीतरी पैसे मिळत असतात, त्यांच्या परीने त्या संस्था काम करत असतात, पण त्यांनाच पुष्कळदा त्रास होत असतो, अनेक अडचणीही असतात. शिवाय त्यांना प्रशिक्षणाचीही गरज असते. देणग्या कशा मिळू शकतात, त्यासाठी शासकीय योजना कोणत्या असतात, हिशेब कसे ठेवायचे, ऑडीट कसे करायचे, धर्मादाय आयुक्त वा अन्य शासकीय खात्यांसाठी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता कशी करायची, संभाव्य धोके, संस्थेचे व्यवस्थापन असे बरेच विषय माहिती करून देण्याची आवश्यकता असते. शिवाय काही शासकीय कर्मचारी त्यांना उगीचच दमवतात, समाजकंटकांचा त्रास असतो, अशा वेळी सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित होण्याचा लाभ होईल, अशा अनेक उद्दिष्टांनी सामाजिक संस्थांचे एकत्रीकरण किंवा संघटन करण्याचे प्रयत्न आम्ही मित्र कार्यकर्त्यांनी चालविले होते. 'फेडरेशन ऑफ एन जी ओ'ज अशा नावाने दहा-पंधरा वर्षांपूर्वी हा प्रयत्न ग्राहक पंचायतीने सांगलीत करून पाहिला होता. आता लुल्ला फाऊंडेशनच्या वतीने तसे पुन्हा करून पाहिले. परंतु त्यालाही प्रतिसाद मिळालेला नाही. माझ्या मते प्रत्येक संस्थेतल्या कार्यकर्त्यांना आपले म्हणून स्वतंत्रपण सांभाळायचे -किंवा अधिक स्पष्ट सांगायचे तर मिरवायचे- असते. त्यामुळे सारा समाज एकत्र बांधणे हे स्वप्नरंजनच आहे.

□

प्रत्येक विषयात प्रश्न तर सर्वांना असतातच. कोणत्याही समाजातील प्रश्न कमी होऊन, चांगले नागरी जीवन रुजायचे असेल तर त्यासाठी उत्तम शालेय शिक्षणाची व्यवस्था असायला हवी असा विचार आमच्यात होऊ लागला. सर्व समस्यांचे मूळ शिक्षणातच असेल तर आपल्या प्रयत्नांची दिशा तिकडे वळविणे योग्य ठरेल, म्हणून यापुढे आमच्या फाऊंडेशनचे काम शिक्षण क्षेत्रासाठी करण्याचे ठरविले. या ट्रस्टने आपलीच शिक्षण संस्था किंवा शाळा काढावी, तसेच ट्रस्टसाठी काही स्थावर इमारत वगैरे करावी हे मात्र कटाक्षाने दूर ठेवले. त्याऐवजी शिक्षणासाठी जिथे चांगले प्रयोग चालतात त्यांस प्रोत्साहन मिळावे यासाठी खर्च करण्याचे धोरण आता नक्की केले आहे.

शिक्षण क्षेत्राची स्थिती, बालक - पालक - शिक्षक या घटकांची भूमिका, शासकीय धोरण अशा सर्व बाजूंचा अभ्यास मुळात जाऊन करण्याचा मी निर्णय घेतला. ज्ञानरचनावादी शिक्षणाच्या बाबतीत तज्ज्ञ म्हणून ओळखल्या जाणाऱ्यांच्या भेटी घेणे आवश्यक वाटू लागले. आधीच्या वर्षी आमच्या सामाजिक संस्थांच्या संमेलनात 'ग्राममंगल' संबंधी कार्यकर्त्यांनी भाग घेतलेला होता. त्यात रमेश पानसे सरांकडे येण्याचे निमंत्रण मिळालेले होते. नव्या शिक्षणपध्दतीचे प्रयोग, जवळच्या इस्लामपूर येथील तुळजाभवानी शिक्षण संस्थेने चालविले होते. त्या एकूण कामांबद्दल मला खूप जिज्ञासा आणि ओढ निर्माण झाली. पेठ आणि इस्लामपूर येथील शाळेत सर्व वातावरण आणि नवी शिक्षणविषयक कार्यपध्दती अंमलात आणलेली होती.

मी आणि वसंत आपटे वाईला गेलो. वाई तालुक्यातील आडगावच्या काही शाळा पाहिल्या, आणि आम्ही आश्चर्यचकित झालो. शाळा जिल्हा परिषदेच्या, साध्यासुध्या! शिक्षक जवळपासचे पण विशेष प्रशिक्षण घेतलेले. मुले जमिनीवर शिक्षकाच्या भोवती कोंडाळे करून बसलेली , जमिनीपासून कमी उंचीवर फळा, त्या पोरांशी गप्पा मारत बसल्यासारखे शिकवणे चालले होते. मुलांची काहीतरी परीक्षा घ्यावी असे आम्हाला वाटले. म्हणून दुसरी तिसरीच्या मुलांना काही सोपे प्रश्न विचारले, त्यांचा त्या मुलांनी फडशा पाडल्यावर जरा कठीण प्रश्न सुरू केले आणि आम्हीच फार कमी पडतो आहोत असे आम्हाला कळून आले. ''पावणेसतरा कोटि ही संख्या लिहा'' म्हटल्यावर पोरांनी पटापट लिहून दाखवली. 'हे आम्हाला तरी जमेल का' असे मनात वाटले. तिसरीच्या मुलांनी 'आईला लिहिलेले पत्र' आम्ही वाचल्यावर

त्यांचा हेवाच वाटला. सांडपाणी, पर्यावरण, स्वच्छता अशा बाबतीत मुले पुष्कळ जाणून होती. आतापर्यंत शाळकरी मुले , - त्यांतही खेड्यांतील मुलांविषयीचे आमचे समज चुकीचे ठरत होते. हा नवा चांगला बदल नव्या शिक्षणपध्दतींनी दाखवून दिला होता. त्यासाठी अधिकारी, व प्रशिक्षित शिक्षक यांचा समन्वय आणि प्रयत्न कारणीभूत होते. तिसरा घटक पालकांचा असतो तो या ठिकाणी त्यांच्या परिस्थितीमुळे उदासीनच होता. म्हणजे आपल्या प्रयोगाच्या दृष्टीने अनुकूल होता, असे म्हणायचे!

एकंदरीतच त्या शाळांतील मुलांच्या शिक्षणातील गती व आकलन पाहिल्यावर या बाबतीत आपल्याला किती काम करण्यासारखे आहे याची कल्पना येऊ लागली. शिवाय आमच्या आधीच्या निरीक्षणानुसार भावी काळासाठी अशा ज्ञानरचनेचा उपयोग सर्वच क्षेत्रांना होणे शक्य होते. त्या दृष्टीकोणातून आम्हाला आमच्या कामाची दिशा आता ठरविणे आवश्यक होते, आमचा तसा विचार विनिमय सुरू झाला. वाई व पाचगणी तालुक्यांतील आणखी काही शाळांना आम्ही भेटी दिल्या. तिथे ग्राममंगलच्या प्रयोगांनुसार मुलांना शिक्षण दिले जात होते. त्या विषयावर आता आमच्या अभ्यासात काही शिक्षणतज्ज्ञांशी चर्चा करण्याइतकी आमचीही प्रगती झाली होती. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण, शालाबाह्य मुलांचे शिक्षण, त्या क्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांचे प्रशिक्षण, आणि शिक्षकांचेही प्रशिक्षण अशा सर्व अंगांनी आमच्या प्रतिष्ठानला काम करता येण्यासारखे होते .... म्हणजे करायलाच हवे होते. त्याविषयी माझ्या सर्व सहकारी आणि हितचिंतक सल्लागारांशी मी चर्चा केली. सामाजिक कार्याची व्याप्ती फार मोठी असली तरी आपण आपल्यापुरती काहीतरी मर्यादा आखून घ्यायची, तर ती शिक्षणाला प्राधान्य देणारी असावी असा आम्ही मनोमन निर्णय केला.

त्यानंतर मी ठाण्याजवळच्या आदिवासी भागातील ऐने या गावी भेट दिली. तिथे ग्राममंगल संस्थेची शाळा आणि मुख्य म्हणजे शिक्षकांसाठी प्रशिक्षण-केंद्र आहे. एकदोन दिवस तिथे राहून मी त्यांचे विविध प्रयोग पाहिले. आदिवासी पाड्यांतील मुलांची प्रगती पाहिली. तिथल्या लोकांशी बोललो. आणि आमच्या कामाची दिशा सापडली. त्या दिशेने आखणी करून घेतली. 'क्वेस्ट' या संस्थेचे नीलेश निमकर, फलटणच्या मंजिरी निमकर, महाराष्ट्र ज्ञान मंडळा(एमकेसीएल)चे विवेक सावंत, ज्ञानप्रबोधिनीचे विवेक पोंक्षे, राज्याचे शिक्षण सचिव नंदकुमार अशी शिक्षणक्षेत्रातील

नामवंत मंडळी गाठली. त्यांच्या भेटी व चर्चा यांतून आनंददायी शिक्षण, कृतिशील शिक्षण, ज्ञानरचना, अशा अभिनव संकल्पना आणि नवा शिक्षण-कायदा इत्यादी गोष्टी समजून आल्या. हे एक नवेच क्षेत्र अभ्यासायला मिळाले, त्यात काम करायला खूप वाव दिसत होता; तशी गरजही जाणवत होती. त्या अनुषंगाने काही वरिष्ठ शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, शिक्षक यांच्याशी चर्चा करून तशी खात्री करून घेतली. नव्या शैक्षणिक धोरणाप्रमाणे ज्ञानरचनावाद समजून घेऊन ती पद्धत अनुसरण्याचे ठरविले.

सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील काही बालवाड्यांशी संपर्क केला. सुरुवातीला पाच छोट्या शाळांत नव्या शिक्षणाचा प्रयोग करून पाहावा असे मी योजिले होते. पण या प्रयोगासाठी आठ शाळा तयार झाल्या. त्यांच्यातील शिक्षकांसाठी दोन दिवसांचा अभ्यासवर्ग घेऊन नवी संकल्पना सर्वांना समजून सांगितली. त्यांच्याही आपापसात चर्चा घडवून आणल्या. मुलांच्या शिक्षणाबाबत आजपर्यंत आपल्या ज्या सवयी आाणि समजुती होत्या त्यांना धक्के देणाऱ्या या नव्या पध्दती होत्या.

उदाहरणार्थ वर्गातल्या एखाद्या छोट्या मुलाला पेंग येत असेल तर, आजपर्यंत त्याला शिक्षकांचा राग ओढवून घ्यावा लागत असे; मग त्या पोराला, तोंडावर पाणी मारून ये जा, उभा राहा, धडा दोनदा वाचून दाखव, कान धर -असल्या 'शिक्षा' सांगितल्या जात. त्या विषयीच्या अभ्यासातून नवे निरीक्षण असे सांगते की, झोप ही त्या पोराची पहिली गरज आहे, ती पुरी होईपर्यंत त्याचे कशातही लक्ष लागणेच शक्य नाही; त्याकरिता त्या पोराला प्रथम झोपेची सोय करून द्यावी. वर्गातील एका कोपऱ्यात त्याच्यासाठी सतरंजीची घडी टाकून ठेवायची. ज्या पोराला झोप आल्यासारखे दिसेल त्याला सरळ तिथे जाऊन झोपायला सांगायचे! त्याची झोप झाली की मग ते पोर चांगले शिकू शकते. हे आनंददायी शिक्षण देण्यात मूलभूत गृहीतक असे नक्की ठरलेले आहे की, मुले शिकायला उत्सुक असतात त्यांच्यावर बळजबरी करावी लागत नसते. नवे काहीतरी शिकणे ही माणसाची जन्मजात सहजवृत्ती आहे. बालवयापासून ती फुलवत ठेवून त्याला जे आणि जितके हवे असते, तेच त्यांना शिकवावे. शिक्षण लादले जाऊ नये. तरच ते आनंददायी होते.

त्या आठ शाळांत नव्या पध्दतीचे शिक्षण सुरू झाले त्याकरिता मी मोठ्या रकमेची तरतूद केली. त्या प्रयोगास खूपच चांगला प्रतिसाद मिळू लागला.निष्कर्ष इतके चांगले निघू लागले की, या क्षेत्रातच यापुढे आपल्याला काम करायचे आहे.

लुल्ला प्रतिष्ठानचा तो निर्णय आपोआपच झाला. बालवर्गांसाठी सुरू झालेला हा प्रयोग उत्तम जमला. गेल्या तीन-चार वर्षांत त्या सर्व शाळांची प्रगती लक्षणीय आहे. बालक व पालक खूश आहेत. तिथे प्रवेश घेण्याला नव्या बालकांचे पालक उत्सुक आहेत. त्या वर्गातील मुलांचे हस्ताक्षर सुधारले. या सरावातून त्यांची ग्रहणक्षमता चांगली वाढत आहे.... आणि खरे सांगायचे तर आता माझीही या क्षेत्रातील ग्रहणक्षमता वाढत आहे!

आता यापुढची पायरी म्हणजे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण. त्यात बालकांपेक्षाही पालक व शिक्षक हे दोन घटक जास्त प्रभावी ठरत असतात, म्हणून त्यांच्यासाठी अधिक अनुभवी व तज्ज्ञ लोकांस पाचारण करायला हवे होते. आम्ही त्यासाठी पुण्याची ज्ञानप्रबोधिनी गाठली. विवेकराव पोंक्षे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काही आखणी करून दिली, पण मुख्य सारी अंमलबजावणी व बाकीची सिध्दता तर आम्हालाच करायची होती. त्यासाठी महाराष्ट्र ज्ञानमहामंडळ (एमकेसीएल) चे विवेक सावंत यांच्यासारख्यांशी चर्चा केली. या सर्व प्रक्रियेत व त्याच्या तयारीसाठी माझ्यासोबत वसंत आपटे आणि रणधीर पटवर्धन अशी खंदी मंडळी होती, त्यामुळे अशा प्रकल्पांना सामोरे जाता आले. या गोष्टींसाठी पैसा तर लागतोच लागतो; पण नुसत्या पैशाने भागत नाही, त्यापेक्षा नियोजन, व त्यासाठी वेळ आणि श्रम हे फार जास्त लागते.

एवढ्या तयारीनंतर आम्ही आमच्या वार्षिक अर्घ्यदानाच्या कार्यक्रमाची जुळणी त्याच विषयाच्या अनुषंगाने सुरू केली. २०१४ या वर्षीच्या प्रकल्पासाठी 'शिकू आनंदे' अशी मध्यवर्ती घोषणा ठरली, ती नावातच पुरेशी बोलकी होती. त्या कार्यक्रमाच्या अंतर्गत सांगली जिल्ह्यातील शंभर शाळांत पोचायचे ठरले, प्रत्यक्षात आकडा ११० पर्यंत गेला. त्या प्रत्येक शाळेत सुमारे दोन तासांची तीन सत्रे झाली. एक सत्र पालकांसाठी, दुसरे शिक्षक व संस्था चालकांसाठी, आणि तिसरे सत्र विद्यार्थ्यांसाठी होते.यासाठी ज्ञानप्रबोधिनीने आपल्या जाणकार शिक्षकांकरवी सांगली परिसरातील आणखी ६० शिक्षकांना प्रशिक्षण दिले होते, त्यामुळे हा संघ सुमारे पाऊणशे जणांचा झाला. त्यातील ३-४ जणांचा एकएक गट तयार करून त्यांना शाळा नेमून देण्यात आल्या, व गावोगावच्या सर्व शाळांतून नव्या युगाचा हा विषय सर्व घटकांना समजून देण्यात आला. समारोपासाठी शेवटच्या दिवशी सांगलीच्या भव्य भावे नाट्यगृहात दिवसभराची सत्रे झाली. त्यात विवेक पोंक्षे, प्रकाश पाठक,

रमेश पानसे, कांचन परुळेकर, सुधीर गाडगीळ, विनय सहस्त्रबुध्दे, सुनील सुखथनकर, सुमित्रा भावे इत्यादी जानेमाने लोक सहभागी होते. विनोदिनी काळगी, केतकी माटेगावकर यांनी आपल्या करियरसाठी विद्यार्थी जीवनापासून केलेले प्रयत्न सांगून आपली कला पेश केली. या सर्व कार्यक्रमाचा कळसाध्याय गुरुवर्य शंकर अभ्यंकर यांनी लिहिला. त्यावेळी फलटणच्या मॅक्सिन बर्न्टसन् या उपस्थित होत्या. त्या अमेरिकेतून महाराष्ट्रात येऊन, मातृभाषेतून शिक्षणाचा ठाम पुरस्कार करीत. आमच्या कुटुंबाच्या वतीने काही संस्था आणि व्यक्तींना अर्घ्यदान अर्पण करण्यात आले. या निमित्ताने सुमारे शंभर शाळांतील तीस हजार विद्यार्थी, पाच हजार पालक, आणि दोन हजार शिक्षक इतक्या लोकांपर्यंत आम्ही पोचलो. ज्ञानरचनावाद, सृजनाचा आनंद देणारे शिक्षण, आनंददायी शिक्षण, जीवनाभिमुख शिक्षण अशा नवनव्या संकल्पना त्या संबंधित घटकांपर्यंत पोचविण्याचा हा एक उत्तम प्रयत्न होता. त्याबद्दल आम्हाला समाधान झाले, साऱ्या महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राचे लक्ष आमच्या या प्रकल्पाकडे वेधले.

माझ्या दृष्टीने या घटनेतून आणखी एक फार महत्वाचा लाभ झाला. तो असा की, संघटन करण्याबाबत माझ्यात एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला. कोणत्याही प्रकारचे, कितीही मोठे आणि कोणत्याही ठिकाणी करावयाचे काम हाती आले तर ते आपण सहज करू शकू अशी शाश्वती मला वाटू लागली. एखाद्या प्रकल्पाचे दीर्घकालीन व्यवस्थापन कसे करावे याचे खूप चांगले धडे, माझ्या मित्रपरिवारात नव्यानेच सहभागी झालेले रणधीर पटवर्धन यांच्याकडून मी गिरवू लागलो. या निमित्ताने जवळजवळ ऐंशी कार्यकर्त्यांचा एक गट 'टीम' म्हणून पुढे आला. आजपर्यंत काही संघटना व संस्थांच्या माध्यमांतून मी काम करत होतो, त्यांच्या कार्यपध्दतीने असा गट मला बांधता आला नव्हता. पण कामाशी भिडणारी, समरसून काम करणारी, आपापल्या संस्थेत स्वतंत्र बुध्दीने काम करणारी, आणि तरीही समाजाच्या कामासाठी एकत्र येऊ शकणारी कितीतरी माणसे आहेत, असे मला समजून आले. परिणाम दाखवू शकणारे -म्हणजे रिझल्ट ओरिएंटेड काम करण्यात मला फार स्वारस्य असते. त्या कामांचे मूल्यांकन करणारे करतील! त्याच्यातून दीर्घकाळासाठी काय निष्पन्न होणार त्याचे अचूक भविष्य मांडणारा द्रष्टा मी नाही, पण माझ्या या कार्याचा वेग, पद्धती, आकलन, परिणाम आणि संघटन यांतून माझे, माझ्या सोबत्यांचे समाधान होत आहे.

□

या प्रयत्नांतून शासनाच्या आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्याशी संबंध वाढला. त्यामुळे त्यांच्या अनेक योजना, व त्या योजना राबविणारे पदाधिकारी यांच्याशी संपर्क वाढू लागला. अनेक ठिकाणी त्याच तळमळीने काम करणारे शिक्षक व त्यांचे गट असतात हे माहिती झाले. रोटरी क्लबची 'टीच' योजना, जिल्हा परिषदेची 'डाएट' ही यंत्रणा, शिक्षणाधिकारी व शिक्षकांचे अनेक गट इत्यादी सर्वांशी चर्चा होऊ लागल्या. त्यातून शिक्षकांसाठीच एक प्रशिक्षण वर्ग घेण्याची कल्पना पुढे आली. आजपर्यंतच्या माझ्यापुरत्या विचारांतून मला असे वाटत होते की, आपण कितीही योजनापूर्वक उत्तम दर्जाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी शिबिर वगैरे भरविले तरी त्याला बेताचाच प्रतिसाद मिळतो. परंतु एखाद्या 'वरच्या' सक्षम अधिकाऱ्याला पटवून देऊन त्यासंबंधी सूचना द्यायला लावल्या तर उपस्थिती वाढते. आमच्या निकट वर्तुळातील कोणी म्हणायचे की, 'लहान बालक कधी पोलिओचा डोस आपण होऊन घेत असते काय? त्याच्या व साऱ्यांच्या हितासाठीच, त्याचे हातपाय धरून त्याच्या तोंडात औषध ओतावे लागते.' समाजाच्या हिताचे म्हणून जे असते, तेही असेच बळेबळे द्यावे लागते. शिक्षकांच्या एका गटाने खात्री दिली; किंबहुना त्यांनी अशी मांडणी केली की, असे शिबिर तेच शिक्षकांसाठी भरविणार असून आमच्या फाऊंडेशनने त्यास मदत करावी. म्हणजे शिबिर 'कसे' होईल ही चिंताच संपली. त्यांना आता आमच्या शक्ती प्रमाणे सर्वतोपरी मदत करायची एवढेच उरले, त्यात आम्ही कुठे कमी पडण्याची सुतराम शक्यताच नव्हती.

सांगलीच्या 'शांतिनिकेतन' संस्थेच्या आवारात हे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर झाले. महाराष्ट्राच्या दूरदूरच्या जिल्ह्यांतून जवळजवळ तीनशे शिक्षक स्वतःच्या खर्चाने आले होते; कोणतेही 'वरचे' सर्क्युलर किंवा भत्ता वगैरे नसताना सुटीतले दिवस खर्च करून आले होते. नवे शिकून घेऊन ते आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोचावे या प्रामाणिक उद्देशाने आले होते. त्यांच्यासाठी निवडक विषयांची सत्रे आणि मुक्त चर्चा; इतकेच नव्हे तर रात्रीच्या विनोदनासाठी दर्जेदार व उद्बोधक कार्यक्रम ठेवले होते. हा सारा उत्स्फूर्त मामला पाहून आम्ही खूप उत्साहित, आनंदित आणि चकितही झालो. आमची 'टीम सेवा' त्या शिबिराने प्रभावित झाली व त्या सर्वांना खूप शिकायला मिळाले. या साऱ्याकरिता लागणाऱ्या पैशाचा तर प्रश्नच नव्हता, लुल्ला फाऊंडेशनचा तोच तर उद्देश होता! दरवर्षी पंचवीस-तीस लाख रुपये अशा कार्यांसाठी

द्यायचे हे मी ठरवून घेतले होते, मला माझ्या मनाजोगे सामाजिक काम स्वतः सक्रीय राहून करण्याचे समाधानही लाभत होते.

आता माझ्या दृष्टीने शिक्षण विषय प्राधान्यावरच आला. त्या विषयासाठी वर्षभर मी कामात राहू लागलो. २०१५ सालीही सांगलीत मोठे शिबिर घेण्याबद्दल चर्चा सुरू होती. जे करायचे ते आपल्या उच्च मर्यादेपर्यंत चांगले करायचे हे माझे तत्व असते. म्हणून या वर्षी मी थेट मंत्रालय गाठले, आणि राज्याच्या शिक्षण खात्याचे प्रधान सचिव श्री.नंदकुमार यांना भेटलो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, ज्ञानरचनावाद व नव्या आनंददायी शिक्षणपद्धती प्रामुख्याने व प्राधान्याने सरकारच्या सेवेतील शिक्षणाधिकाऱ्यांना समजून देण्याची फार गरज आहे; कारण शिक्षण विभागातील हेच अधिकारी तळापर्यंत धोरण राबवत असतात. जुन्या समजुती बदलून त्यांना नवी धोरणे व दिशा कळण्यासाठी असे शिबिर घ्यावे, असे त्यांनी सुचविले .त्यांनी त्यासाठी खास परिपत्रक काढून, मराठवाडा - विदर्भातील ११ जिल्ह्यांतील शासकीय शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, 'डाएट' चे प्राचार्य, व केंद्रप्रमुख यांना शिबिरास हजर राहण्याच्या सूचना दिल्या आणि स्वतः ते दोन दिवस येणार असल्याचे जाहीर करून टाकले. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातले जिल्हे वगळण्यात आले होते, कारण तुलनेने या जिल्ह्यांत शैक्षणिक सुधारणांची परिस्थिती बरी आहे.

याचा परिणाम काय झाला असेल याची कल्पना कोणीही करू शकेल. शिक्षणक्षेत्रातील सुमारे ५५० महत्त्वाचे लोक सांगलीत आले. नव्या शिक्षण-कायद्याला धरून अभ्यासक्रमात व अध्यापन पद्धतीत जे बदल होऊ घातले आहेत, त्यांस अनुसरून उपयुक्त सत्रांचे नियोजन शिक्षकांच्या एका गटाने केले. शांतिनिकेतन संस्थेने त्यांची जागा -भोजनगृह व निवासाच्या सोयींसह, उपलब्ध करून दिली. रोटरी क्लबने त्यांच्या 'टीच' योजनेअंतर्गत मदत केली. आमच्या टीमचे सर्व कार्यकर्ते नव्या नव्या कल्पना काढून त्या प्रत्यक्षातही आणत होते. एकूणात अतिशय भव्य, देखणे आणि तितकेच उपयुक्त शिबिर 'नमो ज्ञानाय-२०१५' या नावाने आम्ही घडवून आणले. त्याचा उदोउदो साऱ्या महाराष्ट्रात झाला, यात अतिशयोक्ती नाही. आमचे लुल्ला फाऊंडेशन एकदम एका उंचीवर जाऊन पोचले.

□

याशिवाय आणखी काही कामे आम्ही सहजावारी केली. त्यात सांगली जिल्हा

परिषदेच्या ६० आणि महानगरपालिकेच्या ५०, अशा ११० शाळांतील १ली चे वर्गशिक्षक आणि मुख्याध्यापक यांना वर्षभराच्या त्यांच्या प्रशिक्षणवर्गाचे नियोजन करून दिले, २०१५पासून सलग तीन वर्षे सुमारे २५० शिक्षकांना दरवर्षी सातत्याने प्रशिक्षण देण्याची योजना आहे. त्यातून किमान ५० उत्तम दर्जाचे शिक्षक तयार व्हावेत अशी अपेक्षा आहे. त्या वर्गांसाठी काही शैक्षणिक साहित्यही पुरविले. त्यांनाच तंत्रस्नेही कामकाजाचे प्रशिक्षण दिले. १०वी ११वी च्या मुलामुलींसाठी सायबर क्राईम या विषयाबाबत जागृती करण्याचा प्रयत्न अमोल माने आणि काही ॲडव्होकेट मित्रांच्या मदतीने चालू ठेवला आहे. आतापर्यंत ४० ठिकाणी तो कार्यक्रम झाला. ७वी ते ९वी या वयोगटातील हजारो मुलींसाठी 'कळी उमलताना' हा कार्यक्रम घेण्यात आला. त्या वयातील मुलींच्या आरोग्यासंबधी योग्य ते समुपदेशन त्या कार्यक्रमांतर्गत करण्यात येत असून अनेक शाळांमध्ये ते सौ.मुग्धा अभ्यंकर चालवतात. या कार्यक्रमासाठी अनेक मित्रमैत्रिणी, शिक्षक, आणि सामाजिक कार्यकर्ते यांची फार मदत होत असते. माझ्या या सेवाभावी कार्यामध्ये तेलंग परिवार, विनोद पाटोळे, अनघा पोंक्षे, धनंजय वाघ, लिंबीकाई सर, वैशाली भोसले, मयूर अभ्यंकर आणि इतर बरेचजण सतत संपर्कात असतात.

रोटरी इंडिया लिटरसी मिशनच्या वतीने शिक्षण क्षेत्रात कामगिरी करण्यासाठी 'टीच' आणि 'विन्स' - (Teachers support, E-learning, Adult literacy, Child development, Happy school; आणि Wash In School) अशा दोन प्रकल्पांच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. त्यानुसार यथाशक्ती कामही चालू होते. त्यांचा डिस्ट्रिक्ट ३१७० म्हणजे महाराष्ट्र-गोवा-कर्नाटक या राज्यांचा काही भाग असतो, त्यातील सुमारे १२५ क्लबमध्ये हा प्रकल्प राबवावा अशी त्यांची कल्पना होती. आमच्या फाऊंडेशनच्या वतीने त्याच उद्दिष्टांसाठी काम होत असल्याने त्यांची मदत होणे ओघानेच साधले. मी प्रचंड मेहनत घेऊन अक्षरश: लाखो रुपयांची मदत अनेक शाळांना रोटरी फाऊंडेशनकडून मिळवून दिली आहे. यापुढेही हे प्रयत्न आणखी वेगाने सुरू आहेत. मला आता माझ्यावरच इतका विश्वास वाटतो आहे की, येत्या काही महिन्यातच शासन, सामाजिक संस्था अशा अनेकांकडून कोट्यवधी रुपयांची रक्कम शिक्षण कार्यासाठी मी मिळवू शकेन.

मुंबईच्या 'विवेक' साप्ताहिकाच्या वतीने 'समग्र वंदे मातरम्' हा भक्कम ग्रंथ प्रकाशित केला; त्याच्या कित्येक प्रती विकत घेऊन त्या शाळाशाळांतून देण्यात

आल्या. इतकेच नव्हे तर तो ग्रंथ वाचला जावा, यासाठी त्यावर आधारित निबंधस्पर्धा घेण्यात आली व सुमारे तीन हजार रुपयांची पुस्तके बक्षिसरूपात मुलांना देण्यात आली. 'वंदे मातरम्' ग्रंथ प्रकाशनाच्या समारंभात मा.राज्यपाल विद्यासागर राव यांच्या उपस्थितीत, सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या हस्ते तो ग्रंथ मला मिळाला.

चार पाच वर्षांपूर्वी सांगली जिल्ह्यातील जत भागात दुष्काळ पडला. तिथे अपंग, वृद्ध अशी जी माणसे रोजगाराला जाऊ शकत नव्हती, त्यांच्या शुष्क जीवनात अंकुर फुलविणारी योजना येरळा प्रोजेक्टस् सोसायटीने केली. 'पाषाण पालवी' या नावाखाली मी एक लाख रुपये घातले व त्या योजनेची खूप प्रसिद्धी केली. त्यामुळे देणगीदारांकडून आणखी ३५ लाख रुपये जमा झाले. त्यांतून त्या भागातील सुमारे पाचशे कुटुंबांना सहा महिन्यांचे धान्य-वाणसौदा पुरविता आला. २०१६चा दुष्काळही मोठा होता. यावेळी अनेक गावांत पाणी देण्यासाठी टाक्या, धान्य वगैरे मदत देण्याची गरज होती. मी पहिली मूठ दिलीच, पण सर्वत्र आवाहन करून खूप पैसे गोळा करून दिले. मी आवाहन करावे आणि लोकांनी भरभरून द्यावे असे आता सहजी घडते. इतरांना ते का अवघड वाटावे? मी स्वत: आधी पैसा देतो, प्रत्यक्ष काम करतो, त्यामुळे माझ्या सांगण्याला एक वजन येत असेल. लोकांना विश्वास वाटू लागला की अनंत हस्ताने परमेश्वर देऊ लागतो हे खरे आहे.

याखेरीज एक नवी कल्पना डोक्यात घोळत आहे. भारतातील आदर्श शिक्षणपद्धती कशी असावी, सध्याच्या शिक्षणक्षेत्रातील व्यक्ती आणि पालक यांच्या मनांत समज-गैरसमज काय आहेत, आणि त्यातून मार्ग कसा निघू शकतो... या समग्र विषयावर एक लघुचित्रपट काढावा आणि त्याचा प्रचार-प्रसार सर्वत्र करावा, या दृष्टीने संबंधित तज्ज्ञ मंडळींशी विचारविनिमय सुरू आहे.

□□□

□

# दानं संविभागः

मी माझ्या वानप्रस्थाचे जसे नियोजन केले त्याप्रमाणे माझे काम लुल्ला फाऊंडेशनच्या निमित्ताने चालू झाले, त्यात मी रममाण झालो आहे. एका अर्थी माझ्या व्यवसायातून अंशतः निवृत्तीनंतर माझे काम वाढलेच आहे. सतत व्यस्त राहाण्याची तर मला हौसच होती. आता सामाजिक कामात गुंतून जाण्यामुळे मला त्याचा जास्तच आनंद होत आहे.

साध्या साध्या निमित्ताने स्नेहीजनांचा मेळ जमविण्यात मला खूप आनंद असतो. सामाजिक विषयांची दिशा त्या जवळीकीतून मिळते, निकट परिचय होतात, आणि वेळ छान जाऊन मलाही खूप समाधान मिळते. दरवर्षीच्या दिवाळीत शे-दोनशेच्या मित्रपरिवाराला मी फराळाला घरी बोलावीत असे. ती प्रथा २०१८पर्यंत चालू होती. डॉक्टर्स किंवा अधिकारी बडी मंडळी व कुटुंबियांचे गोतावळे एरवी सहसा घरी येत नाहीत. त्यांना कधीतरी प्रेमाने 'एकदा आमच्या घरी या' एवढेच म्हटलेले असते, ते तेवढ्यावरच राहते. दिवाळीत त्यांना मी खास निमंत्रण देत असे. दिवाळीच्या चकली-लाडूऐवजी छोले, दाल-पक्वान असे खास सिंधी पदार्थ असत. नावीन्य, चव, आग्रह यांमुळे ते पदार्थ सर्वजण चापून खात असत. त्यामुळे मी आणि माझे घर तृप्त होत असे. २०१८ सालच्या दिवाळीपर्यंत आमच्या घरी हा क्रम सुरू होता. त्यानंतरच्या वर्षी माझी पत्नी खूपच आजारी झाली, त्यामुळे खंड पडला. मग कोरोनाच्या वैश्विक महामारीची लाट आली, सगळेच व्यवहार ठप्प झाले. दिवाळी फराळाची ती आनंदपर्वणी मागे पडली. तरीसुद्धा मित्र आणि अभ्यागतांचा खाण्याजेवण्याचा राबता लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आजही चालत राहिला आहे. सुनिता फारशी बाहेर पडत

नसल्याने, सर्वांनी तिला भेटावे हा प्रमुख पण छुपा उद्देश त्यामागे असतो.

या सर्व घडामोडींतून माझ्यावर कौतुकांचा वर्षाव होत असला तरी एका मुद्यावर मात्र प्रश्नचिन्ह उमटत होते असे मलाही जाणवते. आपल्याकडे पूर्वापार दानाविषयी पुष्कळ प्रकारच्या समजुती आणि तत्वेही प्रचलित आहेत. त्यांत तथ्यही आहेच. 'दान सत्पात्री असावे, त्यातून देणाऱ्याला व घेणाऱ्याला समाधान मिळायला हवे, त्यातल्या सामाजिक आशयाला महत्व आहे, ...आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे या हाताने केलेले दान त्या हाताला कळू नये! केलेल्या दानाची कुठे वाच्यता करू नये'.....इत्यादी गोष्टी आपण ऐकत असतो. त्यास अनुसरून कित्येकजण आपापल्या परीने दान देत असतात. मी व्यक्तिगत २०१०पासून दरवर्षी तशी मोठी रक्कम देण्यास सुरुवात तर केलीच होती. दरवर्षी त्यात एकेक लाखाने भर टाकत आता १३ वर्षे पुढे आलो आहे. त्या दानधर्मातून होणाऱ्या कार्याबद्दल मी नेटका प्रचार करतो असे म्हटल्यास चालेल. काही जवळचे मित्र मला याबद्दल स्पष्ट बोलूनही दाखवतात. आपण केलेल्या दानामुळे मनांत कुठेतरी सुखद भावनांचे तरंग उठतील, मनुष्याच्या साधारण स्वभावाप्रमाणे त्यांचे रूपांतर मग अभिमानात होईल, त्यातून गर्व, आणि शेवटी घमेंड वाढेल ही शक्यता असल्यामुळे पूर्वापार आपल्या संस्कृतीने काळजी घेऊन तशी पथ्ये सांगितली असावीत. पण माझे त्या बाबतीत फार वेगळे मत आहे, आणि त्यामुळेच मी माझ्यापुरते वेगळे धोरण ठेवले आहे.

एक तर दानासंबंधी हे संकेत आणि पथ्ये कालानुरूप बदलण्यास काही हरकत नाही. मुळातील तत्वे त्यामुळे बदलणार नाहीत. ठरवून घेतलेल्या गरजांपेक्षा ज्याच्याकडे जास्त आहे त्याने, ज्याला कमी पडते त्यास देऊ करणे हे सामाजिक न्यायाचे मध्यवर्ती सूत्र आहे. अशा देण्याला 'दानधर्म' असे म्हटले. हे धर्माचरण करण्यात लपवून ठेवण्याजोगे काहीही नाही असे मी ठामपणे म्हणतो. आपला धर्म आपल्या दाराच्या आत असावा म्हणून, केलेल्या दानाची वाच्यता कोणी कधी करू नये असे पूर्वकाळी म्हटलेही असेल. पण कर्तव्यधर्माला सामाजिक स्वरूप देण्यात मला काही चूकही वाटत नाही.

ही तत्वचर्चा थोडी बाजूला ठेवून विचार मांडायचा, तर आजच्या काळात सामाजिक कार्यांसाठी आपला हात सढळ करणारे लोक कमी आहेत. मग आपल्यामुळे

त्यांनाही, काहीतरी देण्याची प्रेरणा झाली तर चांगलेच नाही का? मला हेही माहीत आहे की आपल्या समाजात असे काही लोक आहेत, ज्यांची स्थिती अगदी बेताची असूनही त्यांच्याकडे दातृत्वाचा गुण मोठा आहे. पण त्यांच्या मर्यादांमुळेही ते आपल्या त्या मूल्यवान गुणाची वाच्यता करू शकत नसतील. त्यांनी किती दिले यापेक्षा त्यांच्या त्यामागील संवेदना फार मोलाच्या आहेतच! त्यांच्या दानाच्या आणि धर्माच्या कल्पना वेगळ्या असणार. माझ्या मते आपण करतो त्या कामाचे महत्व समाजाला पटविण्यासाठी तेच काम डौलदारपणे मांडावे लागते. त्यांना त्याचे महत्व पटले तर त्यांचा मोठा हातभार लाभू शकतो, मोठे कामही उभे राहू शकते.

स्वतः मलाही माझे चांगले काम लोकांसमोर मांडायला आवडते. ते तसे मांडायचे असल्यामुळे दान व कार्य उत्तमच केले जावे, अशी आपोआपच जबाबदारी येते. माझ्यासोबत काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांवर अशा उत्तम सामुदायिक कामांचा वेगळा प्रभाव पडतो. कामाच्या दिमाखदारपणाचे आणि त्याच्या प्रसिध्दीचे तंत्र आहे. तथापि व्यक्तीपेक्षा कार्याचीच प्रसिध्दी व्हावी. मी माझ्या या कामांची व दान'धर्मा'ची जी काही प्रसिद्धी करू पाहतो, त्यामागे माझाही काही ठाम विचार आहे, इतकेच माझे म्हणणे असते. जोवर मी केलेल्या किंवा करीत असलेल्या कामाची नशा माझ्या डोक्यात घुसत नाही, तोपर्यंत मी त्या प्रसिध्दीकडेही माझ्या कामाचाच एक भाग म्हणून पाहतो. मी मोठा दानशूर म्हणून अनेकजण माझी ओळख करून देताना मला कर्ण, बिल गेट्स अशी उपमा सध्या देत असतात. मी प्रयत्नपूर्वक ते डोक्यात घुसू देत नाही. वित्तेषणा आणि लोकेषणा माणसाला फार घातक असतात असं कित्येक अभ्यासवर्गांत ऐकलेले वाक्य माझ्या मनात ठसले आहे.

रोटरी ही आंतरराष्ट्रीय संस्था आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेतील मुख्य केंद्रातर्फे प्रत्येक ठिकाणच्या शाखांचा कारभार नियंत्रित केला जातो. रोटरी क्लब सांगलीचा मी सोळा-सतरा वर्षे सदस्य आहे. मधली काही वर्षे मी महाराष्ट्र विक्रीकर सल्लागार संघटनेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष अशा महत्त्वाच्या पदांवर असल्यामुळे ती वर्षे मी रोटरीचा सदस्य नव्हतो. गेल्या आठ नऊ वर्षांत मी पुन्हा सदस्यता स्वीकारल्यानंतर रोटरीतील माझे काम वेगळ्या पद्धतीने करायचे ठरवले. रोटरीच्या स्थानिक क्लबपुरते सहभागी होण्यापेक्षा रोटरी डिस्ट्रिक्टपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणे मला

जास्त योग्य वाटले. संपूर्ण देशभर, किंबहुना जगभर त्या त्या क्लबपुरते जे काम चालते ते म्हणजे आठवड्यातून एकदा एकत्र येणे आणि समाजासाठी जी काही छोटी मोठी कामे -स्वतःला थोडेसे अलिप्त ठेवूनच- करणे. मग त्याचे वृत्तांत (रिपोर्टिंग) देणे, त्या कार्यकारिणीने शाबासकी(ॲप्रिसिएशन) मिळवणे वगैरे. व्यक्तिगत म्हटले तर हे आणि एवढेसुध्दा योग्यच आहे, त्यात काही गैर नाही. त्याचे फोटो वगैरे काढून प्रसिद्धी होते. पण दुर्दैवाने सर्व समाजाला असे वाटते की, रोटरीमध्ये फक्त काही उच्चभ्रू लोक एकत्र येतात आणि फोटोसाठी तोंडदेखले काम करतात. माझा एक मित्र कुचेष्टेने म्हणतो की, 'असले क्लब म्हणजे पुरुषांचे महिलामंडळ असते!' ही रोटरीची चुकीची प्रतिमा खोडून योग्य प्रतिमा रुजविण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्यास यश मिळायला काही काळ लागेल.

परंतु डिस्ट्रिक्टपासून आंतरराष्ट्रीय पातळीवर रोटरीचे जे काम चालते ते खरोखरीच प्रचंड मोठे, फार व्यवस्थित आणि साऱ्या समाजाप्रति तळमळीतून चालते. हजारो लोक झोकून देऊन तेथे काम करत असतात. हे लक्षात घेतल्यावर मी बऱ्यापैकी मोठी देणगी रोटरी इंटरनॅशनलच्या माध्यमातून द्यायला लागलो. माझ्या सिंधी वृत्तीचा व्यवहारी विचार असा की, जेवढे पैसे मी घालायचो साधारणपणे तेवढेच पैसे 'रोटरी फाउंडेशन' मदत म्हणून देते. त्यामुळे समाजासाठी, शिक्षणासाठी, वैद्यकीय सेवेसाठी दुप्पट निधी मिळू लागला. इतकेच नाही तर महाराष्ट्र, कर्नाटक-गोव्यापर्यंतच्या रोटरी कार्यकर्त्यांची फळी माझ्या सोबतीला मिळाली. या अर्थाने मला रोटरीमार्फत दान देणे सत्पात्री आणि बिनत्रासाचे वाटते. या सर्व कामास मल्लिकार्जुन बड्डे आणि स्वाती हरकल यांची खूप साथ मिळाली.

म्हणूनच रोटरीला देणगी देताना मी हात आखडता घेत नाही. आवर्जून सांगण्याजोगी गोष्ट म्हणजे गेल्या पाच वर्षांत माझ्या आणि मुलाच्या नावाने खूप मोठी रक्कम रोटरीला दिली. त्यांच्या पद्धतीप्रमाणे रोटरीच्या प्रधान कार्यालयात (इव्हॅन्स्टन, अमेरिका) माझा आणि अमितचा सपत्निक फोटो लावण्यात आला आहे. रोटरी जगतात हे 'आर्च क्लंप सोसायटी मेंबर्स' असे खूप मानाचे मोठे पद समजले जाते. या कामास प्राणेश जहागीरदार यांनी खूप मदत केली.

त्यासोबतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, त्याच्याशी संलग्न संस्था, बुलडाणा बँकेसह

संयुक्तपणे उत्तम दर्जाची शववाहिका आणि स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्यासाठी मोफत वाचनालय, जिल्हा परिषदेचे शैक्षणिक व आरोग्य विषयक प्रकल्प, शिवाय वृद्धाश्रम, गीता परिवार अशा अनेक छोट्या मोठ्या संस्थांना प्रसंगानुरूप काही आर्थिक मदत करीत असतो. सरकारी शाळांमध्ये दर्जा वाढवण्याला प्राधान्य देऊन मी त्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. त्याकरिता शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यशाळा घेणे, पालकांचे समुपदेशन करणे, तरुण मुला-मुलींसाठी कौशल्यविकास कार्यशाळा, मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन वगैरे उपक्रम चालू असतात. यात खरोखरच आनंद मिळत आहे. 'शिक्षण विवेक, पुणे' यांच्या मदतीने दरवर्षी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात 'शिक्षण माझा वसा' नावाचा कार्यक्रम गेली काही वर्षे सुरू आहे. ज्यांनी खरोखरीच काहीतरी वेगळे काम करून दाखवले आहे असे महाराष्ट्रभरातून सहा शिक्षक निवडले जातात. त्यांना खास प्रशस्तीपत्र, रोख रक्कम वगैरे पुरस्काररूपात दिली जाते. दोन तासांचा एखादा चांगला सांकृतिक कार्यक्रम होतो.

मला हल्ली समर्थांच्या दासबोधाचे सामुदायिक जीवनातील महत्त्व पटू लागले आहे. झुकत्या वयामुळे निर्माण झालेल्या आध्यात्मिक ओढीचा कदाचित तो परिणाम असेल. 'सामर्थ्य आहे चळवळीचे' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी दासबोध अभ्यासाची स्पर्धा घेण्याचा विचार असून तशी तयारी सुरू केली आहे. अशा कार्यांसाठी माझा भक्कम आर्थिक पाठिंबा असतो. त्यासाठी मी पूर्वी साठवून ठेवलेले प्लॉट्स आणि जमिनी याच्यातून पुरेसे पैसे उभारत आहे. हे माझे 'व्यसन' पुरविण्यासाठी कुटुंबातून उत्साही प्रतिसाद नाही, परंतु विरोधदेखील नाही.

दुसरा एक विचार अलीकडे डोकावू लागला आहे. मी अलीकडच्या काळात भरपूर पैसे दान करू लागलो. तेव्हापासून, माझ्यापेक्षा ज्यांच्याकडे जास्त पैसे आहेत त्यांच्यात अशी देण्याची दानत का येत नाही असा प्रश्न मनात येतो. उदाहरणार्थ, अनेक राजे महाराजे संस्थानिक आणि जहागीरदार आहेत, त्यांच्या आजच्या पिढ्यांजवळ भरपूर मालमत्ता आहे. त्यांच्या उतारवयातसुद्धा त्या मालमत्ता सोडविण्यासाठी कोर्टकज्जे करण्यात त्यांचा भरपूर वेळ जातो. त्यांनी जर ठरवले की या सर्व केसेस कोर्टातून काढून घ्यायच्या, वाटाघाटी करून सर्व मालमत्ता मोकळ्या करून द्यायच्या, आणि स्वतःसाठी पाच-पन्नास कोटी रुपये ठेवून घेऊन उरलेली हजारो कोटींची संपत्ती

समाजासाठी द्यायची, तर? त्यांचे वाडवडील ज्या राजघराण्यातील होते, त्या प्रदेशासाठी जरी हा पैसा खर्च केला तरी या राजे-जहागीरदारांच्या पुढच्या पिढ्यासुद्धा अजरामर होतील. असे घडताना दिसत तर नाही. कित्येक व्यापारी-उद्योजक यांचे हिशोब, मी कर सल्लागार असल्यामुळे मला ठाऊक आहेत. त्यांनी किती पैसा साठवून ठेवायचा याला मर्यादा नसते. पुढच्या किती पिढ्यांची तरतूद करून ठेवायची!! एवढ्यावर पुन्हा पैशाचा मोह जात नाहीच.

त्यांची प्रचंड श्रीमंती एकीकडे आणि समाजाची अत्यंत गरज दुसरीकडे, यांतील दरी वाढत असते. तो विचार माझ्या मनाला सतावत असतो. एका लग्नाच्या मेजवानीतून भरगच्च जेवून मी बाहेर येत होतो. दाराशी प्रत्येकाच्या हातावर सोनचाफ्याची फुले आणि पेढा ठेवून निरोप देत होते. बाहेर रस्त्यावर उभे राहून दोन बाया आणि त्यांची पोरं हात पसरत होती. हे दोन्ही प्रकार परमेश्वर एकाच वेळी कसे काय घडवू शकतो?

मी जे देतो ते फार मोठे आहे अशातला भाग नाही, पण या बाबतीत मलाच एका ज्येष्ठ मित्राने सांगितले ते अधिक पटले, आणि अस्वस्थ करून गेले. त्याचे म्हणणे असे की, तुमच्याकडे एक कोटी रुपये असतात त्यातले दहा टक्के तुम्ही देता - म्हणजे दहा लाख रुपये देता. ही रक्कम फारच मोठी आहे, पण ज्याच्याकडे शंभर रुपये असतात त्याने दहा रुपये देणे ही जास्त मोठी दानत नाही काय? त्या दहा रुपयांतून फार काही घडणार नाही, पण दानत मापायची ठरवली तर ती कोणाची जास्त?

मनुष्यस्वभाव असाही असतो की, त्याच्या शिदोरीत अर्धी भाकरी असेल तर त्यातलीही चतकोर तो दुसऱ्याला घ्या म्हणतो; पण जवळ दहा पुरणपोळ्या असतील तर तो भुकेल्यासही समोरून हाकलून देतो. याच क्रमाने पुढचा विचार केला तर ज्यांनी स्वतःचे आयुष्यच समाजाला समर्पित केले आहे - पैसा मिळवलेलाच नाही- त्यांची दानत कशी मोजणार आणि त्याचे मोल किती करणार? तुकारामबुवानी स्वतःचे दुकानही घालवले, त्यांना व्यवहार साधलाच नाही. मग त्यांनी समाजाला काही दिलेच नाही असे म्हणून त्यांना दोष देता येईल काय? त्यांचे कार्य मोजण्याच्या काही वेगळ्या मोजपट्ट्या आहेत. मी दिलेल्या देणग्यांमुळे अनेक संस्थांशी परिचय होत असतो, आणि अनेक संस्थांमध्ये मला सन्मान्य पाहुणा म्हणून बोलावले जाते. मी तिथे समयोचित भाषण करून येत असतो. हे कार्यक्रम हल्ली खूप वाढले आहेत.

पण घरी आल्यानंतर मला एकदा पत्नी म्हणाली, ‘तुम्ही जे पैसे देत असता त्याचा तो परिणाम आहे. तुम्ही एक वर्षभर कुणालाही पैसा देऊ नका, मग तुमचे मार्गदर्शन किती लोकांना हवे आहे ते समजून येईल.’ हे ऐकल्यावर मला माझ्या दानधर्माची किंमत समजून आली आणि त्याचे पुन्हा मूल्यांकन करावे असे वाटू लागले.

या सर्व सामाजिक कामांचा माझा व्यापही खूप वाढला आहे. घरचाही व्याप सुरुवातीपासून माझा मीच सांभाळत असतो. कधीतरी प्रसंगाने छोट्यामोठ्या समारंभाच्या वेळी काही काम घरच्या कुणाकडे सोपविलेच तर तेवढ्यापुरती मदत करतात. हा अर्थात त्यांचा दोष नव्हे, किंवा मी तक्रार म्हणून सांगत नाही, तर केवळ वास्तव मांडतो आहे. हा ज्याचा त्याचा पिंड असतो, मला त्यांचा किंचितमात्र त्रास नाही. त्या एकूण कामात व लुल्ला प्रतिष्ठानच्या योजना राबविण्यात मला सौ. मुग्धा व मयुरेश अभ्यंकर यांची खूप साथ मिळत आहे. योजिलेल्या मोठ्या कार्यक्रमांत माझा भाऊ-भावजय, पत्नी-मुले, सुना-नातवंडे, अमेयचे आईवडीलसुद्धा सगळे आनंदाने उपस्थित असतात, हेही सांगायला हवेच ! ऑफीसची जबाबदारी अमित त्याच्या क्षमतेने सांभाळत असतो आणि वकिलीच्या दैनंदिन कामकाजात माझा वेळ खर्च होत नाही. जमिनी खरेदीविक्रीचा व्यवसाय थांबवून पूर्वी घेतलेल्या जमिनींच्या निपटाऱ्याची कामे बऱ्याच जिकीरीची व जोखमीची असतात, ती नरेंद्र यरगट्टीकर यांच्यावर सोपविली आहेत. माझे अन्य सोबती समर्थ असल्यामुळे सामाजिक कामांसाठी मी आता मोकळा राहू शकतो.

सामाजिक कार्याचे मूळ देशनिष्ठेशी निगडीत असते. आपल्याकडे आजकाल सामाजिक बांधिलकीबद्दल खूप बोलले जाते. सर्वत्र असुविधा, असुरक्षितता, अविश्वास भरून राहिल्यासारखे वाटते. अस्वस्थतेचे मूळ देशाविषयीच्या भावनेशी असते. आजच्या काळात - विशेषतः सुशिक्षित मानला जाणारा वर्ग - कमालीचा आत्मकेंद्री झालेला आहे. दुसऱ्यासाठी कुणाला काही करायलाच नको असते. तसेच प्रशासनव्यवस्था पूर्ण ढासळलेली असूनही हा वर्ग त्याबद्दल तक्रार न करता तीच व्यवस्था मुकाटपणी सहन करतो आहे. ‘हे असे चालायचेच’ किंबहुना ‘असेच चालायचे’ या निष्कर्षावर माणसे ठाम आहेत. म्हटले तर हाच वर्ग जाणकार आहे, आजवर ज्या काही सुधारणा, चांगले बदल अथवा कार्ये झाली त्यास हाच वर्ग कारणीभूत आहे. पण मग आता असे

काय घडते आहे की, याच जाणकार लोकांनी इतक्या उदासीनतेचा अनुभव माझ्यासारख्याला द्यावा? त्या वर्गाला कुणीतरी योग्य ती प्रेरणा द्यायला हवी, जागृत आणि जागरूक करायला हवे. ते करणारा कुणी आजच्या काळात नाही हीसुध्दा एक शोकान्तिका आहे. मी माझ्या कामात स्वत:ला गुंतवून ठेवून तसे उदाहरण लोकांसमोर ठेवू शकलो पाहिजे ही आत्यंतिक इच्छा, तीच माझ्या सामाजिक कामांची माझ्यापुरती प्रेरणा आहे.

□□□

□

# लांबत चाललेल्या सावल्या

विश्वविख्यात रशियन साहित्यिक आणि विचारवंत काउंट लिओ टॉलस्टॉय याची एक कथा मला काही ज्येष्ठ मित्रांकडून ऐकायला मिळाली, ती मला मनोमन पटली. अनेकांना ती ठाऊक असली तरी इथे पुन्हा उद्धृत करावी असे वाटते. एका माणसाला पैसे मिळवण्याचा छंद होता. आयुष्यभर खूप स्थावर कमाई करावी असे त्याला वाटत असे. एकदा त्याने देवाची प्रार्थना केली. साक्षात देव त्याच्याकडे आला आणि म्हणाला की, 'तुला हवी तेवढी जमीन मी देईन. तू एक कर. सूर्योदयाला तू चालायला सुरुवात करायची; सूर्यास्तापर्यंत तू जेवढे अंतर पायी कापून परत मूळ जागी येशील तेवढी जमीन तुला मी देईन.' देव अंतर्धान पावला. या सद्गृहस्थाला स्वाभाविकच मोह आवरेना. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून सूर्योदयाला त्याने चालायला सुरुवात केली. जास्तीत जास्त जमीन मिळविण्याच्या नादात तो पहिल्यापासूनच झपाट्याने निघाला. दमून चालणार नव्हते, कारण खूप अंतर चालून पुन्हा मूळ जागी यायला हवे होते. ऊन वाढत चालले तरी न थकता त्याने वेग वाढवला. आणखी आणखी अंतर चालून गेल्यानंतर माथ्यावरचा सूर्य ढळू लागला, तशी त्याला जाणीव झाली. इतकेच अंतर आता परत कापले पाहिजे हे जाणवून त्याने हळूहळू उलट दिशा पकडली. सूर्य अस्ताकडे चालल्यामुळे या माणसाने वेग वाढवला. सूर्यास्तापर्यंत मूळ ठिकाण गाठायला हवे होते म्हणून तो धावत निघाला. त्याला दम लागला पण थकून थांबून चालणार नव्हते. तो जोरात पळू लागला. इतका दमला की त्याला धाप लागली. सकाळी निघालेले मूळचे ठिकाण त्याला काही अंतरावर दिसू लागले. तशा धापत्या अवस्थेत तो आणखी वेगात पळू लागला. आता काही थोडे अंतर राहिले आणि कमालीचा थकून तो धाडकन जमिनीवर पडला. मूळचे ठिकाण

गाठण्याचे त्राण आता त्याच्यात उरलेच नव्हते. सूर्यास्त झाला आणि त्याची उमेद संपली. त्याने भुईला माथा टेकला आणि गतप्राण झाला. लोक जमले. आता त्याचे दफन करणे इतकेच काम बाकी राहिले होते. त्याच्यासाठी केवळ साडेतीन हात जमीन पुरेशी होती.

निवृत्तीच्या वाटेवर असताना ही कथा ऐकल्यावर मी विचारात पडलो. एकूण माझे आयुष्य हे जसे व्यतीत झाले, त्यामुळे मी स्वस्थ समाधानी असायला हरकत नव्हती; पण तसे नव्हते. आता अगदीच गलितगात्र झालेलो आहे असे मुळीच नाही. कामाचा उत्साह अजूनही आहे पण पैलतिरी नेत्र लागल्याप्रमाणे काहीतरी चिंता सतत धुमसत असते. माझ्या अतिशय जवळकीचे, ग्राहक पंचायतीमधील सहकारी भास्कर मोहिते यांचे अत्यंत दुर्दैवी निधन नुकतेच झाले. त्यांना आर्थिक चिंताही भेडसावत होती; पण जिद्दीने आणि नेटाने ते सामाजिक कामात मन रमवत होते. अंतिम समयी त्यांना जगण्याचेही भान नव्हते. हा मृत्यू माझ्या डोक्यात घुमत राहिला. ग्राहक पंचायतीच्या कामातून खूप परिचयाचे झालेले स्नेहांकित अरविंद बोकील हे त्यांच्या अंतकाळी अल्झायमरने ग्रस्त होते. माझे ज्येष्ठ मार्गदर्शक स्नेही अशोकराव तेलंग हे अलीकडच्या दोन-तीन वर्षांत आजारी असतात. हरीपूरला त्यांच्या घरी कधीतरी भेटायला जातो पण त्यांना अस्थिपंजर पडून राहिलेले पाहून परत येताना उद्विग्नता येते. त्यांच्याबरोबर केलेले प्रवास आणि आनंदी हास्यफवाऱ्यांची आठवण येत राहते. माझे जिवलग मित्र म्हणता येतील अशा संडे क्लबचा मित्रसमूह केव्हाही भेटतो, कुठल्याही प्रसंगाला धावत येतो. त्यांच्याही घरच्या काही अडीअडचणींवर गोष्टी होत असतात. सर्वचजण एकमेकाला सांभाळून घेत तीसचाळीस वर्षे आम्ही एकत्र नांदतो आहोत. एकमेकांची एकमेकांना साथसंगत आणि मदत होत असते. माझ्या घरोब्यातले मित्र वसंत आपटे हे कित्येक वर्षे किर्लोस्करवाडीजवळ राहात होते. त्यांच्यामाझ्या घरच्या संबंधांवर, अडीअडचणींवर आणि सुखदुःखांवर बोलणे होत असे. चार वर्षांपूर्वी तेही सांगलीला राहायला आले. या माझ्या मनस्थितीत त्यांच्याशी बोलण्याचा एक आधार वाटतो. बरेच अनुभव दाखले एकमेकास मिळत असतात. माझ्या गत आयुष्याकडे त्रयस्थपणे पाहाण्याचे त्यांतूनच सुचू लागले. त्यांच्या कुटुंबात सर्व काही सुखरूपच असते असे आजवर मला वाटत होते, पण त्यांच्या पत्नीला अलीकडे काही वृध्दत्वाचा त्रास होत असतो. त्यांचा मुलगा आदित्य याच्या संसारात काही झटके-फटके बसले. पण या माझ्या मित्राचे मनःस्वास्थ्य बरेच टिकून राहिले.

आमच्या लग्नाला २८ नोव्हेंबरला २०१५ या दिवशी ३०वर्षे झाली त्या दिवसापासून वानप्रस्थाकडे वाटचाल करण्याची मानसिकता निर्माण होवू लागली. आजच्या काळात गृहस्थी सोडून वनात राहायला जाणे व्यवहारात शक्य नाही. पण गृहस्थाश्रमातून अलिप्त होत हळूहळू बाहेर येणे शक्य आहे. याला मी माझ्यापुरते 'वानप्रस्थ टप्पा २' असे सोयीचे नाव दिले आहे.

गेल्या काही वर्षांत माझी सून गुंजन ही ऑफिसमध्ये यायला सुरुवात झाली. बँकिंग, फायनान्सिंग आणि जीएसटीमध्ये तिने बऱ्यापैकी रस घेतला. परंतु तिची छोटी मुलगी मीरा आणि घरचीही - नाही म्हटले तरी काही - जबाबदारी असल्यामुळे ती फार वेळ देऊ शकत नाही. जी.एस.टी.च्या अभ्यासासोबतच मी आमच्या ट्रस्टच्या माध्यमातून केवळ सामाजिक कामातच लक्ष घालत असतो, अर्थात त्या कामातही माझी व्यावसायिक शिस्त असतेच.

माझी पत्नी सुनीता हिला मधुमेहाचा त्रास होताच, त्यात ती दोन-तीन वेळेला घरातच पडली. मेंदूचा त्रास झाला. 'डायबेटिक फुट'मुळे पायाची मोठी शल्यक्रिया झाली. तिला तीन वेळेला कोल्हापूर येथे मोठ्या रुग्णालयात दाखल करावे लागले. हे सगळे दुखणे सतत चालूच असल्यामुळे तिचे बाहेरचे फिरणे खूप कमी झाले.

मधल्या काळात मला आणि अमित यालाही कोरोनाची लागण झाली. मुंबईतल्या सर्व कुटुंबियांनाही कोरोनाने गाठले. मुलगा अमित हा डॉ. राम लाडे यांच्या विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठानच्या रुग्णालयात सहा दिवस होता. मी मात्र घरीच एकलकोंडीत होतो. याच दरम्यान माझ्या डोळ्यांस रेटीना आणि मोतीबिंदूचे निदान झाले, ती शल्यक्रिया करावी लागली. तरीही डोळ्यांची तक्रार पूर्णतः संपली नाही. पाणी येते, डोळ्यातून जळजळ होत असते. त्याशिवाय प्रोस्टेट ग्रंथीची शल्यक्रिया झाली.

आमच्या मम्मीची प्रकृती वयोमानानुसार तशी ठीक होती. मोठे शरीर हे अनेक व्याधींचे वसतिगृह असते म्हणतात, तसा थोडा प्रकार होता. तिच्या वजनामुळे गुडघे थकले. बसणेउठणे फार कठीण होत गेले. पण तरीही तिचा स्वभाव अखेरपर्यंत तितकाच करारी आणि माघार न घेणारा राहिला. एकदा तिला खूप धाप लागली, वरचा श्वास वर आणि खालचा खाली म्हणतात तशी गत झाली. ताबडतोब तिला सांगलीच्या हृदयतज्ज्ञांकडे नेले. त्यांनी तपासणी केली, त्यावरून फुफ्फुसाचा त्रास आहे, म्हणून दुसऱ्या डॉक्टरांकडे हलविले. तिथे पाच सहा दिवस राहिल्यावर तिसऱ्या

हॉस्पिटलमध्ये जाण्याचा निर्णय झाला. तिथे तीन दिवस उपचार झाले आणि मग कोल्हापूरच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तिथे साधारण पंधरा दिवस राहावे लागले. सर्व डॉक्टरनी मिळून याला 'मल्टिपल डिसीज्' असे गोंडस नाव दिले आणि मग आम्हाला घरी पाठविले. एवढ्या साऱ्यांच्या प्रयत्नांना यश आले, याचे मोठे समाधान झाले. ती सुखरूप घरी आली, पण ते समाधान फार काळ टिकले नाही. त्यानंतर अल्पकाळ तिच्या प्रकृतीची फारशी तक्रार नव्हती. मैत्रिणी आणि निरंकारी पंथाचा दैनिक सत्संग यांत तिचा वेळ छान जात होता. एकदा श्वासोश्वासाच्या त्रासाचे निमित्त होऊन तिला पुन्हा मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले. यावेळी आम्हाला हुलकावणी देऊन मृत्यूने तिला गाठले. आईचे दुःखद निधन झाले. दुर्दैव असे की, वडिलांच्या निधनाच्या घटकेला मी शिर्डीला होतो आणि आईच्या निधनावेळी देखील मी पाठीच्या मणक्याच्या ऑपरेशनमुळे घरीच पडून होतो. दोघांच्या अंत्यसमयी मी त्यांच्याजवळ हजर नव्हतो, याला काय म्हणायचे?

माझा मोठा भाऊ दीपक पहिल्यापासून मुंबईकर असून त्याच्या कुटुंबासह तो तिथे स्थायिक आहे. त्याची मोठी मुलगी अर्पिता विवाहित असून, तो जावई गुजराती ब्राह्मण आहे. धाकटी रिचा; त्या दोघी लेकी खूप बुध्दिमान आहेत. सगळे काही मार्गी लागत होते, तोवर आमच्या कुटुंबात आजारपणाची एक प्रथाच सुरू झाली. दीपक याला अचानक कॅन्सर असल्याचे निदान झाले. किडणीजवळ सुमारे सात सेंटीमीटर आकाराचा गोळा तयार झाला होता. सुदैवाने टाटा हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर विख्यात डॉक्टर श्रीखंडे यांनी शल्यक्रिया केली. पण किती म्हटले तरी ते कॅन्सरचे दुखणे. हिमोग्लोबिन वारंवार कमी होणे वगैरे त्रास सुरू होता. त्याचे वजन पंचवीस किलोंनी कमी झाले. या प्रसंगाने त्याच्या आयुष्याला एक वेगळीच कलाटणी मिळाली. दीपकच्या फर्निचर-व्यवसायात त्याची दुसरी मुलगी रिचा मदत करू लागली. उत्तम पद्धतीने ती तो व्यवसाय सांभाळते. दीपकची मोठी मुलगी अर्पिता, तिने एक छोटी मुलगी दत्तक घेतली. ही बाब मला खूप सुखावून गेली. कारण अशा करुणामय घडामोडीत दीपक व त्याच्या कुटुंबाला फारसा रस नाही असा आम्हा सर्वांचाच समज होता, पण या अर्पिताने तो समज बाजूला करून एक नवा पायंडा पाडला. रिचा हिने पारशी मुलाशी लग्न ठरवले. दीपक त्या तयारीत खूपच आनंदाने गुंतला होता. लग्न दिनांक २३ डिसेंबर २०२३ रोजी दीपकच्या सर्व अपेक्षेप्रमाणे सुखरुप पार पडले.

आमचे सासरे अलीकडे वारंवार आजारी पडू लागले होते. दोन वेळा त्यांनाही रुग्णालयात दाखल करावे लागले. त्यांचे वयही आता झाले होते, माझा भाऊ दीपक आणि वहिनी हेही त्यांचे लेक जावईच असल्यामुळे त्यांची पूर्ण काळजी घेत. परंतु थकलेल्या वयापुढे सर्वांचे इलाज खुंटले आणि १६ नोव्हेंबर २०२३ रोजी ते परलोकी गेले. याच सुमारास अचानक दुधात मिठाचा खडा पडला, दिपकची मोठी मुलगी अर्पिता हिला तोंडातील एका आजाराचे निदान झाले. सासऱ्यांच्या दिवसांचे विधी संपत असतानाच ही धावपळ सुरु झाली. मुंबईच्या एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये आठ डिसेंबरला रोजी ऑपरेशन यशस्वीरित्या पार पडले. या दोन घटनांमुळे नाही म्हटलं तरी लग्न समारंभाच्या तयारीवर दुःखाची छाया जाणवत होती.

□□□

मी वयाच्या सत्तरीकडे चाललो असताना ज्येष्ठ झालो की नाही हे सांगता येत नाही, कारण ज्येष्ठत्व केवळ वयाने येते असे मला मुळीच वाटत नाही. सारा संसार आटोपल्यानंतर उगीच घरात अडकून पडण्यात मला तरी अजिबात रस नाही. तसेच म्हातारपणीच्या तक्रारी सांगत, लोकांच्या कुंपणाची फुले तोडत फिरणे मला जमणार नाही. लुल्ला प्रतिष्ठानच्या नावाने जी सेवाकार्ये मी मनापासून चालू केली आहेत, करतो आहे त्यात रमून जाणे मला फार आनंदाचे वाटते. दिवसांतला माझा बहुतांशी वेळ त्याच कामांत जातो. सेवाभावी काम करणाऱ्या सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांना साहाय्य करण्याच्या निमित्ताने विविध क्षेत्रांतील मोठ्या लोकांच्या भेटी होत असतात. चांगल्या लोकांचे आणि चांगल्या कामांचे संघटन करणे हेसुध्दा आजकाल गरजेचे झाले आहे. कारण समाजात दुष्प्रवृत्ती संघटित होताना, सज्जन शक्तीचा प्रभाव आणि दबाव वाढविणे हा चांगला उपाय ठरू शकतो. त्याच श्रध्देने माझे प्रयत्न चालू आहेत. त्यात मनापासून आनंद आहे.

पैशाची फारशी चिंता नाही. सध्या सोनूची तब्येत हाच तेवढा काळजीचा विषय असतो. डॅडींच्या निधनानंतर एक प्रकारचा पोरकेपणा आला, त्यातून माझ्या वृध्दापकाळाची आणि मुला-नातवंडांची बेगमी झाल्यानंतर अधिकचा पैसा समाजाला अर्घ्यदान म्हणून अर्पण करण्याची बुध्दी परमेश्वराने दिली आहे. हे समाजाचे देणे देऊन जोपर्यंत माझी मालमत्ता संपत नाही, तोपर्यंत साक्षात यमराजाही मला वर नेऊ

शकणार नाही असा विश्वास बाळगून, मावळणाऱ्या प्रत्येक दिवसाला हिशेब देत मी तूर्तास आनंदाने राहात आहे.

गेल्या एक-दोन वर्षांपासून मला आध्यात्मिक प्रवचनेसुद्धा आवडू लागली आहेत. व्हिडिओवर काही आध्यात्मिक बाबा-गुरूंची प्रवचने हल्ली ऐकतो. माझा स्वभाव आतापर्यंत आक्रस्ताळा आणि सतत धांदल करणारा होता, हे मला आता पटू लागले आहे. इतकी वर्षे निकटची माणसे तसे मला सांगत असत, पण मला सर्व गोष्टी झपाट्याने करण्याची सवय आणि आवड असल्यामुळे माझ्या बोलण्यातही ठामपणा असे आणि त्या नादात आवाजही चढा लागत असे. ती आरडाओरड आता कमी झाली आहे असे माझे मलाच जाणवते. मला प्रत्येक गोष्ट काटेकोर आणि बिनचूक व्हावी अशी पहिल्यापासून  सवय असल्यामुळे स्वतःच्याच मनाला त्रासही होत असतो.

माझा मुलगा अमित याच्याबद्दलही थोडे सांगितले पाहिजे. अमित पहिल्यापासून स्वमग्न स्वभावाचा आहे. त्याला काय आवडते, काय रुचते, काय जमते याविषयी तो सहसा इतरांशी चर्चा करत नाही. पहिल्यापासूनच तो मितभाषी आहे. मित्र मैत्रिणींचा घोळका देखील त्याच्या आजूबाजूला फारसा नाही. डॅडींसारखेच आपण बरे आणि आपले काम बरे या स्वभावाने त्याची दिनचर्या सुरू असते. आमचा कर सल्लागाराचा व्यवसाय उत्तम पद्धतीने तो सांभाळतो आहे. अलिकडच्या संगणक युगात इंटरनेटवर सर्वच माहिती एका क्लिकवर उपलब्ध असल्याने सध्याची पिढी पुस्तक हातात घेऊन खूप खोलवर जाऊन अभ्यास करत बसलेली आढळत नाही. अर्थातच अमित देखील याला अपवाद नाही. पिढीतील अंतरामुळे माझ्यासारख्याला हे खटकत राहाते. हे चित्र सार्वत्रिक असल्याने ते स्वीकारण्याशिवाय मला पर्याय नाही अशी गोड समजूत मी सध्या करून घेतो. या आणि अशा अनेक बाबींचा समतोल साधून आम्ही सर्व कुटुंबीय एकत्र नांदत आहोत ही बाब तर आपल्या सभोवतालीच्या जगात दुर्मिळ म्हणावी लागेल. परमेश्वराने प्रत्येकाला घडवताना काही गुणदोष दिलेच आहेत. 'या वस्त्रातें विणतो कोण। एकसारखी नसती दोन।।' हे तर खरेच! हा माझा मुलगा त्याच्या सहचरीशी जुळवून घेत प्रपंच नेटका करेल आणि आमच्या ऑफिसमधल्या कर्मचाऱ्यांतील संघभावनेतून त्यालाही पुढे जाता येईल एवढा भरोसा मी बाळगून आहे.

प्रत्येक कृतिशील माणसाला त्याच्या आयुष्यभरात कामाचा धबडगा रेटून न्यावाच लागतो. त्यातल्या संघर्षात कोणी एकांगी होतात, कोणी चतुर व्यवहारी बनेल बनतात, कोणी अपयशी ठरून स्वत:च्या नशिबाला दोष देत राहातात. मग त्यांचे वाढते वय रुक्ष, हताश किंवा क्रूर आक्रमक होऊन जाते. माझ्या कामाच्या व्यग्रतेमुळे असेल, पण मला तसा प्रसंग कधी आलाच नाही. माझ्या प्रामाणिक प्रयत्नांतून मी कसोशीने व्यवहारी शहाणपण सांभाळले. त्यामुळे रोजच्या जगण्यातले प्रश्न बिकट असले तरी ते हसतखेळत सुटले. चांगले जगण्यासाठी व्यवहार नावाची अल्प लबाडी पुरते. तेवढी करण्याने पापाची टोचणी लागत नाही किंवा पुण्याची मोजणी करावी लागत नाही; असाच मी जगत आलो.

□

आयुष्याची सहा दशके उलटून गेल्यानंतर या काळाचा हा जमाखर्च मांडून झाला. त्याची अखेर शिल्लक काय राहिली, असा एक विचार मला सतत भेडसावत असतो. कधीतरी पहाटे लवकर जाग येते आणि असा विचार तरळत राहातो. ह्या सगळ्या आयुष्याचे एकंदर फलित काय?

आज सगळ्यांचे सारे काही जिथल्या तिथे छान चालू आहे; तरीही समाजाची चिंता मात्र सतत माझ्या डोक्यात घुमत असते. रामदासांप्रमाणे माझ्या अल्पमतीला 'चिंता करितो विश्वाची...' असेच वाटत राहते. साध्या साध्या गोष्टी असतात पण सभोवतीच्या लोकांना त्यातले काहीही कळत नाही, असा माझा एक समज ठाम होत गेला आहे. राहून राहून त्या वास्तवाचे आश्चर्य वाटते. कोणी शिक्षक, मुख्याध्यापक, डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट, स्त्री-पुरुष, तरुण पिढी ... सगळ्यांच्या बाबतीत तो अनुभव येत असतो. त्यांना सतत दोष देऊन स्वतःला शहाणा समजावे असे नाही; पण साध्या साध्या गोष्टी यांना का समजत नसाव्यात आणि समजत असल्या तर ते असे का वागतात-हा प्रश्न राहून राहून पडतो. ते मुद्दाम करतात का, तसेही वाटत नाही. कामाचे नियोजन करणे, त्याची कार्यपद्धती ठरविणे, त्याप्रमाणे प्रत्यक्ष काम करणे आणि त्याचा जमाखर्च मांडणे ही पहिल्यापासून मला सवय आहे. त्याऐवजी भली भली माणसे नियोजन न करता कामाला हात घालतात आणि गोंधळ गडबड घालून कामाचा विचका करतात. कामाची गुणवत्ता, त्याचे प्रमाण, हेतू यांचा त्यांना

काही अंदाज नसतो. वेळ तर कधी कोणी पाळत नाही..... आणि मग सतत रडगाणे म्हणत राहायचे! असा नकारात्मक दृष्टिकोण तयार झाल्याचे सभोवती पाहायला मिळते. त्यातून मग मलाही नैराश्य येते.

कोरोना काळापासून - म्हणजे गेल्या तीन-चार वर्षांत - या विषयावर मी अनेक भाषणे ऑनलाईन पद्धतीने झूमवर केली; ती लोकांना खूप आवडल्याचे लक्षात आले. खूप लोकांनी तसे आवर्जून कळवले. पण ज्यांनी ते कळविले किंवा ज्यांना ते आवडले त्यांच्यात कोणताही बदल झालेला नाही असेच लक्षात येते. मग ही सर्व उसाभर समाजासाठी मी का करायची, असा प्रश्न पडतो. माझे भाषण ऐकून, 'आता यापुढे असे केले पाहिजे, तसे केले पाहिजे' असे माझ्यासमोर हे लोक तात्पुरते बोलतात पण पुन्हा गाडी तिथेच घुटमळते. समाजाची ही मानसिकता बदलणे फार गरजेचे आहे, पण ती कशी बदलायची याचा मार्ग मला तरी सापडत नाही.

धडाडीने काम करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी, काही मोठमोठे उद्योजक, काही नेतेमंडळी आणि सभोवतीची काही निकटवर्ती माणसेसुद्धा माझ्याइतकेच - किंबहुना माझ्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त काम करत असतात आणि तरीही सकारात्मक विचार करू शकतात. ते सर्वजण चार सहा तासच झोपतात आणि उरलेला वेळ सतत काम करत असतात. अर्थातच अशा लोकांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. मग उरलेली सारी माणसे कधी बदलणार? - आणि बदलली नाहीत तर हा समाज, हा देश कशी प्रगती करणार? अशी काहीतरी बिनकामाची उद्विग्नता माझ्या डोक्यात थैमान घालू लागली आहे. रस्त्यांची दुर्दशा, सर्वत्र अस्वच्छता, प्लास्टिकचा वापर, अशुद्ध पाणी.... थोडक्यात म्हणजे संपूर्ण वातावरणाची वाट लागली आहे. या सगळ्याला आपणच कारणीभूत आहोत हे लक्षात येऊनसुद्धा लोक पुन्हा तसेच वागतात. हा सगळा विचार डोके कुरतडत असतो, पण उपाय सापडत नाही. माझ्याप्रमाणे तो कुणालाच सापडत नसावा.

या सर्वांतून एकच गोष्ट महत्त्वाची आणि खरी आहे की, या जगात परमेश्वरानेच विविधता निर्माण केली आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती असतातच. सुखदु:ख तर कोणालाही चुकलेले नाही. बाहेरचे जग सुख आणि दुःखाने भरलेले आहे, हे आता कळू लागले आहे. मग माझ्या मनात उदासीनता दाटून येण्याचे काय कारण? माझ्या मनातील दुःख, हेच बाहेरच्या चडफडी वागण्याचे मूळ असू शकते. सुख किंवा दुःख माझ्या मनातच आहे, ते समतोल राहिले तर बाहेरचे जग मोकळ्या मनाने अनुभवता

येईल, अलिप्तपणाने त्याचा आनंदही घेता येईल. असे दुःख कुढत राहणे हे म्हातारपणाचे लक्षण आहे का?

□

भगवान कृष्णालाही अंत्यसमयी तसा उद्वेगच आलेला होता असे म्हणतात. अर्जुनाची संभ्रमित अवस्था असल्यामुळे त्याला युद्ध करता येईना, लढाईचे भावी दुष्परिणाम उघड दिसत असले तरीही युद्ध करणेच अटळ असे कृष्णाने सांगितले. मी तसाच प्रयत्न करू लागलो आहे. संभ्रमित असलो तरी उद्विग्नता येऊ न देता, दिले कर्म करीत राहणे आणि आयुष्याची अखेर आनंदातच जावी यासाठी प्रयत्न करणे एवढेच आता माझ्या हाती आहे. तो प्रयत्न पुढच्या काळात सतत करीत राहावा एवढेच मी ठरविले आहे.

माझ्या आयुष्याचा आढावा इथवर घेतल्यानंतर एकच मुद्दा शिल्लक राहातो, तो म्हणजे पुढच्या पिढीचा! ज्याने काही कर्तबगारी गाजवलेली आहे त्याला पुढच्या पिढीसाठी वंश वाढावा, घरात मुलगा असावा असे वाटत असते. मी त्या बाबतीत पूर्णतः पुरोगामी आहे असे निश्चितपणे समजावे. अमितला मुलगी झाली, ती माझी नात खूप लाडकी. नव्या काळानुसार तेवढ्यावरच थांबले पाहिजे असेही मला वाटते. तसेच घडले आहे हे माझे समाधान. आमच्या कुटुंबातही कुणाचे त्याबद्दल किंचितही दुमत नाही ही बाब जमेची आहे. झटपट कामे झाली पाहिजेत असा कटाक्ष असल्यामुळे, माझा स्वभाव इतरांवर काम किंवा विचार थोपवण्याचा आहे असे पुष्कळांना वाटते हे मी जाणून आहे. त्याचा त्रास पुढच्या पिढीला होतही असेल. साठीनंतर हळूहळू बाहेरच्या आणि घरच्या व्यवहारांतून दूर व्हावे, अलिप्त व्हावे असे म्हणतात. पण मीच उभ्या केलेल्या व्यवसाय-व्यवहाराच्या पसाऱ्यातून असे पूर्णपणे बाजूला होणे मला साधण्याजोगे नाही. पुढची पिढी ते व्यवहार पेलून धरेल यावरती माझा विश्वास बसत नाही. वानप्रस्थ स्वीकारायचा तर 'जे व्हायचे ते होऊदे, असे म्हणून आपण अलिप्त व्हावे' असे काही मित्रमंडळी आणि वडीलधारी सांगतात पण मला ते अजून तरी पटलेले नाही. कदाचित त्याचा त्रास आणि मानसिक दबाव मुलगा सून, लेक जावई यांच्यावर येत असेलही. त्यातून अजून तरी माझी सुटका नाही असे वाटते. याचा पुढचा टप्पा कसा येणार आहे, मुले मला कितीशी वैतागणार आहेत असा एक

अस्पष्ट विचार अधूनमधून येतो. सून गुंजन ही संसाराला-व्यवहाराला चतुर आहे. मुलगी अमृता तर तिच्या सासरघरची कर्ती झाली आहे. जावई अमेय यालाही पुष्कळदा माझे पटत नसेल. त्याच्या घरी आई-वडील हे शांत स्वस्थ असतात. त्यांच्याशी माझ्या तडफडीची तुलना त्याने केली तर ते चूक नाही.

एकंदरीत दोन पिढीतील विचार-आचारांचे अंतर पुराणकाळापासून कोणाला चुकलेले नाही, इतकेच म्हणून तूर्त तरी आहे हा खटाला पुढे चालवत राहिले पाहिजे. परमेश्वरानेच घडविलेला 'मी' या वयानंतर आता कितीसा बदलणार आहे! परवा एक अभंग समजला. त्यातली,

'ठेविले अनंते तैसेची राहावे ।
चित्ती असो द्यावे समाधान।।'

ही पहिली ओळ मला पटली नाही; पण दुसरी ओळ पटलीच. ती होती -

'वाढल्या उद्वेग दुःखचि केवळ।
भोगणे ते फळ संचिताचे।।''

□□□

मी थकून गेलो आहे असे मुळीच नाही.
तारुण्याच्या किंवा गृहस्थीच्या उंबरठ्यावर
मी जीवनाबद्दल जितका उत्सुक, इच्छुक आणि उत्साही होतो
तितकाच वानप्रस्थाच्या दुसऱ्या टप्प्यावरही आहे.
आयुष्याच्या प्रारंभी काहीतरी ध्येय ठरवून
त्या मर्यादेची एक रेघ मारावी असे म्हणतात;
पण तशी रेघ मला क्षितिजावरच दिसते.
तितके साध्य करणे जमेल असे नाही.
पैसा-यश-संसार हे घरगृहस्थीचे टप्पे मी ओलांडले असल्यामुळे
उरलेले आयुष्य वेगळ्या वाटेवर चालायचे आहे; ते चालायचेच आहे!
आजवरचा हिशोब समाजाला देण्यासाठी ही वेळ योग्य वाटली,
त्याचे परीक्षण कोणीही करू शकेल.

या देशाच्या मातीला जीवन देणाऱ्या सरितांकाठच्या लोकगंगेत
माझ्या आयुष्याचे अर्घ्य द्यायला हवे.....

*जन्मली वेदांसवे जी सिंधु या हृदयान्तरी,*
*कृष्णरूपी वाहते ती संथ जल लहरींपरी*
*मी हिच्या पाण्यात इवला थेंब म्हणुनी खेळलो,*
*घाटावरच्या पायरीची शिळा होउनि राहिलो।।*

□□□

“ आम्ही सिंधी लोक भारताच्या वायव्य प्रांतातून उद्योगी संस्कृतीचा नाइलाजाने त्याग करुन आलो. मला आश्चर्य वाटते की, माझ्या एका छोट्या आयुष्यात परिस्थितीचा एवढा मोठा झोका त्या टोकापासून या टोकापर्यंत कसा काय घेतला गेला? मला भोवळ कधीच आली नाही. श्रध्दा आणि श्रम यांचे दोर दोन्ही हाती मी घट्ट पकडले होते. ”



“ प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य,
सुख-दुखः या भावना
प्रत्येकाच्या अंगी असतात;
पण मी तसा पक्का व्यवहारवादी.
वेळ-श्रम-पैसा हे खर्च करताना,
त्यांतून जास्तीचे काही परत
मिळेल का असा विचार करतो.
त्यात मला चूक वाटत नाही.
या जगातल्या प्रत्येक प्रश्नाला
व्यवहारी उत्तर आहे.
काही प्रसंग असे असतात की असे
का, त्याला उत्तर मिळत नाही.
त्या द्विधा विचारांतून
माणूस प्रगल्भ होत असावा. ”

